जेथें जें जें कांहीं सुंदर म्हणून आढळलें तें सर्व मोठ्या यत्नानें एके ठिकाणीं जमा केलें. मग त्या सर्व सौंदर्यांशाचा मनोहर रांधा करून त्याची एक मनोहर पुतळी रचून अवयवरूपानें तिचे देहांत कोटिशः रत्नें बसविलीं; व याप्रमाणें केवळ देवरूपिणी अशी रत्नखचित स्त्री उत्पन्न केली. आधींच तो विश्वकर्मा, आणि तशांतही त्यानें इतकी मेहनत घेऊन ती निर्माण केली ! तेव्हां रूपानें त्रैलोक्यांतील सर्व स्त्रियांत ती अप्रातिम बनली हें सांगावयास नकोच ! तिच्या उभ्या देहांत बालाग्रप्रायही असें स्थळ नव्हतें कीं, जेथें सौंदर्य लहरा मारीत नव्हतें, किंवा डोळस प्राण्यांची दृष्टि जेथें एकदा गेली असतां कायमचीच चिकटून राहिली नाहीं ! सारांश, ती मदनपुतळी केवळ देहधारिणी लक्ष्मीप्रमाणें जीवमात्राचें मन व डोळे आपणाकडे ओढून घेत होती. त्रैलोक्यामधील सर्व रत्नांतून तिळ तिळ भाग घेऊन विश्वकर्म्यानें तिला निर्माण केलें हें ध्यानांत आणून ब्रह्मदेवांनीं तिला "तिलोत्तमा" हें नांव ठेविलें. मग ती स्त्री ब्रह्मदेवांस वंदन करून हात जोडून नम्रतेनें म्हणाली, "हे प्रजानाथ, आपण मला कोणते कामगिरीसाठीं आज निर्माण केलें ?"

ब्रह्मदेव म्हणाले:—हे तिलोत्तमे, तूं सुंदोपसुंदांकडे जा. कोणीही पाहतांच तुजसाठीं वेडें व्हावें असें हें तुझें रूप आहे. तेव्हां या रूपाचे सामर्थ्यानें, ते उभय दैत्य तुझे दृष्टीस पडतांच तुझ्यावर आसक्त होऊन परस्परांत कलह करतील अशी तजवीज कर.

नारद सांगतात:—धर्मा, ब्रह्मदेवांचें हें भाषण ऐकून, "ठीक आहे, ही कामगिरी मजकडे लागली" असें म्हणून तिलोत्तमेनें प्रथम ब्रह्मदेवाला नमस्कार केला; आणि नंतर ती तेथें बसलेल्या देवमंडळीभोंवतीं प्रदक्षिणा घालूं लागली ! तेथें ब्रह्मदेवाचे उजवे हाताला पूर्वेस तोंड करून महादेव बसले होते. इतर देव डावे हाताला होते, व ऋषिमंडळी तर चहूंकडेच होती. असो, ती सुंदरी जेव्हां त्या मंडळीभोंवतीं प्रदक्षिणा घालूं लागली, तेव्हां देवेंद्र व भगवान शंकर हे, कांहीं झालें तरी हिच्या मागें दृष्टि तरळ होऊं द्यावयाची नाहीं असा निश्चय करून आपलेकडून घट्ट बसले होते; पण, हे राजा, कसला निश्चय आणि कसला इंद्रियजय ! ती वरारोहा जेव्हां प्रदक्षिणाक्रमानें डोळ्यांसमोरून शंकराचे उजवे बाजूकडे वळली, तेव्हां तिचे दर्शनाविषयींची इच्छा अनावर होऊन शंकराला तिला पहाण्याकरितां—ज्याचे डोळे सदा उघडेच आहेत असें—एक दक्षिण बाजूला दुसरें मुख फुटलें. पुढें ती त्याच्या पाठीकडे फिरतांच पश्चिमाभिमुख असें तिसरें मुख फुटलें, व तिनें डाव्या बाजूला वळसा घेतांच उत्तराभिमुख असें एक चौथें मुख फुटलें. हा प्रकार शंकराचा झाला ! इकडे देवेंद्रांना तर मागें, पुढें, बाजूला याप्रमाणें सर्व देहभर रक्तापांग व विशाल असे हजारों नेत्र निर्माण झाले ! या प्रकारें शंकर त्या वेळीं चतुर्मुख बनले, व देवेंद्र सहस्रनेत्र झाले ! इतरांनीं ती तिलोत्तमा फिरेल तसतशी आपली दृष्टि फिरविली ! सारांश, एक ब्रह्मदेव शिवाय करून, तेथें बसलेल्या सर्व महात्म्यांची दृष्टि तिलोत्तमेच्या ठिकाणीं खिळून गेली, तेथून हालेना! असो. असल्या गाळींव मंडळीचीही लुटपुट उडवून देऊन तिलोत्तमा जेव्हां दैत्यांकडे जाण्यास निघाली, तेव्हां 'हिच्या सौंदर्यानें दैत्यवधाबद्दलचा आपला इष्ट हेतु सिद्धीस गेलाच !' असें तेथील सर्व देव व ऋषि मानूं लागले. नंतर, तिलोत्तमा तेथून गेलीसें पाहून ब्रह्मदेवानें तेथें जमलेल्या सर्व देवांना व ऋषिगणांनाही स्वस्थानीं जाण्यास अनुज्ञा दिली !

अध्याय दोनशें बारावा.

—:०:—

सुंदोपसुंदनिधन.

नारद सांगतातः—धर्मा, जगज्जय केल्यामुळें निःसपत्न व निर्भय झालेले ते दैत्य, त्रैलोक्यांतही आपले विरुद्ध कोठें कोणी हालचाल करूं शकणार नाहीं असें पाहून आपणांस कृतकृत्य मानूं लागले. देव, गंधर्व, यक्ष, सर्प, भूपाल व राक्षस या सर्वांजवळील उत्कृष्ट उत्कृष्ट वस्तु हिरावून स्वतांपाशीं आणून ठेविल्यानें ते फार आनंदांत होते; आणि त्यांना कोणीच जेव्हां दडपता नाहींसा झाला, तेव्हां कर्तव्य उरलें नसल्यामुळें ते सहजच आळशी बनले आणि देवांप्रमाणें चैन उडवूं लागले. सुंदर सुंदर स्त्रिया, सुवासिक पुष्पें, सुगंधि द्रव्यें, हरतऱ्हेचे विपुल भक्ष्यभोज्य पदार्थ, व अंतःकरण तृप्त करून सोडणारीं नानाप्रकारचीं उत्कृष्ट पेयें यांच्या सेवनांत दंग होऊन ते अहर्निश अत्यानंदांत लोळूं लागले ! अंतःपुरांत, उपवनांत, पर्वतावर, अरण्यांत—जेथें लहर लागेल तेथें ते अमरांप्रमाणें स्वच्छंद क्रीडा करूं लागले. असा त्यांचा क्रम चालू असतां, एकदा विंध्य पर्वताचे शिखरावर, सभोंवतीं प्रफुल्लित शालवृक्षांची दाटी असून मध्यें समतल पाषाणभूमि आहे, असें एक स्थान शोधून तेथें ते रमणीय स्त्रियांसह क्रीडा करण्याकरितां गेले. आपण उभयतां रमणींसहवर्तमान दिव्य सिंहासनांवर बसले आहेत, भोंवतीं स्वर्गांतील सर्व उपभोग्य वस्तु सिद्ध ठेविलेल्या आहेत, अग्रभागीं सुंदर स्त्रिया वाद्यवादन व नृत्य करीत आहेत, व स्तुतिपूर्ण गीतें गाऊन त्या मोठ्या प्रेमानें दैत्यांची सेवा करीत आहेत, असा तेथें एकच थाट उडून राहिला आहे, इतक्यांत पुष्पें वेंचण्याचे निमित्तानें तिलोत्तमा तेथें आली ! तिनें अंगावर उत्तरीय वस्त्र वगैरे कांहीं न घेतां फार तलम असें एकच रक्तवर्ण वस्त्र परिधान केलें असल्यानें अवयवव्यक्तीमुळें तिचा तो वेष फारच चित्ताकर्षक झाला होता. असला वेष घेऊन, नदीचे कांठीं उगवलेल्या कार्णिकार वृक्षाचीं फुलें वेंचीत वेंचीत ती हळू हळू ते मत्त असुर जेथें बसले होते तेथें गेली. अगोदरच ते मस्तींत आलेले असून उंची मद्यें प्याल्याच्या योगानें ह्यांचे डोळे धुंद व लाल होऊन गेले होते, अशा स्थितींत ती नितंबिनी ह्यांचे दृष्टीस पडली ! मग काय पुसावें ? तिला पहातांच ते उल्लू होऊन आणि आपल्या जागेवरून उठून तिला आलिंगन देण्यासाठीं अति उत्कंठेनें तिजजवळ येऊन खेटले ! त्या वेळीं दोघांचाही काम भडकून उठला असल्यामुळें दोघेही त्या सुंदरीला भोगप्रार्थना करूं लागले. सुंदानें त्या सुभ्रूचा उजवा हात धरला, व उपसुंदानें डावा धरला ! एक तर वरप्राप्तीचा मद, दुसरा शरीरसामर्थ्याचा, तिसरा रत्नादि संपत्तीचा, व चौथा सुरापानानें आलेला ! याप्रमाणें आधींच चार प्रकारच्या मदांनीं उन्मत्त असून तिलोत्तमेला पहातांच कामोत्कंठेनें ते चेवून गेले, आणि मग एकमेकांवर भुंवया मोडूं लागले. सुंद म्हणाला, "उपसुंदा, मी वडील आहें, व ही माझी भार्या आहे; त्या अर्थीं ही तुझी माता आहे, म्हणून तूं दूर हो." उपसुंद म्हणाला, "हें काय बोलणें ? ही माझी भार्या असल्यानें तुला सुनेसारखी आहे, याकरितां तूं हिला स्पर्श करूं नको." मग यानें म्हणावें 'ही तुझी नव्हे—माझी !' त्यानें म्हणावें 'तुझी कोठची ? माझीच !' याप्रमाणें बराच वेळ दोघांची लठ्ठालठ्ठी होऊन, अखेरीस तिच्या रूपानें उन्मत्त झाल्यामुळें आजपर्यंतचें भ्रातृप्रेम व स्नेह सर्व विसरून ते एकमेकांचे कट्टे वैरी बनले, व तिजविषयीं काममोहित होऊन 'हिला मी आधीं भोगणार, मी आधीं, मी आधीं !' असें म्हणत म्हणत त्यांनीं भयंकर गदा उचलून एकमेकांच्या टाळक्यांत हाणि-

त्या व सर्वांग रक्तबंबाळ होऊन आका शांतून तुटून पडलेल्या दोन सूर्यांप्रमाणें ते पराक्रमी बंधु मरून धरणीवर पडले! याप्रमाणें ते पडलेले पहातांच त्या जवळील स्त्रिया व दैत्य यांचा खेद व भय यांनीं थरकांप होऊन तीं सर्व पाताळांत जाऊन दडलीं. नंतर सर्व देव व महर्षि यांसह तेथें येऊन ब्रह्मदेवांनीं निष्कपटपणें तिलोत्तमेची वाहवा करून तिला प्रसन्न मनानें वर दिला कीं, "हे तिलोत्तमे, जेथें जेथें सूर्याची (सूर्यप्रभेची) गति आहे, तेथें तेथें तुझीही गति राहील; व तुझे लावण्याची दीप्ति इतकी उग्र राहील कीं, कोणालाही तुझें रूप पूर्णपणें न्यहाळून पाहवणार नाहीं." याप्रमाणें तिलोत्तमेला वर दिल्यावर, स्वर्गाचें राज्य इंद्राचे स्वाधीन करून देऊन सर्व लोकांचे पितामह ब्रह्मदेव ब्रह्मलोकीं निघून गेले.

नारद सांगतातः—पांडवहो, याप्रमाणें ते सुंदोपसुंद सर्वथा एकचित्त असतांही तिलोत्तमेकरितां संतापून परस्परघाताला प्रवृत्त झाले! म्हणून प्रेमभावानें मी तुम्हांला असें सुचवितों कीं या द्रौपदीसाठीं ज्या योगानें तुम्हा बंधूंत मागेंपुढें वैमनस्य उत्पन्न होऊं शकणार नाहीं, असला कांहीं उपाय वेळींच योजून ठेवा. देव तुमचें कल्याण करो. मजवर तुमचा खरा लोभ असेल तर माझे सूचनेप्रमाणें करा.

वैशंपायन सांगतातः—जनमेजया, ते सर्व बंधु परस्पर प्रेमबद्ध असल्यानें नारदांचा उपदेश त्यांना इष्टच वाटला, व त्या महात्म्यांनीं त्या वेळीं नारद महर्षींसमक्षच असा ठराव केला कीं, "इतउत्तर आम्हांपैकीं कोणीही बंधु द्रौपदीला घेऊन एकांतांत बसला असतां जो दुसरा बंधु त्याशीं नजरानजर करील, त्यानें ब्रह्मचर्यव्रत धारण करून बारा वर्षें वनवास करावा." त्या धर्माचरणी पांडवांनीं याप्रमाणें ठराव केलासें पाहून महर्षि नारद हर्षित होऊन योजिल्या ठिकाणीं चालते झाले. जनमेजया, याप्रमाणें, नारदांच्या सूचनेवरून त्या पांडवांनीं प्रथमच ठराव करून ठेविला असल्यामुळें, द्रौपदीसंबंधानें आपसांत बेबनाव उत्पन्न होण्याचा त्यांच्यावर प्रसंग आला नाहीं.

अर्जुनवनवासपर्व.

अध्याय दोनशें तेरावा.

—:०:—

अर्जुनवनवासनिमित्त.

वैशंपायन सांगतातः—ह्याप्रमाणें परस्परांत ठराव करून, आपल्या शस्त्रप्रतापानें इतर सर्व राजांना जिंकून ते अतुलतेजस्वी नरश्रेष्ठ पांचही पांडव कृष्णेसह त्या इंद्रप्रस्थांत आनंदानें राहूं लागले. कृष्णाही त्या सर्वांच्या अधीन राहून त्यांच्या मनाप्रमाणें वागे. या योगानें, मतंगज व सरोवरयुक्त वनस्थल हीं जशीं अन्योन्याश्रयानें खुलतात, त्याप्रमाणें पांच वीर पतींचे सान्निध्यानें ती द्रौपदी व तिच्या सान्निध्यानें ते पांडव आनंदानें खुलून जात. याप्रमाणें ते महात्मे धर्मानें वागत असतां सर्वच कुरुवंशज क्लेशरहित व सुखी होऊन उत्कर्ष पावले. हे जनमेजया, अशा प्रकारें बरींच वर्षे लोटल्यावर, कोणा एका ब्राह्मणाच्या यज्ञीय धेनु चोरांनीं नेल्या. आपलें गोधन चोरांनीं नेलेंसें पाहतांच तो ब्राह्मण अत्यंत क्रुद्ध होऊन इंद्रप्रस्थास आला, व राजद्वारीं येऊन मोठमोठ्यानें आरडूं लागला कीं, "हे पांडवहो, धावा, धावा; हे अविवेकी, नीच, दुष्ट, चोरटे आमचें गोधन जबरीनें आमचे जवळून हरण करून नेत आहेत. अहो! एखाद्या शांतिनिष्ठ ब्राह्मणापुढलें अन्न कावळ्यांनीं उचलून न्यावें, किंवा वाघाची दरी मोकळीशी पाहून एखाद्या क्षुद्र कोल्ह्यानें निःशंक आंत घुसावें, तशांतलाच हा प्रकार म्हणावयाचा! पांडवहो, धावा! अहो! प्रजांपासून उत्पन्नाचा षष्ठांश घेऊन जो राजा भयापासून त्यांचें रक्षण करीत नाहीं, त्याचे माथीं त्याच्या प्रजांचीं सर्व पातकें येऊन पडतात, असें शास्त्र आहे. बाबांनो, धेनु म्हणजे ब्राह्मणाचें सर्वस्व; ती गेल्यानें ब्राह्मणाच्या सर्व धर्मक्रिया तात्काळ बंद पडतात, व यामुळेंच मी इतका आक्रोश करीत आहें. तस्मात्, माझा हा करुणविलाप ऐकून तरी धावत येऊन मला या संकटांतून कोणी सोडवा रे!"

वैशंपायन सांगतातः—याप्रमाणें अगदीं बाज्यासन्निध येऊन त्या ब्राह्मणानें आकांत मांडिला असतां ह्याचे ते शब्द अर्जुनाचे कानीं पडले. त्याबरोबर त्या महाबाहु धनंजयानें त्या ब्राह्मणाला 'भिऊं नको' म्हणून आश्वासन दिलें; व शस्त्र घेण्याकरितां तो लगबगीनें आयुधागाराकडे चालला. परंतु, राजा, एखाद्या वेळेचा गुण कांहीं चमत्कारिक असतो असें म्हणतात, त्या गोष्टीचा प्रत्यय या वेळीं पूर्णपणें त्या अर्जुनास आला! तो आयुधागाराकडे जातो तों त्याचा ज्येष्ठ बंधु युधिष्ठिर व द्रौपदी हीं त्याच जागीं एकांतांत होतीं! यामुळें अर्जुन मोठ्या पेंचांत पडला. त्याला आंत जातां येईना, आणि शस्त्रावांचून बाहेरही पडतां येईना. बरें, इकडे त्या दुःखित ब्राह्मणानें तर रडून रडून आणि ओरडून ओरडून अर्जुनाला जसें कांहीं सळो का पळो करून सोडलें! यामुळें त्याला मोठी विवंचना पडली. शेवटीं त्यानें मनाशीं असा विचार केला, कीं, "धनहरणामुळें रोदन करणाऱ्या या ब्राह्मणाचें सांत्वन तर आपणास केलेंच पाहिजे. कारण, दुःखित प्रजेची राजानें उपेक्षा करण्यासारखें दुसरें घोर पातकच नाहीं. आज हा ब्राह्मण दाराशीं रडत आला असूनही जर मी याचें रक्षण न करीन, तर आम्हांस मोठें पातक लागेल; आणि रक्षणाचे कामीं सर्व प्रजाजनांचा आम्हां बंधूंवरील विश्वास उडेल. तेव्हां या वेळीं कसलीही अडचण असली तरी ह्या ब्राह्मणाचें रक्षण हें केलेंच पाहिजे. आतां, धर्मराजा एकांतांत असतां त्याची अमर्यादा करून आंत जाणें हें गैर आहे, व त्यामुळें मला बारा वर्षे वनवास भोगावा लागेल हे खरें; पण तेवढ्यानें, रक्षणापेक्षेमुळें ओढवणारे

सर्वांवरचे दुसरे सर्व अनर्थ टळणार आहेत. तेव्हां आतां विचार करीत न बसतां एकदम आंत जाऊन व आयुधें घेऊन ब्राह्मणाचें रक्षण करावें हेंच उत्तम; मग त्याबद्दल मला घोर पातक लागलें, व प्रसंगविशेषीं वनवासांत मरण आलें, तरी पतकरलें. कारण, आपले प्राण खर्ची घालूनही राजानें प्रजारक्षणरूपी धर्म पाळणें हेंच त्याला अधिक श्रेयस्कर आहे."

जनमेजया, ह्याप्रमाणें निश्चय करून अर्जुन आंत गेला; आणि आयुधागारांतून आयुधें व धर्माची आज्ञा घेऊन मोठ्या उत्साहवृत्तीनें तो ब्राह्मणाला म्हणाला, "हे ब्राह्मणा, लवकर मजबरोबर चल, म्हणजे ते परधनेच्छु नीच चोर जोंपर्यंत लांबले नाहींत तोंपर्यंतच आपण त्यांस गांठूं. तूं धीर सोडूं नको. चोरांच्या हातून तुझ्या गाई मी तुला परत देतों. मला ते दुष्ट कोणीकडे गेले आहेत तेवढी वाट दाखव म्हणजे झालें!" असें म्हणून त्या वीर अर्जुनानें लगेच चिलखत अंगावर चढविलें, आणि ध्वजयुक्त रथावर आरूढ होऊन व हातीं धनुष्य घेऊन तो ब्राह्मणानें दाखविलेल्या चोरांवर चाल करून गेला; व बाणांनीं त्या चोरांस जखमी करून त्यांजवळील गाई त्यानें सोडविल्या आणि त्या ब्राह्मणाच्या हवालीं करून त्याला संतुष्ट केलें. नंतर स्वपुरास परत येऊन त्याविषयीं धनंजयानें सर्व गुरुजनांस अभिवंदन केलें, व गुरुजनांनींही त्यास आशीर्वाद दिले. इतकें झाल्यावर तो धर्मराजाला म्हणाला, "हे बंधो, मीं आपणांस एकांतांत पाहिलें, यामुळें मजकडून प्रतिज्ञाभंग झाला. अर्थात् आपले ठरावाप्रमाणें आतां मला बारा वर्षें वनवास करणें प्राप्त आहे. तेव्हां वनवास अंगीकारण्याविषयीं मला आपली आज्ञा असावी."

जनमेजया, अर्जुनाचे तोंडून एकाएकी हे अप्रिय शब्द ऐकतांच धर्मराजा शोकाकुल व दीन झाला; आणि अडखळत अडखळत अर्जुनाला म्हणाला, "अरे, हें तूं काय म्हणतोस? माझें वचन जर तुला प्रमाण असेल, तर, हे निष्पापा, मी काय म्हणतों तें नीट ऐक. माझ्या एकांतांत तूं आलास असें तूं म्हणतोस, पण ह्या गोष्टीला माझें पूर्ण अनुमोदन आहे. तिजबद्दल माझे मनास तिळमात्रही वाईट वाटत नाहीं. अरे, थोराचे एकांतांत शिरल्यानें लहानाचा धर्मलोप होत नाहीं, लहानाचे एकांतांत आल्यानें थोराचा मात्र धर्मलोप होतो. याकरितां, हे महाबाहो, तूं वनांत जाऊं नको. माझा अनादर तूं केला नाहींस, किंवा तुझा धर्मलोपही झाला नाहीं!"

अर्जुन म्हणालाः—दादा, मीं आपलेच मुखांतून असें ऐकिलें आहे कीं, कपटानें धर्माचरण करूं नये. अर्थात्, तुम्ही सुचवितां असले धर्मवाक्यांचे लेपार्थ काढून पळावयाला वाट काढणें हें उचित नाहीं. धर्म म्हटला कीं तेथें सत्यालाच धरून चाललें पाहिजे. याकरितां मी सत्य समजून व या माझ्या आयुधाचीच शपथ घेऊन आपणांस स्पष्ट सांगतों कीं, कसलेंही संकट प्राप्त झालें तरी मी सत्यापासून तिळभरही ढळूं इच्छीत नाहीं.

वैशंपायन सांगतातः—राजा, असें बोलून अर्जुनानें धर्माची अनुमति मिळविली. आणि वनवास अंगीकारून बारा वर्षें वनांत राहण्याकरितां तो निघून गेला.

अध्याय दोनशें चौदावा.

—:०:—

अर्जुनाचा उलूपीशीं समागम.

वैशंपायन सांगतातः—राजा, कुरुकुलाला कीर्तीस चढविणारा तो महाबाहु अर्जुन वनांत जाऊं लागला असतां विद्वान्, वेदवेदांगवेत्ते, व ब्रह्मचिंतन करणारे ब्राह्मण, भिक्षुक, भगवद्भक्त, सूत, पुराणिक, मधुरवाणीनें देवादिकांच्या आख्यानें गाऊन दाखविणारे कथेकरी, ऊर्ध्वरेते ब्रह्मचारी, संन्यासी वगैरे श्रवणसंज्ञक वनौकस

हे सर्व व दुसरे कित्येक मृदुभाषी अनुचर बरोबर असल्यानें, मरुद्गणांनीं परिवेष्टित अशा इंद्राप्रमाणें तो शोभूं लागला. मार्गांत त्यानें कित्येक रमणीय व विचित्र वनें, सरोवरें, नद्या, समुद्र, देश व पवित्र तीर्थें हीं पाहिलीं. नंतर त्यानें गंगाद्वारीं वास्तव्य केलें. राजा, त्या स्थळीं त्या पांडवश्रेष्ठानें जें अद्भुत कर्म केलें, तें ऐक. तो तेथें असतां त्याचे आश्रयावर सर्व ब्राह्मणांनीं अनेक ठिकाणीं अग्निहोत्रें आरंभिलीं. त्याकरितां सर्व तीरावर जागजागीं कुंडें बांधलीं होतीं, आणि जितेंद्रिय व सत्यनिष्ठ ब्राह्मणांनीं स्नानसंध्या करून अग्निप्रबोधन केल्यामुळें त्यांतील अग्नि धडाडले होते. ब्राह्मण हे मंत्रघोषपूर्वक आंत आहुति देत होते, व होमांतीं अग्नीची पुष्पांनीं पूजा करीत बसले होते, अशा समयीं त्या गंगाद्वाराचा देखावा कांहीं अवर्णनीयच दिसत होता. याप्रमाणें वेदींनीं व ब्राह्मणांनीं तें स्थान गजबजून गेलें असतां एके दिवशीं अर्जुन स्नानार्थ गंगेंत उतरला; व स्नान आणि पितृतर्पण करून अग्निकार्य करण्याचे हेतूनें तो गंगेंतून बाहेर पडणार, तों त्याचें रूप पाहून मदनार्त झालेल्या उलूपी नामक नागकन्येनें त्याला एकाएकीं पाण्यांत ओढून पाताळांत नेलें. सुदैवानें तेथें कौरव्य नामक नागाचे घरीं उत्कृष्ट रीतीनें पूजिलेला अग्नि आयताच त्याला आढळला. तेव्हां त्या अग्नींतच अर्जुनानें निःशंकपणें आहुति देऊन आपलें अग्निकार्य संपादिलें; आणि त्या योगानें हुताशन संतुष्ट झाला. नंतर अग्निकार्य उरकल्यावर त्या उलूपीकडे वळून, व गालांतल्या गालांत हसून तो तिला म्हणाला, "हे कल्याणि, हें तूं काय साहस केलेंस? हे सुभगे, हा देश कोणाचा? तूं कोण? व कोणाची कन्या? सुंदरी, हें सर्व मला सांग."

उलूपी म्हणाली:—ऐरावतकुलांत उत्पन्न झालेला कौरव्य नांवाचा नाग आहे, त्याची मी कन्या. माझें नांव उलूपी. तूं स्नानाकरितां गंगेंत उतरला असतां तुला पहातांच मी मदनाकुल झालें. हे निष्पापा, मला अद्यापि दुसऱ्या पुरुषाचा स्पर्श नाहीं, व तुझ्या पायीं हा मदन मला पीडा देत आहे! तर तूं आपला देह माझे कामीं लावून मला आज संतुष्ट कर!

अर्जुनानें उत्तर दिलें:—हे कल्याणि, तूं म्हणतेस तें नीट आहे, परंतु मी स्वतंत्र नाहीं;—मी धर्मराजाच्या अधीन असून त्यानें बारा वर्षेंपर्यंत ब्रह्मचर्य पाळण्याची मला आज्ञा केली आहे. हे जलचारिणि नागकन्ये, खरें पुसशील तर तुझ्यासारख्या सुंदरीला संतुष्ट करण्याला मी तयार आहें. परंतु मी धर्माज्ञा स्वीकारून चुकलों आहें, व ती मला मोडितां येत नाहीं. कारण, मी आजपर्यंत कोणत्याही कारणास्तव अनृत बोललों नाहीं. तस्मात्, हे नागकन्ये, तुझी इच्छा तर पूर्ण व्हावी, आणि मजवर खोटेपणा येऊन माझी धर्महानि होऊं नये, अशी कांहीं तरी तोड काढ!

उलूपी म्हणाली:—हे पांडुपुत्रा तूं पृथ्वीपर्यटन कां करीत आहेस, वडील भावानें तुझे गळ्यांत ब्रह्मचर्य कां बांधिलें, तें सर्व मी जाणतें. द्रौपदीशीं एक बंधु एकांतांत असतां चुकून सुद्धां दुसरा तेथें प्रवेश करील तर त्यानें बारा वर्षें वनांत ब्रह्मचर्यानें काढावीं. असा तुमचा परस्पर करार आहे. परंतु हें ब्रह्मचर्य केवळ द्रौपदीसंबंधानें होय. कारण तिच्याकडे अकालीं दृष्टि टाकिल्याबद्दल बारा वर्षेंपर्यंत तिचा उपभोग अपराधकर्त्यास मिळूं नये, हा या करारांचा तात्पर्यार्थ आहे. तस्मात्, या ब्रह्मचर्याचें पालन द्रौपदीपुरतेंच आहे. इतर स्त्रियांसंबंधानें नाहीं हें उघड दिसतें. यासाठीं माझे अंगीकारानें तुझा व्रतभंग होत नाहीं, हें सिद्ध झालें. शिवाय, हे कमलनयना अर्जुना, मी अगदी मदनार्त झालें आहें; आणि आर्ताचें परित्राण करणें हा राजधर्मच आहे. तेव्हां या दृष्टीनें पहातां मदनपीडेपासून माझें त्वां संरक्षण केल्यानें तुजकडे अधर्म

येत नाहीं. बा अर्जुना, या कृतीनें थोडा तरी धर्माला बाध येईल असेंही तुला वाटत असलें, तरी मी तुला सांगतें कीं, तेवढा दोष माझें मनोगत पूर्ण करून, मला जिवंत राखिल्याच्या पुण्यानें निवृत्त होईल. पार्था, तुझ्या ठिकाणीं माझी अनन्य भक्ति आहे; व भक्ताची उपेक्षा करूं नये असें सज्जनांचें मत आहे. यास्तव, पार्था, तूं या दासीचा अंगीकार कर; असें न करशील तर मी खचीत वांचणार नाहीं! हे महाबाहो, दीन, अनाथ अशांचें तूं सदासर्वदा संरक्षण करितोस, असा तुझा लौकिक आहे, मग मजपुरतीच तूं इतकी ओढाताण कां मांडिली आहेस? अरे! माझें प्राणरक्षण करून प्राणदान दिल्याचें अनुपम पुण्य तूं गांठीं बांध. हे पुरुषोत्तमा, मी तुला आज शरण आलें असून, मदनपीडेनें गांजून गेल्यामुळें धाय मोकलून रडत आहें, इकडे लक्ष दे. मी काय करूं? तूं दृष्टीस पडतांच माझ्या शरिरांत या मदनानें जसा कांहीं पेट घेतला आहे; आणि म्हणूनच मी तुझ्या इतक्या विनवण्या करीत आहें! तस्मात् कृपाळू होऊन तूं आपला देह मला वाहून माझ्या मनासारखें कर!

वैशंपायन सांगतातः—याप्रमाणें त्या नागकन्येनें गळ घातली, तेव्हां तिचें म्हणणें धर्माला धरूनच आहे असें पाहून तो प्रतापी अर्जुन त्या रात्रीं तिचेच महालांत राहून तिच्या इच्छेप्रमाणें वागला; व सूर्योदय होतांच तेथून उठून पुनः गंगाद्वारीं आला. मग त्याला तेथें सोडून ती साध्वी उलूपी आपल्या घरीं गेली. जाण्यापूर्वी, 'तूं जलांत सर्वत्र विजयी होऊन, सर्व जलचर तुला वश रहातील!' असा तिनें अर्जुनास वर दिला.

अध्याय दोनशें पंधरावा.

—:०:—

अर्जुनचित्रांगदासमागम.

वैशंपायन सांगतातः—राजा, गंगेंतून बाहेर आल्यावर, झालेला सर्व प्रकार ब्राह्मणांस सांगून तो इंद्रपुत्र अर्जुन हिमालयाकडे गेला. नंतर अगस्त्यवटाला जाऊन तो वसिष्ठ पर्वतावर गेला. नंतर भृगुतुंग नामक तिर्थाचे ठिकाणीं त्यानें आपलें पाप प्रक्षालन केलें, आणि हजारों गाई व घरें ब्राह्मणांस दिलीं. मग हिरण्यबिंदु तीर्थांत स्नान करून बरींच पुण्यस्थानें त्यानें अवलोकन केलीं. याप्रमाणें हिमालयाची बाजू घेऊन नंतर तो भारतश्रेष्ठ मनुजोत्तम अर्जुन पूर्वेकडील मुलूख पाहण्यासाठीं निघाला. वाटेंत त्या कुरुश्रेष्ठानें क्रमानें एकेक तीर्थ पाहिलें. प्रथम त्यानें नैमिषारण्य व रमणीय उत्पलिनी नामक नदी पाहिली; व पुढें नंदा, अपरनंदा, कौशिकी, महानदी, गया व गंगा हीं तीर्थें पाहिलीं. याप्रमाणें अनेक तीर्थें व पुण्याश्रम यांचें दर्शन घेऊन त्यानें आपलें पाप क्षालन केलें, व ठिकठिकाणीं ब्राह्मणांस अनेक गाई दिल्या. अंग, वंग, कलिंग या देशांत जेवढीं म्हणून तीर्थें व पवित्र स्थानें होतीं, तीं सर्व त्यानें यथाविधि पाहिलीं, व ब्राह्मणांना दक्षिणा वांटली. मग कलिंग राष्ट्राची सीमा ओलांडून तो जेव्हां पुढें जाऊं लागला, तेव्हां त्याच्या बरोबरचे ब्राह्मण त्याला पुढें जाण्याची अनुज्ञा देऊन परत फिरले. ब्राह्मणांची अनुज्ञा मिळाल्यावर तो पराक्रमी कुंतीपुत्र शेलके सोबती बरोबर घेऊन सागरतीराकडे चालला. मार्गातील रमणीय क्षेत्रें व वनें पहात पहात तो समर्थ पांडव तपस्वीजनांनीं शोभायमान अशा महेंद्र पर्वताशीं आला. त्या पर्वताचें दर्शन घेऊन नंतर तो समुद्रकांठीं आला; आणि मग तसाच कांठाकांठानें जात जात मणिपूरचे राज्यांत शिरला.

तेथील सर्व तीर्थें व पुण्यस्थलें अवलोकन करून नंतर तो तेथील राजाच्या भेटीस गेला. त्या मणिपूरेश्वराचें नांव चित्रवाहन होतें. तो मोठा धर्मज्ञ होता. त्याला चित्रांगदा नांवाची एक सुंदर कन्या होती. ती त्या राजधानीत स्वच्छंद हिंडत असतां अर्जुनाचे दृष्टीस पडली. चित्रवाहनाच्या मुलीला पाहतांच त्या वरारोहेवर अर्जुनाचें मन बसलें. मग तो तसाच तिच्या बापाकडे गेला व आपल्या आगमनाचें प्रयोजन सांगून तो त्याला म्हणाला, "राजा, मी थोर क्षत्रिय आहें, याकरितां तुझी ही कन्या मला दे." तें ऐकून राजानें त्याला विचारिलें. "तूं कोणाचा पुत्र? तुझें नांव काय?" अर्जुनानें उत्तर दिलें, "मी कुंती व पांडु यांचा पुत्र असून मला धनंजय म्हणतात." तें ऐकून चित्रवाहनानें त्याला सौम्य शब्दांनीं आपली हकीकत सांगितली

चित्रवाहन म्हणाला:—हे धनंजया, आमच्या कुलांत प्रभंजन नांवाचा एक पूर्वज होऊन गेला. त्याला पुत्र नव्हता, म्हणून त्यानें पुत्रार्थ उत्तम तप केलें. त्याच्या उग्र तपानें पिनाकधारी देवाधिदेव उमापति शंकर प्रसन्न होऊन त्यांनीं 'तुझ्या वंशांत एकच अपत्य होत जाईल,' असा त्याला वर दिला; व त्याप्रमाणें तेव्हांपासून आजपर्यंत आमच्या या कुलांत माझ्या सर्व पूर्वजांना एक एक पुत्र झाला. परंतु मला ही कन्याच झाली आहे. आतां दुसरें अपत्य होणें शक्य नसल्यामुळें हिच्या द्वाराच माझी संतानवृद्धि होणार असें पाहून, हे नरश्रेष्ठा, मी हिला 'हा माझा पुत्रच' असें समजत असतों. हिच्या संततीवांचून माझ्या वंशाचें दार उघडें राहण्यास दुसरा मार्ग नसल्यानें हिचा पुत्र आपण घ्यावा या हेतूनेंच मीं ही राखून ठेविली आहे. तस्मात् तुजपासून हिचे ठायीं जो प्रथम पुत्र होईल, तो या कन्येची किंमत म्हणून माझे वंशवृद्ध्यर्थ मला देणें तुला कबूल असेल, तर या अटीवर ह्या कन्येचा तूं अंगीकार कर.

वैशंपायन सांगतात:—राजा, हें त्याचें भाषण ऐकून अर्जुनानें ती अट पतकरून ती राजकन्या पदरांत घेतली, व तिच्या समागमें तो तीन वर्षे त्या राज्यांत राहिला असतां त्याच्यापासून तिला मुलगा झाला. नंतर तिला दृढालिंगन देऊन तिचा निरोप व तिच्या बापाची अनुज्ञा घेऊन तो कुंतीपुत्र अर्जुन पुनः देशपर्यटनाला निघाला.

अध्याय दोनशें सोळावा.

—:०:—

वर्गा नामक अप्सरेचा उद्धार.

वैशंपायन सांगतात:—नंतर तो भारतश्रेष्ठ अर्जुन तपस्वीजनांनीं सुशोभित अशा दक्षिण समुद्राचे तीरावरील पवित्र तीर्थांना गेला. तेथें पूर्वी तपस्वीजनांनीं व्याप्त होत असलेलीं पांच तीर्थें अलीकडील तपस्व्यांनीं वर्ज्य केलीं होतीं. त्या तीर्थांचीं नांवें अगस्त्यतीर्थ, सौभद्रतीर्थ, अत्यंत पवित्र असें पौलोमतीर्थ, अश्वमेधफल देणारें व स्वच्छ जलानें युक्त असें कारंधमतीर्थ, आणि पांचवें पापनाशक असें भारद्वाजतीर्थ. हीं पांचही तीर्थें धर्मशील मुनिजनांनीं वर्जित असून इतर कोणीही त्यांकडे जात नाहीं असें पाहून अर्जुनानें हात जोडून त्या तपस्व्यांना प्रश्न केला कीं, "आपल्यासारख्या ब्रह्मनिष्ठांनीं हीं तीर्थें वर्ज्य केलीं आहेत याचा हेतु काय?" त्यावर तपस्वी म्हणाले, "हे कुरुनंदना, या तीर्थांत पांच सुसरी आहेत, व कोणी स्नानास उतरलें असतां त्या त्यास आंत ओढून नेतात; म्हणून हीं तीर्थें वर्ज्य केलीं आहेत."

वैशंपायन सांगतात:—राजा, तपस्व्यांच्या मुखांतून हा वृत्तांत ऐकून, ते निवारण करीत असतांही तो महाबाहु अर्जुन तीं तीर्थें पाहण्यासाठीं

गेला. प्रथम तो शूर सौभद्रतीर्थास गेला, व आंत बेधडक उडी टाकून त्यानें स्नान केलें! इतक्यांत पाण्याच्या तळाशीं एक भयंकर सुसर होती तिनें त्या पुरुषव्याघ्राचा पाय धरला. तेव्हां तीं झटपट करीत असतांच तिला पकडून तो बलिश्रेष्ठ अर्जुन पाण्याच्या बाहेर आला. परंतु, राजा, अर्जुनानें बाहेर काढतांच ती सुसर सर्व अलंकारांनीं भूषित, सौंदर्यसंपन्न व लावण्याची केवळ पुतळीच अशी एक मनोहर व शुभलक्षणी स्त्री झाली. हा अलौकिक चमत्कार पाहून कुंतीपुत्र धनंजयाला फार आनंद झाला; आणि त्यानें मोठ्या प्रसन्नतेनें तिला विचारलें, " हे शुभांगि, तूं कोण आहेस ? आतांपर्यंत तूं जलचर कां होतीस ? आणि असली नीच योनि प्राप्त होण्यासारखें तुझ्या हातून कोणतें पाप घडलें होतें ? "

त्या स्त्रीनें उत्तर दिलें:—हे महाबाहो, मी पूर्वी देवांच्या उद्यानांत विहार करणारी एक अप्सरा होतें. कुबेराची मजवर सदैव प्रीति असे. माझें नांव वर्गा. माझ्या दुसऱ्या चार मैत्रिणी होत्या. आम्ही सर्व शुभलक्षणी असून वाटेल तिकडे संचार करण्यास समर्थ होतों. एकदा त्या माझ्या सख्या व मी अशा सर्वजणी कुबेराच्या वस्तीकडे चाललों असतां वाटेंत एक उग्र तपस्वी ब्राह्मण आमच्या दृष्टीस पडला. तो मोठा रूपवान असून वेदाध्ययन करीत होता. त्याला एकांतांत राहण्याची फार आवड होती. धनंजया, त्या प्रदेशांत तो केवळ सूर्याप्रमाणें प्रकाशत असून तें सर्व वन त्याच्याच तपस्तेजानें जसें काय भरून गेलें होतें. त्याचें तें उत्कृष्ट रूप व परम उग्र तप पाहून, त्याच्या तपाला विघ्न करण्याच्या इच्छेनें आम्ही तेथें उतरलों, आणि मी, सौरभेयी, समीची, बुद्बुदा व लता ह्या अशा पांचजणीही एकाच वेळीं त्या ब्राह्मणाजवळ गेलों. मग तेथें हास्य, विनोद, गायन वगैरे करून आम्हीं त्या ब्राह्मणाला मोहित करण्याविषयीं यत्न केला; परंतु, हे वीरा, त्यानें आमच्याकडे मुळींच लक्ष दिलें नाहीं! आणि निर्मळ अशा तपाचे ठिकाणीं स्थिर असणारा तो महातेजस्वी पुरुष आपल्या निग्रहापासून केंसभरही ढळला नाहीं! मात्र आमच्या चेष्टांनीं क्रुद्ध होऊन त्या ब्राह्मणानें ' तुम्ही शतसंख्य वर्षें मगरी होऊन पाण्यांत पडाल ! ' असा आम्हांस शाप दिला.

अध्याय दोनशें सतरावा.

—:०:—

उश्शापकथन.

वर्गा म्हणाली:—हे भारतश्रेष्ठा, तो शाप ऐकून आम्हां सर्वजणींची पांचावर धारण बसली. तेव्हां आम्ही त्या अढळ तपोनिधीला शरण जाऊन म्हणालों, " हे भगवन्, रूप, यौवन व मदन ह्यांनीं मत्त झाल्यामुळें आम्हांकडून अयोग्य वर्तन झालें; पण आपण क्षमाशील ब्राह्मण आहां, तेव्हां आम्हांस क्षमा करावी. हे तपोनिधे, आपण जितेंद्रिय असतांही आपल्यासारख्याला मोहांत पाडण्याची इच्छा धरून येथें येऊन आम्ही फजित झालों, हेंच आम्हांला मरणाहून मरण झालें आहे! महाराज, धर्मवेत्त्यांच्या दृष्टीनें स्त्रिया ह्या वधास योग्य नाहींत. याकरितां आपण धर्माकडे लक्ष देऊन आपची हिंसा करण्याचें मनांत आणूं नका. हे धर्मज्ञ, ब्राह्मण हा सर्व भूतांचा मित्र आहे असें म्हणतात. ज्या अर्थीं आमची एवढीच विनंती आहे कीं, ज्ञात्यांचें हें म्हणणें आपण खरें करावें. जे थोर आहेत ते शरणागतांचें पालन करीत असतात, आणि आम्हीही ज्या अर्थीं आपणांस शरण आलों आहों, त्या अर्थीं आम्हांस क्षमा करणें हेंच आपणांस सर्वथा उचित आहे. "

वर्गा पुढें सांगते:—हे कुरुकुलावतंसा, ब्राह्मण

म्हणाला, " अप्सरांनो, तुम्ही ज्या अर्थी मला शरण येऊन इतकी विनवणी करीत आहां, त्या अर्थी माझ्या शापांत योजिलेला शत शब्द ह्याचा अनंत असा अर्थ न करितां केवळ शंभर एवढाच अर्थ मी ठरवितों. बाकी इतर वेळीं शत, शतसहस्र इत्यादि शब्द अनंत या अर्थानें योजिले जातात. असो; तुम्ही सुसरी झाल्यावर, ज्या वेळीं पाण्यांत उतरलेल्या पुरुषाला पकडीत असतां कोणी पुरुष तुम्हांला पाण्यांतून ओढून भूमीवर घेऊन येईल, त्या वेळीं तुम्हां सर्वजणींना पूर्वीचें दिव्य रूप प्राप्त होईल. आजपर्यंत थट्टेमध्येंही मी कधीं अनृत बोललों नाहीं, त्या अर्थीं माझा शाप मुळींच अनृत होणें शक्य नाहीं; असो, ज्या तीर्थांमध्यें तुम्ही सुसरी होऊन पडाल, तीं सर्व तीर्थें तुम्ही मुक्त झाल्यावर ' नारीतीर्थें ' या संज्ञेनें प्रसिद्ध होऊन मोठमोठ्या विवेकी पुरुषांच्याही चित्तशुद्धीला साधनीभूत होतील ! "

वर्गा म्हणाली:—हे वीरा, नंतर त्या ब्राह्मणाला अभिवंदन करून व प्रदक्षिणा घालून तेथून आम्ही निघालों; व आम्हांस पुनरपि पूर्वरूप प्राप्त करून देणाऱ्या पुरुषाची अल्प काळांतच आमची गांठ कोठें व कशी पडेल या विवंचनेंत आम्ही पडलों. इतक्यांत महाभाग देवर्षि नारद आमचे दृष्टीस पडले. त्या अमिततेजस्वी देवर्षींना पाहून आम्हांस फार आनंद झाला. मग आम्ही त्यांस अभिवंदन करून व लाजेनें मान खालीं घालून उभ्या राहिलों. तें पाहून नारदांनीं आम्हांस आमच्या दुःखाचें कारण विचारिलें; व आम्हींही तें त्यास इत्थंभूत निवेदन केलें. तें ऐकून नारद म्हणाले, " दाक्षिणसमुद्राच्या तीराला पवित्र व रमणीय अशीं पांच तीर्थें आहेत, तेथें तुम्ही त्वरित जा. त्या ठिकाणीं शुद्धात्मा पुरुषश्रेष्ठ धनंजय लवकरच प्राप्त होऊन तुम्हांस या दुःखांतून निःसंशय सोडवील." हे वीरा, त्या महर्षींचें वचन ऐकून आम्ही सर्वजणी या ठिकाणीं निघून आलों, आणि आज तूं माझी सुटका केल्यानें नारदांचें वचनाचा मला पूर्ण प्रत्यय आला आहे. आतां माझ्या त्या चार सख्या अजून या जलांतच आहेत, तर, हे वीरा, त्या सर्वांचाही उद्धार करण्याचें तूं श्रेय जोड.

वर्गेच्या मैत्रिणींचा उद्धार.

वैशंपायन सांगतातः—राजा, नंतर त्या धीरानें सर्वजणींना शापापासून मुक्त केलें. मग तीर्थांतून बाहेर आल्यावर आपआपलीं रूपें घेऊन त्या पूर्वीप्रमाणें अप्सरा झाल्या !

चित्रांगदेची समजूत.

असो; ह्याप्रमाणें तीं पांचही तीर्थें पावन करून व त्या अप्सरांना स्वस्थानीं जाण्याची अनुज्ञा देऊन तो वीर्यशाली अर्जुन पुनः एकवार चित्रांगदेला भेटण्यासाठीं मणिपुरास गेला. त्या चित्रांगदेच्या ठिकाणीं त्याला झालेल्या पुत्राचें नांव बभ्रुवाहन असें ठेविलें होतें. त्याला पाहून अर्जुन चित्रवाहनाला म्हणाला, "राजा, हा माझा पुत्र बभ्रुवाहन चित्रांगदेचें मूल्य म्हणून ठरावाप्रमाणें मी तुला अर्पण करीत आहें. याचा तूं स्वीकार कर, म्हणजे मी तुझ्या ऋणांतून मुक्त होईन." असें राजाला सांगून तो पांडव चित्रांगदेला म्हणाला, "हे भद्रे, देव तुला सुखी राखो. बभ्रुवाहनाचें पालनपोषण करीत कांहीं काळ तूं येथेंच रहा. कांहीं काळानें तूं माझ्या इंद्रप्रस्थ नगरीला अनायासें येशील व मग आपण तेथें आनंदांत राहूं. हे निर्भके, इंद्रप्रस्थास आल्यावर माझी माता कुंती, युधिष्ठिर, भीम हे दोघे वडील आणि नकुल सहदेव असे दोघे धाकटे बंधु, व माझे इतरही संबंधी तुझ्या दृष्टीस पडतील, आणि त्या सर्वांच्या संगतींत तुझा काळ मोठ्या सुखानें जाईल. हा योग कसा घडून येईल म्हणशील तर, माझा सत्यनिष्ठ व धर्मशील असा

ज्येष्ठ बंधु राजा युधिष्ठिर सर्व पृथ्वी जिंकून राजसूय यज्ञ आरंभील, त्या वेळीं, नृप म्हणून जेवढ्यांना संज्ञा आहे ते सर्व राजे अनेक रत्नें घेऊन तेथें येतील व त्यांमध्यें तुझा बाप चित्रवाहनही येईल, त्याच्याबरोबर पित्याची सेवा करण्याच्या मिषानें तूं तेथें ये, म्हणजे आपल्या भेटी होतील. हा निश्चय मनांत ठेव, आणि कोणत्याही प्रकारें दुःख करूं नको. हा बभ्रुवाहन तुझा पुत्र असें तुला वाटत आहे, परंतु हा माझा केवळ शरिराबाहेर फिरणारा प्राणच आहे; यासाठीं तूं याला फार काळजीनें जतन कर. हा कुलदीपक होईल. हा पौरवनंदन बभ्रुवाहन तुझ्या बापाचा धर्मानें वारस असून शिवाय आम्हां पांडवांचा आवडता पुत्र आहे. याकरितां याला जिवापलीकडे जतन कर. हे निष्पापे, माझा विरह होत आहे म्हणून तूं खेद करूं नको."

असो. पुढें तो पुत्र राजास अर्पण करून व चित्रांगदेची याप्रमाणें समजूत घालून, जेथें घोर पातकी मनुष्यालाही शाश्वतपदप्राप्ति होते, व ज्याच्या केवळ दर्शनानेंच मुक्तिलाभ होतो, त्या शंकराच्या आदिस्थानभूत गोकर्ण नामक तीर्थाकडे जाण्यास तो पराक्रमी अर्जुन निघाला.

अध्याय दोनशें अठरावा.

—:o:—

अर्जुनश्रीकृष्णभेट.

वैशंपायन सांगतात—राजा, नंतर गोकर्णयात्रा केल्यावर तो अतुलपराक्रमी अर्जुन पश्चिमसमुद्राचे तीरावरील तीर्थें व पुण्यस्थानें क्रमानें पहात पहात, शेवटीं, अत्यंत पवित्र आणि रमणीय अशा प्रभासक्षेत्रीं गेला. तें वर्तमान श्रीकृष्णाचे कानीं जातांच तो आपल्या प्रिय मित्राला भेटण्यासाठीं तेथें आला. त्या उभयतांची दृष्टादृष्ट होतांच एकमेकांस प्रेमालिंगन देऊन त्यांनी कुशलप्रश्न विचारिले. नंतर ते नरनारायण ऋषि अर्थात् कृष्णार्जुन तेथें त्या वनांतच कांहीं वेळ राहिले. कृष्णानें अर्जुनास तीर्थाटनाचें कारण विचारिलें असतां पूर्वीं घडलेली सर्व हकीकत त्यानें त्यास सांगितली. तेव्हां कृष्णानेंही त्या गोष्टीस मान डोलविली. मग ते कृष्णार्जुन कांहीं वेळ त्या प्रभासतीर्थावर यथेच्छ विलास करून, कायम वस्ती करण्याकरितां रैवतक पर्वताकडे गेले. श्रीकृष्णाचे आज्ञेवरून सेवकांनीं तो पर्वत अगोदरच शृंगारून ठेविला होता. कृष्णार्जुन तेथें जातांच सेवकांनीं भोजनाची सिद्धता केली. मग अर्जुनानेंही सर्व पदार्थांचें मनःपूर्वक सेवन केलें. नंतर कृष्णासहवर्तमान त्यानें नटनर्तकांचे खेळ पाहिले; आणि त्या सर्वांना बक्षिसें वगैरे देऊन वाटेस लाविल्यावर, ते तयार करून ठेविलेल्या दिव्य शय्यांकडे गेले. नंतर शय्येवर पडल्या पडल्या, प्रवासांत पाहिलेल्या नद्या, सरोवरें, पर्वत, तीर्थें व अरण्यें यांचें वर्णन अर्जुनानें श्रीकृष्णास सांगितलें. देवांना दुर्लभ असल्या मृदु व सुखावह शय्येवर पडून फार वेळ झाला नाहीं तोंच निद्रेनें आपला पगडा अर्जुनावर बसविला. नंतर यथेच्छ झोंप घेतल्यावर मधुर गायन, वीणाध्वनि व बंदीजनांचे मंगल स्तुतिपाठ यांच्या योगानें स्वाऱ्या जाग्या झाल्या. नंतर श्रीकृष्ण आपल्या मंदिरांत गेला, आणि नित्यकृत्यें आटोपून पुनरपि अर्जुनाचे भेटीस आला. पुढें सुवर्णमय रथांत बसून ते दोघेही द्वारकेस गेले.

द्वारकागमन.

जनमेजया, अर्जुनाच्या स्वागतार्थ ती सर्व द्वारका कोनाकोपऱ्यापर्यंत शृंगारिली होती. अर्जुन येत आहेसें पाहून द्वारकेंतील सहस्त्रावधि जन त्याला पाहण्याच्या उत्कंठेनें राजमार्गीतच येऊन थडकले. खिडक्या, गच्च्या, सज्जे वगैरे

जेवढ्या पाहण्याच्या जागा होत्या, त्या सर्व स्त्रियांनीं फुलून गेल्या होत्या. भोज, वृष्णि व अंधक या कुलांतील पुरुषांचे तर घोळकेच जमा झाले. मग वृष्णि व अंधक या सर्वांनीं अर्जुनाचा सत्कार केल्यावर, त्यानें वंद्य अशा सर्व गुरुजनांस अभिवंदन केलें, व गुरुजनांनीं उलट पक्षीं त्याचा गौरव केला. द्वारकेंत जे कोणी अल्पवयी होते, त्या सर्वांनीं अर्जुनाचा सत्कार केला. त्या सत्काराचा आदरपूर्वक स्वीकार करून, त्यानें आपल्या बरोबरीच्यांना पुनःपुन: आलिंगनपूर्वक भेटी दिल्या. याप्रमाणें भेटी व परतभेटी उकरल्यावर, रत्नांनीं व भोज्य पदार्थांनीं संमृद्ध असलेल्या कृष्णाच्या रम्य मंदिरांत तो गेला; व कित्येक रात्री त्यानें तेथें श्रीकृष्णाच्या सहवाससुखांत घालविल्या.



सुभद्राहरणपर्व.

अध्याय दोनशें एकुणिसावा.

—:०:—

सुभद्राहरणविचार.

वैशंपायन सांगतातः—हे राजेंद्रा, पुढें थोडक्याच दिवसांत, रैवतक पर्वतावर कांहीं दिवसांच्या मुदतीपर्यंत चालणारा त्या पर्वताचा उत्सव सुरू झाला. तो उत्सव वृष्णि व अंधक हे करीत असत. तेथें ते वृष्णि, अंधक व भोज या कुलांतील वीर त्या रैवतक पर्वताप्रीत्यर्थ ब्राह्मणांस हजारों प्रकारचीं दानें देत. राजा, त्या पर्वतावर सर्वत्र कल्पवृक्ष असून, चौफेर रत्नखचित राजवाडे होते, यामुळें त्या प्रदेशास विलक्षण शोभा आली होती. तो उत्सव चालू असतां तेथें अनेक गुणी जन आले होते. तंतुवाद्यनिपुण अनेक प्रकारचीं वाद्यें वाजवीत होते, नर्तक नाचत होते, व गवई सुस्वर गायन करीत होते. वृष्णिकुलोत्पन्न बहुवीर्यशाली कुमार अलंकृत होऊन सुवर्णरथांत बसून इकडून तिकडे झळकत फिरत होते. हजारों नागरिक आपल्या स्त्रिया व सेवक बरोबर घेऊन—कित्येक लहानमोठ्या वाहनांत बसून तर कित्येक पायींच—त्या पर्वतावर फिरत होते. हे भारता, ज्याच्या मागोमाग गायन करणारे लोक चालत आहेत, असा तो वीरनायक बलराम मदांध होऊन आपल्या रेवती नामक स्त्रीसह तेथें फिरत होता. तसेंच, गंधर्व ज्याची स्तुति करिताहेत, असा वृष्णींचा राजा उग्रसेन आपल्या सहस्र स्त्रियांसहवर्तमान तेथें आला होता. युद्धांत सर्वथा अजिंक्य असे प्रद्युम्न व सांब दिव्यमाला व वस्त्रें परिधान करून व मदानें धुंद होऊन देवांप्रमाणें त्या ठिकाणीं विहार करीत होते. त्याचप्रमाणें अक्रूर, सारण, गद, बभ्रु, विदूरथ, निशठ, चारुदेष्ण, पृथु, विपृथु, सत्यक, सात्यकि, भंगकार, महारव, हार्दिक्य, उद्धव हे व दुसरे पुष्कळ अप्रसिद्ध पुरुषही तेथें येऊन तो उत्सव साजरा करीत होते. त्या सर्वांबरोबर त्यांचा स्त्रीवर्गादिक निरनिराळा परिवार होता. तो अत्यद्भुत व आश्चर्यकारक महोत्सव सुरू असतां, तो पाहण्याकरितां कृष्णार्जुन हेही आले असून ते बरोबरच हिंडत होते. याप्रमाणें ते हिंडत असतां, जिनें सर्व अलंकार घातले आहेत अशी वसुदेवाची रूपवती कन्या सख्यांच्या मध्यमार्गी बसलेली अर्जुनाच्या दृष्टीस पडली. तिला पाहतांच त्याच्या मनांत मदनाचा प्रादुर्भाव झाला, व तो तिच्याकडे टक लावून पाहूं लागला. तेव्हांच हें कृष्णाच्या ध्यानांत आलें; आणि तो अर्जुनास हसत हसत म्हणाला, "पार्था, वनवास करणाराचें मन कामानें असें व्याप्त व्हावें हें मोठें आश्चर्य आहे. अरे, ही सारणाची भगिनी—माझी सख्खी बहिण सुभद्रा ना ! असो ! ही बाबांची फार लाडकी आहे. अर्जुना, तुझें कल्याण होवो. हिच्यावर जर तुझें मन जात असेल, तर मी स्वत: याविषयीं पित्याजवळ गोष्ट काढीन !"

अर्जुन म्हणाला:—गोपालकृष्णा, ही वसुदेवाची मुलगी व प्रत्यक्ष तुझी बहीण असून अनुपम रूपवती आहे. ही कोणाचें बरें मन मोहित करणार नाहीं ? कृष्णा, ही तुझी बहिण वृष्णिकुलोत्पन्न सुभद्रा माझी पट्टराणी होईल, तर मग खरोखर तूं माझें सर्व प्रकारें कल्याण केल्याप्रमाणें होईल. यास्तव, हे जनार्दना, हिच्या प्राप्तीस्तव मीं कोणता उपाय करावा तें मला सांग. जें जें कांहीं मनुष्याच्या हातून होणें शक्य आहे, तें सर्व मी हिच्या प्राप्तीस्तव करीन.

श्रीकृष्ण म्हणाला:—अर्जुना, क्षत्रियांनीं स्वयंवरविधीनें विवाह करावा हा उत्तम पक्ष होय. परंतु स्त्रीस्वभाव चंचल असल्यामुळें, तसें

केल्यास आपला कार्यभाग होईलच असा नियम नाहीं. आतां बलात्कारानें स्त्रीस हरण करावें हेंही क्षत्रियांस प्रशस्त होय; शूरांनीं याच प्रकारें विवाह करावा असें धर्मशास्त्रज्ञ म्हणतात. यास्तव, अर्जुना, तूं माझ्या बहिणीस बलात्कारानेंच हरण कर. कारण, स्वयंवर केल्यास ती कोणास माळ घालील कोण जाणे !

वैशंपायन सांगतात:—राजा, नंतर अर्जुन व कृष्ण यांनीं पुढें कसकसें करावयाचें तें ठरविलें, व धर्मराजास हा बेत कळविण्यासाठीं तत्काल हस्तिनापुरास त्वरेनें जाणारे जासूद पाठविले. तेव्हां धर्मराजानें तें सर्व ऐकून घेऊन त्यास आपली संमति दिली.

अध्याय दोनशें विसावा.

—:०:—

सुभद्राहरण.

वैशंपायन सांगतात:—जनमेजया, अशा प्रकारें धर्मराजाचें अनुमोदन मिळाल्यावर अर्जुन सुभद्रेचा शोध करूं लागला. त्या वेळीं ती रैवतक पर्वतावर असल्याचें त्यास समजलें. तेव्हां त्यानें आपला सर्व बेत श्रीकृष्णास कळवून त्याचें अनुमोदन घेतलें; व तो रथांत बसून निघाला. तो रथ कांचनमय असून सर्वलक्षणसंपन्न होता. शैब्य व सुग्रीव हे अश्व त्यास जोडले असून अनेक घुंगुरमाळा बांधिल्या होत्या. त्यांत सर्व प्रकारचीं शस्त्रास्त्रें सिद्ध होतीं. त्याचा शब्द मेघगर्जनेसारखा असून प्रज्वलित अग्नीसारखा त्याचा प्रकाश पडला होता. यामुळें तो रथ पाहतांक्षणींच शत्रूंचा हर्ष मावळून जाई.

राजा, अशा प्रकारच्या त्या रथांत बसून खड्ग, कवच, व तलत्राण, अंगुलित्राण वगैरे सर्व प्रकारची सिद्धता करून अर्जुन मृगयेच्या मिषानें बाहेर पडला. इकडे सुभद्रेनें त्या पर्वतश्रेष्ठ रैवतकाची पूजा केली; आणि तेथील सर्व देवता व ब्राह्मण यांचेंही पूजन करून त्यांपासून आशीर्वाद मिळविले. नंतर त्या पर्वतास प्रदक्षिणा करून ती द्वारावतीत परत येण्यास निघाली, इतक्यांत कामशरपीडित अर्जुन एकाएकीं तेथें आला ! त्यानें त्या सर्वांगसुंदरीस बळेंच आपल्या रथावर बसविलें, आणि आपणही त्याच रथांत बसून इंद्रप्रस्थाकडे प्रयाण केलें. सुभद्रेस अर्जुनानें हरण केलें हें पाहतांच तिच्या बरोबरचे सर्व शिपाई हाहाकार करीत द्वारकेंत धावत गेले; आणि द्वारकेंत जी एक सुधर्मा नांवाची सभा होती, तींत जाऊन त्यांनीं सभाध्यक्षास अर्जुनाचें सर्व कृत्य निवेदन केलें. त्यांचें तें भाषण ऐकतांच सभापतीनें सुवर्णानें मढविलेली युद्धारंभद्योतक नौबत मोठ्यानें वाजविली. तिचा शब्द कानीं पडतांच भोज, वृष्णि व अंधक हे वीर खवळून गेले; व पुढील अन्नपाणीही टाकून देऊन तसेच चोहोंकडून तेथें गोळा होऊं लागले. त्यांतील महारथी वीर त्या सभेंतील शेंकडों सिंहासनांवर विराजमान झाले. तीं सिंहासनें सुवर्णमय असून रत्नें व पोंवळीं यांनीं सुशोभित केलीं होतीं. यामुळें त्यांची कांति प्रज्वलित अग्नीप्रमाणें पडे. त्या उत्तम चादरी घातलेल्या सिंहासनांवर विराजमान झालेले ते वृष्णि व अंधक या कुलांतील महारथी वीर वेदीचे ठिकाणीं अधिष्ठित झालेल्या अग्नीप्रमाणें प्रकाशमान होत होते. इंद्रसभेंत जसे देव, तसे ते त्या सभेंत बसले असतां सैनिक व सभापाल यांनीं अर्जुनाचें सर्व कृत्य त्यांस सांगितलें. तें श्रवण करतांच, मदानें ज्यांचे डोळे लाल झाले आहेत अशा त्या अभिमानी वृष्णिवीरांस अर्जुनाचा अत्यंत राग येऊन ते एकदम उठले; व मोठमोठ्यानें ओरडूं लागले, “ अरे, रथ सज्ज करा; प्रास, प्रचंड धनुष्यें, व उत्कृष्ट चिलखतें त्वरित इकडे घेऊन या. ” याप्रमाणें कित्येक सारथ्यांस रथ जोडण्याविषयीं सांगूं लागले, व कित्येक तर



सुभद्रा हरण.

स्वतांच सुवर्णालंकृत अश्व रथांना जुंपूं लागले. याप्रमाणें रथ, ध्वज, कवचें वगैरे आणण्याची त्या नरवीरांची एकच गडबड उडाली!

बळरामदादांचा कोप.

नंतर, ज्यानें वनमाला गळ्यांत घातल्या असून नीलवस्त्रें परिधान केलीं आहेत, व मदानें जो उन्मत्त होऊन गेला आहे, असा कैलासशिखरासारखा धिप्पाड बळराम त्यांस उद्देशून म्हणाला, "वीरहो, कृष्ण स्वस्थ असतां तुम्हीं अविचारानें हें काय आरंभिलें आहे? अहो, याचा अभिप्राय काय आहे हें कळण्यापूर्वीच संतप्त होऊन व्यर्थ गर्जना करितां हें काय? हा कृष्ण महाबुद्धिमान आहे. तेव्हां या संबंधानें त्याचें मत काय आहे तें प्रथम त्यास स्वतः सांगू द्या; आणि नंतर त्याच्या अभिप्रायाप्रमाणें तुम्ही वर्तन करा."

राजा, बळरामाचें हें सयुक्तिक भाषण श्रवण करतांच सर्व वीर शांत झाले; व "ठीक आहे" असें म्हणून ते सर्वजण पुनः सभेंत जाऊन बसले. नंतर शत्रुनाशक बळराम श्रीकृष्णास म्हणाला, "जनार्दना, या वेळीं तूं कांहींएक न बोलतां स्वस्थपणें मजा पहात बसला आहेस हें काय? अरे, हा अर्जुन धैर्यसत्त्वादि गुणांपासून न ढळणारा असें समजून केवळ तुझ्यासाठीं आम्हीं याचा इतका आदरसत्कार केला; परंतु कुलास बट्टा लावणारा हा दुष्ट त्या मानास अगदीं अयोग्य होय. हें पहा—जेथें अन्न खाल्लें तेथील भांडीं फोडणें—खाल्ल्या घरचे वासे मोजणें हें कुलीनें म्हणविणारास उचित आहे काय? आतां, आपल्या पूर्वीच्या नात्याप्रमाणेंच नवीन संबंध करावा अशी त्याची इच्छा असल्यामुळें त्यानें हें केलें असें म्हणावें, तर ही इच्छा धरून कोणता अभ्युदयेच्छु असें साहस कर्म करील बरें? आमची पर्वा न बाळगतां, आणि, कृष्णा, तुझाही अनादर करून आज सुभद्रेस त्यानें बलात्कारानें हिरावून नेलें! मी म्हणतों, सुभद्रेस नव्हे, प्रत्यक्ष आपल्या मृत्यूसच त्यानें बरोबर नेलें आहे! गोविंदा! सर्पाच्या शेंपटीवर पाय दिला असतां तो त्यास असह्य होतो, त्याचप्रमाणें अर्जुनानें आज प्रत्यक्ष माझ्या मस्तकावर पाय दिला आहे, तो मीं कसा सहन करावा! अरे, त्यास काय वाटतें? मी एकटा आजच्या आज पृथ्वी निष्कौरव करून टाकीन, परंतु ही अर्जुनानें केलेली अवज्ञा मला बिलकूल खपावयाची नाहीं!"

अशा प्रकारें मेघ किंवा दुंदुभि यांच्या शब्दाप्रमाणें तो गर्जना करून बोलला असतां, त्यास वृष्णि, भोज व अंधक या वीरांनीं अनुमोदन दिलें.

हरणाहरिकापर्व.

अध्याय दोनशें एकविसावा.

—:०:—

श्रीकृष्णाचें भाषण.

वैशंपायन सांगतातः—राजा, त्या सभेंतील वृष्णिवीरांनीं आपआपल्या परीनें पुष्कळ भाषण केलें. नंतर कृष्ण हा धर्म व अर्थ यांस धरून मोठें खुबीदार बोलला. तो म्हणाला, "वीरहो, आपल्या कुलाचा अर्जुनानें बिलकूल अपमान केला नाहीं; उलटा त्यानें आपला मोठा गौरवच केला आहे, यांत संशय नाहीं ! तुम्ही सात्वत द्रव्यलोभी आहां असें अर्जुनास वाटत नसल्यामुळें, आसुरविधीनें स्त्री मिळविण्याचें त्यानें मनांत आणिलें नाहीं, हें ठीकच झालें. आतां, स्वयंवरविधींत वधूनें आपल्या इच्छेस येईल तो पति वरावयाचा असल्यामुळें, ही आपणास माळ घालीलच अशी कोणासही खातरी नसते; यास्तव तो प्रकार अर्जुनास बिलकूल पसंत वाटत नाहीं. तसेंच, कन्याप्रतिग्रह घेणें कोणत्या क्षत्रियास आवडणार आहे ? किंवा आपल्या पोटच्या पोरीस पशूप्रमाणें विकण्यास जगांत कोण शहाणा तयार होणार आहे ? याप्रमाणें सर्व विधींत दोष असल्याचें आढळून आल्यावरूनच अर्जुनानें राक्षसविधीनें सुभद्रा हरण केली असावी, असें मला वाटतें. कारण, हा राक्षसविधि क्षत्रियांस प्रशस्त मानिला असल्यामुळें अर्जुनाचें हें कृत्य धर्मसंमत आहे. हा संबंध फारच उत्तम जुळला आहे. खरोखर सुभद्रा मोठी दैववान, म्हणून ती त्या श्रेष्ठ अर्जुनानें हरण केली ! पहा—भरतकुलांत, त्यांतही कीर्तिमान शांतनूच्या वंशांत ज्याचा जन्म, व कुंतिभोज राजाची कन्या पृथा ही ज्याची माता, तो अर्जुन पति मिळावा असें कोणास बरें वाटणार नाहीं. अहो, या अर्जुनास युद्धांत जिंकण्यास समर्थ असा त्या भगनेत्र हरण करणाऱ्या विरूपाक्ष शंकरावांचून मला तर दुसरा कोणीच दिसत नाहीं ! मान्यहो, या पृथ्वीवरच काय, पण स्वर्गकैलासादि कोणत्याही लोकांत अर्जुनाच्या रथासारखा दुसरा रथ नाहीं; व त्याच्या त्या रथास जोडलेले माझ्या अश्वांसारखे श्रेष्ठ अश्वही नाहींत. अर्जुन हा शीघ्र अस्त्रें सोडणारा वीर आहे. त्याची बरोबरी करणारा आज दुसरा कोण आहे ? यास्तव तुम्ही लवकर जा, व अर्जुनाचें समाधान करून त्यासह सर्वजण मोठ्या आनंदानें परत या, असें माझें सांगणें आहे. जर का युद्धांत तुम्हास पराजित करून अर्जुन तसाच खांडवप्रस्थास जाईल, तर तुमची केवढी अपकीर्ति होईल बरें ? परंतु त्याचें सांत्वन केल्यास त्यांत कांहीं तुमचा पराभव झाला असें होणार नाहीं !"

अर्जुनसुभद्राविवाह.

नृपाला, श्रीकृष्णाचें तें भाषण सर्वांस पसंत पडलें, व त्यांनीं तदनुसार वर्तन केलें. तेव्हां अर्जुन द्वारकेंत परत आला, व श्रीकृष्णानें त्याचें सुभद्रेशीं लग्न लाविलें ! त्या ठिकाणीं सर्व लोक अर्जुनाची फार मानमान्यता ठेवीत असत. एक वर्षाहून कांहीं अधिक दिवस त्याच ठिकाणीं राहून अर्जुनानें यथेष्ट विहार केला; आणि नंतर पुष्करतीर्थीं जाऊन, वनवासापैकीं अवशिष्ट राहिलेले दिवस तेथेंच घालविले. बारा वर्षें पूर्ण होतांच तो खांडवप्रस्थास गेला, व धर्मराजास भेटला. नंतर ब्राह्मणांचें विधिपूर्वक पूजन करून तो द्रौपदीकडे गेला. तेव्हां ती त्यास प्रेमानें म्हणाली, "अर्जुना, इकडे कशाला येतोस ! ती यदुकन्या सुभद्रा जिकडे असेल तिकडे जा. माझ्यापेक्षां सुभद्रेवर तुझा अधिक लोभ जडला हें स्वाभाविकच झालें. कारण, ओझें एकदा घट्ट बांधिलें असलें तथापि त्यास जर पुनः दुसरी दोरी बांधिली, तर पहिली दोरी सैल पडावयाचीच !

तेव्हां नव्या प्रेमानें जुनें प्रेम शिथिल होणें साहजिकच आहे !"

राजा, जनमेजया, याप्रमाणें द्रौपदी अनेक प्रकारें बोलूं लागली; तेव्हां अर्जुनानें तिची वारंवार क्षमा मागून पुन:पुन: समजूत केली; आणि त्यानें उत्तम रंगाचें रेशमी वस्त्र नेसलेल्या सुभद्रेस गोपकन्येचा वेष देऊन तात्काळ द्रौपदीकडे पाठविलें. त्या वेषानें सुभद्रेचें सुंदर रूप अधिकच खुलून गेलें. जिचे डोळे विशाल व आरक्त आहेत, अशी ती वीरपत्नी सुभद्रा प्रथम मुख्य घरांत जाऊन तिनें कुंतीस वंदन केलें. तेव्हां कुंतीनें त्या सर्वांगसुंदरीच्या मस्तकाचें अवघ्राण केलें. तिला पाहून कुंतीस फार आनंद झाला, व तिनें तीस पुष्कळ आशीर्वाद दिले. नंतर ती पूर्णचंद्रानना त्वरेनें द्रौपदीकडे गेली; आणि तिला वंदन करून " मी तुमची दासी आहें " असें म्हणाली. तेव्हां द्रौपदीही तिचा सत्कार करण्यासाठीं उठून उभी राहिली. तिनें कृष्णभगिनी सुभद्रेस प्रेमानें आलिंगन दिलें, व म्हटलें:—सुभद्रे, तुझा पति शत्रुरहित असो ! (तुझ्या पतीचे मनांत सापत्नभाव नसो.) तें ऐकून सुभद्रेसही मोठा आनंद झाला, व तिनें त्यास ' तथास्तु ' म्हणून अनुमोदन दिलें. जनमेजया, या दोघींचें एकमेकींवर प्रेम बसलेलें पाहून कुंती व पांडव यांस मोठा आनंद झाला.

लग्नाची देणगी.

राजा, नंतर, आपल्या नगरांत आलेला अर्जुन परत इंद्रप्रस्थास गेल्याचें वर्तमान द्वारकेंत समजतांच, तो शत्रूंस ताप देणारा श्रीकृष्ण परमात्मा बलरामासहवर्तमान इंद्रप्रस्थास आला. त्या कमलनेत्राबरोबर भ्राते, कुमार तसेंच वृष्णि आणि अंधक या कुलांतील अनेक महारथी वीर असून, सर्वांच्या रक्षणास मोठें सैन्य होतें. वृष्णिवीरांचा अधिपति व दानाध्यक्ष जो महाबुद्धिमान अक्रूर, तोही त्यांबरोबर इंद्रप्रस्थांत गेला. त्याचप्रमाणें महातेजस्वी अनाधृष्टि, प्रत्यक्ष बृहस्पतीचा महाबुद्धिमान प्रख्यात शिष्य उद्धव, सत्यक, सात्यकि, यादव, कृतवर्मा, प्रद्युम्न, सांब, निशठ, शंकु, पराक्रमी चारुदेष्ण, झिल्ली, विपृथु, महाबाहु, सारण व विद्वानांत वरिष्ठ गद हे व दुसरे पुष्कळ वृष्णि, अंधक व भोज या कुलांतील पुरुष मोठमोठे नजरनजराणे घेऊन खांडवप्रस्थास गेले. श्रीकृष्ण आला आहे हें युधिष्ठिरास समजतांच त्याचा सत्कार करण्यासाठीं त्यानें नकुल–सहदेवांस सामोरे पाठविले. त्यांनीं त्यांचें आगतस्वागत केल्यावर ते बरोबर आणलेलें द्रव्य घेऊन खांडवप्रस्थांत शिरले. तें नगर ध्वजपताकांनीं सुशोभित केलें होतें. रस्ते स्वच्छ झाडून वर सडा शिंपडिला होता. जिकडेतिकडे फुलें विखुरल्यामुळें त्या नगरास विशेष शोभा आली होती. थंडगार चंदनोदकें, इतर सुवासिक पदार्थ व ठिकठिकाणीं जळत असलेला सुगंधि धूप यांचा सुवास सर्वत्र पसरला होता. संतुष्ट व पुष्ट नागरिकांनीं गजबजून गेलेल्या व व्यापाऱ्यांच्या पेढ्यांनीं शोभणाऱ्या त्या नगरांत वृष्णि, अंधक, भोज व बलराम यांसहवर्तमान त्या पुरुषोत्तम वीर श्रीकृष्णानें प्रवेश केला. तेव्हां नागरिकांनीं व हजारों ब्राह्मणांनीं त्याची पूजा केली. त्यांची पूजा स्वीकारीत स्वीकारीत, इंद्रमंदिराच्या तोडीच्या पांडवांच्या राजवाड्यांत तो शिरला. तेव्हां युधिष्ठिरानें प्रथम बलरामास विधिपूर्वक भेटून नंतर श्रीकृष्णाच्या मस्तकाचें अवघ्राण केलें, आणि त्यास आलिंगन दिलें. श्रीकृष्णानेंही धर्मराज व भीमसेन यांचा योग्य रीतीनें सन्मान केला. नंतर जसजसे वृष्णि व अंधक वीर येऊं लागले, तसतसें त्यांचेंही धर्मराजानें प्रेमानें यथायोग्य आदरातिथ्य केलें. त्यानें कित्येकांस वडिलांप्रमाणें व कित्येकांस मित्रांप्रमाणें मान दिला; त्यानें कांहीं-

शीं प्रेमपूर्वक भाषण केलें; व दुसऱ्या कित्येकांनीं तर उलट धर्मराजासच वंदन केलें. नंतर, वधूपक्षानें लग्नाचा अहेर म्हणून वरपक्षास द्रव्य देण्याची चाल आहे तीप्रमाणें महायशस्वी श्रीकृष्णानें आपणाबरोबर आणलेलें सर्व द्रव्य सुभद्रेच्या लग्नाचा अहेर म्हणून पांडवांस दिलें. ज्यांस लहान घंटांचीं जाळीं बांधिलीं आहेत, व चार चार घोडे जोडले असून स्वकर्मांत कुशल सारथि ज्यांवर आहेत, असे एक हजार सुवर्णाचे रथ कृष्णानें पांडवांस दिले. त्याचप्रमाणें, त्यानें मथुरा देशच्या दहा हजार पवित्र, तेजस्वी व दुभत्या गाई दिल्या. चंद्रप्रभेप्रमाणें तेजस्वी शुभ्र वर्णाच्या,आणि सुवर्णाचे अलंकार घातलेल्याघोड्या एक हजार दिल्या. मानेवरील काळ्या केंसांशिवाय बाकी सर्व शरीर ज्यांचें शुभ्रवर्ण आहे अशा उत्तम शिकविलेल्या, ववायूप्रमाणें वेगवान खेंचरी प्रत्येकास पांचपांचशें याप्रमाणें श्रीकृष्णानें पांडवांस अर्पण केल्या. स्नान घालणें व आंग स्वच्छ करणें या कामासाठीं एक हजार गौरवर्ण तेजस्वी तरुण दासी त्यानें पांडवांस दिल्या. त्यांचे वेष उत्तम असून सर्व शरीर निर्लोम होतें. पुतळ्यांच्या शेंकडों माळा वगैरे अलंकार त्यांनीं धारण केले असून, त्या सेवाकर्मांत मोठ्या दक्ष होत्या. याशिवाय, बाल्हीक देशांतील रुंद पाठीचे एक लक्ष अप्रतिम घोडे त्यानें कन्याधन म्हणून दिले. त्या दाशार्ह श्रीकृष्णानें अग्नीप्रमाणें तेजस्वी खनिज व कृत्रिम सोनें तर दहा ओझीं दिलें. याशिवाय, त्यानें, मदोन्मत्त झाल्यामुळें ज्यांच्या गंड, गुह्य व कर्णमूळ या तीन स्थानांपासून मदस्राव होत आहे, पर्वताशिखराप्रमाणें ज्यांचीं शरिरें भव्य आहेत, जे साहसप्रिय असून युद्धांत कधींच माघार घेणारे नाहींत, असे एक सहस्र सुंदर गज, घंटा व सुवर्णमाला यांनीं उत्तम शृंगारून, त्यांच्या महातांसुद्धां पांडवांस अर्पण केले.

नंतर, बलरामानें मोठ्या प्रीतीनें या नूतन संबंधाचें अभिनंदन करण्यासाठीं अर्जुनास पाणिग्रहणसांगतेप्रीत्यर्थ दक्षिणा दिली. हा यादवांकडून आलेला अहेर म्हणजे एक महानदच होय. बहुमूल्य रत्नें हा त्याचा प्रवाह होय. वस्त्रें, शाली वगैरे त्याचा फेंस समजावा. मोठमोठे हत्ती हे या नदांतील भयंकर ग्राह असून, ध्वज व पताका हें शेवाळ होय. अशा प्रकारचा हा महानद पूर्वींच परिपूर्ण असलेल्या पांडवभांडागाररूप समुद्रांत प्रविष्ट झाला; तेव्हां तो समुद्र तुडुंब भरून जाऊन शत्रूंस शोकाकुल करूं लागला. असो; धर्मराज युधिष्ठिरानें त्या सर्व द्रव्याचा स्वीकार केला, व त्या वृष्ण्यंधक वीरांचाही अहेर वगैरे करून सत्कार केला. त्या ठिकाणीं एकत्र जमलेल्या सर्व वीरांनीं, स्वर्गांत ज्याप्रमाणें पुण्यवान पुरुष विहार करितात, त्याप्रमाणें विहार केला. त्या कुरुवृष्णींनीं उत्तम गायनवादनादिकांनीं स्वैरपणें यथेच्छ क्रीडा केली. याप्रमाणें पुष्कळ दिवस तेथें आनंदांत राहिल्यानंतर ते पराक्रमी पुरुष पुनः द्वारकेस परत जावयास निघाले. तेव्हां पांडवांनीं अहेर वगैरे देऊन त्यांचा आदरसत्कार केला. नंतर ते सर्वजण पांडवांनीं दिलेलीं सोज्ज्वल रत्नें घेऊन बलरामासह निघून गेले. असो.

अभिमन्युजन्म.

राजा, कृष्ण मात्र अर्जुनासमागमें त्या रम्य इंद्रप्रस्थांतच राहिला. तेथें तो महायशस्वी श्रीकृष्ण यमुनातीरीं मृगया करी, व मृगवराहादिकांची शिकार करून अर्जुनाबरोबर करमणूक करी. पुढें कांहीं दिवसांनीं श्रीकृष्णाची प्रिय बहीण सुभद्रा हिला, इंद्राणीस जसा जयंत तसा एक महाकीर्तिमान पुत्र झाला. त्याचे बाहु लांब असून वक्षस्थल विशाल व नेत्र वृषभनेत्रांप्रमाणें तेजस्वी होते. शत्रूंस पादाक्रांत करणारा व मनुष्यांत श्रेष्ठ असा वीर अभिमन्यु सुभद्रेच्या पोटीं जन्मला.

तो अभि म्हणजे निर्भय व मन्युमान् म्हणजे अतिशूर असा असल्यामुळें, त्या शत्रुविनाशक अर्जुनपुत्रास लोक 'अभिमन्यु' असें म्हणूं लागले. यज्ञामध्यें शमी वृक्षाच्या पोटांत उत्पन्न झालेल्या अश्वत्थांपासून घर्षणाच्या योगानें अधरारणीचे ठिकाणीं जसा अग्नि उत्पन्न होतो, तसा सुभद्रेच्या ठिकाणीं अर्जुनापासून तो अतिरथी वीर उत्पन्न झाला. भारता, याचा जन्म होतांच युधिष्ठिरानें अयुत गाई व सोन्याच्या मण्यांच्या माळा ब्राह्मणांस दिल्या. लोकांस जसा चंद्र प्रिय होतो, तसा हा अभिमन्यु लहानपणापासूनच पांडव व श्रीकृष्ण यांस फार प्रिय झाला. जन्मापासून प्रत्यक्ष श्रीकृष्णानें त्याचें उत्तम प्रकारें लालनपालन केलें. तेव्हां तो बालशुक्लेंदुवत् वृद्धिंगत होऊं लागला. पुढें वेदाध्ययन केल्यावर अभिमन्यूनें स्वतः अर्जुनापासून ब्रह्मास्त्रादि दिव्य, खड्गादि मानुष,अशा संपूर्ण चतुष्पाद[1] व दशविध[2] धनुर्वेदाचें साग अध्ययन केलें. अस्त्रांच्या योजनेविषयीं विशिष्ट ज्ञान, हस्तलाघव व युद्धप्रसंगींच्या सर्व प्रकारच्या शारीरिक क्रिया, यासंबंधाच्या सर्व विशेष गोष्टी अर्जुनानें त्यास शिकविल्या. सारांश, शास्त्रज्ञान व प्रत्यक्ष योजना या दोन्ही बाबतीनें त्यानें अभिमन्यूस आपणाप्रमाणें निपुण केलें. असो. अभिमन्यूस पाहून अर्जुनास संतोष होई. इंद्र जसा अर्जुनाकडे आनंदानें पाही, तसाच अर्जुनही अभिमन्यूकडे मोठ्या प्रेमानें पहात असे. कारण–शत्रुसंहारास आवश्यक असे सर्व गुण त्याचे ठायीं वसत असून तो सर्वलक्षणसंपन्न होता. तो सर्वथा अजिंक्य असून त्याचे खांदे वृषभासारखे प्रशस्त व मुख सर्पाप्रमाणें विस्तृत होतें. तो सिंहासारखा अभिमानी, प्रचंड धनुष्य धारण करणारा, मत्त गजाप्रमाणें पराक्रमी, व मेघ किंवा दुंदुभि यांप्रमाणें गंभीर शब्द करणारा असून, त्याचें मुख पूर्णचंद्राप्रमाणें आल्हादकारक होतें. सारांश, शौर्य, वीर्य, रूप व आकृति यांमध्यें तो अगदीं कृष्णासारखा होता; असो.

द्रौपदीपुत्रजन्म.

पतिव्रता पांचालीसही पांच पतींपासून पंचपर्वतांप्रमाणें श्रेष्ठ व वीर्यशाली असे पाच मुलगे झाले. अदितीस जसे आदित्य, तसे पांचालीस युधिष्ठिरापासून प्रतिविंध्य, वृकोदरापासून सुतसोम, अर्जुनापासून श्रुतकर्ता, नकुलापासून शतानीक व सहदेवापासून श्रुतसेन असे हे पांच महारथी वीर झाले. शत्रूंचे प्रहार खिजगणतींत नस-

---

१ मंत्रमुक्तं पाणिमुक्तं मुक्तामुक्तं तथैव च ॥ अमुक्तं च धनुर्वेदे चतुष्पाच्छस्त्रमीरितम् ॥ (चार प्रकारचीं शस्त्रें सांगितलीं आहेतः–एक–ज्याची योजना मात्र करितां येते परंतु उपसंहार करितां येत नाहीं त्यास मंत्रमुक्त शस्त्र म्हणतात दुसरें—हातापासून सुटलेलें शस्त्र बाण वगैरे. तिसरें—मुक्तामुक्त म्हणजे ज्याची योजना व उपसंहार दोन्ही करितां येतात असें शस्त्र चौथें—अमुक्त शस्त्र म्हणजे ज्याची योजना करावयाची नसते, व जें दुरून पाहनांच शत्रु पळून जातात असें. उदा० मंत्रसिद्ध ध्वज वगैरे.)

२ आदानमथ संधानं मोक्षणं विनिवर्तनं ॥ स्थानं मुष्टिः प्रयोगश्च प्रायश्चित्तानि मंडलम् ॥ रहस्यं चोत दशधा धनुर्वेदांगमिष्यते ॥ (धनुर्वेदाचीं दहा अंगें सांगितलीं आहेतः—१ आदान–भात्यांतून बाण घेणें २ संधान–बाण मौर्वीस जोडणें. ३ मोक्षण–बाण लक्ष्यावर सोडणें. ४ विनिवर्तन–(लक्ष्य शक्तिहीन झाला असतां) सोडलेला बाण परत आणणें. ५ स्थान–धनुष्य व ज्या यांचा मध्य किंवा मध्याजवळचा भाग–(शरसंधानाच्या वेळीं व एरवींही हातानें धरावयाचा.) ६ मुष्टि–तीन किंवा चार अंगुलींची. ७ प्रयोग–मधलें बोट व आंगठ्याजवळील बोट, किंवा मधलें बोट व आंगठा यांमध्यें बाण धरणें. ८ प्रायश्चित्त–प्रसंगाप्रमाणें करावयाचे विधि. ९ मंडल–अस्थिर लक्ष्याचा वेध. १० रहस्य–शब्दादि वेध, एकदम अनेक लक्ष्यांचा वेध वगैरे.)

ण्याच्या गुणानें हा दुसरा विंध्याचलच व्हावा, म्हणून त्या युधिष्ठिरपुत्राचें ब्राह्मणांनीं प्रतिविंध्य असें नांव ठेविलें. सहस्र सोमयाग केल्यानंतर हा चंद्रसूर्याप्रमाणें तेजस्वी व मोठा धनुर्धारी पुत्र भीमसेनापासून जन्मल्यामुळें त्यास सुतसोम असें नांव पडलें. श्रुत म्हणजे विख्यात कर्म करून अर्जुन परत आला असतां त्यापासून जन्मला म्हणून त्यास श्रुतकर्मा असें नांव पडलें. कुरुकुलांत शतानीक नांवाचा एक मोठा थोर राजर्षि होऊन गेला, त्याचें शतानीक हें नांव नकुलानें आपल्या त्या कीर्तिमान पुत्रास ठेविलें. पुढें द्रौपदी कृत्तिका नक्षत्रावर सहदेवापासून जो पुत्र प्रसवली, त्यास लोक श्रुतसेन म्हणूं लागले. राजेंद्रा, हे द्रौपदीचे पुत्र एकेक वर्षाच्या अंतरानें जन्मले. हे मोठे यशस्वी व परस्परांवर प्रेम करणारे निपजले. धौम्य महर्षींनीं त्यांचे जातकर्मापासून चूडाकर्म व उपनयन येथपर्यंतचे सर्व संस्कार विधिपूर्वक केले; व उपनयनानंतर त्या पुत्रांनीं ब्रह्मचर्यानें राहून वेदाध्ययन केल्यावर, अर्जुनापासून दिव्य व मानुष अशा संपूर्ण धनुर्वेदाचें अध्ययन केलें. राजेंद्रा, अशा प्रकारच्या त्या देवतुल्य, विशालवक्ष व महारथी पुत्रांच्या योगानें पांडवांस अत्यानंद होत असे.

खांडवदाहपर्व.

अध्याय दोनशें बाविसावा.

—:०:—

ब्राह्मणरूपानें अग्नीचें आगमन.

वैशंपायन सांगतातः—राजा, धृतराष्ट्र व भीष्म यांच्या आज्ञेप्रमाणें पांडव इंद्रप्रस्थास राहात असतां त्यांनीं इतर प्रजापीडक राजांचा नाश केला. तेव्हां ज्याप्रमाणें शुभचिन्हांकित व पवित्र कर्म करणाऱ्या स्वतांच्या देहांत जीव आनंदानें राहतात, त्याचप्रमाणें सर्व प्रजा धर्मराजाच्या राज्यांत आनंदानें नांदूं लागल्या. हे भरतर्षभा, नीतिमान पुरुष आपल्याच योग्यतेच्या आपल्या तीन भावांचा जसा सारखा मान राखितो, तसा युधिष्ठिर राजा धर्म, अर्थ व काम या तिघांचें—एकाच्या सेवनानें दुसऱ्यास विरोध न येईल अशा प्रकारें—एकसारखेंच सेवन करीत असे. यामुळें, भूमीवर समप्रमाणानें अवतीर्ण झालेल्या धर्मार्थकामांचा युधिष्ठिर हा मोक्षस्वरूपी आत्माच आहे, किंवा या युधिष्ठिर राजाचे धर्म, अर्थ व काम हे तीन अमात्य आहेत, असें वाटे. युधिष्ठिर हा एक ब्रह्मस्वरूप जाणणारा, मोठमोठे यज्ञ करून वैदिक कर्में करणारा, व उत्तम लोक प्राप्त होतील अशा प्रकारें नीतीनें वागणारा राजा लोकांस मिळाला. त्याच्या योगानें लक्ष्मी स्थिर झाली, ज्ञान पराकाष्ठेस जाऊन पोहोंचलें, व पृथ्वीवरील इतर राजांची नीतिमत्ताही वृद्धिंगत झाली. चारी वेदांचें ज्यांत अनुष्ठान चाललें असा एखादा महायज्ञ त्या चार वेदांच्या योगानें जसा शोभतो, तसाच युधिष्ठिरही आपल्या चार भावांच्या योगानें विशेष शोभूं लागला. ज्याप्रमाणें बृहस्पतिसारखे मोठमोठे देव भगवान ब्रह्मदेवाभोंवतीं उभे राहतात, त्याप्रमाणें धौम्यप्रभृति श्रेष्ठ ब्राह्मण युधिष्ठिराभोंवतीं उभे असत. धर्मराजावर प्रजाजनांचें इतकें विलक्षण प्रेम असे कीं, त्याच्या योगानें विमल अशा पूर्णचंद्राप्रमाणेंच धर्मराजाचे-ही ठिकाणीं त्यांची दृष्टि व मन हीं एकदम रममाण होत. राजाचें कर्तव्य जें प्रजापालन, त्याच्या योगानेंच लोक इतके संतुष्ट असत असें नव्हे; तर, युधिष्ठिरावर लोकांची तशीच निष्ठा बसली असल्यामुळें ते संतुष्ट असत. ही भक्ति बसण्याचें कारण असें कीं, प्रजाजनांच्या मनास आवडेल तेंच युधिष्ठिर करीत असे. तो सदोदीत गोड बोले. अयुक्त, असत्य, असह्य किंवा अप्रिय भाषण कसें तें त्या बुद्धिमंतास ठाऊकही नव्हतें. हे भारता, सर्व लोकांचें कल्याण करून त्याबरोबर आपलें हित साधणारा तो अत्यंत तेजस्वी युधिष्ठिर नेहमीं आनंदांत राहात असे. त्याचप्रमाणें, त्याचे भाऊही पराक्रमानें इतर भूपालांस जरबेंत ठेवून निश्चितपणानें आनंदांत कालक्रमणा करीत होते. याप्रमाणें कित्येक दिवस लोटल्यावर अर्जुन श्रीकृष्णास म्हणालाः—मधुसूदना, आज उष्मा फार होत आहे, यास्तव यमुनातीरीं जाऊन सुहृज्जनांसहवर्तमान त्या ठिकाणीं विहार करूं, व सायंकाळीं परत येऊं. कृष्णा, मला वाटतें, तुलाही ही गोष्ट आवडेल.

कृष्ण म्हणालाः—कौंतेया, आपण इष्टमित्रांसह यथेष्ट जलक्रीडा करावी असें माझ्याही मनांत आहे.

वैशंपायन सांगतातः—जनमेजया, याप्रमाणें बोलणें झाल्यावर, कृष्णार्जुनांनीं प्रथम आपला बेत धर्मराजास कळवून त्याची अनुज्ञा घेतली, आणि नंतर सुहृज्जनांसहवर्तमान ते यमुनातीरीं गेले. त्या प्रदेशांत नानाप्रकारचे वृक्ष व लहान मोठीं जलमंदिरें असून, प्रत्यक्ष अमरावतीप्रमाणें तो प्रदेश उत्तम होता. मूल्यवान व रुचकर असे भक्ष्यभोज्य व पेय पदार्थ व नानाप्रकारचीं सुवासिक पुष्पें यांनीं तो प्रदेश युक्त असल्यामुळें,

कृष्णार्जुनांस विहार करण्यास योग्य अशा उत्कृष्ट स्थलीं गेल्यावर, त्यांच्या बरोबरची सर्व मंडळी लहानमोठ्या रत्नखचित अंतःपुरांतून यथेष्ट क्रीडा करूं लागली. त्याचप्रमाणें, ज्यांचा कटिप्रदेश प्रशस्त आहे, स्तन रमणीय व पुष्ट आहेत, आणि गति मदामुळें स्खलनयुक्त झाली आहे, अशा सुंदर स्त्रियाही मनसोक्त विहार करूं लागल्या. कृष्णार्जुनांच्या स्त्रिया कोणी वनामध्यें तर कोणी जलामध्यें व कोणी मंदिरांतून याप्रमाणें मनास आवडेल त्या ठिकाणीं व आवडेल त्या प्रकारानें करमणूक करूं लागल्या. त्या सर्वांत द्रौपदी व सुभद्रा ह्या तर क्रीडेमध्यें अतिशयच दंग होऊन गेल्या. त्यांनीं अनेक स्त्रियांस विपुल वस्त्रें व अलंकार हीं दिलीं. कित्येक स्त्रिया हर्षभरानें नाचूं लागल्या, कित्येक मोठमोठ्यानें खिदळूं लागल्या, कित्येक ओरडूं लागल्या, व दुसऱ्या कित्येक मद्यपान करूं लागल्या. दुसऱ्या कित्येक स्त्रिया एकमेकीस आडवूं लागल्या व मारूंही लागल्या. कांहीं स्त्रिया तर एकमेकींजवळ आपापलीं रहस्येंही सांगूं लागल्या. त्या वेळीं तें सुसंपन्न अरण्य वेणु, वीणा, मृदंग इत्यादि वाद्यांच्या मधुर नादानें सर्वत्र दुमदुमून गेलें. याप्रमाणें आनंदीआनंद चालला असतां कृष्णार्जुन जवळच्याच एका सुंदर प्रदेशीं जाऊन त्या ठिकाणीं उत्तम आसनावर बसले, व पूर्वीं होऊन गेलेल्या पराक्रमांच्या व इतर पुष्कळ गोष्टी सांगून एकमेकांचें मनोरंजन करूं लागले. स्वर्गाच्या पाठीवर जसे अश्विनीकुमार, तसे ते माधवधनंजय त्या ठिकाणीं आनंदानें बसले असतां, कोणीएक ब्राह्मण त्यांच्याकडे आला. त्याचें शरीर मोठ्या शालवृक्षाप्रमाणें असून तेज तप्त सुवर्णाप्रमाणें होतें. त्याचा वर्ण पिंगट निळा असून दाढीमिशांचे केंस ज्वालेप्रमाणें पिंवळट होते. उंचीला शोभेल अशी प्रकारची त्याची आंगलट होती. बालसूर्याप्रमाणें तेजस्वी, जटावल्कलें धारण करणारा, कमलमुख, व तेजानें प्रज्वलित अग्नीप्रमाणें प्रकाशणारा तो द्विजोत्तम जवळ येतांच कृष्ण व अर्जुन आपआपल्या आसनांवरून उठून सत्वर उभे राहिले.

अध्याय दोनशें तेविसावा.

अग्निजाड्य व त्याचा पराभव.

वैशंपायन सांगतातः—राजा, तो ब्राह्मण कृष्णार्जुनांस म्हणालाः—खांडवसमीपवर्ती लोकनायकहो, मी एक मोठा भोक्ता ब्राह्मण आहें. मी सदोदीत अपरिमीत खात असतों. यासाठीं आपणांजवळ एवढेंच मागतों कीं, मला एक वेळ तृप्त होईपर्यंत भोजन घाला. तें ऐकून कृष्णार्जुन म्हणाले, "विप्रा, आपण कोणत्या प्रकारच्या अन्नानें संतुष्ट व्हाल तें आम्हांस सांगा, म्हणजे तशा प्रकारचें अन्न संपादन करण्याचा आम्ही प्रयत्न करूं." याप्रमाणें कोणतें अन्न तयार करावें अशा आशयाचा त्यांचा प्रश्न ऐकून तो ब्राह्मण त्यांशीं बोलूं लागला.

ब्राह्मण म्हणालाः—मला अन्न खाण्याची इच्छा नाहीं, मी अग्नि आहें, असें समजून मला योग्य योग्य असें अन्न तुम्ही मला द्या. या खांडवारण्याचें इंद्र सदोदीत रक्षण करीत असतो; व श्रेष्ठ यांचें रक्षण करीत असल्यामुळें मला तें दग्ध करितां येत नाहीं. इंद्राचा मित्र जो एक तक्षक नांवाचा सर्पांचा राजा आहे, तो सदोदीत आपल्या परिवारासह या अरण्यांत राहातो, व त्याच्यासाठीं वज्रधारी इंद्र या अरण्याचें रक्षण करितो. त्या तक्षकाबरोबर तेथील अनेक प्राण्यांचेंही संरक्षण आपोआप केलें जातें. मला हें खांडववन दग्ध करण्याची फार इच्छा आहे; परंतु इंद्राच्या पराक्रमामुळें तसें करण्यास मी असमर्थ आहें. कारण, मी प्रज्वलित झालों असें दिसतांच इंद्र मेघोदकाचा वर्षाव करितो, त्यामुळें हें अरण्य

मनसोक्त जाळण्याची माझी इच्छा जागच्या जागींच राहते. कृष्णार्जुनहो, तुम्ही अस्त्रज्ञ आहां, तेव्हां तुम्हीं मला साह्य केल्यास तें अरण्य जाळण्यास मी समर्थ होईन. हें अशा प्रकारचें अन्न मी पसंत करीत आहें. यास्तव, हे उत्तम अस्त्रज्ञहो, तुम्ही त्या जलधारा व आंतील प्राणी यांचें सर्व बाजूंनीं उत्तम प्रकारें निवारण करा.

जनमेजय विचारतोः—भगवन्, ज्यांत नाना प्रकारचे जीव रहात होते, व ज्याचें प्रत्यक्ष महेंद्र रक्षण करीत होता, तें खांडववन दग्ध करण्याची अग्निनारायणास कां इच्छा असावी बरें? मला वाटतें, याचें कांहीं तरी मोठें कारण असावें. यास्तव, ब्रह्मन्, पूर्वी खांडववन कसें दग्ध झालें, तें यथातथ्य व विस्तारपूर्वक श्रवण करण्याची माझी इच्छा आहे.

श्वेतकि राजाची कथा.

वैशंपायन सांगतातः—राजा, ज्या कारणास्तव अग्नीनें खांडवारण्य दग्ध केलें, तें सर्व कारण इत्थंभूत सांगतों, श्रवण कर. अरे, अनेक ऋषींनीं जिचें वर्णन केलें आहे, अशी ही खांडवदाहाविषयींची पुरातन कथा मी तुला सांगतों. राजा. प्राचीन काळीं श्वेतकि नामक एक प्रख्यात राजा होऊन गेला. तो मोठा बलवान व पराक्रमी असून प्रत्यक्ष इंद्राच्या योग्यतेचा होता. त्याच्यासारखा यज्ञ करणारा, दाता व विचारी राजा कोणीच नाहीं. त्यानें मोठमोठे यज्ञ व क्रतु करून ब्राह्मणांस पुष्कळ दक्षिणा दिली. पुढें पुढें तर सत्र, नानाप्रकारचीं दानें, व इतर कर्मांचा प्रारंभ यांवाचून दुसरीकडे त्याचें लक्षच जाईनासें झालें. तो ऋत्विजांसहवर्तमान एकसारखा यजन करीत असे, तेणेंकरून त्याच्या ऋत्विजांचे डोळे धूमानें व्याकूळ होऊन गेले; व कांहीं दिवसांनीं तर ते अगदीं कंटाळून त्या राजास सोडून निघून गेले. तेव्हां राजानें त्यांची अनेक प्रकारें प्रार्थना केली. परंतु त्यांचे नेत्र अधू झाल्यामुळें ते परत यज्ञ करण्यास आले नाहींत. नंतर त्यांचें अनुमोदन घेऊन राजानें अन्य ऋत्विजांकडून तें कर्म समाप्त करविलें. पुढें कांहीं काळ गेल्यावर त्या राजास पुनः यज्ञ करण्याची इच्छा झाली. तेव्हां त्यास यज्ञ करण्यास शंभर वर्षेंपर्यंत कोणीच ऋत्विज मिळाला नाहीं. राजानें स्वतः व आपल्या सुहृज्जनांकडून ऋत्विज मिळविण्याची अनेक प्रकारें खटपट केली. त्या कीर्तिमंतानें ब्राह्मणांस साष्टांग नमस्कार घातले, मधुर पेयें पाजिलीं, व गोड बोलून मन वळविण्याचा वारंवार यत्न केला; परंतु ते राजाची विनंती मान्य करीतना. तेव्हां मात्र तो राजर्षि क्रुद्ध झाला, आणि आश्रमांत राहणाऱ्या तपोनिष्ठ ब्राह्मणांस म्हणाला, "विप्रहो, जर मी पतित असेन, किंवा आपल्या सेवेस सादर नसेन, तर आपणच काय, पण सर्व ब्राह्मणांनीं ताबडतोब माझा त्याग अवश्य करावा; परंतु तसें नसल्यास, माझी यज्ञाविषयीं जी श्रद्धा आहे, तिला आपण अडथळा आणणें किंवा माझा विनाकारण त्याग करणें आपणांस योग्य नव्हे. विप्रहो, मी आपणांस अगदीं शरण आलों आहें. मजवर प्रसाद करण्यास आपण समर्थ आहां. परंतु आपण जर केवळ द्वेषामुळें माझा त्याग करीत असाल, तर मी दुसऱ्या ब्राह्मणांकडे जाईन, व मधुर भाषण, दान इत्यादिकांनीं त्यांस प्रसन्न करून घेतल्यानंतर मी आपलें काय काम आहे तें त्यांस सांगेन."

जनमेजया, याप्रमाणें बोलून श्वेतकि राजा स्वस्थ उभा राहिला. यज्ञकर्म बंद करण्याविषयीं राजाचें मन आपणांस वळवितां येत नाहीं असें पाहून ते ऋत्विज खिन्न झाले व त्यास म्हणाले, "हे नृपश्रेष्ठा, तुझीं यज्ञकर्में नित्य चालू असतात. तीं सतत करतां करतां आम्ही अगदीं श्रांत झालों आहों, यास्तव या कामाच्या त्रासानें थकून गेलेल्या आम्हांस त्वां आतां सोडून द्यावें. हे पुण्यवंता, तुझी विचार-

शक्ति विकल झाल्यामुळें तुला यज्ञ करण्याची इतकी उतावळी झालेली आहे कीं, तीमुळें, आम्ही किती श्रांत झालों आहों हेंही तुला कळत नाहीं, यास्तव आतां तूं शंकराकडे जा, म्हणजे तो तुझा यज्ञ करील!"

ब्राह्मणांचें तें निंदाव्यंजक भाषण श्रवण करून श्वेतकि राजा रागारागानें कैलास पर्वतावर गेला, व उग्र तपश्चर्या करूं लागला. राजा, त्यानें इंद्रियांचा निग्रह केला असून त्याची ती तपश्चर्या मोठी प्रशंसनीय होती. देवाधिदेव शंकरास प्रसन्न करण्यासाठीं तो कित्येक दिवसांचीं उपोषणें करी व बाराव्या किंवा सोळाव्या दिवशीं फलमूलें भक्षण करून पारणें करी. पुढेंपुढें तर तो राजा दोन्ही हात वर करून डोळ्यांचें पातेंही न लवूं देतां स्वस्थ चित्तानें सहा महिनेपर्यंत खांबाप्रमाणें अचल राहिला. तेव्हां त्याची ती उग्र तपश्चर्या पाहून शंकरांनीं त्यास मोठ्या प्रीतीनें दर्शन दिलें. हे भारता, भगवान शंकर त्यास सप्रेम व गंभीर वाणीनें म्हणाले, "हे शत्रुतापना नरेंद्रा, तुझ्या या तपश्चर्येनें मी संतुष्ट झालों आहें, तुला पाहिजे असेल तो वर मागून घे." जनमेजया, अमिततेजस्वी शंकराचें तें भाषण श्रवण करून श्वेतकि त्यास साष्टांग प्रणिपात करून म्हणाला, "भगवन्, आपण देवदेवेश आहां; सर्व लोक आपल्या चरणीं लीन असतात. आपण जर मजवर प्रसन्न झालां असाल, तर, हे सुरेश्वरा, आपण स्वतः माझें याजनकर्म करा." राजाचें तें भाषण श्रवण करून भगवान शंकर संतुष्ट झाले आणि स्मित करून बोलूं लागले.

शंकर म्हणाले:—राजा, मी याजनकर्म करावें या उद्देशानें तूं मोठी तपश्चर्या केलीस, परंतु हें याजनकर्म करण्याचा आम्हांस अधिकार नाहीं. आतां ज्यापेक्षां तूं हा वर मिळविण्याच्या हेतूनें हें महत्तपाचरण केलेंस, त्यापेक्षां कांहीं कालानें मी तुझें याजनकृत्य करीन. श्वेतके, ब्रह्मचर्यानें राहून व अंतःकरण अगदीं स्वस्थ ठेवून सतत बारा वर्षेंपर्यंत एकसारख्या आज्यधारा चालवून जर तूं अग्नीस तृप्त करशील, तर हा तुझा मनोरथ मी पूर्ण करीन.

शूलपाणी शंकरानें याप्रमाणें सांगितल्यावर श्वेतकि राजानें त्यांच्या आज्ञेनुरूप सर्व कांहीं केलें. बारा वर्षें पूर्ण होतांच पुनः शंकर त्या ठिकाणीं आले; आणि राजाचें तें कृत्य अवलोकन करतांच त्यांस परम संतोष होऊन ते राजास म्हणाले, 'श्वेतके, तूं सर्व राजांत वरिष्ठ आहेस, तुझ्या या कृत्यानें मी संतुष्ट झालों आहें! हे परंतपा, याजन करणें हें फक्त ब्राह्मणांसच विहित असल्यामुळें तें मला करतां येत नाहीं; तथापि भूलोकीं दुर्वास मुनि म्हणून जो प्रख्यात महातेजस्वी ब्राह्मण आहे, तो प्रत्यक्ष माझाच अंश आहे. तो माझ्या आज्ञेनें तुझें याजन करील; तूं यज्ञसाहित्याची तयारी कर."

शंकराचें हें भाषण श्रवण करून राजा आपल्या नगरास परत आला; व साहित्याची जुळवाजुळव करूं लागला. मग सर्व सिद्धता झाल्यावर तो पुनः शंकरांकडे गेला आणि म्हणाला, "भगवन्. सर्व साहित्य व यज्ञास लागणारीं साधनें तयार झालीं आहेत, आतां आपल्या कृपेनें उद्याच दुर्वास मुनींनीं माझ्या यज्ञाची दीक्षा घ्यावी अशी माझी प्रार्थना आहे."

महात्म्या श्वेतकीचें हें भाषण श्रवण करून शंकर दुर्वासास हांक मारून म्हणाले, "द्विजवरा, हा महाभाग्यवान श्वेतकि राजा आहे, याचें याजनकर्म तूं करावेंस अशी माझी तुला आज्ञा आहे."

दुर्वास मुनींनीं 'ठीक आहे' म्हणून त्यांस उत्तर दिलें. नंतर त्या थोर राजाच्या सत्रास सुमुहूर्तावर प्रारंभ होऊन तें श्रुतींत सांगितल्याप्रमाणें अगदीं यथाविधि झालें, व ब्राह्मणांस विपुल दाक्षिणा मिळाली. असो, श्वेतकिराजाचें तें

सत्र समाप्त होतांच त्या यज्ञांत दीक्षा घेतलेले ब्राह्मण व सर्व सदस्य दुर्वास मुनींची अनुज्ञा घेऊन निघून गेले; आणि तो राजाही आपल्या नगरास परत आला; तेव्हां मोठमोठे वेदपारंगत विप्र त्यास सन्मान देऊं लागले, बंदीजन त्याची स्तुति करूं लागले, व नागरिक लोक त्याचें अभिनंदन करूं लागले. याप्रमाणें आपल्या कृतीनें सन्मान्य झालेला तो नृपश्रेष्ठ श्वेतकि पुष्कळ कालानें सर्व ऋत्विज व सदस्य यांसहवर्तमान स्वर्गलोकास गेला. असो; त्या राजानें केलेल्या सत्रांत बारा वर्षेंपर्यंत अग्नि हविर्द्रव्य भक्षण करीत होता. एकताननेनें चाललेल्या त्या अनुष्ठानांत तुपाचें व इतर हवनीय द्रव्याचें जें एकसारखें हवन होत होतें, त्याच्या योगानें अग्नि अत्यंत तृप्त झाला; इतका कीं, पुढें कोणाचेंही हविर्द्रव्य ग्रहण करण्याची त्यास इच्छा देखील होईना! त्याचा वर्ण पांढरा फटफटीत होऊन गेला, व प्रकाशही नीट पडेनासा झाला. पुढें तर त्यास एक रोगच जडला, व त्यामुळें तो निस्तेज होऊन त्यास वरचेवर ग्लानि येऊं लागली. आपण निस्तेज होत चाललों ही गोष्ट लवकरच अग्निनारायणाच्या लक्षांत आली; तेव्हां सर्व लोक ज्यास पूज्य मानतात त्या ब्रह्मलोकीं तो गेला. तेथें ब्रह्मदेव आसनावर बसले आहेत असें पाहून अग्नि त्यांस म्हणाला, "भगवन्, श्वेतकेतु राजानें मला पराकाष्ठेचें तृप्त केल्यामुळें माझ्या तोंडास विलक्षण अरुचि उत्पन्न झाली आहे, ती मला घालवितां येत नाहीं. यामुळें, जगत्पते, मी निर्बल व निस्तेज होऊन गेलों आहें. यास्तव आपल्या प्रसादानें माझी प्रकृति पूर्वस्थितीवर यावी अशी माझी इच्छा आहे."

अग्नीचें तें भाषण श्रवण करून, संपूर्ण विश्व उत्पन्न करणारे ब्रह्मदेव किंचित् हास्य करून त्यास म्हणाले, "हे हव्यवाहना, ज्यानें सतत आज्यधारा चालतात त्या वसोर्धारा नामक पात्रानें हवन केलेलें द्रव्य तूं सतत बारा वर्षेंपर्यंत भक्षण केलेंस, त्यामुळें तुला ग्लानि आली आहे, व तुझें तेज एकाएकी नष्ट झालें आहे; तथापि तूं भिऊन जाऊं नको. तूं पुनः पूर्वीसारखा होशील. तुझी अरुचि मी नाहींशी करीन हें निश्चयपूर्वक सांगतों. अरे, पूर्वयुगांत तुला एकदा अशीच ग्लानि आली होती त्या वेळीं तूं देवांच्या शत्रूंचें वसतिस्थान जें अतिघोर खांडववन तें दग्ध केलें होतेंस. अनला, त्या वनांत सांप्रत सर्व प्रकारचे प्राणी राहतात. त्या सर्वांचा भेद तूं भक्षण केलास म्हणजे तुझी प्रकृति पूर्ववत् होईल. यास्तव लवकर जा, व तें वन दग्ध कर, म्हणजे तूं या आजारांतून मुक्त होशील."

ब्रह्मदेवांच्या मुखांतून निघालेले हे शब्द ऐकतांच अग्नि त्वरेनें निघाला, आणि मोठ्या वेगानें खांडववनास जाऊन पोहोंचला. तेथें येतांच तो क्रुद्ध झालेला अग्नि वायूच्या साह्यानें एकदम प्रज्वलित झाला. खांडववन प्रदीप्त झालेलें पाहतांच त्यांत राहणारे प्राणी अग्नि विझविण्यासाठीं नेटानें प्रयत्न करूं लागले. शेंकडों हजारों हत्ती खवळून जाऊन आपआपल्या सोंडांनीं पाणी आणून वरचेवर अग्नीवर शिंपडूं लागले. पुष्कळ फडांचे नाग क्रोधानें बेहोष होऊन आपल्या फडांनीं पाणी आणून भराभर अग्नीजवळ टाकूं लागले. तसेंच इतर प्राणीही दगड, माती वगैरे अग्नीवर फेकूं लागले. याप्रमाणें सर्वांनीं मिळून नानाउपायांनीं तो अग्नि त्वरित विझवून टाकिला! राजेंद्रा, अग्नि खांडववनांत पुनः पुन प्रज्वलित होऊं लागला असतां आतां सांगितलेल्या रीतीनेंच सात वेळां विझविला गेला!

अध्याय दोनशें चोविसावा.

—:०:—

अर्जुन व अग्नि यांचा संवाद.

वैशंपायन सांगतातः—राजा, याप्रमाणें सात वेळ पराभव झाल्यामुळें अग्नीची अगदीं निराशा झाली, व त्यास वारंवार ग्लानि येऊं लागली. तेव्हां रागारागानें ब्रह्मदेवांकडे जाऊन त्यानें घडलेली सर्व हकीकत जशीच्या तशी निवेदन केली. तेव्हां मुहूर्तमात्र विचार करून ब्रह्मदेव त्यास म्हणाले, "बाबा, तें वन तुला जाळतां येईल अशा प्रकारची एक युक्ति मीं शोधून काढिली आहे. अनला, जरा दम धर, म्हणजे सर्व सांगतों. हव्यवाहना, नरनारायण हे अर्जुन गोविंदांच्या रूपानें अवतीर्ण होणार आहेत. ते तुला साह्यकर्ते होतील व त्यांच्या मदतीनें तुला खांडववन जाळतां येईल. यावर अग्नीनें "फार उत्तम" म्हणून उत्तर दिलें. पुढें नरनारायणांनीं अवतार घेतल्यानंतर पुष्कळ दिवसांनीं अग्नीस ब्रह्मदेवांच्या त्या वचनाची आठवण होऊन तो पुनः ब्रह्मदेवांकडे गेला तेव्हां ब्रह्मदेव त्यास म्हणाले, "अनला, प्रत्यक्ष इंद्र पहात असतांही तुला जेणेंकरून खांडववन आजच्या आज जाळतां येईल, तो उपाय असाः पूर्वीं देव असलेले जे नरनरायण, त्यांनीं देवकार्यासाठीं मनुष्यलोकांत जन्म घेतला आहे. त्यांस लोक अर्जुन व वासुदेव असें म्हणतात. ते सांप्रत खांडवारण्यानजीकच एकत्र बसले आहेत, त्यांजकडे तूं जा; आणि खांडवदाहार्थ त्यांचें साह्य माग. त्यांचें साह्य मिळाल्यावर मग देव जरी त्या अरण्याचें रक्षण करीत असले तरी तें तुला जाळतां येईल. सर्व प्राण्यांचें ते प्रयत्नानें निवारण करतील. त्याचप्रमाणें, देवांचा राजा जो इंद्र, त्याचेंही ते निवारण करतील यांत तिलमात्र संशय नाहीं नृपोत्तमा, ब्रह्मदेवांचें हें भाषण श्रवण करून अग्नि कृष्णार्जुनांजवळ गेला, व पुढें त्यानें कांय मागितलें तें मीं तुला पूर्वींच सांगितलें आहे. राजा, अग्नीचें तें भाषण श्रवण करून, इंद्राच्या इच्छेविरुद्ध खांडववन दग्ध करण्याची इच्छा करणाऱ्या त्या अग्नीस अर्जुनानें समयोचित असें उत्तर दिलें.

अर्जुन म्हणालाः—मजजवळ उत्तम उत्तम अशीं पुष्कळ अस्त्रें आहेत, त्यांच्या योगानें मी शेंकडों वज्रधारी इंद्राशीं युद्ध करण्यासही समर्थ आहे; परंतु, हे भगवन्, समरामध्यें लढत असतां माझी तडफ सोसण्याजोगें म्हणजे माझ्या बाहुबलास अनुरूप असें धनुष्य मजजवळ नाहीं. मी बाणांचा एकसारखा वर्षाव करीत असल्यामुळें मला अक्षय्य बाण पुष्कळच लागतात. यास्तव, मला पाहिजे तितके बाण वाहून नेण्यास समर्थ असा रथही मजजवळ नाहीं. मला पांडुरवर्णाचे वायुवेगानें चालणारे दिव्य घोडे व सूर्याप्रमाणें तेजस्वी असून मेघांप्रमाणें शब्द करणारा उत्तम रथ पाहिजे आहे. तसेंच, ज्याच्या योगानें रणांत नागपिशाचादिकांस मारितां येईल अशा प्रकारचें कृष्णाच्या पराक्रमास साजेल असें शस्त्र त्याजजवळ नाहीं. तेव्हां, भगवन्, हें मिळण्यास कांहीं उपाय असल्यास आम्हांस सांगा. कारण, हें साहित्य मिळाल्यावर महारण्यांत वर्षाव करणाऱ्या इंद्राचें आम्ही खातरीनें निवारण करूं. सारांश, आम्हांस स्ववीर्याप्रमाणें जें जें करतां येण्याजोगें आहे, तें करण्यास आम्ही सिद्ध आहों. मात्र त्या कामास योग्य अशीं साधनें आपण आम्हांस पुरविलीं पाहिजेत.

अध्याय दोनशें पंचविसावा.

—:०:—

अर्जुनाला गांडीवादिकांची प्राप्ति.

वैशंपायन सांगतातः—अर्जुनानें याप्रमाणें भाषण केल्यावर, धूम हा ज्याचा ध्वज, त्या भगवान अग्नीनें, जलांत वास करणारा व जलाधिपति जो अदितिपुत्र लोकपाल वरुण त्याचें दर्शन घेण्या-

च्या इच्छेनें ध्यान केलें. अग्नीचा तो हेतु जाणून वरुण तेथें प्रकट झाला. तेव्हां त्याचा आदरसत्कार करून अग्नि म्हणाला, "जलेश्वरा, तूं चौथा लोकपाल व देवांचा देव असून नित्य आहेस. तुला चंद्रानें दिलेलें तें धनुष्य, दोन भाते व कपिध्वज रथ सत्वर मला दे. कारण, त्या धनुष्यानें अर्जुन माझें फार मोठें काम करणार आहे. त्याचप्रमाणें, श्रीकृष्णही सुदर्शन चक्रानें फार मोठें काम करणार आहे. यास्तव, हें सर्व तूं मला आजच्या आज दे." यावर वरुणानें 'देतों' म्हणून उत्तर दिलें; आणि त्याप्रमाणें, ज्यांतील बाणांचा कधींच क्षय होत नाहीं, असे दोन मोठे भाते व अत्यद्भुत गांडीव धनुष्य अर्जुनास दिलें. तें धनुष्य मोठें बळकट असून यश व कीर्ति वाढविणारें होतें. कोणत्याही शस्त्रानें त्याचा भंग व्हावयाचा नाहीं इतकेंच नव्हे, तर सर्व शस्त्रांचा नाश करण्यास तें समर्थ होतें. तें एकटें एक लक्ष आयुधांची बरोबरी करणारें असल्यामुळें, शत्रुसैन्यास पराभूत करणारें व म्हणूनच सर्व आयुधांत श्रेष्ठ होतें. असें तें राज्यवर्धक धनुष्य चित्रविचित्र रंगांनीं विभूषित होतें. त्या अक्षत व आटोपसर धनुष्यास शेंकडों वर्षांपासून देव, दानव व गंधर्व परमपूज्य मानीत आले होते. असो; या धनुष्यभात्यांशिवाय एक दिव्य अश्व जोडलेला कपिध्वज रथही वरुणानें अर्जुनास दिला. त्याचे घोडे गंधर्वलोकांतील असून पांढऱ्या मेघाप्रमाणें स्वच्छ होते. ते वेगामध्यें मन किंवा वायु यांची बरोबरी करणारे असून, सुवर्णमालांनीं अलंकृत केलेले होते. त्या रथावर सर्व प्रकारचीं युद्धोपयोगी साहित्यें सिद्ध असून तो देवदानवांसही अजिंक्य होता. तो सर्व रत्नांमध्यें मनोहर व देदीप्यमान असून त्याचा शब्द मोठा गंभीर होत असे. भुवनप्रभु जो प्रजापति विश्वकर्मा, त्यानें मोठी तपश्चर्या खर्च करून हा रथ बनविला होता. याच सूर्यासारख्या तेजस्वी रथांत बसून पूर्वी चंद्रानें दानवांस जिंकिलें. असो; नूतन मेघांवर ज्याप्रमाणें इंद्रधनुष्य विराजमान व्हावें, त्याप्रमाणें या अत्यंत सुशोभित व मेघवर्णाच्या रथावर देह व वस्त्र यांच्या कांतीनें इंद्रधनुष्याप्रमाणें शोभणारे ते कृष्णार्जुन आरूढ झाले. त्या रथावरील ध्वजाचा दांडा सुवर्णाचा असून फारच मनोहर व सर्वोत्कृष्ट होता. त्या ध्वजदंडावर सिंहव्याघ्रांप्रमाणें भयंकर आकृतीचा एक दिव्य वानर होता. रथाच्या शिरोभागीं असलेला तो वानर शत्रुसैन्यास दग्धच करितो कीं काय असें वाटे. या वानराशिवाय त्या ध्वजावर दुसरेही पुष्कळ नानाप्रकारचे भयंकर प्राणी होते. त्यांच्या गर्जनांनीं शत्रुसैन्यें मूर्छित होऊन जात. असो; त्या अनेक पताकांनीं शोभणाऱ्या श्रेष्ठ रथास अर्जुनानें प्रदक्षिणा करून देवतांसही प्रणाम केला; व कवच, खड्ग, तलत्राण व अंगुलित्राण धारण करून युद्धास सिद्ध होऊन तो अर्जुन, पुण्यवान पुरुष विमानांत आरूढ होतो त्याप्रमाणें त्या रथावर आरूढ झाला. नंतर त्या वीर्यशाली अर्जुनानें अग्नीस नमस्कार करून ब्रह्मदेवांनीं प्राचीनकाळीं निर्माण केलेलें तें श्रेष्ठ दिव्य गांडीव धनुष्य मोठ्या आनंदानें हातांत घेतलें; आणि मोठा जोर करून त्यास प्रत्यंचा चढविली. तो महाबलाढ्य अर्जुन धनुष्यास गुण चढवीत असतां तिचा टणत्कार इतका भयंकर झाला कीं, तो ज्यांनीं ज्यांनीं ऐकिला त्यांचीं त्यांचीं अंतःकरणें भेदरून गेलीं.

श्रीकृष्णाला चक्र व गदाप्राप्ति.

असो; याप्रमाणें धनुष्य, रथ व अक्षय्य भाते मिळतांच अर्जुनास आनंद झाला, व तो अग्नीस साह्य करण्यास समर्थ झाला. नंतर अग्नीनें श्रीकृष्णास एक चक्र दिलें. त्यास, सोडणाराच्या हातीं परत येण्याची तजवीज केली होती. असें तें आग्नेयास्त्राप्रमाणें प्रियकर चक्र मिळतांच श्रीकृष्ण-

ही त्यास साह्य करण्यास समर्थ झाला. तेव्हां अग्नि त्यास म्हणाला, "मधुसूदना, या चक्रानें तूं देव, राक्षस इत्यादि मनुष्येतरांसही जिंकशील यांत संशय नाहीं. या चक्राच्या योगानें तूं युद्धामध्यें मनुष्य, देव, राक्षस, पिशाच, दैत्य व नाग यांसही भारी होशील, व शत्रूंचा मोड करण्यांत देखील प्रवीण होशील यांत शंका नाहीं. माधवा, संग्रामामध्यें हें चक्र तूं वरचेवर शत्रूंवर फेकलेंस तथापि तें निष्प्रतिबंधपणें शत्रूंचा नाश करून पुनः पुनः तुझ्या हातीं परत येईल."

यानंतर, भगवान वरुणानेंही, जिचा शब्द वज्राप्रमाणें कठोर होतो अशी दैत्यांचा संहार करणारी कौमोदकी नामक भयंकर गदा श्रीकृष्णास दिली. याप्रमाणें रथ, ध्वज, शस्त्रें व अस्त्रें यांनीं संपन्न झालेले ते कृष्णार्जुन मोठ्या आनंदानें अग्नीस म्हणाले, "भगवन्, आतां आम्ही सर्व देव व सर्व राक्षस यांजबरोबरही युद्ध करण्यास समर्थ आहों; मग सर्पासाठीं युद्धाची इच्छा करणाऱ्या एकट्या इंद्राची ती कथा काय?"

खांडवदाह.

पुनः अर्जुन म्हणाला:—हा वीर्यशाली श्रीकृष्ण हातांत चक्र घेऊन निघाला असतां त्यास अशक्य असें त्रैलोक्यांतही कांहींएक नाहीं. हे पावका, हें गांडीव धनुष्य व हे मोठे अक्षय्य भाते मिळाल्यावर सांप्रत युद्धामध्यें त्रैलोक्य जिंकण्याची उमेद आली आहे. यास्तव, हे महासमर्था, या खांडववनास सर्व बाजूंनीं घेरून तूं आजच यथेष्ट प्रज्वलित हो. आम्ही तुझें साह्य करण्यास समर्थ आहों.

वैशंपायन सांगतात:—श्रीकृष्ण व अर्जुन यांनीं अग्नीस याप्रमाणें सांगितलें असतां तो प्रज्वलित होऊन खांडववन जाळूं लागला. चोहोंबाजूंनीं तें अरण्य दग्ध करण्यास अग्नीनें सुरवात केली, तेव्हां कल्पांतच होत आहे कीं काय असा भास होऊं लागला! हे भरतर्षभा, श्रीकृष्ण व अर्जुन यांची अनुज्ञा घेऊन मेघगर्जनेप्रमाणें शब्द करीत अग्नि त्या अरण्यांत शिरतांच तेथील सर्व प्राणी थरथरां कांपूं लागले, व तें अरण्य दग्ध होऊं लागलें. तेव्हां सूर्यकिरणांनीं व्याप्त झालेल्या मेरु पर्वताप्रमाणें तें शोभूं लागलें!

अध्याय दोनशें सव्विसावा.

—:०:—

इंद्रक्रोध

वैशंपायन सांगतात:—नंतर ते रथिश्रेष्ठ कृष्णार्जुन वेगवेगळ्या रथांत बसले; आणि खांडवारण्याच्या दोहों बाजूस राहून त्यांनीं आंतील सर्व प्राण्यांचा चोहोंकडून भयंकर विध्वंस मांडिला. खांडववनांत राहणारे प्राणी ज्या ज्या बाजूस पळून जातांना दिसत, त्या त्या बाजूस ते दोघे वीर धावून जात. त्या वेळीं त्यांचे रथ इतके जलद फिरत होते कीं, त्या दोहोंमधील अंतर सुळींच दृष्टोत्पत्तीस येत नव्हतें. म्हणजे कोलीत गरगर फिरवीत असतां जसें चोहींकडे तेजाचें कडें दिसतें, तसें या जलद फिरणाऱ्या दोन रथांचें एक अखंड कडेंच खांडववनाभोंवतीं आहेसें दिसे. तें अरण्य दग्ध होऊं लागतांच हजारों प्राणी भयंकर किंकाळ्या फोडीत चोहों बाजूंनीं बाहेर पडूं लागले. त्यांतील कित्येकांचीं शरीरें अर्धवट जळलीं होतीं; कित्येक होरपळून गेले होते; कित्येकांचे डोळे फुटले असून दुसऱ्या कित्येकांचीं अंगें अगदीं फुटून गेलीं होतीं; आणि कित्येक तर केवळ भयानें पळत सुटले होते. ज्या कित्येक प्राण्यांस ममतेमुळें आपले मुलगे, आईबाप व बांधव यांस सोडून जाववेना, ते त्यांस आलिंगन देऊन जागच्या जागींच मरण पावले. कित्येक दांतओठ खात अनेक वेळां अग्नींतून उड्या मारून बाहेर पडले, परंतु कृष्णार्जुनांच्या प्रभावापुढें त्यांचा प्रयत्न हरून त्यास भयंकर किंकाळ्या फोडीत

परत अग्नींतच पडावें लागलें. कित्येक पक्ष्यांचे पंख, डोळे व पाय दग्ध झाल्यामुळें ते मूर्छित होऊन जमिनीवर ठिकठिकाणीं मरत पडलेले दिसूं लागले. जलाशयांतील पाणी अग्नीच्या योगानें तप्त होऊन कढूं लागल्यामुळें त्यांतील मत्स्यकूर्मादि प्राणी मरून गेले. अशा प्रकारें त्या ठिकाणीं प्राण्यांचा संहार चालला असतां कित्येकांचीं शरिरें अत्यंत तप्त होऊन लाल झाल्यामुळें ते मूर्तिमंत अग्निच आहेत कीं काय असें भासूं लागलें. कित्येक प्राणी उडून जाऊं लागले, त्यांचे अर्जुनानें बाणांच्या योगानें तुकडे तुकडे करून त्यांस प्रदीप्त अग्नींत पाडिलें. तेव्हां त्यांचि सर्वांगास बाण लागल्यामुळें ते भयंकर किंकाळ्या फोडीत जरासे उंच उडून पुनः खांडवारण्यांतच येऊन पडले. त्या अरण्यांत राहणाऱ्या प्राण्यांच्या झुंडीच्या झुंडी बाणांनीं ताडित झाल्या असतां त्यांचा शब्द समुद्रमंथन होत असतां त्यांतून निघणाऱ्या ध्वनीप्रमाणें प्रचंड होऊं लागला. प्रदीप्त अग्नीच्या भयंकर ज्वाला आकाशास जाऊन मिळाल्या, तेणेंकरून देव अतिशय उद्विग्न झाले; आणि ते स्वर्गांत राहणारे देव, ऋषि वगैरे सर्व महात्मे त्या ज्वालांनीं संतप्त होऊन, असुरमर्दन करणारा देवांचा राजा जो सहस्राक्ष इंद्र त्याकडे गेले.

देव म्हणाले:—अमरनाथा, सर्व लोक अग्नीनें जळून जात आहेत हें आहे तरी काय? अरे, त्रैलोक्याचा प्रलय होण्याची वेळ प्राप्त झाली कीं काय?

वैशंपायन सांगतात:—त्यांचें हें भाषण श्रवण करतांच इंद्रानें स्वतः तिकडे पाहिलें, आणि खांडववनाची अग्नीपासून मुक्तता करण्यासाठीं तो तात्काळ उठला! नंतर, अनेक आकारांच्या शेंकडों रथांनीं आकाश व्याप्त करून त्यानें पर्जन्यवृष्टीस सुरवात केली. त्या वेळीं इंद्राच्या प्रेरणेनें मेघांनीं खांडवारण्यावर मुसळधार धरली, परंतु अग्नीच्या उष्णतेनें सर्व पाण्याची आकाशांतच वाफ झाल्यामुळें तें अग्नीपर्यंत पोहोंचलेंच नाहीं. हें पाहून इंद्र अग्नीवर फारच संतापला, व पुनः प्रचंड मेघांच्या योगानें मोठा वर्षाव करूं लागला. तेव्हां ज्वाला व पर्जन्य यांनीं चोहोंकडून वेष्टित झालेलें तें खांडवारण्य धूर, मेघ व वीज यांनीं व्याप्त झाल्यामुळें फारच भयाण होऊन गेलें!

अध्याय दोनशें सत्ताविसावा.

—:०:—

देव–कृष्णार्जुनयुद्ध.

वैशंपायन सांगतात:—जनमेजया, इंद्र याप्रमाणें पर्जन्यवृष्टि करूं लागला, तेव्हां अर्जुनानें अस्त्रप्रयोगाचें विलक्षण चातुर्य दाखवून बाणवृष्टीनें त्याचें निवारण केलें. चंद्र ज्याप्रमाणें धुक्यानें सर्व प्रदेश व्याप्त करितो, त्याचप्रमाणें त्या अतर्क्यस्वरूपी अर्जुनानें अगणित बाणांच्या योगानें तें खांडववन झांकून टाकलें. तो शरवृष्टीनें आकाश व्याप्त करूं लागला तेव्हां त्या खांडववनांतून कोणत्याही प्राण्यास बाहेर पडतां येईना. या वेळीं, सर्पांचा महाबलाढ्य राजा जो तक्षक तो तेथें मुळींच नव्हता. खांडवारण्य दग्ध होऊं लागतांच तो कुरुक्षेत्रांत जाऊन राहिला होता. त्या तक्षकाचा अश्वसेन नामक एक महापराक्रमी पुत्र तेथें होता, त्यानें अग्नींतून सुटण्याचा भगीरथ प्रयत्न केला; परंतु अर्जुनाच्या बाणांपुढें त्याचा कांहींच उपाय चालेना. तेव्हां त्याच्या आईनें त्यास गिळून तेथून सोडविलें. ती प्रथम त्याचें मस्तक ग्रस्त करून पुच्छ गिळीत गिळीत पुत्राची सुटका करण्याच्या इच्छेनें बाहेर पडली; इतक्यांत अर्जुनानें तीक्ष्ण शरानें तिचें शिर उडविलें. हें पाहतांच त्या अश्वसेनास सोडविण्यासाठीं इंद्रानें वायवास्त्र सोडून अर्जुनास तात्काळ मोहित केलें, त्यामुळें अश्वसेन सुटून गेला. ती घोर माया अवलोकन करून व नागानें

आपणास फसविलें हें पाहून अर्जुनानें आकाशांत उंच गेलेल्या प्राण्यांचे तात्काळ दोन दोन तीन तीन तुकडे करून टाकले; अग्नि, अर्जुन व कृष्ण या तिघांनींही संतापानें "तुझें निसंतान होईल" असा त्या नागास शाप दिला. नंतर इंद्रानें फसविल्यामुळें अर्जुन चिडून जाऊन बाणांच्या योगानें आकाश व्याप्त करून इंद्राशीं लढूं लागला. त्या वेळीं अर्जुन युद्धास सरसावला असें पाहतांच इंद्रानेंही संपूर्ण नभोमंडल आच्छादित करून आपलें तीव्र अस्त्र सोडिलें. तेव्हां सर्व सागरांस क्षुब्ध करणारा झंझावात मोठ्यानें घोंघावत आकाशांत उत्पन्न झाला, आणि त्यानें जलवृष्टि करणारे मेघ उत्पन्न केले. त्यांपासून मोठा गडगडाट व विजांचा चकचकाट होऊं लागला. तेव्हां कोणत्याही अस्त्राचा प्रतीकार कसा करावा हें उत्तम जाणणाऱ्या पार्थानें मेघनाशार्थ सर्वोत्तम असें वायवास्त्र मंत्रून तें सोडिलें. त्याच्या योगानें, इंद्रानें उत्पन्न केलेल्या मेघांचें तेज व सामर्थ्य नष्ट झालें, सर्व जलधारा शुष्क झाल्या, विद्युत्प्रभा लोपून गेल्या, आणि एका क्षणांत धूळ व अंधार यांचा नाश होऊन आकाश स्वच्छ झालें. सुखकर असे थंडगार वारे वाहूं लागले, सूर्य नेहमींप्रमाणें प्रकाशमान झाला, व आपल्या कार्यास आलेलें विघ्न नष्ट झाल्यामुळें अग्नीस आनंद होऊन त्यानें ठिकठिकाणीं नानाप्रकारचे आकार धारण करून पेट घेतला, आणि त्यामध्यें प्राण्यांच्या शरिरांपासून निघालेली चरबी पडल्यामुळें तर त्याच्या ज्वाला फारच पसरल्या! याप्रमाणें तें अरण्य पेटलें असतां अग्नीचा इतका मोठा शब्द होऊं लागला कीं, तेणेंकरून संपूर्ण जग दुमदुमून गेलें. हे राजेंद्रा, कृष्णार्जुन अग्नीचें संरक्षण करीत आहेत असें पाहून गरुडप्रभृति पक्षी अहंपणानें आकाशांत जमले. गरुडानें आपल्या वज्रासारख्या कठोर पंखांनीं, चोंचीनें व नखांनीं कृष्णार्जुनांस प्रहार करण्याच्या उद्देशानें त्यांवर अचानक झडप घातली. त्याचप्रमाणें, संतप्त झाल्यामुळें ज्यांचीं तोंडें लाल भडक झालीं आहेत अशा नागांच्या झुंडीच्या झुंडी भयंकर विषाचा वर्षाव करीत अर्जुनाजवळ आल्या, परंतु अर्जुनानें आपल्या कोपरूप अग्नीनें सिंचित केलेल्या बाणांनीं त्या सर्वांचे तुकडे उडविले. तेव्हां ते देहविसर्जनार्थ पुनः त्या प्रदीप्त अग्नींतच जाऊन पडले! यानंतर असुर, गंधर्व, यक्ष, राक्षस व सर्प भयंकर गर्जना करीत युद्धास सरसावले. कृष्णार्जुनांस ठार करण्यासाठीं त्यांनीं बंदुका, दगड फेंकण्याचें चक्राश्म नामक लांकडी यंत्र, व गोफणी धारण केलेले आपले बाहु उंच केले असून क्रोधावेशानें त्यांचें तेज प्रखर झालें होतें. ते मोठमोठ्यानें वल्गना करून शस्त्रवर्षाव करीत असतां पार्थानें आपल्या तीक्ष्ण बाणांनीं त्यांचीं डोकीं उडविलीं. शत्रूंचा संहार करणाऱ्या त्या महाप्रतापी श्रीकृष्णानें तर दैत्यदानवांचे थवेच्या थवे धुळीस मिळविले. ज्याप्रमाणें भोंवऱ्यांत सांपडून भ्रमण करणारे तृणादिक पदार्थ किनाऱ्यास पोहोंचले म्हणजे स्तब्ध पडतात, त्याचप्रमाणें शरविव्हल झालेले कित्येक महापराक्रमी राक्षसादिक अस्त्रसामर्थ्यानें ओढले जाऊन कृष्णार्जुनांजवळ येऊन निश्चेष्ट पडले. नंतर देवाधिदेव इंद्र क्रुद्ध होऊन शुभ्र ऐरावतावर आरूढ होऊन कृष्णार्जुनांवर धावला. त्यानें मोठया वेगानें वज्र उचलून तें त्यांवर सोडलें, आणि ते दोघे मेले म्हणून देवांस सांगूनही टाकलें! इंद्रानें वज्र उचललेलें पाहतांच देवांनींहीं आपापलीं शस्त्रें सरसाविलीं. राजा, यमानें कालदंड घेतला, कुबेरानें गदा उचलली, वरुणानें पाश ग्रहण केले, स्कंद अशनि नामक अद्भुत शक्ति घेऊन मेरु पर्वतासारखा निश्चल उभा राहिला, अश्विनीकुमारांनीं दिव्य ओषधि घेतल्या, ब्रह्मदेवानें धनुष्य धारण केलें, व जयानें मुसळ उचलिलें! महाबली विश्वकर्म्यानें

तर संतप्त होऊन एक पर्वतच हातांत घेतला, अंशानें शक्ति स्वीकारिली, मृत्युदेवानें परश्वध नामक शस्त्राचा अवलंब केला, अर्यमाही परिघ नामक भयंकर शस्त्र घेऊन भ्रमण करूं लागला,' व ज्यास सभोंवार वस्तरे लाविले आहेत असें चक्र हातांत घेऊन मित्र उभा राहिला. राजेंद्रा, पूषा, भग व सविता हेही क्रुद्ध होऊन धनुष्यें व खड्ग घेऊन कृष्णार्जुनांवर धावले. त्याचप्रमाणें रुद्रगण, वसुगण, महाबलाढ्य मरुद्गण, विश्वेदेव, स्वतेजानें देदीप्यमान असलेले साध्य, हे व दुसरे पुष्कळ देव त्या पुरुषोत्तम कृष्णार्जुनांस ठार करण्याच्या हेतूनें नानाप्रकारचीं शस्त्रास्त्रें घेऊन त्यांजवर धावले. घनघोर संग्रामामध्यें प्रलयकाळीं होणाऱ्या उल्कापातासारखे अद्भुत व प्राण्यांस बेशुद्ध पाडणारे भयंकर उल्कापात होऊं लागले. देवांसहवर्तमान इंद्र अत्यंत खवळला आहे असें पाहतांच ते अस्खलित युद्ध करणारे निधड्या छातीचे दोघे अजिंक्य वीर धनुष्यें सज्ज करून उभे राहिले; आणि आपणांवर चाल करून येणाऱ्या देवांस त्वेषानें वज्रतुल्य बाण सोडून ताडन करूं लागले. त्या वेळीं देवांचे प्रयत्न वरचेवर निष्फळ होऊन त्यांचा पुष्कळ वेळां पराभव झाला. तेव्हां शेवटीं ते भीतीनें रणभूमि सोडून इंद्राच्या आश्रयास गेले. अशा प्रकारें अर्जुन व माधव यांनीं देवांचा पराभव केलेला पाहून अंतरिक्षांत जमलेल्या मुनींस फारच चमत्कार वाटला. त्याचप्रमाणें, इंद्रही युद्धामध्यें त्यांचा पराक्रम वारंवार अवलोकन करून फार संतुष्ट झाला. तथापि तो पुनः त्यांच्याशीं लढूं लागला. अर्जुनाचें सामर्थ्य पुनः अवलोकन करण्याच्या इच्छेनें त्यानें दगडांची भयंकर वृष्टि केली; परंतु अर्जुनानें बाणांचा वर्षाव करून तिचें निरसन केलें. इंद्रानें पुनः त्याहून जोराची शिलावृष्टि केली; परंतु त्या इंद्रपुत्र अर्जुनानें शीघ्रगामी बाणांच्या योगानें तिचाही नायनाट करून टाकला, व आपला पिता जो इंद्र त्यास संतुष्ट केलें ! यानंतर इंद्रानें आपल्या दोन्ही हातांनीं मंदराचलाचें एक प्रचंड शिखर वरील वृक्षांसह उपटून त्या पांडुनंदनाचा घात करण्यासाठीं त्यावर टाकलें. त्या वेळीं अर्जुनानें, ज्यांचीं अग्रें प्रज्वलित आहेत व जे मोठ्या वेगानें सरळ गमन करतात अशा बाणांच्या योगानें त्या पर्वतशृंगाच्या ठिकऱ्या उडविल्या! तो पर्वत विदीर्ण होत असतां चंद्र, सूर्य व ग्रह यांसहवर्तमान आकाशाचेच तुकडे उडत आहेत कीं काय असें भासलें! तें प्रचंड पर्वतशृंग एकदम खालीं खांडवारण्यांत पडलें, तेव्हां तेथील असंख्य प्राणी त्याच्या खालीं चिरडून जाऊन मरण पावले!

मयदर्शनपर्व.

अध्याय दोनशें अठ्ठाविसावा.

मयासुराचें रक्षण.

वैशंपायन सांगतातः—राजेंद्रा, त्या खांडवारण्यांत राहणारे दानव, राक्षस, नाग, तरस, अस्वल, मदोन्मत्त हत्ती, वाघ, सिंह, हरणें, रानरेडे, शरभ पक्षी वगैरे अनेक जातींचे प्राणी तें शिखर पडतांच भयभीत होऊन सैरावैरां पळत सुटले, आणि दीन वदनानें त्या अरण्याकडे व कृष्णार्जुनांकडे पाहूं लागले. तें पर्वतशृंग खालीं पडलें तेव्हां जो प्रचंड ध्वनि झाला, त्याच्या योगानें उरांत धडकी भरून ते चोहोंकडे पाहूं लागतात, तों सर्व अरण्य अनेक प्रकारें पेटत आहे, व बाहेरच्या बाजूस श्रीकृष्ण अस्त्र सज्ज करून उभा आहे असें त्यांच्या दृष्टीस पडलें. तेव्हां त्यांनीं भयंकर किंकाळ्या फोडल्या. त्यांच्या घोर नादानें व अग्नीच्या तडतडाटानें आकाश प्रलयकालच्या मेघगर्जनेप्रमाणें दुमदुमून गेलें. इतक्यांत, महाबाहु श्रीकृष्णानें, जें स्वतांच्या तेजानें प्रकाशमान झालें होतें असें तें मोठें भयंकर चक्र त्यांच्या नाशार्थ सोडिलें; तेव्हां त्या चक्राच्या प्रहारानें दानवराक्षसांसहवर्तमान तेथील सर्व क्षुद्र प्राण्यांचा चक्काचूर उडून ते एका क्षणांत अग्नींत जाऊन पडले! सायंकालीं आकाशामध्यें ज्याप्रमाणें जागजागीं निघालेले मेघ आरक्त दिसतात, त्याप्रमाणें या ठिकाणीं ते दैत्य कृष्णाच्या चक्रानें विदीर्ण होऊन त्यांचीं शरीरें मेद व रुधिर यांनीं भरून गेल्यामुळें आरक्तवर्ण दिसूं लागलीं. हे भारता, तो वृष्णिकुलोत्पन्न श्रीकृष्ण हजारों पिशाच, पक्षी, नाग व पशु यांचा संहार करीत कृतांतकाळाप्रमाणें तेथें संचार करूं लागला. तो एकसारखा आपलें चक्र फेकीत असून तें प्रत्येक वेळीं अनेक प्राण्यांस ठार करून वरचेवर त्याच्या हातांत परत येत होतें. याप्रमाणें पिशाच, सर्प व राक्षस यांचा वध करीत असतां त्या सर्वभूतात्मक श्रीकृष्णाचें स्वरूप फारच उग्र दिसूं लागलें. सर्व देव त्या ठिकाणीं चोहोंकडून जमा झाले होते, परंतु युद्धांत कृष्णार्जुनांस जिंकणारा एकही त्यांत निघाला नाहीं. कृष्णार्जुनांपासून खांडवारण्याचें रक्षण करून अग्नि विझवून टाकणें आपणांस अशक्य आहे असें पाहून देव माघारे फिरले. सर्व देव पराङ्मुख झालेले पाहून इंद्रास परमानंद होऊन तो कृष्णार्जुनांची प्रशंसा करूं लागला. त्याच वेळीं आकाशवाणी होऊन तिनें इंद्रास मोठ्या गंभीर स्वरानें सांगितलें कीं, "इंद्रा, ज्याच्या रक्षणासाठीं तूं इतकी खटपट करीत आहेस, तो तुझा मित्र नागराज तक्षक या ठिकाणीं मुळींच नाहीं. सांप्रत तो कुरुक्षेत्रास गेलेला आहे. शिवाय, हे वासवा, युद्ध करून या कृष्णार्जुनांस जिंकणें सर्वथा अशक्य आहे हें माझ्या सांगण्यावरून पक्कें समज. अरे, हे सामान्य मनुष्य नव्हत. हे स्वर्गांत प्रख्यात असलेले नरनारायण नांवाचे पुरातन देव आहेत. यांचें सामर्थ्य व पराक्रम तुझ्याही अनुभवास आलेला आहे. यांना जिंकणें अत्यंत दुर्घट आहे इतकेंच नव्हे, तर हे युद्धांत सर्वथा अजिंक्यच आहेत. त्याचप्रमाणें हे त्रैलोक्यामध्यें सर्वांपेक्षां जास्त पुरातन व मोठे तपोनिष्ठ असल्यामुळें देव, दानव, गंधर्व, यक्ष, राक्षस, मनुष्य, किन्नर, पन्नग इत्यादि सर्वांस परमपूज्य आहेत. यास्तव, इंद्रा, खांडवारण्याचा सांप्रत होणारा विनाश ब्रह्मलिखितानुरूपच होत आहे असें समजून तूं देवांसहवर्तमान येथून निघून जा." अशा प्रकारचें तें यथायोग्य वाक्य श्रवण करून इंद्रानें आपला क्रोध व सूड उगविण्याची इच्छा सोडून देऊन स्वर्गास प्रयाण केलें. स्वतः इंद्रच स्वर्गास जाऊं लागला असें पाहतांच सर्व देव आपापल्या सैन्यांसहवर्त-

मान त्याच्या मागून निघालें. सर्व देवांसह इंद्र मागें फिरला असें पाहतांच त्या वीरश्रेष्ठ कृष्णार्जुनांनीं सिंहनाद केला. जनमेजया, देवेंद्र निघून गेल्यावर त्या आनंदित झालेल्या दोघां वीरांनीं निःशंकपणानें तें अरण्य त्या अग्नीला जाळूं दिलें. ज्याप्रमाणें वायु मेघांस पळवून लावतो, त्याप्रमाणें अर्जुनानें देवांस पिटाळून लाविल्यानंतर त्यानें खांडवारण्यांत राहणारे प्राणीही शरवृष्टीनें जर्जर केले. सव्यसाची अर्जुन बाण फेकूं लागला असतां कोणत्याही प्राण्यास तेथून पळून जातां येईना; ज्याचीं अस्त्रें कधींच विफल होत नाहींत अशा त्या अर्जुनाकडे त्या ठिकाणीं नुसतें वर मान करून पहाण्याची देखील छाती मोठमोठ्या प्राण्यांस सुद्धां होईना; मग समरांगणांत त्याशीं युद्ध करणें तर दूरच राहिलें. अर्जुन केव्हां केव्हां एका बाणानें शेंकडों प्राण्यांचा वध करूं लागला, व केव्हां केव्हां एकाच प्राण्यावर शेंकडों बाण टाकूं लागला. त्या वेळीं ते प्राणी यमाच्याच तडाक्यांत सांपडल्याप्रमाणें तत्काल गतप्राण होऊन अग्नींत पडूं लागले. अवघड पर्वतादिकांच्या तटावर किंवा गुप्त देवता, पितर यांच्या देवालयांत गेल्यानेंही त्यांस सुख मिळालें नाहीं. अशा प्रकारें प्राणिक्षय झाल्यामुळें जिकडे तिकडे हाहाकार उडून गेला. प्राण्यांचे मोठमोठे कळप दीन वाणीनें भयंकर किंकाळ्या फोडूं लागले. त्याचप्रमाणें हत्ती, मृग व तरस हेही मोठमोठ्यानें ओरडूं लागले. त्या वेळीं इतका मोठा आवाज होऊं लागला कीं, तेणेंकरून अतिदूर अंतरावरील गंगेंतील व समुद्रांतील जलचर प्राणी, विद्याधरगण, व त्या अरण्यांत राहणारे सर्वजण भयभीत झाले. त्या महावीर अर्जुनाकडे किंवा दुष्टांचा संहार करणाऱ्या श्रीकृष्णाकडे नुसतें पाहण्यासही कोणी समर्थ होईना; मग युद्ध करण्याची वार्ता कशाला? तेथील कित्येक राक्षस, दानव व नाग एका जुटीनें राहिले होते, त्यांसही श्रीकृष्णानें आपल्या चक्रानें ठार केलें. तेव्हां त्या शिरच्छेद झालेल्या प्राण्यांबरोबरच दुसरेही राक्षसादिक धिप्पाड प्राणी केवळ चक्राच्या वेगानेंच गतप्राण होऊन त्या प्रदीप्त अग्नींत येऊन पडले. असो; याप्रमाणें मांस व रुधिर यांचे प्रवाह व चरबी यांच्या योगानें अग्नि तृप्त होऊन त्याच्या ज्वाला आकाशांत उंच जाऊं लागल्या; व तो अगदीं धूमरहित झाला. प्राण्यांच्या मेदाचें सेवन करून त्याचे पिंगट नेत्र, जिव्हा, विशाल मुख, व ऊर्ध्व केश हीं सर्व प्रदीप्त झालीं. कृष्णार्जुनांनीं दिलेलें तें यथेच्छ भोजन मिळाल्यामुळें तो आनंदित झाला; आणि त्याची क्षुधा शांत होऊन त्यास पराकाष्ठेचें समाधान झालें. इतक्यांत मयासुर त्या अरण्यांतून पळून जात असतां एकाएकीं कृष्णाच्या दृष्टीस पडला. हा दानवांचा मय नामक श्रेष्ठ शिल्पी पळून जात आहे असें जाणून, त्यास जाळण्याच्या इच्छेनें त्या अनिलसारथि अग्नीनें जास्त भडकून मेघाप्रमाणें गंभीर शब्द करीत श्रीकृष्णाची प्रार्थना केली. तेव्हां त्यास ठार करण्याच्या हेतूनें कृष्णानें चक्र उचलिलें. तें उगारिलेलें चक्र व दग्ध करण्यास प्रवृत्त होणारा अग्नि अवलोकन करतांच मयासुर अर्जुनाकडे धावत गेला; आणि "अर्जुना, माझें रक्षण कर, रक्षण कर," असें म्हणाला. राजा, मयाची ती दीन वाणी श्रवण करून अर्जुनानें त्यास धीर देत "भिऊं नको" "भिऊं नको" असें मोठ्या दयार्द्र अंतःकरणानें सांगितलें. अशा प्रकारें नमुचीचा भाऊ जो मय त्यास अर्जुनाकडून अभयवचन मिळतांच श्रीकृष्णानें त्यास मारण्याचा आग्रह धरिला नाहीं, व अग्नीपासूनही त्यास इजा पोहोंचली नाहीं.

वैशंपायन सांगतात:—राजा, कृष्णार्जुनांनीं इंद्रापासून अग्नीचें संरक्षण केलें असतां त्यानें पंधरा दिवसपर्यंत तें अरण्य जाळिलें; आणि त्या संपूर्ण अरण्यापैकीं अश्वसेन, मयासुर व चार शार्ङ्गक पक्षी अशा सहाजणांस मात्र त्यानें दग्ध केलें नाहीं.

अध्याय दोनशें एकुणतिसावा.

—:०:—

शार्ङ्गकोपाख्यान.

जनमेजय राजा विचारतोः—ब्रह्मन्, तें खांडवारण्य दग्ध करीत असतां अग्नीनें शार्ङ्गकांस कां जाळलें नाहीं तें मला सांगा. अश्वसेन व मयासुर यांची अग्नीपासून कशा प्रकारें मुक्तता झाली तें आपण सांगितलें; परंतु शार्ङ्गकांच्या मुक्ततेचें कारण सांगितलें नाहीं. शार्ङ्गक सुरक्षित राहिले हें मोठेंच आश्चर्य आहे. यास्तव, त्या अग्निप्रलयांत त्यांचा नाश कसा झाला नाहीं तें मला कथन करा.

वैशंपायन सांगतातः—राजा अग्नीनें शार्ङ्गकांस ज्यामुळें जाळलें नाहीं, तें सर्व वर्तमान मी तुला यथातथ्य सांगतों. पूर्वी मंदपाल नामक एक मोठा वेदज्ञ महर्षि होता. त्यास धर्माचें ज्ञान उत्तम प्रकारचें असून तो कडकडीत तपश्चर्या करीत असे. त्यानें ब्रह्मचर्यमार्गाचा अवलंब केला असून तो सर्वदा स्वाध्यायाध्ययन करीत असून धर्मनिष्ठा, तपश्चर्या व इंद्रियनिग्रह यांत तत्पर असे. हे भारता, याप्रमाणें मोठी तपश्चर्या केल्यानंतर त्याचें देहावसान होऊन तो पितृलोकीं गेला; त्या ठिकाणीं त्यास त्याच्या पुण्याचें फल मिळालें नाहीं. तेव्हां आपण पुण्यकर्मानें संपादन केलेले लोकही निष्फल झाले असें पाहून त्याबद्दल त्यानें यमधर्मासन्निध बसलेल्या देवतांस प्रश्न केला.

मंदपाल म्हणालाः—देवहो, मीं तपश्चर्येनें संपादित केलेल्या या लोकांचा उपभोग घेण्याची मला कां बरें बंदी असावी! जें कर्म केलें असतां या लोकांचा उपभोग घेतां येईल असें कोणतें कर्म भूलोकीं असतांना माझ्या हातून व्हावयाचें राहिलें आहे? ज्यासाठीं हे लोक मला प्राप्त झाले नाहींत, तें कर्म मी पुनः भूलोकीं जाऊन करीन. परंतु, देवहो, मीं केलेल्या या तपश्चर्येचें कोणतें फल आहे तें मला सांगा.

देव म्हणालेः—मंदपाल मुने, मनुष्य कोणत्या कोणत्या ऋणानें बद्ध असतात तें श्रवण कर. श्रौतस्मार्तकर्मे, ब्रह्मचर्य व संतति या तीन ऋणांशीं ते बांधलेले असतात, व तीं तीन ऋणें अनुक्रमें यज्ञ, तपश्चर्या व पुत्र यांच्या योगानें फिटतात. यांपैकीं तूं मोठें तपाचरण केलें आहेस, व यज्ञयागही केले आहेस; परंतु तुला संतति नाहीं, व यामुळेंच केवळ तुला ते पुण्यलोक प्राप्त झाले नाहींत. यास्तव तूं पुत्रोत्पादन कर, म्हणजे तुला उत्तम उत्तम लोकांचा उपभोग घ्यावयास सांपडेल. पुत्र हा पितरांस पुन्नामक नरकापासून सोडवितो, अशी श्रुति आहे. यास्तव, हे ऋषीश्वरा, अपत्यवृद्धीचा प्रयत्न कर.

वैशंपायन सांगतातः—देवांचें तें भाषण श्रवण करून मंदपाल विचार करूं लागला कीं, कोणत्या योनीमध्यें आपणास थोडक्या अवकाशांत पुष्कळ संतति प्राप्त होईल. असा विचार करतां करतां, पक्ष्यांना एकाच वेळीं पुष्कळ संतति होते ही गोष्ट त्यास आठवली, तेव्हां त्यानें शार्ङ्गक पक्ष्याचें रूप घेऊन जरिता नामक त्याच जातीच्या स्त्रिशीं समागम केला; आणि तिचे ठिकाणीं चार पुत्र उत्पन्न केले. ते मोठे ब्रह्मनिष्ठ झाले. ते पुत्र अंडावस्थेंत असतांच त्यांस मातेसह तेथेंच टाकून मंदपाल मुनि लपिता नामक दुसऱ्या स्त्रीकडे गेला. भारता, मंदपाल आपणास सोडून गेला हें पाहून जरिता अत्यंत शोकाकुल झाली; परंतु अपत्यस्नेहामुळें तिला त्याच्या मागून जातां आलें नाहीं. राजेंद्रा, केवळ अंडावस्थेंत असलेल्या त्या ऋषींस घोर अरण्यांत सोडून जाणें वास्तविक अयोग्य असतांही मंदपालानें त्यांचा त्याग केला. तथापि जरितेचें पुत्रांवर विलक्षण प्रेम असल्यामुळें तिनें त्यांस सोडिलें नाहीं. पुढें तीं पिलें अंडीं फोडून बाहेर निघाल्यावरही ती मोठ्या प्रेमानें त्यांस चारा आणून घालीत असे. याप्रमाणें कांहीं दिवस गेल्यावर एकदा मंदपाल

लपितेसहवर्तमान अरण्यांत फिरत असतां खांडवारण्य जाळण्यासाठीं अग्नि येत आहे असें त्यानें पाहिलें. अग्नीचा हेतु कळतांच मंदपालास आपल्या लहान लहान,बालकांची आठवण झाली; आणि आपल्या पुत्रांचा अग्नीनें नाश होतो कीं काय अशी भीति पडून, त्या मंदपाल महर्षीनें महासमर्थ व लोकपाल जो अग्नि त्याची स्तुति करून त्यास संतुष्ट केलें.

मंदपाल म्हणाला:—हे अग्ने, तूंच सर्व लोकांचें मुख आहेस; म्हणजे जीवरूपानें तूंच भक्षण करितोस. देवांकडे तूंच हविर्भाग नेऊन पोहोंचवितोस. हे पावका, तूं आकाशांत, भूमींत व प्रत्येक पदार्थाच्या उदरांत गुप्तरूपानें संचार करीत आहेस. मोठमोठे तत्त्वज्ञानी तूं एक आहेस असें म्हणतात, आणि पुनः तुझे गार्हपत्य, दाक्षिण व आहवनीय असे तीन प्रकार आहेत असेंही प्रतिपादन करतात. त्याचप्रमाणें पंचमहाभूतें, सूर्य, चंद्र व यज्ञ करणारा (यजमान) अशीं तुझीं आठ स्वरूपें असून यज्ञ सिद्धीस नेणारा तूंच आहेस असें समजतात. हें संपूर्ण जग तूंच निर्माण केलेंस असें मोठमोठे ऋषि म्हणतात. हे हुताशना, तूं नसशील तर हें जग एका क्षणांत नष्ट होईल. तुझी उपासना केल्यानें ब्राह्मणांस पत्नी व पुत्र यांसहवर्तमान स्वकर्मसंपादित शाश्वत गति प्राप्त होते. अग्ने, आकाशांत संलग्न असलेले विद्युद्युक्त मेघ हें तुझेंच स्वरूप असून तुजपासून निघालेल्याच ज्वाला सर्व भूतांस दग्ध करीत असतात. सारांश, लोकांचें पालन करणें व संहार करणें हीं दोन्ही तुझींच कामें होत. हे महातेजस्वी अनला,ही संपूर्ण चराचर सृष्टि तूंच उत्पन्न केलीस. कर्मविधायक वेदही तुझ्याच मुखापासून उत्पन्न झाले. जलप्रभृति महाभूतें तूंच निर्माण केलीं असून हें संपूर्ण जग तुजवरच अवलंबून आहे. देवांचें अन्न जें हव्य व पितरांचें अन्न जें कव्य, तें सर्व तुझ्याच ठिकाणीं अर्पण केलें जात असून त्याचा फलदाताही तूंच आहेस. देवा, जगाचा संहारकर्ता व उत्पन्नकर्ता तूंच आहेस. त्याचप्रमाणें बृहस्पति, अश्विनीकुमार, सूर्य, चंद्र, व अग्नि हीं सर्व तुझींच भिन्नभिन्न स्वरूपें आहेत

वैशंपायन सांगतात:—राजेंद्रा, त्या अत्यंत तेजस्वी मंदपाल मुनीनें याप्रमाणें स्तुति केली असतां अग्नि त्यावर प्रसन्न झाला, आणि संतुष्टचित्तानें म्हणाला, "मुने, तुझें कोणतें प्रिय मीं करावें ?" मंदपाल हात जोडून त्यास म्हणाला, "तूं खांडववन दग्ध करशील त्या वेळीं माझ्या पुत्रांस सोडून दे." यावर भगवान अग्निनारायणानें 'ठीक आहे' म्हणून उत्तर दिलें. याप्रमाणें मंदपालास वचन दिल्यामुळेंच त्यानें खांडवारण्य दहन करण्याच्या वेळीं शार्ङ्गकांस जाळिलें नाहीं.

अध्याय दोनशें तिसावा.

—:०:—

जरिताविलाप.

वैशंपायन सांगतात:—पुढें अग्नि प्रज्वलित झाला तेव्हां शार्ङ्गक भयभीत होऊन त्यांची पांचावर धारण बसली. त्या दुःखद प्रसंगीं त्यांस कोणीच त्राता दिसेना. आपले मुलगे अगदींच लहान आहेत असें पाहून त्यांची माता जरिता अत्यंत शोकाकुल होऊन विलाप करूं लागली.

जरिता म्हणाली:—हा भयंकर अग्नि अरण्य दग्ध करीत करीत इकडेच येत आहे! याचें स्वरूप इतकें प्रचंड आहे कीं, हा संपूर्ण जगच जाळून टाकतो कीं काय असें वाटतें. हा अग्नि माझें दुःख वृद्धिंगत करीत आहे! पहा—या माझ्या अज्ञान बालकांकडे माझें अंतःकरण आकर्षिलें जात आहे. कारण यांस अद्यापि पंख फुटले नसून धड चालतांही येत नाहीं. शिवाय आमच्या पूर्वजांचा उद्धार यांच्या योगानेंच व्हावयाचा आहे. हा प्रदीप्त अग्नि तर वृक्षांचा नाश करीत इकडेच येत आहे, आणि माझ्या बालकांस पंख

फुटले नसल्यामुळें त्यांस घेऊन उडून जातां येत नाहीं. अशा वेळीं मीं त्यांस घेऊन जावें, तर या विस्तीर्ण अरण्यांतून या चौघांस पलीकडे घेऊन जाणें मला अगदींच अशक्य आहे. तसेंच यांस सोडूनही जाववत नाहीं. काय करावें ? यांस पाहून माझें हृदय तीळतीळ तुटत आहे ! आतां यांपैकीं कोणास टाकूं व कोणास घेऊन जाऊं ? पुत्रहो, या वेळीं मीं काय केलें असतां आपलें कर्तव्य बजावलें असें होईल याचा तुम्हीच विचार करा. तुमची मुक्तता कशी होईल याचा मी मघांपासून विचार करीत आहें; परंतु मला कांहींच उपाय सुचत नाहीं. तेव्हां आतां मी आपल्या पंखांखालीं तुम्हांस झांकून घेऊन तुम्हांबरोबर मरेन ! बाळांनो, तुम्ही अंडावस्थेंत असतांनाच तुमच्या पित्यानें असें सांगून ठेविलें आहे कीं, तुम्हांपैकीं ज्येष्ठ जो जरितारि, त्यावर आपलें संपूर्ण कुल अवलंबून राहील; सारिसृक्क संतति उत्पन्न करून पितृकुलाचा विस्तार करील; तिसरा स्तंबमित्र हा मोठी तपश्चर्या करील; आणि द्रोण ब्रह्मवेत्त्यांत वरिष्ठ होईल. असें सांगून तुमचा निर्दय पिता मागें निघून गेला. असें असतां सांप्रत हें भयंकर संकट प्राप्त झालें आहे. यांतून कोणत्या उपायानें पार पडतां येईल ? निदान आपलें कर्तव्य केलें असें होण्यास काय केलें पाहिजे.

वैशंपायन सांगतातः—राजा, जरितेला आपल्या पुत्रांची अग्नीपासून मुक्तता करण्याचा कांहींच मार्ग सुचेना, तेव्हां ती शोकाविव्हळ होऊन आपल्या पुत्रांस याप्रमाणें बोलली. त्यावर शार्ङ्गकांनीं मातेस प्रत्युत्तर दिलें कीं, "माते, तूं आमचा लोभ सोडून देऊन, जेथें अग्नि नसेल तेथें निघून जा. या ठिकाणीं जरी आम्ही मरून गेलों, तरी तुला दुसरे पुत्र होतील. परंतु, माते, तुझा विनाश झाल्यास आमच्या कुलाचा विस्तार होण्याचा मार्गच खुंटला. यास्तव या दोन्ही गोष्टींचा सारासार विचार करून, आपल्या कुलाचें जेणेंकरून हित होईल असें कृत्य करण्याचा हा अत्यंत महत्त्वाचा प्रसंग तुला प्राप्त झालेला आहे. तेव्हां ज्यामुळें सर्व कुलाचाच विनाश होणार, असा अपत्यस्नेह तूं या वेळीं धरूं नको. आमच्या पित्यानें, पुत्रोत्पत्तीनें मिळणाऱ्या पुण्यलोकांच्या प्राप्तीस्तव तुझा स्वीकार केला आहे, यासाठीं त्याचा तो हेतु निष्फल होऊं देऊं नको.

जरिता म्हणालीः—पुत्रहो, या वृक्षाजवळच जमिनींत हें एक उंदराचें बीळ आहे, यामध्यें तुम्ही निर्भयपणें त्वरित शिरा, म्हणजे तुम्हांस अग्नीपासून बिलकूल इजा पोहोंचणार नाहीं. तुम्ही आंत गेल्यावर मी मातीनें तें भोंक वरून बंद करून टाकीन. अग्नीपासून सुटण्याचा हा उत्तम उपाय आहे असें मला वाटतें. अग्नि विझाल्यावर मी परत येऊन मातीचा ढीग दूर करून बीळ मोकळें करीन. तेव्हां, बाळांनो, अग्नीचें निवारण करण्याचा हा मीं सांगितलेला मार्ग तुम्हांस पसंत पडतोना ?

शार्ङ्गक म्हणालेः—माते, आम्हांस अद्याप पंख फुटले नसून आम्ही केवळ मांसाचे गोळे आहों, आणि उंदीर हा तर मांसाहारी आहे; तेव्हां तो आमचा निःसंशय नाश करील हें उघड दिसत असतां या बिळांत आमच्यानें प्रवेश करवत नाहीं. काय करावें ? अग्नीनें आम्ही जळून न जाण्याचा कोणता उपाय करावा ? काय केलें असतां उंदीर आम्हांस मारणार नाहीं ? आमच्या पित्याचा हेतु कसा सफल होईल ? व आमची माता कशी वांचेल ? आम्हीं या बिळांत प्रवेश केल्यास आमचा उंदरापासून नाश होईल, व वरच राहिल्यास अग्नीपासून नाश होईल ! या दोन गोष्टींचा विचार केला असतां, दुसऱ्याच्या भक्ष्यस्थानीं पडण्यापेक्षां जळून जाणेंच चांगलें. बिळामध्यें उंदरानें खाल्लें तर आम्हांस निंद्य मरण येईल, त्यापेक्षां अग्नीमध्यें देह विसर्जन करणें हाच मार्ग प्रशस्त होय.

अध्याय दोनशें एकतिसावा.

—:०:—

जरितागमन.

जरिता म्हणाली:—ह्या बिळांत राहणारा उंदीर बाहेर निघाला असतां त्यावर ससाण्यानें झडप घातली, आणि त्या क्षुद्र प्राण्यास पायांत धरून तो निघून गेला; यास्तव या बिळांत आतां तुम्हांस भय नाहीं.

शार्ङ्गक म्हणाले:—ससाण्यानें उंदीर नेल्याचें आम्हांस मुळींच माहीत नाहीं. शिवाय, एका उंदरास त्यानें नेलें असलें तरी या बिळांत दुसरे पुष्कळ उंदीर असण्याचा संभव आहे, आणि त्यांपासूनही आम्हांस भीतिच आहे. ज्या दिशेकडून वारा वहात असतो त्या दिशेकडून अग्नि परावृत्त होतो असा सामान्य नियम असल्यामुळें, या ठिकाणीं अग्नि येईलच असें नाहीं. परंतु आम्ही बिळांत राहिल्यास त्या ठिकाणीं मात्र तेथील प्राण्यांपासून निःसंशय मरण पावूं. यास्तव, माते, निश्चयानें जेथें मृत्यु येणार, त्या ठिकाणापेक्षां हें संशयित मृत्यूचें ठिकाण अधिक चांगलें. यासाठीं आम्ही येथेंच राहतों. तूं आकाशमार्गानें उडून जा. आम्ही येथेंच मेलों तरी तुला योग्य मार्गानें दुसरे चांगले पुत्र होतील.

जरिता म्हणाली:—बाळांनो, तो महाबलाढ्य पक्षिराज ससाणा बिळांतून उंदरास घेऊन वेगानें जात असतां मीं प्रत्यक्ष पाहिलें आहे; इतकेंच नव्हे, तर तो उडत असतां मी मोठ्या वेगानें त्याच्या मागोमाग गेलें, आणि त्यानें निवारण केलें असतांही मागें न फिरतां मी त्यास असा आशीर्वाद दिला कीं, " हे पक्षिराजा, तूं या बिळांतून आमचा शत्रु घेऊन गेलास, यास्तव तुला दिव्य देह प्राप्त होऊन अक्षय्य स्वर्गसुख मिळो. " पुढें त्या श्येन पक्ष्यानें तो उंदीर खाऊन टाकल्यानंतर त्या पक्ष्याचा निरोप घेऊन मी स्वगृहास परत आलें. यास्तव, पुत्रहो, तुम्ही पूर्ण विश्वासानें या बिळांत प्रवेश करा. येथें तुमच्या केंसासही धक्का लागणार नाहीं. कारण श्येन पक्ष्यानें प्रत्यक्ष माझ्यादेखत येथील उंदीर नेला आहे.

शार्ङ्गक म्हणाले:—माते, हा वेळपर्यंत ससाण्यानें उंदीर नेल्याची आम्हांस वार्ताही नाहीं, यामुळें पूर्ण खातरी झाल्यावांचून बिळांत शिरण्याचा आम्हांस धीर होत नाहीं.

जरिता पुनः म्हणाली:—मुलांनो, श्येनानें उंदीर नेल्याचें मला पक्कें ठाऊक आहे. त्या ठिकाणी तुम्हांस कांहींएक भीति नाहीं, यास्तव तुम्ही माझ्या सांगण्याप्रमाणें वागा.

शार्ङ्गक म्हणाले:—माते, तूं नसत्या उपायानें आमची भयापासून मुक्तता करण्याचा प्रयत्न करूं नको. आम्हांस सोडून जाण्याची तुझी इच्छा स्पष्ट आहे, तेव्हां हें औपचारिक मिथ्या भाषण पाहिजे कशाला ? बिळाच्या आंत काय आहे याची आपणांस कांहींच निश्चित माहिती नाहीं. अशा स्थितींत त्यांत शत्रु असण्याचा पुष्कळ संभव असतांना त्यांत प्रवेश करणें शहाणपणाचें होणार नाहीं. माते, आम्ही आजपर्यंत तुजवर कांहींच उपकार केला नाहीं, आणि पुढें आम्ही मोठे झाल्यावर तर तूं आमची ओळखही विसरशील. सांप्रत तूं मोठे कष्ट सोसून आमचें रक्षण करीत आहेस; परंतु, हे साध्वी, तथा पाहूं गेल्यास तूं आमची कोण ? व आम्ही तरी तुझे कोण ? वास्तविक कोणी कोणाचा नाहीं. हा मातृपुत्रसंबंध केवळ काल्पनिक होय. तूं अजून तरुण आहेस, सुंदर आहेस, व पतीचा मनोरथ पूर्ण करण्यास समर्थ आहेस; यास्तव, माते, पतीचा शोध करून त्यासमागमें रहा, म्हणजे तुला दुसरे सुंदर पुत्र होतील. आम्हांसही अग्नींत प्रवेश करून पवित्र लोक प्राप्त होतील. कदाचित् आम्ही अग्नीनें जळून गेलों नाहीं, तर तुला पुनः भेटूंच.

वैशंपायन सांगतातः—राजा, पुत्रांचें तें भाषण श्रवण करून ती शार्ङ्गी पुत्रांस तेथेंच अरण्यांत सोडून अग्नीपासून सुरक्षित असलेल्या सुखकर प्रदेशीं त्वरेनें निघून गेली. इकडे अग्नीच्या ज्वाला जास्त प्रखर होऊन तो मंदपालाचे ते पुत्र बसले होते त्या बाजूस प्राप्त झाला. अग्नि प्रज्वलित होऊन नजीक येऊन ठेपला असें त्या पक्ष्यांच्या दृष्टीस पडतांच, जरितारि अग्नीस उद्देशून बोलूं लागला.

अध्याय दोनशें बत्तिसावा.

—:०:—

शार्ङ्गककृत अग्निप्रार्थना.

जरितारि म्हणालाः—शहाणा मनुष्य हा संकटकाल येण्याच्या आधींपासूनच सावधगिरीनें रहात असतो; यामुळें, संकट प्राप्त झाल्यावर त्यास कदापि दुःख होत नाहीं. ज्या अविचारी मनुष्यास पुढें येणारें संकट समजत नाहीं, किंवा जो त्याची तजवीज आधीं लावीत नाहीं, तो संकट आल्यावर गडबडून जातो, व त्यामुळें त्याचें कल्याण होत नाहीं.

सारिसृक्क म्हणालाः—दादा, तूं महाबुद्धिमान व मोठा शूर आहेस, यास्तव सांप्रत आम्हांवर येऊन कोसळलेल्या संकटापासून आमचें संरक्षण करण्यास तूंच समर्थ आहेस; आम्ही सर्वजण कुचकामाचे आहों. बाबा, पुष्कळ माणसांत तुजप्रमाणें ज्ञानी व शूर असा एखादाच असतो!

स्तंबमित्र म्हणालाः—ज्येष्ठ भ्राता पित्यासमान होय; त्यानेंच लहानास संकटापासून सोडवावयाचें; असें असतां, वडिलाचीच मति जर गुंग होऊं लागली, तर कनिष्ठाच्या हातून काय होणार?

द्रोण म्हणालाः—हा प्रज्वलित अग्नि त्वरेनें आपल्या घरट्याकडेच येत आहे. अहो! हा निर्दय आपल्या सप्तजिव्हात्मक मुखानें वृक्षादिकांस ग्रस्त करून आपणांस व्यापून टाकीत आहे पहा!

वैशंपायन सांगतातः—राजा, त्या मंदपालपुत्रांनीं याप्रमाणें आपसांत बाटाघाट केल्यानंतर, एकाग्र चित्त करून अग्नीस कसें संतुष्ट केलें, तें श्रवण कर.

प्रथम जरितारि म्हणालाः—अग्ने! वायु हें एक तुझेंच स्वरूप असून लतांचें शरीरही तूंच आहेस. कारण, त्या लता जेथें उत्पन्न होतात, ती पृथ्वी तुझ्यापासूनच निर्माण झालेली आहे. उदक हें तुझें वीर्य होय, म्हणजे त्याचेंही उत्पत्तिस्थान तूंच होस. हे महासमर्था, तुझ्या ज्वाला सूर्यकिरणांप्रमाणेंच चोहोंकडे पसरतात!

सारिसृक्क म्हणालाः—हे अग्निनारायणा, आमची आई आम्हांस सोडून गेली, व पिता कोण हें आम्हांस माहीतही नाहीं. आतां, आपलें रक्षण आपण स्वतांच करावें असें म्हणशील, तर आम्हांस अद्याप पंखही फुटले नाहींत! अशा स्थितींत तुजवांचून आम्हांस दुसरा कोणीच त्राता नाहीं. यास्तव, हे अग्ने, आम्हां बालकांचें संरक्षण कर. आम्ही अत्यंत दीन होऊन तुला शरण आलों आहों. हे अनला! तुझें जें एक कल्याणकारक शांत स्वरूप आहे, त्याच्या योगानें तूं आपल्या या सप्तजिव्हांपासून आम्हांस सोडीव. हे जातवेदा, या संपूर्ण विश्वामध्यें स्वतः तप्त होणारा असा काय तो तूंच एक आहेस. सूर्य हेंही तुझेंच स्वरूप असल्यामुळें, त्याच्या किरणांतील उष्णताही तुझ्यावांचून दुसऱ्याची नाहीं. यास्तव, हे हव्यवाहना! बाल्यावस्थेंत असलेल्या आम्हां ऋषींचें तूं पालन कर, आणि आम्हांपासून दूर निघून जा.

स्तंबमित्र म्हणालाः—अग्ने, हें चराचर सर्व विश्व तुझेंच स्वरूप आहे. ज्याप्रमाणें सुवर्ण म्हटलें म्हणजे त्यांत कुंडलादिकांचा समावेश होतो, त्याचप्रमाणें जग हा तुझाच विकार अस-

त्यामुळें तें तुझ्यामध्येंच समाविष्ट होतें. सर्व प्राण्यांस तूंच धारण करतोस, आणि संपूर्ण विश्वाचें पोषणही तूंच करतोस. हे अग्निनारायणा! हवि भक्षण करणारा व देवांचे हविर्भाग त्यांना पोहोंचविणारा तूंच असून हवनीय द्रव्यही तूंच आहेस! मननशील पुरुष हे तुझ्या कार्यांवरूनच तुझीं अनेक स्वरूपें मानितात; तरी त्या सर्व कार्यांचें कारण जो तूं, त्या तुझें स्वरूप एकच आहे हेंही जाणतात. हे हव्यवाहना! हें संपूर्ण ब्रह्मांड तूंच उत्पन्न करतोस, आणि तमोगुणानें वृद्धिंगत होऊन योग्य कालीं पुनः ह्याचा संहार करतोस. अशा प्रकारें संपूर्ण विश्वाचें प्रसूतिस्थान तूंच असून लयस्थानही तूंच होतोस. तेव्हां, हे महासामर्थ्यवंता, तूं आमचें संरक्षण कर.

द्रोण म्हणाला:—अग्ने! तूं अन्नमय आहेस. हें जड विश्व तुझाच विकार होय. तथापि हें जड अन्न नित्य नाहीं. कारण प्राणी त्याचें भक्षण करितात. याप्रमाणें जडाचा सूक्ष्माचे ठिकाणीं लय होत असतो; परंतु, अग्ने, सूक्ष्म देहादिकही तुजमध्यें (कारणांत) अंतर्भाव पावतात. यास्तव, तूं जड व सूक्ष्म अशा संपूर्ण जगताचा स्वामी होस. तूं नित्य व पूर्ण असून, रज्जूच्या ठिकाणीं भासमान होणाऱ्या सर्पाप्रमाणें आपल्या ठिकाणीं आरोपित झालेल्या या सर्व जगाचा विनाश करितोस. हे शुद्धा, तूं सर्व उपाधिदोषांपासून अलिप्त आहेस. तूंच सूर्य होऊन आपल्या किरणांनीं पृथ्वीवरील उदक व दुसरे रस शोषून घेतोस, व योग्य कालीं त्यांची वृष्टि करून तद्द्वारा मोठ्या चातुर्यानें जगाचें संरक्षण करतोस. त्याचप्रमाणें, प्रलयकालीं भूमि, उदक वगैरे पदार्थांतील सत्त्वांश ग्रहण करून तूं कारणरूपानें राहतोस, आणि पुनः उत्पत्तिकालीं चैतन्यशक्ति देऊन सर्व विश्वें निर्माण करितोस. हे पावना, ह्या हिरण्यागार लता, पुष्करिणी व जलपूर्ण समुद्र तुझ्यापासूनच पुनः उत्पन्न होतात. हे तीक्ष्णकरा, हें पक्षिशरिर रसाधिपति वरुणाचें श्रेष्ठ स्थान होय. कारण, या देहानेंच सर्व रसांचा उपभोग घेतां येतो. यास्तव, हे हुताशना, तूंच आज आमचा त्राता व कल्याणकर्ता हो, आणि आमचा नाश करूं नको. हे पिंगाक्षा, हे लोहितग्रीवा, जलप्रवाहाला ज्याप्रमाणें कांहींएक उपद्रव न करितां तूं त्यापासून दूर जातोस, त्याप्रमाणेंच तूं आम्हांपासूनही दूर जा.

वैशंपायन सांगतात:—राजा, त्या ब्रह्मवेत्त्या द्रोणाचें असें भाषण ऐकून अग्नि संतुष्ट झाला, आणि मंदपालास दिलेल्या वचनाच्या अनुरोधानें द्रोणाशीं बोलूं लागला.

अग्नि म्हणाला:—द्रोणा, तूं मोठा ऋषि आहेस. तूं हें ब्रह्माचेंच प्रतिपादन केलें आहेस. मी तुझें इच्छित पूर्ण करीन. आतां तुला भीति नाहीं. 'अरण्य दग्ध करीत असतां माझ्या पुत्रांस जिवंत ठेव' असें तुमचा पिता मंदपाल यानें मला पूर्वींच सांगितलें आहे. मंदपालाचें तें बोलणें, आणि, द्रोणा, तुझें हें येथील भाषण, हीं दोन्ही मला मान्य आहेत. ब्रह्मश्रेष्ठा, तूं केलेल्या स्तुतीनें मी फार संतुष्ट झालों आहें. तुझें कल्याण असो. माझ्यापासून तुम्हांस इजा व्हावयाची नाहींच, परंतु मीं आणखी काय करावें अशी आपली इच्छा आहे?

द्रोण म्हणाला:—हे विमलाग्ने, हीं येथील मांजरें आम्हांस नित्य त्रास देतात, यास्तव या सर्वांना तूं दग्ध कर!

वैशंपायन सांगतात:—जनमेजया, शार्ङ्गकांस अभिवचन देऊन अग्नीनें त्याप्रमाणें केलें, आणि प्रदीप्त होऊन तें खांडवारण्य जाळून टाकलें!

अध्याय दोनशें तेहतिसावा.

—:०:—

मंदपाल व शार्ङ्गक यांची भेट.

वैशंपायन सांगतात:—जनमेजया, इकडे मंदपालास आपल्या मुलांविषयीं चिंता उत्पन्न झाली.

त्यांचें रक्षण करण्याविषयीं त्यानें अग्नीस सांगून ठेविलें होतें, तथापि त्यास समाधान वाटेना. तो एकसारखा मुलांसाठीं तळमळूं लागला. याप्रमाणें चिंता करीत असतां तो लपितेस म्हणाला, "हे लपिते, त्या घरट्यामध्यें माझ्या मुलांची काय वाट होणार? सोसाट्याचा वारा सुटून अग्नि प्रदीप्त झाला म्हणजे त्यांतून माझ्या मुलांस सुटतां येणें अशक्य आहे! त्यांच्याजवळ त्यांची आई आहे, परंतु त्यांचें रक्षण करण्यास ती असमर्थ असल्यामुळें, नुसता शोक करण्यापलीकडे ती बिचारी काय करील बरें? अरेरे! आकाशांत उंच किंवा आजूबाजूस उडून जाण्यास तीं असमर्थ असल्यामुळें, त्याजकडे पाहून तिचें काळीज तीळतीळ तुटत असेल, व अनेक प्रकारें विलाप करीत ती इकडून तिकडे घिरट्या घालीत असेल, दुसरें काय? हरहर! आतां तो माझा बाळ जारितारी कसा निभावणार? माझ्या सारिसृक्काची काय दशा होणार? स्तंबमित्र व द्रोण तरी आतां कसचे वांचतात? तसेंच त्या बिचाऱ्या जरितेची तरी काय अवस्था होणार?"

हे भारता, याप्रमाणें त्या अरण्यांत मंदपाल विलाप करीत असतां लपिता त्यास मत्सरानें म्हणाली, "महाराज, आपले पुत्र मोठे तेजस्वी व महापराक्रमी असे ऋषि आहेत, असें आपण मला सांगितलें आहे. तेव्हां त्यावरून पाहिलें असतां त्यांच्याविषयीं आपणांस काळजी करण्याचें कांहीं कारण दिसत नाहीं. शिवाय, अग्नीपासून तर त्यांस मुळींच भीति नाहीं. कारण, त्यांच्याविषयीं तुम्ही अग्नीला माझ्यासमक्ष सांगितलें आहे, आणि महानुभाव अग्नीनेंही 'ठीक आहे' म्हणून आपणांस वचन दिलें आहे. तेव्हां तो लोकपाल अग्नि तसें वचन देऊन तें पाळणार नाहीं असें मुळींच होणार नाहीं. अशी वास्तविक स्थिति असतां आपण मुलांविषयीं चिंता करतां, यावरून हें उघडच दिसतें कीं, पुत्रचिंता ही केवळ मला दाखविण्याकरितां असून, खरी चिंता माझी सवत जी जरिता तिच्याविषयीं लागून आपणांस दुःख होत आहे. कारण, तिच्यावर जशी आपली प्रीति होती, तशी कांहीं माझ्यावर नाहीं. खरोखर, ज्यावर आपलें अत्यंत प्रेम आहे अशा सुहृदास पीडा होत असतां त्याची–प्रत्यक्ष आपल्या प्राणाची–उपेक्षा करणें सामर्थ्यवंतास बिलकूल योग्य नव्हे. याकरितां, जिच्यासाठीं आपणांस इतकी तळमळ लागली आहे, त्या जरितेकडे एकदा जा कसे! माझें काय? एखाद्या नीच पुरुषाच्या स्त्रीप्रमाणें मी आपली येथें एकटीच दिवस कंठीन!"

मंदपाल म्हणाला:–लपिते, तुला वाटतें तशा प्रकारची एखाद्या कामी मनुष्याप्रमाणें माझी मुळींच वागणूक नाहीं. ह्या जगांत मी फक्त संततीकरितांच संचार करीत आहें; आणि सांप्रतचें संकट माझ्या संततीवरच ओढवलें आहे. आतां तूं म्हणशील कीं, 'मजपासून नाहीं का तुम्हांस संतति होणार?' पण ती गोष्ट लांबची आहे. अग! हातचें सोडून पळत्याच्या मागें लागणें हें मूर्खपणाचें लक्षण होय;–त्याचा लोकांत अपमानच होतो. तेव्हां तुला वाटेल तसें तूं कर. धडाधड असंख्य वृक्षांची राखरांगोळी करणारा हा अग्नि माझ्या अंतःकरणांत भलतेच विचार उत्पन्न करीत आहे!

वैशंपायन सांगतातः—राजा, इतक्या अवकाशामध्यें, इकडे शार्ङ्गकांनीं प्रार्थना केल्यामुळें अग्नि त्या वनांतून दूर गेला, व पुत्रांच्या काळजीनें विव्हल झालेली ती पुत्रवत्सल जरिता आपल्या बालकांकडे परत आली. आपले पुत्र अग्नीपासून बचावले असून ते अगदीं सुखरूप असून एकमेकांत किलबिल करीत आहेत, असें पाहतांच तिच्या नेत्रांतून प्रेमाश्रूंचे लोट वाहूं लागले; आणि तिनें आक्रोश करीत करीत एकामागून एक सर्व मुलांजवळ जाऊन त्यांस कवटाळिलें! हे भारता, इतक्यांत मंदपाल मुनि तेथें येऊन

पोहोंचला. परंतु त्यांपैकीं एकाही मुलानें त्याचें अभिवंदन केलें नाहीं. मंदपालानें मात्र प्रत्येक मुलाबरोबर व जरितेबरोबर बोलण्याचा अनेक वेळां उपक्रम केला,. परंतु बरें किंवा वाईट असें त्याच्याशीं कोणीच कांहीं बोललें नाहीं. तेव्हां मोठ्या करुणस्वरानें मंदपाल म्हणाला, "प्रिये, मी इतका आर्त होऊन तुला वारंवार विचारीत असतां तूं मला कां बरें उत्तर देत नाहींस? मागें मी तुझा त्याग करून गेलों खरा, परंतु सांप्रत मला मुलांचें चैन पडत नाहीं. तर, यांपैकीं तुझा थोरला मुलगा कोणता, व त्याच्या पाठचा कोणता, मधला कोण, व अगदीं धाकटा कोण, तें मला सांग."

जरितेनें उत्तर दिलें:—आपणांस ज्येष्ठाशीं काय करावयाचें आहे? किंवा त्याच्या पाठच्याशीं तरी काय करावयाचें आहे? मधल्याशीं आपलें काय काम आहे? किंवा धाकट्याची तरी चौकशी आपण कशाला करितां? मला सर्वस्वीं दैन्यावस्थेंत सोडून आपण जिच्याकडे गेलां, त्या तरुण सुहास्यवदना लपितेकडेच आतां जा.

मंदपाल म्हणाला:——खरोखर परपुरुषगमन व सापत्नभाव यांहून अन्य अशी कोणतीच गोष्ट स्त्रियांच्या परलोकप्राप्तीस विघातक नाहीं. दोन्ही गोष्टी वैराग्नि पेटविणाऱ्या असून अनुनें पुरुषाच्या व स्त्रीच्या मनास अत्यंत उद्विग्न तात. ही गोष्ट मोठमोठ्या पतिव्रतांसही अहार्य आहे. पहा—अत्यंत पतिव्रता व कल्याणक म्हणून प्राणिमात्राला जी विश्रुत, त्या अतीसही एकदा भगवान वसिष्ठ मुनींबद्दल ा आली होती; व त्यामुळें, तो निष्कपट सदाचाररत मुनिश्रेष्ठ सप्तर्षींच्या मध्यभागीं ला असतां तिनें त्याचा अपमान केला! या मनामध्यें किल्मिष येतांच ती हिरवीपि होऊन गेली, आणि पतीवर नजर ठेवण्यासाठीं गुप्त वेष स्वीकारून ती कधीं दृश्य व कधीं अदृश्य राहूं लागली. असो; केवळ अपत्यप्रेमानें मी येथें आलों असतां तूंही आज त्या अरुंधतीप्रमाणेंच मज आतांबरोबर साशंकभावानें वागत आहेस यांत संशय नाहीं. बरें, तिकडे पहावें तों लपितेसही तुजप्रमाणेंच मत्सर वाटत आहे. तेव्हां, खरोखर, कोणत्याही पुरुषानें, ही आपली भार्या असा भरवंसा कधींही धरूं नये.' त्यांतून स्त्री एकदां पुत्रवती झाली, म्हणजे ती पतिसेवा वगैरे आपलें कर्तव्यही विसरून जाते.

वैशंपायन सांगतात:—राजा, मंदपालाच्या मुखांतून अशा प्रकारचे उद्गार निघाल्यानंतर, ते शार्ङ्गक पित्याच्या सेवेस सादर झाले, व मंदपालही ती आपली स्त्री व सर्व मुलें यांसह आनंदानें राहूं लागला!

अध्याय दोनशें चौतिसावा.

—:०:—

वरप्रदान.

मंदपाल म्हणाला:—बाळांनो, अग्नि जेव्हां खांडवारण्यांत येऊं लागला, तेव्हां तुमची मुक्तता करण्याविषयीं मीं त्यास विनंती केली. त्या वेळीं त्या महात्म्यानें 'ठीक आहे' असें म्हणून मला अभिवचन दिलें. अग्नीच्या त्या वचनावर माझा विश्वास होता, व तुमची माता मोठी धर्मनिष्ठ असल्यामुळें तुमचें रक्षण होईल असेंही मला वाटत होतें. शिवाय, तुम्ही अलौकिक सामर्थ्यवान आहां हें मी जाणून होतोंच, व या सर्व गोष्टींमुळें मी प्रथम इकडे आलों नाहीं; यास्तव, हे पुत्रहो, तुम्ही आपल्या मनांत मजविषयीं रोष धरूं नका. तुम्ही मोठे ऋषि असल्याबद्दल प्रत्यक्ष अग्निही जाणत आहे; आणि तुम्ही ब्रह्मज्ञानी असल्यामुळें तुम्हांसही त्याचें सर्व ज्ञान आहेच.

वैशंपायन सांगतात:—अशा प्रकारें पुत्रांचें समा-

धान करून मंदपाल जरितेसह तेथून अन्य प्रदेशीं निघून गेला. असो; याप्रमाणें खांडवारण्यांत प्रदीप्त झालेल्या त्या भगवान अग्नीनें दुष्ट प्राण्यांच्या नाशानें जगताचें कल्याण करण्यासाठीं तें अरण्य जाळून टाकलें; आणि त्या ठिकाणीं मेदाचे व वपेचे पाटचे पाट गट्ट करून अत्यंत संतुष्ट होऊन त्यानें अर्जुनास दर्शन दिलें. नंतर भगवान इंद्र देवगणांसहवर्तमान अंतरिक्षांतून खालीं उतरला, व कृष्णार्जुनांस म्हणाला, " खरोखर देवांसही दुष्कर असें हें कृत्य तुम्हीं दोघांनीं केलें आहे; व या गोष्टीनें मीं संतुष्ट झालों आहें. तेव्हां या भूलोकीं मनुष्यांस दुर्लभ असा एखादा वर मजपासून तुम्ही मागून घ्या. "

वैशंपायन सांगतात:—राजा, तेव्हां अर्जुनानें इंद्राजवळ सर्व अस्त्रें मागितलीं. परंतु तीं देण्याचें त्यानें लांबणीवर ढकलिलें. तो म्हणाला, " अर्जुना, ज्या वेळीं तुजवर भगवान शंकर सुप्रसन्न होईल, त्या वेळीं हीं सर्व अस्त्रें मी तुला देईन. हे कुरुनंदना, अस्त्रें केव्हां द्यावयाचीं तें मला माहीत आहे, आणि ती वेळ आल्यावर तीं मी तुला देईनही. धनंजया, सर्व अग्न्यस्त्रें, सर्व वायव्यास्त्रें व माझींही सर्व अस्त्रें तुला प्राप्त होतील. "

नंतर श्रीकृष्णानें 'या अर्जुनावर माझें शाश्वत प्रेम राहावें' असा वर मागितला, व सुरपति इंद्रानें त्या महाबुद्धिमान श्रीकृष्णास तसा वर दिला. नंतर तो इंद्र देवगणांसहवर्तमान अग्नीचा निरोप घेऊन स्वर्गलोकीं गेला. अग्नीनें पशुपक्ष्यांसहवर्तमान तें अरण्य जाळल्यानंतर परम तृप्त होऊन पांच दिवसपर्यंत विश्रांति घेतली. विविध मांसें भक्षण करून आणि रक्त व मेद प्राशन करून तो पराकाष्ठेचा संतुष्ट झाला, आणि कृष्णार्जुनांस म्हणाला, " हे पुरुषश्रेष्ठहो, तुम्हीं दोघांनीं मला यथेच्छ तृप्त केलें आहे, आतां मी तुम्हांस जाण्याची अनुज्ञा देतों. तुमच्या गतीस कोठेंही प्रतिबंध होणार नाहीं. तुमच्या इच्छेस येईल तिकडे तुम्ही आतां गमन करा. "

वैशंपायन सांगतात:—हे भरतर्षभा, अशा प्रकारें महानुभाव अग्नीनें त्या दोघांस निरोप दिल्यानंतर कृष्ण, अर्जुन व मयासुर यांनीं त्यास प्रदक्षिणा केली, आणि ते त्रिवर्ग नदीच्या रम्य तीरावर एकत्र जाऊन बसले.

आदिपर्व समाप्त.

श्रीमन्महाभारत.

सभापर्व.

अध्याय पहिला.

मंगलाचरण.

ॐ

नारायणं नमस्कृत्य नरं चैव नरोत्तमम् ।
देवीं सरस्वतीं चैव ततो जयमुदीरयेत् ॥

ह्या अखिल ब्रह्मांडांतील यच्चयावत् स्थावर-जंगम पदार्थांच्या ठिकाणीं चिदाभासरूपानें प्रत्ययास येणारा जो नरसंज्ञक जीवात्मा, नरसंज्ञक जीवात्म्यास सदासर्वकाळ आश्रय देणारा जो नारायण नामक कारणात्मा, आणि नरनारायणात्मक कार्यकारणसृष्टीहून पृथक् व श्रेष्ठ असा जो नरोत्तमसंज्ञक सच्चिदानंदरूप परमात्मा, त्या सर्वांस मी अभिवंदन करितों; तसेंच, नर, नारायण व नरोत्तम ह्या तीन तत्त्वांचें यथार्थ ज्ञान करून देणारी देवी जी सरस्वती, तिलाही मी अभिवंदन करितों; आणि त्या परमकारुणिक जगन्मातेनें लोकहित करण्याविषयीं माझ्या अंतःकरणांत जी स्फूर्ति उत्पन्न केली आहे, तिच्या साह्यानें ह्या भवबंधविमोचक जय म्हणजे महाभारत ग्रंथाच्या सभापर्वास आरंभ करितों. प्रत्येक धर्मशील पुरुषानें सर्वपुरुषार्थप्रतिपादक अशा शास्त्राचें विवेचन करितांना प्रथम नर, नारायण आणि नरोत्तम ह्या भगवन्मूर्तींचें ध्यान करून नंतर प्रतिपाद्य विषयाचें निरूपण करण्यास प्रवृत्त व्हावें हें सर्वथैव इष्ट होय.

मयसभेचा प्रस्ताव.

वैशंपायन सांगतातः—हे जनमेजया, नंतर कृष्णार्जुनांच्यापुढें हात जोडून मयासुर उभा राहिला, आणि त्यानें त्या उदारधी अर्जुनास विनयपूर्वक मोठ्या गौरवानें पुनः पुनः असें म्हटलें.

मयासुर म्हणालाः—हे कौन्तेया, तूं माझ्यावर जे उपकार केले आहेस, त्यांचें काय वर्णन करावें? पहा—ह्या भगवान श्रीकृष्णानें क्षुब्ध होऊन माझ्यावर सुदर्शनाची योजना केली, आणि असें असतां त्यापासून तूं मला सोडविलेंस; त्याप्रमाणेंच

सर्वभक्षक वैश्वानर मला दग्ध करण्यास उद्युक्त झाला, आणि त्यापासूनही तूं माझें संरक्षण केलेंस; तेव्हां हे तुझे उपकार लहानसहान आहेत काय? हे दयानिधे पार्था, ह्या तुझ्या ऋणांतून मुक्त होणें सर्वथा अशक्य होय; तथापि यथाशक्ति प्रत्युपकार करून अंशतः तरी उत्तराई व्हावें, अशी माझी फार फार मनीषा आहे; तर मीं तुझें कोणतें प्रिय कार्य करावें, त्याची आज्ञा कर.

अर्जुन म्हणालाः—हे मयासुरा, तुझी कृतज्ञता अवलोकन करून मी फार संतुष्ट झालों. माझ्या उपकारांची फेड करण्यास तुला आणखी कांहीं-एक करावयास नको. तूं आपल्या विनयप्रचुर भाषणानें सर्वस्वीं अनृणी झाला आहेस. ह्यास्तव, हे असुरश्रेष्ठा, तूं आतां जा. माझ्यावर नित्य लोभ कर, व आम्हीही तुझ्यावर तो नित्य करूं.

मयासुर म्हणालाः—हे समर्था पुरुषवरा, तुझें हें भाषण तुझ्या कुलशिलांस अनुरूपच आहे. तुझ्यासारख्या महात्म्यास प्रत्युपकाराची इच्छा असणें कधींही संभवत नाहीं; तथापि मी होऊन मोठ्या आवडीनें तुजकरितां कांहीं तरी विशिष्ट कृत्य करण्याची इच्छा करीत आहें. हे पांडुतनया, मी दानवांचा विश्वकर्मा आहें. शिल्पविद्येंत माझी बरोबरी करणारा कोणीही नाहीं. मी दुसरें विश्वही निर्माण करीन. ह्यास्तव तुझ्याकरितां कांहीं तरी लोकोत्तर कार्य करावें असें माझ्या मनांत आहे.

अर्जुन म्हणालाः—बा मयासुरा, आपणावर आलेल्या प्राणांतिक संकटांतून केवळ माझ्यामुळेंच आपली मुक्तता झाली, असें ज्या अर्थी तुला वाटत आहे, त्या अर्थी मीं केलेल्या उपकारांच्या फेडीकरितां तुजपासून आणखी कांहींएक कार्य करून घ्यावें, असें मला मुळींच वाटत नाहीं. हे दानवेश्वरा, आपल्या प्राणरक्षणाचें सर्व श्रेय जर तूं मला देत आहेस, तर ह्या बहुमानापेक्षां अधिक तें कोणतें कार्य आहे बरें! आतां, तुझ्या संकल्पाचा भंग करणें हें मला उचित नाहीं; ह्यासाठीं, भगवान श्रीकृष्ण सांगेल त तूं कर, म्हणजे त्या योगें मजवर प्रत्युपकार केल्यासारखें होईल.

वैशंपायन सांगतातः—जनमेजया, नंतर मयासुरानें भगवान वासुदेवांची आग्रहपूर्वक विनंती केली. तेव्हां 'ह्याला काय करावयास सांगावें बरें?' असा त्या प्रजापालक त्रैलोक्याधिपति परमात्म्यानें क्षणभर विचार केला, आणि मग त्यास 'एक सभा निर्माण कर' म्हणून सांगितलें: त्या समयीं भगवान श्रीकृष्ण म्हणालेः—हे शिल्पिश्रेष्ठा, जर तुझ्या मनांत कांहीं विशिष्ट गोष्ट करून आपलें प्रेम व्यक्त करावयाचें असेल, तर धर्मराजाला ह्या ठिकाणीं तूं आपल्या मनाप्रमाणें एक सभा करून दे. हे असुरवरा, ती सभा इतकी अपूर्व झाली पाहिजे कीं, ती पाहतांक्षणींच प्रेक्षकांचीं मनें चकित होऊन जावीं व सर्व मानवलोकांत कोणासही त्या सभेसारखी दुसरी सभा करितां येऊं नये. हे दैतेया, ह्याशिवाय त्या सभेंत देव, दैत्य, मनुष्यें इत्यादिकांचीं चित्रें, प्रतिमा वगैरे ज्या तूं करशील, त्यांत असा कांहीं अजब चमत्कार दिसला पाहिजे कीं, तीं चित्रें व त्या प्रतिमा अगदीं सजीवच आहेत असा भास होऊन, त्यांच्या ठिकाणीं त्यांस अनुसरून असणारे नैसर्गिक धर्म हुबेहूब वास करीत आहेत, असें सर्वांस वाटावें!

वैशंपायन सांगतातः—जनमेजया, भगवान श्रीकृष्णांची ती आज्ञा श्रवण करून मयासुरास मोठा संतोष झाला, आणि त्यानें धर्मराजाकरितां विमानतुल्य उत्कृष्ट सभा सिद्ध करण्याचें मनांत योजिलें. मग कृष्णार्जुनांनीं तो सर्व वृत्तांत धर्मराजास निवेदन केला, आणि त्यांनीं त्याची व मयासुराची भेट करून दिली. राजा, त्या समयीं युधिष्ठिरानें त्या मय दैत्याची यथायोग्य पूजा वगैरे केली, आणि त्या दैत्यश्रेष्ठानें ती आदरपूर्वक स्वीकारिली. नंतर त्यानें युधिष्ठिरप्रभृति पांडुपुत्रांस तेथें वृषपर्व नामक दैत्याचें चरित्र निवेदन केलें; आणि कांहीं वेळ स्वस्थ बसून, त्या महासमर्थ पांडवांकरितां जी सभा

तयार करावयाची, तिचा मनामध्यें आराखडा जुळविला. पुढें त्या चतुराग्रणी विश्वकर्मा दानवानें भगवान श्रीकृष्णाचें व पांडवांचें अनुमोदन घेऊन सुमुहूर्तावर स्वस्तिपुण्याहवाचन करविलें, आणि सहस्रावधि सत्पात्र ब्राह्मणांस क्षीरादिकांचें यथेच्छ भोजन घालून त्यांस बहुविध संपत्ति अर्पण केली. असो. ह्याप्रमाणें सभारचनेचा उपक्रम केल्यानंतर त्या वीर्यशाली दानवानें सभेकरितां स्थलाची आंखणी केली. सभेसाठीं जी भूमि त्यानें निश्चित केली, ती अशी होती कीं, तिच्यामध्यें साही ऋतूंचे विशिष्ट गुण वसत होते; व तो भूप्रदेश इतका रमणीय होता कीं, त्याची ती प्रसन्नता व मोहकपणा अवलोकन करून चित्तास तात्काळ समाधान वाटे. हे भारता, अशा प्रकारचें उत्तम स्थल सभेकरितां कायम केल्यानंतर, त्या लोकोत्तर शिल्प्यानें दहा हजार हात लांब व दहा हजार हात रुंद असा भूमिखंड मोजून त्यावर त्या सभेचा पाया आंखला.

अध्याय दुसरा.

—:०:—

श्रीकृष्णाचें द्वारकेस प्रयाण.

वैशंपायन सांगतात:—जनमेजया, भगवान श्रीकृष्ण मोठ्या आनंदानें इंद्रप्रस्थास बरेच दिवस राहिले; आणि पांडवांनींही त्यांच्या ठिकाणीं लोकोत्तर प्रेम ठेवून मनापासून उत्तम प्रकारें त्यांचे पाहुणचार केले. पुढें भगवंतांच्या मनांत पितृदर्शनाची लालसा उत्पन्न झाली; व त्यांनीं द्वारकेस परत जाण्याचा विचार योजिला.

हे भारता, नंतर श्रीकृष्णांनीं धर्मराजाचा निरोप घेतला; व आपल्या आतेच्या म्हणजे कुंतीच्या चरणीं मस्तक ठेवून द्वारकेस जाण्याकरितां तिची अनुज्ञा मागितली. पारिक्षिता, भगवंतांचें हें वर्तन किती कित्ता घेण्यासारखें आहे, त्याचें मनन कर. पहा—ज्याच्या चरणांवर सर्व जगानें लोटांगण घालावें, त्या लोकनायक प्रभूनें देखील गुरुजनांचे पाय वंदन करावे, ह्याचा आशय मनांत आण. भगवंतांनीं सर्व लोकांस केवळ वळण घालून देण्याकरितांच आपलें परमपावन मस्तक आपल्या पितृभगिनीच्या पदीं लीन केलें! असो; नंतर कुंतीनें श्रीकृष्णाच्या मस्तकाचें अवघ्राण केलें, व त्यास मोठ्या ममतेनें कवटाळिलें! राजा, मग त्या समर्थानें आपली बहीण सुभद्रा हिची भेट घेतली. सुभद्रेस पाहतांच त्यास गहिंवर उत्पन्न झाला; व सहोदरप्रेमानें सद्गदित होऊन त्याचे नेत्र भरून आले. नंतर कांहीं वेळ जाऊं देऊन भगवंतांनीं त्या यशस्विनी सुभद्रेस थोडासा बोध केला. राजा, तो बोध म्हणजे प्राकृत जनांनीं केलेला बोध नव्हे. त्या बोधवाक्यांतील अर्थ मोठा विचार करण्यासारखा असून, त्यांत असत्याचा किंवा मिथ्यावादाचा लेश सुद्धां नव्हता; शिवाय तो उगीच पाल्हाळीक नसून, त्यांतील तात्पर्य मनांत वागवून जे कोणी वर्तन ठेवतील, त्यांचें निश्चयानें कल्याण झालेंच पाहिजे, असा तो होता; आणि त्यांत सांगितलेले आचार किंवा सिद्धांत इतके निर्विवाद व सुयुक्त होते कीं, त्यांविषयीं द्वैध किंवा शंका उत्पन्न होण्याचें मुळींच प्रयोजन नव्हतें; असो. अशा प्रकारचें तें अपूर्व बोधामृत प्राशन करून सुभद्रेसही आनंद झाला; व भ्रातृवियोगाचें दुःख एकीकडे सारून तिनें श्रीकृष्णापाशीं आपल्या पितृवर्गास व आप्तसुहृदांस निरोप सांगितले, आणि पुनःपुनः त्याविषयीं गौरव प्रदर्शित करून त्याच्या चरणांवर मस्तक ठेविलें. नंतर भगवंतांनीं तीस आशीर्वाद दिले; व तिचा निरोप घेऊन ते द्रौपदी व धौम्य गुरु ह्यांच्या भेटीस गेले. तेथें प्राप्त झाल्यावर भगवान पुरुषोत्तमानें धौम्य गुरूंना अभिवंदन करून त्यांचा आशीर्वाद ग्रहण केला, व द्रौपदीचें सांत्वन करून तिचाही निरोप घेतला. हे अधिराजा, पुढें भगवान श्रीकृष्ण अर्जुनासमवेत युधिष्ठिरादिक आतेभावांस भेटण्याक-

रितां गेले. ते त्यांकडे जातांच युधिष्ठिरादिक सर्व श्रोते त्यांच्या समीप एकदम जमले, व अमरपरिवेष्टित देवेंद्राप्रमाणें तो पांडवपरिवेष्टित यादवेंद्र त्या ठिकाणीं शोभूं लागला !

जनमेजया, नंतर प्रयाणमुहूर्त सन्निध आला असें पाहून, तदुचित कृत्यें करण्यास भगवान सिद्ध झाले. प्रथम त्यांनीं स्नान करून व शुचिर्भूत होऊन वस्त्राभरणें धारण केलीं; आणि अर्घ्यपाद्य, गंधपुष्प, धूपदीप व समंत्रक विधि ह्यांच्या योगें देवद्विजांचें अर्चन करून त्यांस पुनःपुनः अभिवंदिलें; आणि प्रस्थानकालीं विहित अशीं सर्व कार्यें यथासांग संपादून प्रयाणाभिमुख होत्साते ते राजवाड्यांतून बाहेर पडले; व नगरसीमेपाशीं आल्यावर, तेथें दधिपात्रें, फळें व अक्षता घेऊन स्वातिवचन करण्यास सिद्ध असलेल्या परमपूज्य ब्राह्मणांस त्यांनीं दक्षिणा समर्पण केली व प्रदक्षिणा घालून त्यांचें आशीर्वचन ग्रहण केलें; आणि नंतर ते त्या सुमुहूर्तीं आपल्या महादेदीप्यमान रथावर आरूढ झाले.

जनमेजय भूपते, भगवंताच्या त्या लोकोत्तर रथाचें काय वर्णन करावें ! तो अंतर्बाह्य सुवर्णाचा असून त्याच्या ध्वजपटावर गरुडचिन्ह विराजत होतें; त्या तेजःपुंज रथावर कौमोदकी गदा, सुदर्शन चक्र, शार्ङ्ग धनुष्य, नंदक खड्ग इत्यादि आयुधें झळकत असून वीरासनीं अधिष्ठित असलेल्या कमलनयन प्रभु श्रीकृष्णांची अद्वितीय प्रभा दशदिशांस फांकत होती. त्या महावेगवान दिव्य रथास शैब्य-सुग्रीव अश्व जोडिले असून त्यावर दारुक नामक सारथि अश्वांचे प्रग्रह (लगाम) हातांत धरून अग्रभागीं बसला होता; आणि त्या रथाच्या मागें आणखी एक दिव्य रथ उभा असून त्यांत भगवान बलराम अधिष्ठित होते.

हे पारिक्षिता, भगवान श्रीकृष्णांच्या मागून युधिष्ठिर राजा मोठ्या प्रेमानें त्या रथावर चढला, व त्या श्रेष्ठ दारुकास एकीकडे करून त्या कुरुपतीनें स्वतः आपल्या हातांत त्या अश्ववरांचे लगाम घेतले. नंतर वीरनायक अर्जुन रथावर चढला, व सुवर्णदंडाचें तें शुभ्र चामर भगवान श्रीकृष्णांवर डावीकडून उजवीकडे वारूं लागला. जनमेजय राजा, पुढें तो दिव्य रथ चालू झाला, आणि त्याच्या मागून भीम, नकुल व सहदेव हे बंधु आणि महान महान ऋत्विज, आप्तसुहृद् व नागरिकजन ह्यांचा समुदाय चालूं लागला. राजा, पांच पांडव व पौरजन ह्यांसहवर्तमान भगवान अतुलप्रतापी श्रीकृष्णांची स्वारी जेव्हां इंद्रप्रस्थाहून निघाली, तेव्हां जणू काय कुलपतीला (अधिगुरूला) निरोप देण्याकरितां त्याचा परमप्रिय शिष्यसमुदायच त्याच्या मागून चालला आहे, असा भास झाला.

राजा, नंतर कांहींसें पुढें गेल्यावर भगवान गोविंदानें प्रथम महाधनुर्धर पार्थाचा निरोप घेतला, व त्यास गाढ आलिंगन दिलें. मग त्यानें धर्मराज व भीमसेन ह्यांस वंदन केलें, आणि तो नकुल व सहदेव ह्यांस 'येतों बरें' असें म्हणून कडकडून भेटला; आणि त्या उभय वीरांनीं तात्काळ श्रीकृष्णपदीं लोटांगण घातलें. राजा, प्रेमपाश मोठा बलवान असतो. श्रीकृष्णानें जरी त्या बंधुवर्गाचा व आप्तसुहृदांचा निरोप घेतला, आणि त्यांनीं परत फिरावें म्हणून पर्यायानें दर्शविलें, तरी तो महान ओघ त्याच्या मागून पूर्ववत् चालूच राहिला ! ह्याप्रमाणें अर्धयोजनपर्यंत मार्ग क्रमिल्यावर भगवान गोविंदानें पुनः धर्मराजाच्या पायांवर मस्तक ठेविलें, आणि 'दादा, आतां परत वळावें.' अशी आग्रहपूर्वक विनंती केली. तेव्हां धर्मराजानें आपल्या पदीं लीन झालेल्या श्रीकृष्णाला उठवून त्याचें मस्तक हुंगिलें, व "बरें आहे; यावें." असें म्हणून त्या धर्मराजानें त्या कमलनेत्र यदुपुंगवास मोठ्या कष्टानें अनुज्ञा दिली. हे भारता, नंतर भगवान श्रीकृष्णांनीं त्या पांचही पांडवांपाशीं "मी लवकरच पुनः येईन; काळजी करूं नका." असें मोठ्या कळकळीनें कबूल केलें; आणि "आतां

तुम्ही परता. " असें वारंवार सांगून रथांत बसलेल्या व पायीं चालत असलेल्या सर्व पांडवांस व त्यांजबरोबर आलेल्या ऋत्विजादि मंडळीस एकदांचें माघारें लाविलें; आणि मग त्यानें मोठ्या आनंदानें आपला रथ द्वारकेकडे चालविला. राजा, त्या समयीं देवाधिदेव इंद्र आपल्या अमरावतीसच जात आहे असा भास झाला! बा जनमेजया, श्रीकृष्णपदारविंदीं युधिष्ठिरादिक पांडुपुत्रांचें चित्त किती आसक्त होतें म्हणून सांगावें! भगवंतांनीं जरी त्या पांडवास मागें परताविलें, तरी त्यांचीं पावलें पुढें पडतना; ते भगवंतांच्या रथाकडे दृष्टि लावून तेथेंच उभे राहिले. पण जेव्हां तो रथ दृष्टीच्याही पलीकडे गेला, तेव्हां त्यांचा नाइलाज झाला; व मग त्यांनीं केवळ उत्कट प्रेमरूप साधनावर विसंबून राहून त्याच्या साहाय्यानें भगवंतांच्या मागोमाग आपलें मन पिटाळलें, आणि परमात्मचिंतनांत निमग्न होऊन त्यांच्या मनोवृत्ति अगदीं तटस्थ झाल्या! सारांश, भगवान द्वारकावासी श्रीकृष्ण इंद्रप्रस्थांत बरेच दिवस राहिले होते, तरी तितक्या सहवासानेंही पांडुपुत्रांची भगवद्दर्शनलालसा तृप्त झाली नव्हती; आणि ह्यामुळें, श्रीकृष्णाचा रथ अगदीं दिसत नाहींसा झाल्यावर जेव्हां पांडव परत वळले, तेव्हां त्यांस अत्यंत विरहदुःख झालें; असो. ह्याप्रमाणें मोठ्या कष्टानें श्रीकृष्णाला निरोप दिल्यावर पांडव मागें परतले, व मग सत्वर आपल्या नगरांत प्रविष्ट झाले. इकडे भगवान बलराम व कृष्ण ह्यांचे रथ इतक्या वेगानें द्वारकेंत येऊन पोहोंचले कीं, जणू काय पक्षिराज गरुडच अंतरिक्षमार्गानें झेंप घालून द्वारकेंत उतरला, असें सर्वांस भासलें!

वैशंपायन सांगतातः—हे जनमेजया, महाधार्मिक युधिष्ठिर राजानें आपले बंधु, पुत्र व आप्तसुहृद् ह्यांसमवेत इंद्रप्रस्थास परत आल्यावर सर्वांस आपआपल्या स्थानीं जाण्यास अनुमोदन दिलें, आणि आपण मोठ्या आनंदानें द्रौपदीची भेट घेतली; असो.

वैशंपायन सांगतातः—राजा जनमेजया, इकडे श्रीकृष्णाचा रथ द्वारकेंत प्रविष्ट होतांच उग्रसेनप्रमुख यादवश्रेष्ठांनीं श्रीकृष्णाची अर्घ्यपाद्यादिकांनीं पूजा केली; आणि नंतर श्रीकृष्ण हा, पितामह आहुक, पिता वसुदेव, भाग्यवान माता देवकी, व ज्येष्ठ बंधु बलराम ह्यांस प्रणाम करून त्यांच्या संनिध उभा राहिली. पुढें प्रद्युम्न, सांब, निशठ, चारुदेष्ण, गद, अनिरुद्ध व भानु ह्यांस श्रीकृष्णानें मोठ्या प्रेमानें आलिंगन दिलें; आणि गुरुजनांची आज्ञा झाल्यावर तो रुक्मिणीच्या मंदिरांत प्रविष्ट झाला; असो.

जनमेजय राजा, भगवान श्रीकृष्णाची आज्ञा झाल्यापासून, तो भाग्यशाली मयासुर, पांडवांकरितां कशा प्रकारची सभा करावयाची ह्याचा विचार करीत होता; व ती सभा अमुक एक प्रकारची करावयाची ह्याचा त्यानें आराखडाही काढिला होता. आतां त्यानें एकंदर सभेच्या रचनेविषयीं मनामध्यें यथाशास्त्र योजना केली, आणि ती सभा सर्व रत्नांनीं मंडित करून ब्रह्मांडांतील लोकोत्तर कृत्यांचें तें निधानच बनवावयाचें, असें त्यानें ठरविलें!

अध्याय तिसरा

—:०:—

मयासुराचें बिंदुसरोवरावर गमन.

वैशंपायन सांगतातः—राजा जनमेजया, पुढें मयासुरानें त्या महाधनुर्धर अर्जुनाला म्हटलें, " हे अर्जुना, मला आतां जाण्याची आज्ञा दे; मी लवकरच परत येईन. पार्था, कैलास पर्वताच्या उत्तरेस मैनाक नामक एक गिरि आहे, व त्याच्या समीप बिंदुसर नांवाचें एक रम्य सरोवर आहे. तेथें पूर्वी सत्यप्रतिज्ञ वृषपर्व दानवाधिपतीनें एक दिव्य सभा सिद्ध करून दानवांसहवर्तमान यज्ञानुष्ठान करण्याचें योजिलें होतें.

हे कुंतीपुत्रा, मीं त्या सभेंतील भांडागारांत धनाचे व रत्नांचे मोठमोठे राशि, मंदिरांस रंगविण्याकरितां चित्रविचित्र रंग, नानाविध चूर्णें व इतर अनेक उपकरणें विपुल ठेविलीं आहेत. हे भारता, जर ते पदार्थ अद्याप तेथें असतील, तर ते तेथें जाऊन घेऊन यावे, व त्यांच्या योगें धर्मराजाकरितां मनोहर, दिव्य, सर्वरत्नमंडित व अपूर्व अशी एक अद्वितीय सभा निर्माण करावी, असें माझ्या मनांत आहे. शिवाय, अर्जुना, वृषपर्व राजानें रणामध्यें शत्रूंचा वध केल्यानंतर आपली भयंकर गदा त्या बिंदुसरोवरावरच ठेविली आहे, असें मला स्मरतें. ती गदा मोठी विलक्षण आहे. तिच्यावर अनेक ठिकाणीं सुवर्णाच्या चित्रविचित्र फुलांचें कोंदणकाम असून, ती मोठी बळकट व विशाल आहे. तिच्या अंगीं इतकें सामर्थ्य आहे कीं, तिच्यावर दुसऱ्या गदांचे कितीही प्रहार झाले तरी ती अणुमात्र डगत नाहीं. ती एक गदा, दुसऱ्या लक्षावधि गदांशीं एकटी झुंजेल; आणि ज्या वीरावर तिचा प्रहार होईल, त्याचा कधींही नाश झाल्याशिवाय राहणार नाहीं. ह्याकरितां, ती गदा तेथून आणावी व भीमसेनास द्यावी, असें मला वाटतें. अर्जुना, गांडीवधनुष्य धारण करण्यास जसा तूंच पात्र आहेस, तसा तो भीमसेनच ती उग्र गदा धारण करण्यास पात्र होय. ह्याखेरीज, वरुणाचा देवदत्त नामक महाशंखही तेथंच आहे. त्याची शक्ति इतकी लोकोत्तर आहे कीं, त्याचा महास्वर ऐकतांच शत्रूंचीं हृदयें तात्काळ विदीर्ण होतात! असो. हे पांडुनंदना, ह्या सर्व वस्तु निःसंशयपणें तुम्हांस आणून देतो. स्वस्थ असा.';

वैशंपायन सांगतातः—जनमेजया, मयासुर ह्याप्रमाणें अर्जुनास सांगून ईशान्य दिशेस निघून गेला; आणि कैलास पर्वताच्या उत्तरेस मैनाक पर्वताप्रत जाऊन पोहोंचला. राजा, त्या मैनाक पर्वताचें हिरण्यशृंग नांवाचें एक महान शिखर आहे. त्याजवर रत्नांच्या मोठमोठ्या खाणी असून त्याच्याच पायथ्याशीं तें रमणीय बिंदुसरोवर आहे.

बिंदुसरोवराचा महिमा.

ह्या बिंदुसरोवराच्याच समीप भगीरथ राजाला अनेक वर्षेंपर्यंत उग्र तपश्चर्या केल्यावर त्या परमपावन गंगेचें दर्शन घडलें. अखिल स्थावरजंगम पदार्थांचा उत्पादक जो महात्मा ब्रह्मदेव, त्यानें ह्या स्थलींच आपल्या इच्छेनुरूप शंभर महान क्रतु (अश्वमेध) केले. राजा, त्या ठिकाणीं जे रत्नखचित यज्ञस्तंभ व ज्या सुवर्णमय यज्ञशाला सिद्ध केल्या होत्या, त्या अत्यंत मनोहर होत्या. त्यांचीं प्रमाणें, घटना वगैरे धर्मशास्त्रांत सांगितल्याप्रमाणें नव्हतीं; तर केवळ यज्ञमंडपास उत्कृष्ट शोभा प्राप्त व्हावी, हा हेतु मनांत धरून मोठ्या चातुर्यानें त्यांची रचना केलेली होती. राजा, शचीपति देवेंद्राला जें इंद्रपद प्राप्त झालें, त्याचें कारण तरी त्यानें ह्या पुण्यक्षेत्रीं यजन केलें हेंच होय. जनमेजया, भगवान भूतपति शंकर, सर्व लोकांची उत्पत्ति केल्यावर ह्या स्थळींच अखंड परमानंदाचा लाभ घेत राहिले असून, सहस्रावधि भूतगण त्या वीर्यशाली महादेवाची सेवा करीत आहेत. पारिक्षिता, सहस्र महायुगें (कृत, त्रेता, द्वापर व कलि ह्या युगांच्या सहस्र चौकड्या) परिभ्रमण होत तोंपर्यंत भगवान नरनारायण, ब्रह्मदेव, यम व रुद्र ह्या पांची देवता येथेंच सत्र करीत असतात; आणि त्या सत्रबलानेंच त्या पुरुषांस प्रलयानंतर योग्य कालीं सृष्टीचें पुनः संधान करितां येतें. हे भारता, भगवान लोकनायक वासुदेवानें ह्या ठिकाणींच बहुत संवत्सरपर्यंत श्रद्धापूर्वक अनेक यज्ञयाग केले, आणि त्यामुळेंच धर्माची प्रवृत्ति निरंतर अव्याहत चालली आहे. राजा, त्या परमपावन भूप्रदेशीं सुवर्णमालांनीं शृंगारलेले अनेक यज्ञस्तंभ व अनेक अतितेजस्वी यज्ञशाला त्या समयीं भगवंतांनीं सिद्ध केल्या, आणि यज्ञयागांच्या सांगतेसाठा ब्राह्मणांना अपरिमित धन वांटलें.

मयासुराचें पुनरागगन.

हे धनुर्धरा जनमेजया, बिंदुसरोवरावर जाऊन मयासुरानें ती अद्वितीय गदा, तो अपूर्व देवदत्त

शंख, आणि वृषपर्वसभेचें काम उरकून उरलेले ते चित्रविचित्र रंग, नानाविध चूर्णे, इतर अनेक उपकरणें आणि तो महान धनकोश व रत्नकोश हीं ग्रहण केलीं. राजा, मयासुरास ह्या सर्व वस्तु जशा ठेविल्या होत्या तशाच्या तशाच प्राप्त झाल्या; कारण त्यांवर राक्षस व किंकर ह्यांचा पहारा असल्यामुळें त्यांपैकीं कांहींएक नष्ट झालें नव्हतें. राजा, मयासुरानें तीं सर्व सामुग्री तेथून आणिली, आणि तिच्या योगें धर्मराजाकरितां इंद्रप्रस्थास एक दिव्य, मनोहर, रत्नखचित, अप्रतिम व त्रिभुवनांत प्रख्यात अशी सभा तयार केली. राजा, त्या मयदैत्यानें ती श्रेष्ठ गदा भीमसेनास दिली; आणि तो अपूर्व शंख अर्जुनास समर्पिला.

मयसभेचें वर्णन.

हे राजाधिराजा, मयासुरानें जी सभा सिद्ध केली, तिचें वर्णन काय करावें ! त्या सभेची लांबी व रुंदी प्रत्येकीं दहा दहा हजार हात होती. तिच्या मध्यें जागोजाग सुवर्णाचे वृक्ष निर्माण केले होते. तिच्या ठिकाणीं अग्नि, सूर्य व चंद्र ह्यांच्या सभांप्रमाणें अलौकिक तेज झळकत असून, तिचा आकार मोठा मोहक व हृदयंगम होता. मयासुरानें तयार केलेल्या त्या सभेची कांति भगवान आदित्याच्या देदीप्यमान कांतीसही मागें टाकीत होती. जणू काय ती दिव्य सभा आपल्या दिव्य तेजानें अंतर्बाह्य प्रदीप्तच झालेली आहे असें भासत होतें. नूतन मेघाप्रमाणें ती विस्तीर्ण सभा अंतरिक्षास अगदीं भिडलेली होती. त्या अवाढव्य व रमणीय सभेंत जे कोणी प्रवेश करतील, त्यांचीं सर्व पातकें नष्ट व्हावीं आणि त्यांचे सर्व क्लेश हरले जावे, अशी कांहीं अपूर्व योजना मयासुरानें केली होती. त्रिभुवनांतील उत्तम उत्तम पदार्थांनीं ती सभा घडविली असून, तिच्या भोंवतालचे प्राकार (कोट) व द्वारांवरील तोरणें हीं हिरे, पांच वगैरे रत्नांचीं केलेलीं होतीं. तिच्यामध्यें अनेक चित्रें काढिलीं होतीं, व अनेक प्रतिमा म्हणजे पुतळे बसविले होते. राजा, प्रतिसृष्टि करणाऱ्या त्या मय दैत्यानें धर्मराजाला जी ही सभा करून दिली, तिच्या मूल्याचा अंदाजही करणें कठिण आहे. जनमेजया, फार काय सांगावें ? त्या महाबुद्धिमान मयानें जी सभा तयार केली, त्या सभेसारखी सुंदर सभा भगवान विष्णूची, ब्रह्मदेवाची किंवा इंद्राचीसुद्धां नाहीं! राजा, त्या लोकोत्तर सभेचें संरक्षण करण्याकरितां आठ हजार[१] किंकर नामक राक्षस मयासुरानें नेमिले होते. ते राक्षस अत्यंत बलिष्ठ असून त्यांचे देह मोठे विशाल व भयंकर होते. त्या राक्षसांपैकीं कित्येकांचे आरक्त व कित्येकांचे पिंगट असे नेत्र होते. त्यांच्या कर्णांचा आकार शिंपांसारखा असून अंतरिक्षांत संचार करण्यास व वाटेल त्यास प्रहार करण्यास त्यांच्या अंगीं शक्ति होती; आणि हे राक्षस त्या मयसभेस जरूर पडल्यास एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं खुशाल घेऊन जात असत !

सरोवराची भ्रामकता.

राजा पारिक्षिता, त्या सभेमध्यें मयासुरानें एक अप्रतिम सरोवर निर्माण केलें होतें. त्यांत सुवर्णकमळें विपुल असून तीं सर्वतोपरी रत्नमय होतीं. तेथील कमललतांचा पत्रविस्तार इंद्रनील मण्यांचा असून, त्या विस्तारावर प्रफुल्लित असलेलीं कमलपुष्पें पद्मराग मण्यांचीं होतीं. तसेंच त्या कमलिनींचे नाल (देंठ) अन्य रत्नांचे असून त्यांच्या आसमंताद्भागीं बहुविध पक्षिगण वास करीत होते. राजा, त्या पुष्करिणींत जिकडे तिकडे रत्नमय कमलें विकसित झालीं असून, त्यांत इतस्ततः सुवर्णाचे मासे व कासवें हीं संचार करीत असल्यामुळें तेथें मोठी विचित्र शोभा प्राप्त झाली होती. त्या सरोवरांत उतरण्याला नानाविध रत्नांच्या पायऱ्या बनविल्या असून, उदकाच्या अधोभागीं पंकाचा (चिखलाचा) किंचित् सुद्धां लेप नव्हता; आणि ह्यास्तव, वास्तविकपणें जलाचा संचय असतांही त्या जलाच्या

१ राक्षसांची एक विशिष्ट जाति.

स्वच्छपणामुळें एकदम पाहणारास जलाच्या जागीं स्थलाचाच भास होई! राजा, त्या पुष्करिणींत मंदवायूच्या योगानें उदकाचे तुषार उसळत; आणि त्यामुळें, जणू काय मौक्तिकांचा फंवाराच उडत आहे असें भासे! राजा, त्या जलाशयाच्या चारही बाजूंस तटप्रदेशीं महान महान रत्नांचे चतुष्कोणी शिलापट्ट बसविले असून अंतर्भागीं रत्नांचींच कमलें, रत्नांचे नाल, व रत्नांचींच पत्रें, आणि त्यांवर मंदवायुप्रेरित मौक्तिकांचा दाट फंवारा उसळत असल्यामुळें, कित्येक राजे त्या पुष्करिणीच्या कांठीं शिलापट्टांवर प्राप्त झाले म्हणजे, आणखी पुढेंही अशीच मणिमय भूमि आहे, असा त्यांस खरोखरीच भास होई, व ते अज्ञानानें त्या जलाशयांत कोसळून पडत!

हे जनमेजय राजा, त्या सभेच्या भोंवतालीं नानाविध महान महान नील वृक्ष सदासर्वकाळ प्रफुल्लित असत, आणि त्यांची सुंदर आकृति व थंडगार सावली अवलोकन करून प्रेक्षकांस अत्यंत समाधान वाटे. राजा, चोहोंकडे त्या सभेच्या आसमंतात् सौगंधिक वृक्षांची राई व कमलांचे तटाक लागून गेले असून, त्यांवर अनेक हंस पक्षी, कारंडव पक्षी व चक्रवाक पक्षी विहार करीत असल्यामुळें दिव्य शोभा दिसत होती. राजा, ह्याशिवाय, त्या सभेपासून दूर अंतरावर चारही दिशांस उदकांत किंवा भूमीवर जीं कमलें विकसित झालेलीं असत, त्यांतील सुगंध वायूच्या ओघाबरोबर त्या सभेंत वाहत येत असे. सारांश, मयासुरानें जी सभा पांडवांकरितां सिद्ध केली, तींत अंतरंगभागीं जशीं नानाविध सुखसाधनें निर्माण केलीं होतीं, तशीं बहिरंगभागींही तीं निर्माण केलीं असून इतर अन्यदेशीय भौतिक सुखांची सुद्धां त्यांत भर पडण्याची व्यवस्था होती. हे जनमेजया, अशा प्रकारची ती लोकोत्तर सभा तयार करण्यास मयासुरास चौदा महिन्यांहून अधिक काळ लागला, आणि नंतर ती सभा पूर्णपणें सिद्ध झाल्यावर त्या दानवश्रेष्ठानें धर्मराजाला ती गोष्ट विदित केली.

अध्याय चौथा.

—:०:—

ब्राह्मणसंतर्पण.

वैशंपायन सांगतातः—हे जनमेजया, ती सभा सिद्ध झाल्याचें वर्तमान मयासुरानें निवेदन केल्यावर, धर्मराजानें त्या सभेंत प्रवेश करण्याचा विचार केला; आणि त्यानें प्रथम अयुत (दहा हजार) ब्राह्मणांस भोजन घातलें. राजा जनमेजया, धर्मराजानें त्या ब्राह्मणांस नानाविध भक्ष्य, पेय, चोष्य व लेह्य पदार्थ वाढिले; तूप व मध यांचे तर पाट वहात होते. त्या धर्मराजानें क्षीररसही यथेष्ट समर्पिला, आणि उत्तम उत्तम कंद, मुळें, फळें, बराहाचीं व हरिणाचीं मांसें, तिलमिश्रित पदार्थ, जीवन्ती नामक विशेष पक्वान्नें, सर्व प्रकारचीं हविष्यान्नें, नानाविध मांसप्रकार इत्यादिकांनीं त्यांचा अत्यंत संतोष केला. नंतर त्या धर्मराजानें दूरदूरच्या ठिकाणांहून प्राप्त झालेल्या त्या ब्राह्मणांस नूतन वस्त्रें, बहुविध पुष्पें वगैरे समर्पण करून आणखी प्रत्येकास दहा दहा सहस्र धेनु दिल्या. हे भारता, त्या प्रसंगीं त्या ब्राह्मणांनीं त्या युधिष्ठिराला आशीर्वचन देऊन जो जयघोष केला, तो अगदीं स्वर्गमंडलास जाऊन पोहोंचला!

देवतांची स्थापना.

हे पारिक्षिता, नंतर तेथें नानाविध सुस्वर वाद्यें वाजूं लागलीं असतां, धर्मराजानें त्या सभेंत द्वारादिकांच्या ठिकाणीं व इतरत्र देवतांची स्थापना करून त्यांची बहुविध सुगंधि द्रव्यांनीं यथासांग पूजा केली.

सभाप्रवेश.

राजा, ह्याप्रमाणें देवतांची स्थापना केल्यावर, धर्मराजानें त्या मयसभेची पूजा करून तींत

आपल्या बंधूंसहवर्तमान प्रवेश केला. ह्या समयीं तेथें मोठमोठे मल्ल, नट, झल्ल (दांडपट्टा खेळणारे), सूत (पुराण सांगणारे) व वैतालिक (भाट) हे आपआपल्या ठिकाणीं असलेलें अप्रतिम कौशल्य दाखवून धर्मराजाची सेवा करीत होते. राजा, त्या मयसभेंत प्रवेश केल्यावर, लोकपाल इंद्र जसा देवसभेंत शोभतो, तसा तो धर्मात्मा युधिष्ठिर त्या मयसभेंत शोभूं लागला.

सभाप्रवेशसमारंभ.

हे जनमेजया, पांडवांनीं त्या सभेंत प्रवेश केला त्या समयीं जो महान समारंभ झाला, त्याचें काय वर्णन करावें! त्या सभेंत पांडवांचें अभिनंदन करण्याकरितां देशोदेशांहून थोर थोर ऋषि व मोठमोठे भूपाल जमले होते. तेथें पांडवांसमवेत जे महर्षि व राजर्षि विराजमान झाले होते, त्यांपैकीं कित्येकांचीं नांवें मी तुला सांगतों.

ऋषिमंडल—राजा जनमेजया, असित, देवल, सत्य, सर्पिर्माली, महाशिरा, अर्वावसु, सुमित्र, मैत्रेय, शुनक, बलि, बक, दाल्भ्य, स्थूलशिरा, कृष्णद्वैपायन, शुक, सुमंतु, जैमिनि, पैल, मी स्वतः (वैशंपायन), तित्तिरि, याज्ञवल्क्य, पुत्रासहित लोमहर्षण, अप्सुहोम्य, धौम्य, अणीमांडव्य, कौशिक, दामोष्णीष, त्रैबलि, पर्णाद, घटजानुक, वायुभक्ष, मौंजायन, पाराशर्य, सारिक, बलीवाक, सिलीवाक, सत्यपाल, कृतश्रम, जातूकर्ण, शिखावान्, आलंब, पारिजातक, महाभाग पर्वत, महामुनि मार्कंडेय, पवित्रपाणि, सावर्ण, भालुकि, गालव, जंघाबंधु, रैभ्य, कोपवेग, भृगु, हरिबभ्रु, कौण्डिन्य, बभ्रुमाली, सनातन, काक्षीवान्, औशिज, नाचिकेत, गौतम, पैङ्ग्य, वराह, शुनक, महातपस्वी शांडिल्य, कुक्कुर, वेणुजंघ, कालाप, कठ इत्यादि अनेक परमपावन, धर्मज्ञ, जितेंद्रिय व वेदवेदांगपारग ऋषिवर्य त्या सभेंत धर्मराजाच्या सन्निध बसले असून, त्यास पुण्यकारक कथा निवेदन करीत होते.

क्षत्रियमंडल—राजा जनमेजया, श्रीमान महात्मा मुंजकेतु, धर्मात्मा विवर्धन, संग्रामजित् दुर्मुख, वीर्यवान उग्रसेन, पृथ्वीपति कक्षसेन, अपराजित क्षेमक, व कांबोजराज कमठ हे राजे त्या सभेंत अधिष्ठित असून शिवाय महाबलिष्ठ कंपन राजाही तेथें होता. राजा पारिक्षिता, त्या कंपनाचा पराक्रम मोठा अपूर्व होता. ज्याप्रमाणें वज्रधर देवेंद्रानें महावीर्यवान, दीप्ततेजस्वी व शस्त्रास्त्रांत निपुण अशा त्या कालकेयांना कांपवून सोडिलें, त्याप्रमाणें हा कंपन राजा एकटा बल, वीर्य व शस्त्रास्त्रें ह्यांनीं संपन्न असलेल्या यवनांना कांपवून सोडीत असे. राजा, त्या सभेंत आणखी पुष्कळ भूपाल विराजित झाले होते. मद्राधिपति जटासुर, कुंति, किरातराज पुलिंद, पुंड्रकासहित अंगवंग राजे, आंध्रकासहित पांड्योड्र राजे, शिवाय अंगराज, वंगराज, सुमित्र, शत्रुनाशक शैब्य, किराताधिप व यवनाधिप सुमना, चाणूर, देवरात, भोज, भीमरथ, कालिंगाधिपति श्रुतायुध, मगधाधिपति जयसेन, सुकर्मा, चेकितान, शत्रुघ्न पुरु, केतुमान्, वसुदान, विदेहाधिप कृतक्षण, सुधर्मा, अनिरुद्ध, महाबल श्रुतायु, अनूपराज दुर्धर्ष, क्रमजित सुदर्शन, पुत्रांसह शिशुपाल, कुरूषाधिपति दंतवक्त्र, तसेच महापराक्रमी देवतुल्य यादवकुमार—आहुक, निपृथु, गद, सारण, अक्रूर, कृतवर्मा, शिनिपुत्र सत्यक—त्याप्रमाणेंच भीष्मक, आकृति, वीर्यवान द्युमत्सेन, महाधनुर्धर केकय, सौमकि यज्ञसेन आणि शस्त्रास्त्रविद् महाबल केतुमान् व वसुमान् हे महान महान क्षत्रिय त्या मयसभेंत कुंतीपुत्र धर्मराजाच्या समवेत अधिष्ठित झाले होते. हे जनमेजया, ह्यांशिवाय त्या दिव्य सभेंत रौरवाजिन (रुरुनामक मृगाचें चर्म) धारण करून, अर्जुनापासून धनुर्वेदाचा अभ्यास केलेले महाबलवान राजकुमार बसले असून, वृष्णिकुलाची कीर्ति वाढविणारे व अर्जुनापासूनच धनुर्वेद शिकलेले यादवकुमार—प्रद्युम्न, सांब, युयधान, सात्यकि

सुधर्मा, अनिरुद्ध—व पुरुषश्रेष्ठ शैब्य आणि ह्यांशिवाय दुसरे बहुत राजे त्या सभेंत जमले होते. राजा जनमेजया, त्या सभेंत अर्जुनाचा सखा तुंबुरु हा नेहमींच राहिला होता, व शिवाय सत्तावीस गंधर्वगण त्या महात्म्या धर्मराजाच्या सेवेंत सदासर्वकाळ तत्पर होते. प्रधानांसहवर्तमान चित्रसेन गंधर्व, आणि दुसरे गंधर्व व अप्सरा हीं त्या सभेंत नृत्यगायनादिक करीत होतीं. राजा, त्या ठिकाणीं गायनकलेंत व वादनकलेंत प्रवीण, तालांच्या मात्रांची घडामोड करण्यांत व रागरागिणींची व्यवस्था लावण्यांत कुशल, तसेच आरोहावरोह जाणण्यांत व वर्ज्यावर्ज्यांच्या विचार करण्यांत निपुण, मृदंगादि चर्मवाद्यें व वीणादि तंतुवाद्यें ह्यांमध्यें निष्णात, आणि वाद्यांचा ध्वनि व कंठांतील स्वर ह्यांची उत्कृष्ट एकतानता करण्यांत विशारद असे किन्नरही तेथें होते. ते सर्व तुंबुरूच्या आज्ञेप्रमाणें गंधर्वादिकांसमवेत नानाप्रकारच्या दिव्य ताना मारून मोठ्या उल्हासानें गात गात त्या पांडवांचें व ऋषिसमुदायांचें रंजन करीत होते. सारांश, ज्याप्रमाणें स्वर्गामध्यें इंद्रादि देव भगवान ब्रह्मदेवाची सेवा करितात, त्याप्रमाणें त्या मयसभेमध्यें महाधार्मिक व सत्यप्रतिज्ञ गंधर्वादिक अनेक पुरुष युधिष्ठिराची मनापासून सेवा करीत होते.



लोकपालसभाख्यानपर्व.

अध्याय पांचवा

—:०:—

नारदागमन.

वैशंपायन सांगतात:—राजा जनमेजया, त्या लोकोत्तर मयसभेंत महान महान विप्रवर्य, क्षत्रिय वीर व चित्रसेनादिक गंधर्व ह्यांसहवर्तमान युधिष्ठिरप्रभृति उदारधी पांडव अधिष्ठित असतां, तेथें भगवान देवर्षि नारद प्राप्त झाले. राजा, महात्म्या

नारदांची योग्यता

काय वर्णन करावी? त्या मुनिश्रेष्ठांस कोणतीही गोष्ट परोक्ष नव्हती. ऋग्, यजुस्,साम व अथर्वण हे वेद, आणि ईशावास्यादि उपनिषदें ह्यांमध्यें ते निष्णात होते. वेद व उपनिषदें हीं त्यांस केवळ अवगत होतीं इतकेंच नव्हे, तर त्यांस त्यांचा अर्थही उत्तम प्रकारें विदित होता. वेदांचें व वेदांताचें मुख्य प्रमेय सदासर्वकाळ त्यांच्या दृष्टीपुढें असे; आणि ह्यामुळें, देहाची इतिकर्तव्यता कोणती, ह्याचें ते स्वत: चिंतन करीत, व दुसऱ्यासही चिंतन करावयास लावीत. हे जनमेजया, नारदांचा तो विलक्षण अधिकार मनांत आणून, इंद्रादिक लोकपाल व दुसरे महान महान देव त्या महर्षींची नित्य सेवा करीत; आणि त्यांपासून बोधामृताचा लाभ करून घेऊन कृतार्थता जोडीत. असो.

राजा, भगवान नारदांचें ज्ञान मोठें विशाल होतें. कोणताही विषय त्यांस करतलामलकवत् असे. इतिहास व पुराणें हीं त्यांस उत्कृष्टपणें अवगत होतीं. वेदामध्यें वर्णन केलेलीं देवदानवयुद्धें किंवा तत्तुल्य दुसरे वृत्तांत, तशींच पुराणांत अथवा इतिहासांत निरूपण केलेलीं हरिश्चंद्रादिक राजर्षींचीं वंदनीय चरित्रें किंवा आख्यानें हीं त्यांस योगबलानें प्रत्यक्ष दृग्गोचर होत.

हे भारता, देवर्षि नारद हे न्यायमीमांसादि शास्त्रांत केवळ प्रतिसूर्यच होते: अज्ञानतिमिराचा त्यांच्या ठिकाणीं लवलेशही नव्हता. कोणत्याही विषयाचा सांगोपांग विचार करण्यांत ते प्रवीण होते. विषय, संशय, पूर्वपक्ष, उत्तरपक्ष व संगति हीं जीं कोणत्याही विषयाचा निर्णय करण्याचीं पांच अधिकरणें, त्यांत ते निपुण असल्यामुळें, त्यांच्या विवेचनापासून अगदीं सूक्ष्म व गहन असाच निर्णय उपलब्ध होई. राजा, नारद मुनींच्या ठायीं त्रिकालज्ञान असल्यामुळें, त्यांस मन्वादिकांनीं स्थापन केलेल्या धर्मतत्त्वांचें रहस्य यथार्थ कळत होतें; शिक्षा, कल्प, व्याकरण, निरुक्त, छंद व ज्योतिष हीं जीं वेदांचीं सहा अंगें, त्यांत त्यांच्यासारखा अन्य कोणीही पारंगत नव्हता; आणि त्यामुळें, विरोधदर्शक वेदवाक्यांची संगति कशी लावावी, एकाच वैदिक वचनांतून अनेक अर्थ सुयुक्तिक रीतीनें कसे ग्रहण करावे, आणि एकाच कर्मविधीपासून बहुविध धर्मफलें कशीं उद्भवतात, हें त्यांस उत्तम रीतीनें समजत होतें.

जनमेजया, भगवान नारद ऋषींच्या ठिकाणीं केवळ अपूर्व ज्ञान वसत होतें इतकेंच नव्हे, तर त्यांच्या ठिकाणीं उत्तम वक्त्याला अवश्य असणारे जे गुण, तेही पूर्णपणें वसत होते. त्यांचें भाषण मोठें प्रगल्भ असे. त्यांत असंबद्धता लवमात्र नसे. ते मोठे बुद्धिमान होते. त्यांची विवेचनपद्धति शुद्ध व साधार असे. त्यांनीं जें जें ज्ञान संपादिलें होतें, त्याचा त्यांस विसर कसा तो माहीतही नव्हता. श्रोत्यांची मनोवृत्ति, विषयग्रहणशक्ति, त्यांचे व्यवहार इत्यादिकांविषयीं निश्चय करण्यास त्यांस मुळींच विलंब लागत नसे. श्रोतृवृंदांशीं गांठ पडतांच त्यांशीं त्यांचें तात्काळ तादात्म्य होई. त्यांची दृष्टि फार दूरवर चाले. कर्मकांडाची मर्यादा कोणती व ज्ञानकांडाची मर्यादा कोणती, हें यथार्थ व्यक्त करून दाखविण्यांत ते फार कुशल होते. प्रत्यक्ष, अनुमान, आगम (श्रुतिस्मृतिवचन) इत्यादि जीं प्रमाणें, त्यांच्या योगानें घटाग्निस्वर्गादि लौकिक विषयांचें व निर्गुणनिरतिशयादिक अलौकिक आत्मतत्त्वांचें सत्यस्वरूप

ते विशद करीत. प्रतिज्ञा, हेतु, उदाहरण, उपनय व निगमन हे जे वाक्याचे पांच अवयव, त्यांचा अन्योन्यसंबंध कसा असतो, व त्यांच्या अर्थाविषयीं प्रतिकूल तर्क केल्यास किंवा त्या अवयवांपैकीं एकावर किंवा अनेकांवर अवधान न ठेविल्यास अतिव्याप्ति, अव्याप्ति, असंभव इत्यादि दोष घडून वाक्यांतर्गत अर्थास कशी आपत्ति प्राप्त होते, आणि सर्व वाक्यविभागांची मननपूर्वक सुव्यवस्थेनें संगति लागल्यास उद्दिष्ट अर्थ पूर्वपक्षकाराच्या गळ्यांत कसा बांधितां येतो, ह्यांतील मर्म त्यांस उत्कृष्टपणें विदित असे. राजा जनमेजया, फार काय सांगावें? भगवान नारद मुनींचा वाक्प्रवाह चालू झाला म्हणजे प्रत्यक्ष देवगुरु बृहस्पतींचीही त्यांजवर मात्रा चालत नसे!

हे भरतकुलभूषणा, महर्षि नारदांचा अधिकार काय वर्णावा? त्यांस परब्रह्मतत्त्वाचें यथार्थ ज्ञान झालें होतें. ते लौकिक प्रमाणांचा स्वीकार करून धर्म, अर्थ, काम व मोक्ष ह्या चारही पुरुषार्थांचें विवरण करीत असत. वेदवाक्यांवरून धर्मादिकांच्या स्वरूपाविषयीं विपरीत भावना उत्पन्न होऊं लागल्यास, ते महाज्ञानी भगवद्भक्त मुनि, वेदवचनांचें आर्वाक (बाह्य) स्वरूप न पाहतां आद्य स्वरूप (रहस्य) पाहणेंच इष्ट होय, असें प्रतिपादन करून वेदवाक्यांतील प्रमेयांचा साधार निश्चय करीत. त्यांस सर्व भुवनकोशाचें पूर्ण ज्ञान होतें. त्रैलोक्याच्या वर, खालीं व मध्यें काय काय आहे, हें त्यांस प्रत्यक्ष दिसत असे. सांख्यशास्त्र (वेदान्तविचार) व योगमार्ग (चित्तवृत्तिनिरोध) ह्या उभय साधनांचा ते उत्तम उपयोग करीत असत. श्रवण केलेल्या विषयांचें मनन करून तर्कानें अर्थानुसंधान करण्यांत ते प्रवीण होते. सांख्यशास्त्राच्या निदिध्यासनानें मुख्य प्रमेयांतील असंभावनेचा ते तात्काळ निरास करीत. देहादिकांविषयीं आत्मभाव धरणें व्यर्थ होय, ही गोष्ट श्रोत्यांच्या मनांत ठसविण्यास त्यांस विलंब लागत नसे. लोकांचा उच्छेद होऊं नये म्हणून सुर म्हणजे ज्ञानी पुरुष व असुर म्हणजे अज्ञानी पुरुष ह्यांच्यामधील कलहबीज दूर करण्यास ते सदोदीत उद्युक्त असत. इतकेंही करून त्या उभयतांत कलह प्रवृत्त झाल्यास, कोणत्या पक्षानें कसें वागलें असतां त्याचें कार्य सिद्ध होईल, हें ते उत्तम प्रकारें जाणीत. साम, दान, दंड व भेद हे जे राजनीतींतील प्रधान नियम, त्यांकडे ते केव्हांही पराङ्मुख नसत. संधि, विग्रह, यान, आसन, द्वैधीभाव व समाश्रय असे जे सहा विधि, त्यांचा ते विजयेच्छु पुरुषास सदा उपदेश करीत. अखिल शास्त्रांत त्यांची अव्याहत गति होती; आणि युद्धशास्त्रामध्यें व संगीतशास्त्रामध्यें सुद्धां त्यांचें परिशीलन असे. असो.

ह्याप्रमाणें नानाविध गुणांनीं ओतप्रोत भरलेले ते भगवान देवर्षि नारद त्रैलोक्यांत यदृच्छेनें फिरत असतां पांडवांस भेटण्याकरितां उल्लसित होऊन मनोवेगानें त्या मयसभेंत प्राप्त झाले. त्या समयीं त्यांच्याबरोबर पारिजात, धीमान पर्वत, सौम्य सुमुख इत्यादिक महान महान ऋषि होते. भगवान नारदांनीं व त्यांच्यासमवेत असलेल्या इतर सर्व ऋषींनीं मयसभेंत प्रवेश करितांच आशीर्वचनांनीं धर्मराजाचा जयजयकार केला; आणि त्याबरोबर तात्काळ युधिष्ठिरादिक धर्मवेत्त्या सर्व पांडवांनीं मोठ्या लगबगीनें उठून विनयपूर्वक मोठ्या प्रेमानें त्यांस अभिवंदन केलें, व यथोचित आसनांचा परिग्रह करण्याविषयीं त्यांस प्रार्थून मधुपर्कादिक अतिथिसत्काराची सिद्धता करविली. नंतर धर्मराजानें अर्घ्यपाद्यादिकांनीं त्या ऋषिश्रेष्ठांची पूजा केली; आणि त्यांस धेनु, मधुपर्क, सर्व प्रकारच्या अभीष्ट वस्तु, रत्नें वगैरे समर्पिलीं. राजा, युधिष्ठिरानें केलेली पूजा ग्रहण करून भगवान नारद ऋषि संतुष्ट झाले. पुढें भीमादिक इतर पांडुपुत्रांनीं त्या वेदपारग महात्म्यांचें यथाविधि पूजन केलें आणि नंतर नारद मुनींनीं परमाल्हादित होऊन धर्मार्थकामपर असे अनेक प्रश्न धर्मराजास विचारिले.

राजा पारिक्षिता, त्या समयीं भगवान नारदांनीं तेथें जे प्रश्न विचारिले, त्यांचा हेतु—केवळ धर्मराजाची संपूर्ण परिस्थिति समजून घ्यावी इतकाच होता असें नव्हे, तर आपला अभिप्राय व्यक्त करून, त्या सभेंत अधिष्ठित असलेल्या युधिष्ठिरादिक राजर्षींना अखिल राजधर्मांचा उपदेश करावा, हाच त्या महर्षींचा उद्देश होता; आणि हाच उद्देश मनांत आणून धर्मराजानें नारदांच्या प्रश्नरूप विवेचनाच्या अंतीं, "महर्षे, तुमच्या उपदेशाचा मी मनापासून अंगीकार करितों; तुमच्या अभिप्रायानुरून मी सतत वर्तेन." असें त्या ऋषिवर्यास विनयपूर्वक उत्तर दिलें; असो. आतां, त्या मुनिवर्यानें जे प्रश्न विचारिले, ते ऐक.

नारदप्रणीत राजनीति

किंवा

कंचित्प्रश्न.[1]

नारद विचारतात:—राजा युधिष्ठिरा, भूपतीला म्हटलें म्हणजे यज्ञयाग, दानधर्म, कुटुंबभरण इत्यादि कार्यासाठीं धनादिकांचें उत्तम बळ असलें पाहिजे; तर तें बळ तुजपाशीं आहेना? तसेंच, लोकनायकाचें मन सदोदीत धर्माचरणाविषयीं तत्पर असलें पाहिजे; ह्यास्तव तुझें मन धर्मपर आहेना? धर्मराजा, राजे लोकांनीं सुखोपभोग अनुभवावे, पण त्यांत दंग होऊन परब्रह्मचिंतनापासून विमुख होऊं नये; तेव्हां तुझी स्थिति कशी आहे बरें? तुला राजसुखें अनुकूल आहेतना? बरें पण त्यांत तूं अतिशय आसक्त नाहींसना? हे नरदेवा, उत्तम, अधम व मध्यम असे जे जनांचे त्रिविध वर्ग, त्यांशीं तदनुरूप त्रिविध वर्तन ठेवणें अवश्य आहे; ऋत्विक्पुरोहितादि गुरुस्थानापन्न जनांविषयीं पूज्यबुद्धि धारण करून त्यांस वर्षासनें वगैरे करून दिलीं पाहिजेत, दुष्ट व घातुक जनांचें शासन करून त्यांस जरबेंत ठेवण्याकरितां त्यांजपासून दंड घेणें अगत्याचें आहे, आणि प्रजेचें पालन करून तिजपासून उत्पन्नाचा षष्ठांश कररूपानें वसूल घेण्यास प्रत्यवाय नाहीं; तुझे पूर्वज ह्या तिन्ही विहित गोष्टी मोठ्या काळजीनें करीत असत; तेव्हां तूंही त्या श्रेष्ठ मार्गाचें अवलंबन करीत असतोसना? हे नरपुंगवा, पृथ्वीपतीच्या ठिकाणीं नीचत्व, विरक्तत्व व कामुकत्व हे महान दोष होत; ह्यांच्या योगानें त्याच्या हातून राज्यशकट कधींही सुयंत्र चालणार नाहीं; ह्यास्तव ह्या दोषांपासून भूपतीनें सदैव अलिप्त असलें पाहिजे. त्यानें अर्थाविषयीं लोभ धरून धर्माचा अव्हेर होऊं देऊं नये; धर्माविषयीं तत्पर होऊन अर्थाकडे दुर्लक्ष करूं नये; आणि तात्कालिक सुखांवर आसक्ति ठेवून धर्म व अर्थ ह्या दोहोंविषयीं उदासीन बनूं नये. सारांश, धर्माची प्रीति, अर्थाचा लोभ, व सुखाचा अभिलाष ह्या तिन्ही गोष्टी अगदीं मर्यादित असल्या पाहिजेत. तेव्हां तुझी स्थिति ह्याप्रमाणें सर्वथा प्रशंसनीय आहेना? हे विजयिश्रेष्ठा युधिष्ठिरा, धर्म, अर्थ व काम ह्या तिहींनीं विशिष्ट अशा मर्यादेचें उल्लंघन करूं नये; ह्यास्तव, प्रत्येक उत्कर्षेच्छु पुरुषानें त्यांस विशिष्ट काळ नेमून द्यावा हें फार चांगलें; आणि ह्याच तत्त्वावर दृष्टि ठेवून श्रुतीनें असा नियम घालून दिला आहे कीं, पूर्वाह्णीं नित्यनैमित्तिक धर्मकृत्यें आचरावीं, मध्यान्हापासून सायान्हापर्यंत द्रव्यार्जनादिक अर्थपर कृत्यें करावीं, आणि सायान्हीं व नंतर सुखोपभोग घ्यावे. धर्मराजा, ही कालानुरूप कर्मयो-

---

[1] नारद मुनींनीं विचारिलेल्या प्रत्येक प्रश्नाच्या आरंभीं कच्चित् हा शब्द मुळांत आहे, म्हणून ह्या प्रकरणास कच्चित्प्रश्न असें म्हणतात. कच्चित् हें संस्कृतांत प्रश्नार्थक अव्यय आहे. ज्या प्रश्नार्थक वाक्यांत वक्ता आपला अभिप्राय प्रश्नांतच व्यक्त करितो, त्या वाक्यांत ह्या अव्ययाची योजना करितात. मुक्तेश्वरादिक महाराष्ट्रकवींनीं कच्चित ह्या अव्ययाचें महाराष्ट्ररूपांतर किंचित् असें केलें आहे; ह्यास्तव ह्या कच्चित्प्रश्नांस मराठींत किंचित्प्रश्न असें म्हणतात.

जना तूं जाणतच आहेस; तेव्हां तूं तदनुसार वर्तन करीत आहेसना ?

युधिष्ठिर राजा, (१) नास्तिकपणा, (२)असत्य, (३) क्रोध, (४) प्रमाद (गैरसावधपणा), (५)दीर्घसूत्रता(चेंगटपणा), (६)ज्ञानी लोकांची भेट न घेणें, (७) आळस, (८) इंद्रियासक्ति, (९) केवळ धनलोभ, (१०) दुष्टांशीं मसलत, (११) सुनिश्चित कर्माविषयीं उदासीनता, (१२) रहस्यस्फोट, (१३) देवादिकांचे मंगलोत्सव न करणें, व (१४) दाही दिशांकडील शत्रूंना दाबांत ठेवण्याविषयीं दक्षता न राखणें असे हे राजांच्या ठायीं चौदा दोष होत. हे पांडुतनया, राजांच्या ठिकाणीं जे अवश्य असले पाहिजेत, असे मुख्य गुण सहा आहेत: (१) दुसऱ्याचें चित्त वश करून घेऊन त्यावर आपली छाप ठेवण्याकरितां राजांच्या अंगीं उत्तम वक्तृत्व असावें; (२) शत्रूस नित्य भय पडावें व त्यांनीं वर मान उचलूं नये ह्यास्तव राजांनीं आपला पराक्रम व सामर्थ्य सदासर्वकाळ शत्रूच्या दृष्टीपुढें ठाम जागृत ठेवावें; (३) राजांची दृष्टि मोठी सूक्ष्म व दूरवर असावी; (४) पूर्वी घडलेल्या गोष्टींचा त्यांस कधींही विसर पडूं नये; (५) प्राचीन इतिहासाचें पूर्ण मनन करून, पुढें काय घडेल ह्याचें बरोबर अनुमान त्यांस करितां यावें; आणि (६) त्यांस राजनीतीचीं सर्व तत्त्वें उत्कृष्ट विदित असावीं. राजा, तुझ्या ठिकाणीं हे सर्व गुण आहेत; तेव्हां ह्या सर्व गुणांचा योग्य उपयोग करून साम, दान, भेद, दंड, मंत्र, औषध व इंद्रजाल ह्या सात उपायांपैकीं कोणता उपाय कोठें श्रेयस्कर होईल ह्याचा तूं नीट विचार करीत असतोसना ! हे वीरपुंगवा विजयेच्छु पुरुषानें शत्रूच्या बलाबलाचें योग्य परीक्षण करणें अत्यंत अगत्याचें आहे; ह्यास्तव तुझा तसा परिपाठ आहेना ? तशीच चौदा प्रकारच्या अधिकाऱ्यांवर भूपतीची विशेष दक्षतेची दृष्टि पाहिजे. ते अधिकारी म्हटले म्हणजे देशाधिकारी, दुर्गाधिकारी (किल्लेदार), रथाधिपति, अश्वाधिपति, गजाधिपति, शूर सैनिक, अंतःपुररक्षक अन्नाधिपति, शस्त्राधिपति, सेनागणक, आयव्ययलेखक, धनाधिपति, गुप्त हेर व कामगार लोक हे होत; तर ह्या सर्वांवर तुझी योग्य नजर आहेना ? राजा, शत्रूच्या बलाबलांची परीक्षा केल्यावर आपलें बल कमी व शत्रूचें बल अधिक असें दिसून आल्यास, त्या प्रसंगीं स्वसंरक्षणाचा मुख्य उपाय शत्रूशीं युक्तीनें साम करणें हाच होय; ह्याकरितां तसें करून कृषिकर्म, व्यापार, किल्ले, सरहद्दी, हस्तिशाला, रत्नांच्या व सुवर्णाच्या खाणी, व करांचा वसूल ह्यांची सुव्यवस्था ठेवावी, आणि संपत्ति वाढवून राज्यांतील व्यंगें दूर करावीं हें इष्ट आहे; तेव्हां त्याप्रमाणें तूं करीत आहेसना ?

धर्मराजा, राज्यांतील संपत्ति वाढण्यास कृषिकर्मादिक आठ गोष्टी सुधारल्या पाहिजेत हें खरें; परंतु ह्यापेक्षांही एक मोठी गोष्ट अनुकूल असली पाहिजे ती ही कीं, राष्ट्रामध्यें मुळींच फूट नसावी; राजनियुक्त सर्व अधिकाऱ्यांमध्यें राजभक्ति उत्कृष्ट असली पाहिजे; दुर्गाध्यक्ष, बलाध्यक्ष, धर्माध्यक्ष, सेनानायक, उपाध्याय, वैद्य व ज्योतिर्विद ह्या सर्वांनीं एकमतानें स्वामिकार्यासाठीं तनमनधन अर्पण करून झटलें पाहिजे; लांच वगैरे देऊन फंदफितूर उत्पन्न करण्याचा शत्रूंनीं प्रयत्न केल्यास राजसेवकांनीं त्यास लुब्ध होतां उपयोगी नाहीं; तसेंच राज्याधिकारी पुरुषांनीं ऐश्वर्यभरानें उन्मत्त होऊन स्वकर्तव्यापासून पराङ्मुख होऊं नये; ते व्यसनादिकांत निमग्न होऊन पापकर्मास उद्युक्त होतील तर त्यांचा स्वतांचा व परिणामीं त्यांच्या राज्याचा सर्वस्वीं घात होईल; सारांश, लक्ष्मीची वाढ होण्यास राज्यांत सर्वत्र स्वामिकार्यासाठीं निःसीम प्रेम वसलें पाहिजे; तेव्हां तुझ्या राज्यांत तें उत्तम प्रकारें वास करीत आहेना ? तूं जे अधिकारी नेमिले आहेस, ते बाह्यात्कारीं मात्र राजनिष्ठा प्रदर्शित करून आंतून शत्रूला सामील नाहींतना?

तुझे प्रीतींतले मंत्री किंवा दूत तुझ्याशीं दगा करून तुझी मसलत तुझ्या वैऱ्यांस कळवीत नाहींतना ?

राजा, आपल्यावर प्रेम कोण करितात, आणि शत्रु कोण आहेत, व आपल्याशीं उदासीनवृत्तीनें (दोन्ही पक्षांकडील वेतन घेऊन मध्यस्थवृत्तीनें) कोण वागतात, ह्याचा विचार करून त्यांशीं तदनुरूप वर्तन ठेविलें पाहिजे. आपल्यावर प्रेम करणाऱ्या पुरुषांची प्रथम योग्य परीक्षा करावी, व नंतर त्यांस आपल्या मसलतींत घेऊन त्यांच्या साहाय्यानें बलिष्ठ शत्रूंशीं साम किंवा दुर्बल शत्रूंशीं युद्ध करावें; तसेंच, जे उदासीन किंवा मध्यम वृत्तीनें वागत असतील, त्यांशीं आपणही तशीच वागणूक ठेविली पाहिजे. ह्यास्तव ह्या नियमानुसार तुझें योग्य वर्तन चालू आहेना ? हे प्रतापशाली वीरा, राज्यांत जे वृद्ध, कुलीन, स्वामिनिष्ठ, उत्कृष्ट सल्लागार व आचारसंपन्न पुरुष असतात, त्यांच्या सल्लयावर राजाचा जय अवलंबून असतो; ह्यास्तव, त्या पुरुषांचा आपल्याप्रमाणें गौरव होईल अशी तजवीज करणें हें राजाचें कर्तव्य होय; तेव्हां तूं तशी व्यवस्था ठेविली आहेसना ? बा युधिष्ठिरा, राजकार्यधुरंधर अमात्यांनीं राजाचें रहस्य कोणासही कळूं न देतां राजकार्य चालविलें म्हणजे राष्ट्र नेहमीं सुरक्षित राहून शत्रूपासून त्यास केव्हांही उपसर्ग होत नाहीं असा अबाधित नियम आहे; तेव्हां तुझ्या राज्यांत अमात्यमंडळ तसें वर्तन करीत आहेना ?

हे पांडुनंदना, राजाची वृत्ति मोठी कठिण आहे. त्यानें अहर्निश आपल्या कार्याचें निदिध्यसन चालविलें पाहिजे. त्यानें योग्य वेळीं निजून उठलें पाहिजे. त्यास अमर्याद निद्रा उपयोगी नाहीं. राजानें अमात्यांशीं ज्या मसलती केल्या असतील, त्यांचा त्यानें पहांटेस आपल्याशीं विचार करावा. राजा धर्मा, हे सर्व नियम तूं जाणतच आहेस; तेव्हां तुझें वर्तन योग्य प्रकारें चाललें आहेना ? राजा, कोणतीही मसलत करणें ती एकट्यानेंच करूं नये. कारण, एकट्यानेंच मसलत केली असतां कधीं कधीं मोठ्या चुका घडतात; तसेंच, मसलतींत दुसरे लोक घ्यावयाचे ते अनेक घेणें हेंही अयोग्य होय; कारण त्या योगें ती मसलत गुप्त रहात नाहीं. म्हणून, मसलत करावयाची असतां ती दोघांनींच करावी हें इष्ट आहे. तर तूं ज्या मसलती करितोस, त्यांत ही अशी सावधगिरी ठेवितोसना ? तुझ्या मसलती फुटून राष्ट्रभर होत नाहींतना ?

हे युधिष्ठिरा, ज्या व्यवसायांत आरंभीं फारसें द्रव्य घालावें लागत नाहीं—पण परिणामीं त्यांपासून पुष्कळ उत्पन्न होतें, असे व्यवसाय कोणते, ह्याचा निश्चय करून ते व्यवसाय करण्यास तात्काळ प्रयत्न करणें हें इष्ट होय. कृषिकर्म, व्यापार इत्यादिक व्यवसाय ह्यांपैकींच आहेत. तेव्हां हे व्यवसाय करण्यास तूं उत्तेजन देतोसना ? तसेंच जे कोणी हे व्यवसाय करितात, त्यांना विघ्नें करीत नाहीसना ? राजा, कामगार लोक अपरिचित, अविश्वसनीय व पुनःपुनः कामावर लावलेले असे असल्यास, त्यांपासून व्हावा तसा लाभ होत नाहीं. कामगार लोकांचें मन राजाच्या ठिकाणीं आसक्त असल्याशिवाय ते कसून काम करीत नाहींत. ह्यास्तव ते जुने, पूर्ण परिचयाचे, विश्वासू व स्वामीच्या कल्याणाकरितां मनापासून झटणारे असेच असावे; म्हणजे ते महान महान कार्यें मोठ्या उल्हासानें घडवून आणितात. राजा धर्मा, तुझ्या पदरीं जे कामदार लोक आहेत, ते असेच आहेतना ? पांडुतनया, सेवकांना स्वामिकार्य हाच स्वार्थ वाटला पाहिजे. ते स्वतांच्या हिताविषयीं अगदीं निर्लोभ असावे. वाडवडिलांपासून जे सेवक चाकरी करीत आलेले असतात, त्यांच्या ठायीं धन्याविषयीं उत्तम आत्मीयता उत्पन्न झालेली असते. ह्यासाठीं, सर्वस्वी विसंबून राहणें तें अशांच सेवकांवर राहिलें पाहिजे. तेव्हां तुझा परिपाठ असाच आहेना ? राजा, सेवकांवर जीं कामें सोंपविलीं असतात,

त्यांपैकीं कोणतीं कामें पुरीं झालीं, कोणतीं कामें पुरीं होत आलीं, व कोणतीं कामें आरंभावयाचीं राहिलीं, इत्यादिक माहिती त्या सेवकांस पूर्णपणें असली पाहिजे; जर ही माहिती त्यांस नसेल, तर तीं कामें योग्य वेळीं तयार होणार नाहींत. तेव्हां तुझ्या सेवकांना ही सर्व आवश्यक माहिती नीटपणें असतेना ?

हे राजश्रेष्ठा, राष्ट्राचा उदय हा त्या राष्ट्रांतील ज्ञानमत्तेवर अवलंबून असतो; आणि ती ज्ञानमत्ता आचार्यवर्गाच्या पात्रतेवर अवलंबून असते. तेव्हां तुझ्या राष्ट्रांत जे आचार्य आहेत, ते श्रुतिस्मृत्यादिक धर्मशास्त्रांत, धनुर्विद्येत व अन्य विषयांत विशारद आहेतना? तसेच ते शिष्यांस धनुर्वेदादिक विद्या शिकवून उत्तम प्रकारें तयार करीत असतातना ? राजा, विद्वान पुरुषाची योग्यता मोठी अपूर्व असते. ह्यासाठीं, सहस्रावधि मूर्ख पुरुषांना खर्चीं घालूनही एका विद्वानास पदरीं बाळगिलें पाहिजे. कारण, महत्संकट प्राप्त झालें असतां एक विद्वानच त्यांतून आपणास सोडवील. ह्यास्तव तूं विद्वान पुरुषास हरतऱ्हेनें संग्रहीं ठेवण्याविषयीं उत्सुक असतोसना ? धर्मा, राष्ट्रांतील सर्व किल्ले हे धन, धान्य, उदक, आयुधें, यंत्रें, कारागीर व योद्धे यांनीं सदासर्वकाळ परिपूर्ण असले पाहिजेत; नाहीं तर ते प्रसंगीं आपलें कल्याण करण्याच्या ऐवजीं अकल्याणच करतील. तेव्हां तुझ्या राज्यांतील सर्व किल्ल्यांची धनधान्यादिकांनीं समृद्ध स्थिति आहेना ? राजा, राजकीय व्यवहारांत अमात्याची योग्यता फार श्रेष्ठ होय. इंद्रियजेता शूर, बुद्धिवान, दूरदर्शी व चतुरस्र असा एक अमात्य राजाला किंवा राजपुत्राला महद्भाग्य प्राप्त करून देतो, हें लक्षांत धर.

हे अजातशत्रो, शत्रूकडील मंत्री, पुरोहित, युवराज, सेनापति, द्वारपाळ, अंतःपुररक्षक, कारागाराधिकारी, धन वसूल करणारा कामगार, धन खर्चिणारा अधिकारी, उपदेशक, नगरस्वामी, काम नेमून देणारा अधिकारी, धर्माध्यक्ष, सभाध्यक्ष, पहारेकरी, किल्लेदार, सरहद्द संभाळणारे वीर आणि अरण्यपालक अशा अठरा अधिकाऱ्यांवर आणि स्वतःकडील मंत्री, पुरोहित व युवराज हे खेरीज करून बाकीच्या अधिकाऱ्यांवर राजानें गुप्त हेरांकडून टेहेळणी राखावी. प्रत्येक अधिकाऱ्याच्या मागें तीन तीन गुप्त हेर ठेवावे. त्या हेरांस कोणीं ओळखूं नये म्हणून त्यांचा वेष पाखंडी वगैरे लोकांप्रमाणें असावा. त्या हेरांमध्यें आपसांतही एकमेकांची एकमेकांस ओळख पटूं नये. त्यांनीं बारीक नजर व तिखट कान सर्वत्र ठेवावे; आणि जें कांहीं विशेष समजेल, तें आपल्या प्रभूस बिनचूक निवेदन करून स्वामिसेवा उत्कृष्ट बजावावी. बा युधिष्ठिरा, ही सर्व व्यवस्था तूं केली आहेसना ? हे शत्रुनाशका, हेरांची व्यवस्था असली तरी राजानेंही स्वतः दक्षतेनें शत्रूवर दृष्टि ठेवली पाहिजे. त्यानें आपलें हृद्गत परपक्षास कळणार नाहीं अशी सावधगिरी ठेवावी; आणि प्रसंग आल्यास शत्रूचा निःपात उडवितां यावा म्हणून एकसारखे परिश्रम चालवावे; राजा, तुझ्या ठिकाणीं ही सर्व तयारी आहेना ?

हे नयनिपुणा, चतुर्विध पुरुषार्थांची इच्छा करणाऱ्या नरपतीनें, पुरोहित नेमावयाचा तो आचारवान, कुलीन, बहुश्रुत, गुणज्ञ, अनिंदक व उत्कृष्ट शिकविणारा असा नेमावा, आणि त्याचा उत्तम प्रकारें आदरसत्कार करावा, हें इष्ट आहे. तेव्हां तूं अशा प्रकारचा सच्छील व सत्पात्र पुरोहित नेमून त्याचा आदरसत्कार करीत आहेसना ? राजा, अग्न्यागारावर जो याजक ठेवावयाचा, तोही असाच सर्वथा वंदनीय असला पाहिजे. त्यास याज्ञिक विधि उत्तम प्रकारें येत असावे. तो मोठा प्रबुद्ध व सुस्वभाव असावा; आणि त्यानें त्या त्या काळीं झालेलें व होणारें होमहवन नेहमीं यजमानास विदित करावें. राजा, अग्निशालेवर जो याजक तूं नेमिला आहेस, तो त्या क्रियेस

पात्र असून होमहवनांबद्दलचें वर्तमान तुला यथाकालीं विदित करितोना? हे कुंतीपुत्रा, राजगृहीं जो ज्योतिर्विद नेमावयाचा, तोही आपल्या कामांत कुशल असला पाहिजे. सामुद्रिक शास्त्रास अनुसरून त्यास अवयवपरीक्षा करितां यावी; धूमकेतु वगैरे दिव्य उत्पातांचें, धरणीकंप वगैरे भौम उत्पातांचें, व वामनेत्रस्फुरण वगैरे दैहिक उत्पातांचें त्यास यथायोग्य ज्ञान असावें; आणि त्या सर्वांवरून भावी अनर्थांचें बरोबर अनुमान करून त्यानें राजास साहाय्य करावें. राजा, तुझ्या पदरीं जो ज्योतिर्विद आहे, तो असाच आहेना?

हे शत्रुदंडना, राजानें अधिकाऱ्यांची योजना करितांना त्यांची पात्रापात्रता नीट मनांत आणावी. कार्यांच्या महत्त्वाप्रमाणें त्यांवर अधिकाऱ्यांची नेमणूक केली पाहिजे. जीं कामें महत्त्वाचीं असतील, त्यांवर तसेच मोठे अधिकारी नेमावे; जीं कामें मध्यम असतील, त्यांवर मध्यम प्रकारचे सेवक नेमावे; आणि जीं कामें अगदीं सामान्य असतील, त्यांवर तसेच सामान्य पुरुष नेमावे. मुख्य प्रधानाचें पद, सैनापत्य, रत्नांच्या खाणी, धनागार, कृषिनिरीक्षण (पीकपहाणीचें काम) इत्यादिक महत्त्वाच्या जागीं वंशपरागत कार्यभार वाहणारे, अत्यंत प्रामाणिक, अतिशय थोर व सदाचारसंपन्न अशाच अधिकाऱ्यांची नेमणूक केली पाहिजे; आणि इतर मध्यम व कनिष्ठ स्थानीं त्या त्या स्थानाच्या योग्यतेप्रमाणें सेवकवर्गाची योजना करावी, हें अत्यंत आवश्यक आहे. तेव्हां, हे युधिष्ठिरा, तुझी अशी पद्धति आहेना?

हे भरतर्षभा, राजानें प्रजांचा प्रतिपाल करितांना त्यांस अपत्यवत् मानिलें पाहिजे. अपत्यास जशी वात्सल्यानें शिक्षा करावयाची, तशी प्रजांस वात्सल्यानेंच शिक्षा केली पाहिजे. प्रजांस उग्र दंड केल्यास त्यांस राजशासन सहन होणार नाहीं, आणि त्या अगदीं त्रस्त व दीन होऊन जातील; ह्यास्तव तसें करणें उचित नाहीं. तेव्हां तुझ्या राज्यांत प्रजांस उग्र दंड होत नाहींना? राजा, प्रजांचा उत्कर्ष होण्यास मोठमोठ्या मसलती प्रधानादिकांच्या अभिप्रायानेंच झाल्या पाहिजेत. ह्यास्तव, तू तसेंच करीत असतोसना? हे भरतकुलभूषणा, राजानें प्रजांपासून कर वगैरे घेणें तो त्यांच्या शक्तीप्रमाणें व बेताबातानेंच घेतला पाहिजे. तो प्रजांस पिळून धनसंचय करील, तर त्याचें तें करणें म्हणजे एक महापातकच होय. जारकर्मी पुरुषाचा स्त्रिया जसा अनादर करितात, तसा, याजकादि परम पूज्य पुरुष त्या प्रजापीडक राजाचा महापातक्याप्रमाणें अनादर करितात. ह्यास्तव सुकीर्तिमान नरदेवानें तें दुष्कृत्य कधींही करूं नये. राजा, तूं आपल्या प्रजांपासून अशा प्रकारें निष्ठुरपणानें कधींही धनसंग्रह करीत नाहींसना? हे उदारबुद्धे, राज्याचा अभ्युदय होण्यास राज्यांतील सेनापति धनसंपन्न, सुकीर्तिमान, संतुष्ट, शूर, धोरणी, धीट, इमानी, कुलीन, राजनिष्ठ व सदोदित दक्ष असा पाहिजे. तेव्हां तुझा सेनापति तसा आहेना? राजा, सैन्यावरचे दुसरे अधिकारी सुद्धां सर्व प्रकारच्या युद्धकलेंत कुशल, समय जाणणारे, निष्कपटी व पराक्रमी असावे; आणि त्यांस राजानें बहुमान द्यावा. तेव्हां तुझे सेनाधिकारी तसे कुशल वगैरे असून तूं त्यांस बहुमान देतोसना? धर्मा, सैन्याचा रोजचा शिधा व महिन्या महिन्याचें वेतन त्यांस वेळच्या वेळीं मिळालें पाहिजे. तें उगीच लांबणीवर टाकूं नये. शिपायांस शिधा व पगार जर वेळच्या वेळीं मिळाला नाहीं, तर त्यांचे फार हाल होऊं लागतात; आणि मग ते धन्यावर संतापून त्याजला महान संकटांत पाडितात. ह्यास्तव, हे शत्रुदमना, तूं सैन्याचा पगार, शिधा वगैरे वेळेवर देतोसना? राजा, प्रधानादिक सर्व राजपुरुष कुलीन व राजनिष्ठ असावे; त्यांनीं राजकार्याकरितां नेहमीं युद्धामध्यें प्राण देण्यास सिद्ध झालें पाहिजे, हें उचित होय. तेव्हां तुझे प्रधान वगैरे

असे यथायोग्य व राजभक्त आहेतना? राजा, स्वदेशाचें संरक्षण करण्याकरितां व परदेश जिंकून घेण्याकरितां जें सैन्य बाळगावयाचें, त्यावरील सत्ता एकाच्याच हातीं उपयोगी नाहीं. त्यावर निरनिराळे शूर अधिकारी असावे. जर ती सत्ता एकाच पुरुषाच्या हातीं असेल, तर कदाचित् तो पुरुष फितूर होऊन भलतेंच वर्तन करूं लागल्यास महान अनर्थ उद्भवेल. राजा धर्मा, तूं ह्या कामीं योग्य दक्षता ठेविली आहेसना?

हे कुंतीपुत्रा, राजसेवकांपैकीं जे कोणी विलक्षण पराक्रम करून राजकार्य साधितात, त्यांस अधिक मान, वेतन वगैरे मिळणें अवश्य आहे. जर ही व्यवस्था नसेल, तर अचाट कृत्य करण्याचा किंवा लोकोत्तर बुद्धि चालविण्याचा ते कधींही प्रयत्न करणार नाहींत. ह्यास्तव, बा धर्मा, तुझ्या राज्यांत जे पुरुष असें विशेष कृत्य करितात, त्यांस तुझ्याकडून विशेष मान वगैरे मिळतोना? राजा, विद्वान व ज्ञानसंपन्न पुरुषांस त्यांच्या गुणानुरूप दानदक्षिणा मिळून त्यांची संभावना झाल्याखेरीज राष्ट्राची विद्या व ज्ञान वाढणार नाहीं; म्हणून तूं आपल्या राज्यांतील विद्वानांची व ज्ञानवानांची योग्य संभावना करितोसना? राजश्रेष्ठा, जे वीर राजकार्याकरितां धारातीर्थी शयन करितात, किंवा अन्य प्रकारीं संकटांत पडतात, त्यांच्या अनाथ स्त्रियांचें पालनपोषण करणें हें राजाचें कर्तव्य कर्म होय; तेव्हां तूं त्याप्रमाणें करीत असतोसना? हे वीरवरा, जेव्हां शत्रु भयाकुल होऊन, आर्त होऊन किंवा पराजित होऊन शरण येतो, तेव्हां त्याचें पुत्रवत् पालन केलें पाहिजे, हा विहिताचार होय. तुझ्या राज्यांत त्याप्रमाणें करण्याची पद्धति आहेना? बा पांडुतनया, राजाला 'सर्व प्रजा आपल्या कुटुंबांतील मनुष्यें होत' असें वाटलें पाहिजे, व प्रजांनीं राजाविषयीं आईबापांप्रमाणें भावना धरिली पाहिजे. राष्ट्रांत असें जर अन्योन्यप्रेम वास करील, तर त्या राष्ट्राचा उत्कर्ष होईल. तेव्हां तुझ्या राज्यांत हें अन्योन्यप्रेम आहेना? हे युधिष्ठिरा, राजानें आपल्या शत्रूवर एकसारखी सूक्ष्म दृष्टि ठेविली पाहिजे. कोणत्या वेळीं शत्रूवर चालून गेल्यास तो आपल्या हस्तगत होईल, ह्याचें त्यानें पूर्ण अवधान राखिलें पाहिजे. स्त्रिया, द्यूत, मृगया, मद्यपान इत्यादि व्यसनांमध्यें शत्रु दंग झाला असल्यास त्याचा विवेक भ्रष्ट झाला असें समजून त्याजवर चालून जाण्यास हरकत नाहीं; मात्र तसें करण्यापूर्वी प्रधानादिकांची सल्ला, धनादिकांची सुस्थिति व सैनिकांचा भरपूर पुरवठा ह्या त्रिविध बलाचें नीट मनन करावें, आणि ती सर्व तयारी आहे असें पाहून शत्रूवर मोठ्या आवेशानें बेलाशक चाल करावी. तेव्हां, धर्मा, तूं ह्याप्रमाणें करितोसना?

हे अरिंदमा, विजयेच्छु पुरुषानें शत्रूवर चालून जाण्यापूर्वी बहुविध गोष्टींकडे लक्ष पुरविलें पाहिजे. त्यानें प्रथम पार्ष्णिमूलाचें नीट परीक्षण करावें; म्हणजे (१) आपणास ज्याशीं युद्ध करावयाचें आहे, त्याचें शौर्य, साहस, दूरदर्शित्व इत्यादि गुणांचें नीट निरीक्षण करावें; व (२) त्या गुणांशीं आपल्या अंगच्या तदनुरूप गुणांची तुलना करून पाहावी; नंतर शत्रूचे (३) मित्र व त्या (४) मित्रांचे मित्र, तसेच (५) आपले मित्र व आपल्या (६) मित्रांचे मित्र (शत्रुपक्षाचे व स्वपक्षाचे साहाय्यकारी) कोण कोण व कितपत विश्वसनीय आहेत, ह्याचा बरोबर अंदाज करावा. पुढें आपल्या मित्रमंडलाच्या समीप आपली (७) पाठ राखण्याकरितां व (८) उत्तेजन देण्याकरितां उभे असणारे वीर कशा प्रकारचे आहेत, आणि त्यांच्याही समीप त्यांस (९) मदत करण्याकरितां व (१०) सावरून धरण्याकरितां कोण कोण सिद्ध आहेत ह्याचें उत्कृष्ट मनन करावें. मग आपणाकडे व आपल्या शत्रूकडे (११) तटस्थ वृत्तीनें दृष्टि ठेवणाऱ्या

पुरुषांचें हृदय ओळखावें, आणि शेवटीं (१८) सर्वांच्या पृष्ठभागीं अगदीं उदासीनपणें वर्तन करणाऱ्या (भ्रमण करणाऱ्या) अधिकाऱ्यांची परिस्थिति न्यहाळून पाहावी. राजा, हें पार्ष्णिमूल अवलोकन केल्यावर, त्यांपैकीं कोणाचा अवमान झालेला आहे कीं काय, कोणाचें वेतन थकलें आहे कीं काय, कोणी स्वार्थपर होऊन धनादिकांस लुब्ध झाला आहे कीं काय, कोणी संतापला आहे कीं काय, कोणी भ्याला आहे कीं काय इत्यादिक पहावें; आणि नंतर ते अधिकारी शत्रुपक्षाकडील असल्यास त्यांस अभीष्ट वस्तु अर्पण करून त्यांमध्यें फितुरी करावी, आणि ते अधिकारी स्वपक्षाकडील असल्यास त्यांचे मनोरथ परिपूर्ण करून असंतोषाचें बीज काढून टाकावें; आणि इतकें सर्व केल्यावर, शत्रुपक्षाच्या ठिकाणीं अपजयाचीं कारणें विद्यमान आहेत व स्वपक्षाच्या ठिकाणीं तीं विद्यमान नाहींत अशी खातरजमा करून घ्यावी; आणि नंतर अग्नि, उदक, व्याधि, दुर्भिक्ष, पटकी इत्यादिकांपासून आपत्ति प्राप्त होण्याचा संभव आहे कीं काय, ह्याविषयीं दैवज्ञांचें अनुमत काढून मग शत्रूवर चाल करावी, हें उचित होय. ह्यास्तव, हें सर्व करण्याचा तुझा परिपाठ आहेना? हे भरतश्रेष्ठा, स्वसेनेचा संतोष व परसेनेची फितुरी हीं विजयाचीं मुख्य साधनें आहेत. तेव्हां तूं युद्धास निघण्यापूर्वी आपल्या सैन्याचा पगार आधीं देतोसना? त्याप्रमाणेंच शत्रुसैन्यांतील अग्रणी पुरुषास वश करून घेण्याकरितां रत्नादिकांच्या गुप्त भेटी पाठवितोसना? हे धर्मा, विजयेच्छु राजानें प्रथम इंद्रियांचें दमन करून कार्याकार्यविचार करावा, आणि नंतर शत्रुपक्षांत अव्यवस्था आहे असें दिसतांच त्यावर चाल करून जावें, हा धर्म होय. तेव्हां तूं असेंच करीत असतोसना? हे शत्रुतापना, युद्ध करून रक्तस्राव करणें हें होतां होईल तों टाळिलें पाहिजे. ह्यास्तव, शत्रुनाशास उद्युक्त झाल्यावर प्रथम साम, दान, दंड, भेद हे चार श्रेष्ठ उपाय योजावे; ह्या उपायांची उत्तम प्रकारें योजना केल्यास प्राणहानि न होतां आपला उद्देश सिद्धीस जातो. तेव्हां तूं हाच क्रम अनुसरतोसना? हे प्रजापालका, कोणत्याही राजानें आणखी देश जिंकण्यास उद्युक्त होण्यापूर्वी आधीं मिळविलेले देश आपल्या ताब्यांत ठाम राहण्याकरितां त्यांचा बंदोबस्त उत्तम ठेवून मग शत्रूवर चाल करून जावें; नाहीं तर हातचें सोडून पळत्याच्या पाठीस लागल्याप्रमाणें होईल. तेव्हां ज्या ज्या वेळीं शत्रूवर तूं चाल करितोस, त्या त्या वेळीं मागें नीट व्यवस्था ठेवितोसना? हे वीरपुंगवा, शत्रूला जिंकणें व जिंकल्यावर त्याचें योग्य प्रकारें रक्षण करणें हेंच वीरांचें खरें खरें शौर्य होय. तेव्हां तूं शत्रूस हस्तगत करून त्याचें नीटपणें रक्षण करितोसना? हे पांडुपुत्रा, सैनिकांच्या अंगीं मुख्यत्वेंकरून चार गुण असले पाहिजेत: (१) ते सत्कुलांत जन्मलेले असावे; (२) त्यांच्या ठिकाणीं उत्तम राजप्रीति असावी; (३) त्यांस 'राजा हा आपला पालनपोषण करणारा होय.' असें वाटत असावें; व (४) त्यानीं रानावनांत फिरून, पडेल ती राजसेवा करण्यास उद्युक्त व्हावें. राजा, सैन्याचीं प्रमुख अंगें आठ होत. तीं रथ, गज, अश्व, वीर, पायदळ, मजूर, हेर व मार्गदर्शक हीं आहेत. सेनापतींनीं अष्टांगपरिपूर्ण व चतुर्विधगुणमंडित असें सैन्य कवाईत शिकवून तयार करावें, आणि मग शत्रूच्या अंगावर चालून जाऊन त्याचा पूर्ण विध्वंस उडवावा, असा हा मुख्य क्रम होय. राजा युधिष्ठिरा, हें सर्व तुझे सेनापति करितातना?

हे शत्रुमर्दना, शत्रूवर स्वारी करण्यापूर्वी आपल्या व शत्रूच्या सैन्याची वगैरे स्थिति जशी नीट पारखिली पाहिजे, तशीच स्वारी करण्याची वेळ कोणत्या प्रकारची आहे, ह्याचाही योग्य विचार केला पाहिजे. शत्रूवर हल्ला करावयाचा तो

शत्रूस प्रतिकूल अशाच काळीं केला पाहिजे. शत्रूच्या देशांत धान्यादिकांचा तुटवडा पडण्याचा सुमार आहे, व प्रजाजन दुष्काळाच्या भीतीनें गांगरून जाऊन आपल्याजवळील धान्य जपून ठेवीत आहेत, अशा समयीं शत्रूवर चाल करून जावें, म्हणजे शत्रूकडून शिपायांस धान्यादिक मिळत नाहींसें होऊन शत्रुसैन्य बेदिल होईल, व आपणांस अनायासें जय मिळेल ! राजा धर्मा, तूं शत्रूवर चाल करितांना ह्या नियमांचें उल्लंघन करीत नाहींसना ? हे नीतिविशारदा, राजानें स्वराष्ट्रांत व परराष्ट्रांत अनेक अधिकारी नेमावे, व त्यांनीं आपआपलीं कामें योग्य प्रकारें करून राजकार्य साधावें, हें योग्य होय. तेव्हां तूं जे अधिकारी स्वदेशांत व परदेशांत नेमिले असशील, ते आपआपलीं कामें निष्कपट बुद्धीनें करून आपसांत एकमेकांना जपत असतातना ?

हे वीरवरा, राजाच्या चरितार्थास लागणारे भक्ष्यभोज्य पदार्थ, वस्त्रपात्रें, कस्तूरी वगैरे सुवासिक वस्तु इत्यादिकांचें संरक्षण राजसेवकांनीं उत्तम प्रकारें करावें; आणि हे पदार्थ परदेशांतून आणितांना त्यांचा मध्यंतरीं अपहार होऊं नये ह्यास्तव राजानें स्वतः दक्षता ठेविली पाहिजे. तेव्हां त्याप्रमाणें सर्व कांहीं तूं करितोसना ? हे पृथानंदना, धनागार, धान्यागार, वाहनें, द्वारें, आयुधें, जमाबंदीचा वसूल इत्यादि कामांवर राजाचें सदैव कल्याण चिंतिणारे राजभक्त अधिकारी असणें इष्ट होय. ह्यास्तव तुझ्या राज्यांत ही सर्व सुव्यवस्था आहेना ? बा धर्मा, राजास कोठून शत्रु उत्पन्न होईल ह्याचा कांहीं नियम नाहीं; ह्याकरितां, आचारी वगैरे राजवाड्यांत राहणाऱ्या लोकांपासून व सेनापति वगैरे बाहेर वास करणाऱ्या अधिकाऱ्यांपासून राजानें प्रथम आपलें रक्षण करण्याची सावधगिरी ठेवावी; आणि नंतर, आपल्या पुत्रादिकांपासून त्या अधिकाऱ्यांस सुरक्षित राखावें; व शेवटीं, ते राजसेवक आपसांत कलह करणार नाहींत अशी खबरदारी घ्यावी. हे कुंतीपुत्रा, हें जर घडलें नाहीं, तर कोठून व केव्हां अरिष्ट उद्भवेल, ह्याचा भरंवसा धरितां येणार नाहीं. असो; राजा, ही सर्व दक्षता तूं ठेविली आहेसना ?

हे युधिष्ठिरा, मद्यपान, द्यूत, क्रीडा, स्त्रिया इत्यादि व्यसनांकडे जो खर्च झाला असेल, त्याचा हिशेब प्रातःकाळीं घेऊं नये. कारण, ती वेळ धर्माचरणाची असल्यामुळें, पुरोहितादिक थोर व वंदनीय जन त्या समयीं राजाकडे येत असतात. तेव्हां हा भलताच व्यवसाय करण्यांत राजा निमग्न असेल तर त्या महात्म्यांस वाईट वाटेल, व ते राजगृह सोडून चालते होतील. तेव्हां, हे भूपते, तूं हा अविचार कधीं करीत नाहींसना ? हे धर्मा, राजाची संपत्ति सदासर्वकाळ थोड्याबहुत प्रमाणानें वाढत असली पाहिजे; आणि हा उद्देश मनांत धरून खर्चाची व्यवस्था राखली पाहिजे. सुभिक्ष (स्वस्ताई) असतांना जमेच्या चौथ्या भागांत राजानें खर्च भागवावा; दरादामाचें मान मध्यम असतांना जमेचा द्वितीयांश खर्चावा; आणि दुर्भिक्ष (दुष्काळ) असतांना जमेच्या तीन हिश्शांत सर्व खर्च चालवावा. राजा, हा नियम पाळून तूं सदैव कोशवृद्धि करीत असतोसना ? हे धर्मनंदना, आप्त, गुरु, वृद्ध, वाणी, कारागीर व पदरचीं माणसें ह्यांचे दुष्काळांत वगैरे हाल होऊं लागले असतां, त्यांस वारंवार पैसारुका, धान्य वगैरे देऊन हातभार लावणें हें राजाचें मुख्य कर्तव्य होय. ह्यास्तव, अशा प्रसंगीं आप्तादिकांस तूं हातभार लावतोसना ? हे भरतश्रेष्ठा, जमाखर्चाचे कामावर जे कामगार नेमिलेले असतात, त्यांनीं दररोज जमा किती आली व खर्च किती झाला हें नेहमीं प्रातःकाळीं राजास कळविलें पाहिजे. त्याप्रमाणें ते तुला रोज कळवितातना ? हे धर्मनंदना, जे अधिकारी आपल्या कामांत वाकबगार असून राजहिताविषयीं नित्य

तत्पर असतात, आणि त्या योगें राजाची प्रीति संपादितात, अशा अधिकाऱ्यांना विनाकारण कामावरून काढून टाकणें हा केवळ दुराचार होय जर त्यांच्यावर, कांहीं अपराध लागू होत असेल, तर त्यांस काढून टाकणें न्यायाचें होईल; परंतु तसें न करितां केवळ लहरीखातर किंवा कांहीं अन्य हेतूनें त्यांस कामावरून दूर केल्यानें सर्वत्र अस्वस्थता व बेदिली उत्पन्न होईल, आणि त्यामुळें राजाला शेवटीं विपत्ति भोगाव्या लागतील. ह्यास्तव, बा धर्मा, अशा प्रकारचें अयोग्य वर्तन तुजकडून कधीं घडत नाहींना? हे भारता, अधिकारी लोकांची नेमणूक करितांना-ही फार दूरवर विचार केला पाहिजे. कामाचा मगदूर पाहून त्याप्रमाणें त्यावर योग्य सेवकाची योजना करावी. उत्तम, मध्यम व अधम असे तीन प्रकारचे सेवक असतात; ह्यास्तव, कामांची ही उत्तम, मध्यम व कनिष्ठ अशी तीन प्रकारची वर्गवारी काढून त्यांवर त्या त्या कामांत उपयुक्त असे पुरुष नेमावे. राजा, तूं हें सर्व करीत असतोसना? राजा, कित्येक राजसेवक नेमतांना जरी योग्य म्हणून नेमिले असले, तरी केव्हां केव्हां त्यांमध्यें पुढें कित्येक दुर्गुण दृष्टिगोचर होतात. अशा प्रसंगीं, जे राजसेवक दुर्गुणी आहेत असें आढळून येईल, त्यांस कामावरून काढून टाकिलें पाहिजे. राजा, तुझ्या पदरीं जे सेवक आहेत, त्यांत कोणी लोभी, चोर, दावे-दार किंवा मूर्ख असे नाहींतना? युधिष्ठिरा, प्रजांचा संतोष व कृषीवलांचा (शेतकऱ्यांचा) उत्साह हीं दोन ऐश्वर्यवृद्धीचीं निश्चित कारणें होत. राष्ट्रांत चोरांचा व ठकांचा सुळसुळाट झाला, नव्या तरण्या लोकांचें अथवा स्त्रियांचें प्राबल्य होऊन प्रौढ व बहुश्रुत लोकांचें वर्चस्व नष्ट झालें, किंवा राजाच मदांध होऊन प्रजांस लुटूं लागला, म्हणजे प्रजांचा व कृषीवलांचा पूर्ण नाश झाला म्हणून समजावें. ह्याकरितां, हे सुनीतिमंता, अशी अस्वस्थता तुझ्या राज्यांत नाहींना? हे नरश्रेष्ठा, राष्ट्रांतील कृषि (शेतकी) निवळ पर्जन्य-वृष्टीवरच अवलंबून राहूं नये; कृषिकर्मासाठीं मो-ठमोठाले तलाव कांहीं विशिष्ट अंतरावर नित्य उदकानें परिपूर्ण राहतील अशी व्यवस्था असावी. तेव्हां तुझ्या राज्यांत ही व्यवस्था आहेना? युधिष्ठिरा, कृषीचा उत्कर्ष व्हावा ह्याकरितां कृषी-वलांची सुस्थिति राखण्याकडे राजानें लक्ष पुरविलें पाहिजे. त्यांपाशीं पोटगी व बींभरण भर-पूर आहे कीं नाहीं, ह्याची राजानें चौकशी करावी; आणि सदयतेनें दरमहा दरशेंकडा एकाहून अ-धिक व्याज न घेतां त्यांस कर्ज द्यावें. बा धर्मा, तूं हीच पद्धति ठेविली आहेसना? हे भरतकुल-भूषणा, लोकांचें सुखसमाधान वाढविणें हें राजाचें प्रधान कर्तव्य आहे. राष्ट्रांत सुशील व थोर लोक जे व्यवसाय करीत असतील, ते त्यांचे व्यवसाय अव्याहत व उत्तम प्रकारें चालले तर लोकांस उत्साह येऊन त्यांचें सुखसमाधान वाढतें. ह्यास्तव तुझ्या राज्यांत कृषि, वाणिज्य (व्यापार), पशुपालन व व्याजबट्टा हे लोकांचे धंदे नीटपणें चालत आहेतना?

हे युधिष्ठिरा, प्रत्येक ग्रामांत राजानें नेमिलेले पांच पांच अधिकारी कायमचे असावे. ते प्र-शास्ता[1], समाहर्ता[2], संविधाता[3], लेखक[4] व साक्षीदार हे होत. हे पांचही अधिकारी शूर, शहाणे व एक-मतानें काम करणारे असावे! राजा धर्मा, तुझ्या देशांतील ग्रामांत ही सर्व व्यवस्था नीटपणें चालली आहेना? राजा, राष्ट्रामध्यें प्रांत (सीमे-वरील खेडींपाडीं), ग्राम (गांव), नगरें (शहरें) व पुर (राजधानी) ह्या ज्या चतुर्विध लोकवस्तीच्या जागा, त्या सर्व पूर्णपणें राजाच्या स्वाधीन अस-ल्या पाहिजेत. प्रांतांतून (खेड्यांपाड्यांतून)

१ जमाबंदीचा ठराव करणारा कामगार. २ वसुली-कामगार. ३ कुळांची समजूत घालणारा कामगार. ४ कारकून.

राजनियुक्त करांचा जो वसूल येईल, तो प्रांताधिपतीनें ग्रामाधिपतीच्या हवालीं करावा; ग्रामांतून जो कर वसूल होईल, तो ग्रामाधिपतीनें नगराधिपतीकडे पोहोंचवावा; नगरांतून जो कर जमा होईल, तो नगराधिपतीनें पुराधिपतीकडे (देशाधिपतीकडे) आणून द्यावा; आणि शेवटीं त्या देशाधिपतीनें सर्व वसूल प्रत्यक्ष राजास अर्पावा. राजा, नगरादिकांचें संरक्षण करण्यासाठीं गांवांची व प्रांतांची व्यवस्था उत्तम राखिली पाहिजे. गांवांत अनेक शूर पुरुष असून त्यांस क्रमाक्रमानें नगरांची योग्यता येऊं लागावी; आणि खेडेगांवांची भरभराट होत होत त्यांस गांवांचें स्वरूप प्राप्त व्हावें. राजा, देशांतील लोकांमध्यें नित्य अशा प्रकारें जोम वाढत जाऊन राजकीय कोशागारांत जर भर पडत गेली नाहीं, तर राजाचें वैभव, सत्ता वगैरे वाढणार नाहीं; आणि पुढेंमागें त्यांस ऱ्हास प्राप्त होईल. ह्यास्तव, तुझ्या राज्यांतील ग्रामादिकांची व्यवस्था वगैरे उत्तम आहेना?

हे कुंतीतनया, राष्ट्रामध्यें बंदोबस्ताच्या नगरास व सामान्य नगरांस चोरटे लोक उपद्रव देत असल्यास त्यांचा शोध लावून नाश करण्याकरितां सैन्याच्या टोळ्या फिरत्या ठेविल्या पाहिजेत. प्रजांचें स्वास्थ्य राखिल्याशिवाय देशाचें कधींही कल्याण व्हावयाचें नाहीं. ह्यासाठीं तुझ्या देशांत ही तजवीज आहेना? हे भरतर्षभा, अबलाजनांचें संरक्षण करून त्यांवर दुःखप्रसंग आल्यास त्यांचें सांत्वन करणें हें राजाचें कर्तव्य आहे; तेव्हां ही गोष्ट तूं करीत असतोसना? बा धर्मा, स्त्रियांच्या ठिकाणीं शारीर बलाप्रमाणें मानसिक बलही कमीच असतें. ह्यास्तव त्यांच्यावर भरवंसा ठेवणें किंवा त्यांस एखादी गुप्त मसलत सांगणें हें सर्वथा भयप्रद आहे. तेव्हां हें सर्व मनांत आणून तूं स्त्रीजनांवर विश्वास वगैरे ठेवून त्यांस गुह्य गोष्ट सांगत नाहीसना?

हे शत्रुनाशका, कांहीं अहितकारक प्रसंग ओढवणार असें कळल्याबरोबर राजानें त्याच्या प्रतिकाराचा विचार एकदम आरंभिला पाहिजे. अशा समयीं अंतःपुरांत विलास भोगीत पडून राहून जर तो त्या प्रसंगाकडे दुर्लक्ष करील, तर त्याचा व त्याच्या देशाचा नाश झाला म्हणून समजावें. तेव्हां तूं या सर्व विचाराकडे अवधान ठेविलें आहेसना? हे विशालकीर्ते, रात्रीस दुसऱ्या व तिसऱ्या प्रहरीं निद्रा घेऊन नंतर चौथ्या प्रहरीं (ब्राह्मकालीं) उठून धर्म व अर्थ ह्यांचें चिंतन करावें, हें विहित होय. तेव्हां तूं तसें करीत असतोसना? हे पांडवा, योग्य वेळीं उठून व वस्त्रभूषणें धारण करून समयज्ञ मंत्र्यांशीं सल्लामसलत करावी; व त्यांजबरोबर जे कोणी भेटीसाठीं वगैरे आले असतील, त्यांचें म्हणणें ऐकून घेऊन त्याचा विचार करावा, हें राजाचें कर्तव्य आहे. ह्यास्तव ह्याप्रमाणें करण्याचा तूं नित्य प्रघात ठेविला आहेसना? हे अरिंदमा, राजानें आपल्या संरक्षणार्थ असमंताद्भागीं निरंतर सशस्त्र शूर सेवक ठेवावे. त्यांचा पोषाख लाल रंगाचा असावा, व त्यांनीं अलंकार धारण करून प्रभुसेवेंत तत्पर राहावें. राजा युधिष्ठिरा, तुझ्या सन्निध अशा प्रकारचे दक्ष सैनिक असतातना?

हे पांडुनंदना, दुर्जनास यमाप्रमाणें उग्र दंड करणें आणि सज्जनांस अतिशय मान देणें, हें उचित आहे. ह्याकरितां, राज्यकारभार पाहात असतां प्रिय अथवा अप्रिय गोष्टी कोणत्या ह्याचें उत्तम मनन करून, त्या करणाऱ्यांना सन्मान देणें किंवा शासन करणें अवश्य होय. तेव्हां तूं त्याप्रमाणें करीत असतोसना? हे पृथापुत्रा, राजानें आपल्या शरिरास किंवा मनास विकृति झाली असतां तिचें निवारण करण्याचा नेहमीं यत्न करावा. त्यानें शारीर पीडा औषधोपचारांनीं व पथ्यसेवनानें दूर करावी, आणि मानसिक पीडा वृद्धजनांच्या बोधामृतानें घालवावी. बा धर्मा, ही गोष्ट करण्याचा तुझा परिपाठ आहेना? राजा,

वैद्य हे अष्टांगचिकित्सेमध्यें निपुण असले पाहिजेत: (१) कोणत्या कारणापासून कोणते रोग उद्भवतात, (२) त्या रोगांचें बीज रुजलें म्हणजे कोणतीं चिन्हें दृग्गोचर होतात, (३) पुढें त्या रोगांना कोणतें स्वरूप प्राप्त होतें, (४) कोणत्या उपायांनीं ते विकार वाढतात व कमी होतात, (५) त्या विकारांवर कोणते उपचार करावे, (६) कोणतीं औषधें गुणकारी होतील, (७) रोग्याचा स्वभाव वगैरे कसा आहे, आणि (८) रोग्याच्या तैनातीस असणारे लोक व अन्य परिस्थिति अनुकूल आहे कीं नाहीं, ह्या सर्व गोष्टींचें यथार्थ परीक्षण वैद्यांस करितां यावें. शिवाय, त्यांस रोग्याविषयीं कळकळ व हरतऱ्हेनें रोग निवारण करण्याची उत्कंठा असली पाहिजे. बा धर्मा, तुझ्या पदरीं जे वैद्य आहेत, ते ह्या सर्व गोष्टींत निपुण आहेतना ? ते निरंतर तुझ्या आरोग्यास जपतातना ?

हे समदृष्टे, आपल्यापुढें जे वादीप्रतिवादी येतात, त्यांचें म्हणणें शांत चित्तानें ऐकून घेऊन यथायोग्य निर्णय करणें हें राजाचें प्रधान कर्तव्य होय. लोभ, मोह, अभिमान इत्यादिकांस वश होऊन राजा जर त्या कर्तव्याकडे दुर्लक्ष करूं लागेल, तर तें त्याचें दुर्वर्तनच समजावें. ह्यास्तव तूं अशा कामीं कधीं हयगय करीत नाहींसना ? हे कुंतीतनया, राजा स्वकर्तव्यापासून भ्रष्ट झाल्यास घोर अनर्थ घडतात. ‘ माझी सत्ता अनियंत्रित आहे, ’ असें जर राजाला वाटलें, तर त्याचें सर्व वैभव हरपलेंच म्हणून समजावें. म्हणून प्रत्येक लहान मोठें कार्य करितांना त्यानें आपली विवेकबुद्धि चालविली पाहिजे. तो एखाद्या मनुष्याच्या सांगण्यावरून किंवा केवळ लहरीखातर, अथवा त्यांत कांहीं स्वार्थ साधतो आहे म्हणून किंवा अधिकाराच्या जोरावर जर आश्रित जनांची वृत्ति बंद करील, तर महत्पातक घडेल, हें राजांनीं नित्य ध्यानांत ठेवावें. बा पांडुतनया, तूं हें पातक कधीं करीत नाहींसना ?

हे शत्रुमर्दना, राष्ट्रांतील लोक सदैव राजनिष्ठ राहतील अशी व्यवस्था राजानें करावी. शत्रूपासून लांच वगैरे घेऊन राजाशीं द्रोह करण्यास उद्युक्त असलेल्या लोकांचे समुदाय म्हणजे राजाच्या अभ्युदयमार्गांतील दुःसह कंटकच होत. तेव्हां असे कृतघ्न पुरुष तुझ्या राज्यांत तुझा द्रोह करीत नाहींतना ? राजा, ज्या शत्रूस पुनःपुनः स्वाऱ्या करून अगदीं जर्जर करून टाकिलें असेल, तो शत्रु देखील संधि सांपडतांच पुनः वर मान उचलण्यास पहात असतो; ह्यास्तव त्या दीन झालेल्या शत्रूवर सुद्धां नीट नजर ठेविली पाहिजे. त्या शत्रूस कोणी विपरीत सल्ला देत आहे काय, त्यास सैन्याची वगैरे कोणी मदत करीत आहे काय, अथवा सल्लामसलत व सैन्य वगैरे ह्या दोहोंच्या योगें त्यास कोणी पाठबळ देत आहे काय, ह्याचा राजानें नेहमीं बारकाईनें तपास ठेविला पाहिजे. बा युधिष्ठिरा, तुझ्या राज्यांत असा कोणी दुर्बल शत्रु बलिष्ठ होऊं पहात नाहींना ? राजा, मुख्यत्वेंकरून दान व मान ह्यांच्या योगें वश करून घेतलेले मांडलिक राजे सार्वभौम राजाविषयीं सदा अनुरक्त असले, म्हणजे साम्राज्यास केव्हांही अपाय होत नाहीं. तेव्हां तुझ्या राज्यांतील मांडलिक राजे तुझ्या ठिकाणीं अनुरक्त असून तुजसाठीं प्राण देण्यास तयार आहेतना ?

हे धर्मनिष्ठा, सर्व विद्यांत प्रवीण असलेल्या ब्राह्मणांचे दयादाक्षिण्यादि गुण पाहून त्यांचें पूजन केलें असतां देहाची कृतार्थता करितां येते, व त्यांस दक्षिणा वगैरे दिल्या असतां स्वर्गपद व सायुज्यही निश्चयानें जोडितां येतें; ह्यास्तव, सर्वविद्यापारंगत ब्राह्मणांची पूजा करून त्यांस तूं नित्य दक्षिणा देत असतोसना ? युधिष्ठिरा, वेदत्रयींत सांगितलेला सनातन धर्म

अत्यंत श्रेष्ठ होय; पूर्वजांनीं जसें ह्याच धर्माचें आचरण केलें, तसेंच प्रस्तुतच्या लोकांनींही ह्याचेंच आचरण करणें श्रेयस्कर आहे; तेव्हां तूं पूर्वजांप्रमाणें वैदिक कर्मे करण्याचा प्रयत्न करून त्यांचा विस्तार करीत असतोसना? हे पृथापुत्रा, षड्रस अन्नें समर्पण करून ब्राह्मणांचें संतर्पण करणें हें राजास अत्यंत श्रेयस्कर आहे. ह्यास्तव तुझ्या भवनांत तूं आपल्या समक्ष सत्पात्र ब्राह्मणांस नानाविध मधुर पदार्थ अर्पण करून दक्षिणा वगैरे देतोसना ? राजा, भगवच्चरणारविंदीं मन लावून निष्कामबुद्धीनें वाजपेय, पुंडरीक इत्यादिक क्षत्रियांनीं करण्यास योग्य असे सर्व यज्ञ करणें हे राजाचें प्रधान कर्तव्य आहे. ह्याकरितां तूं ते सर्व यज्ञ करीत असतोसना ? हे भरतश्रेष्ठा, वडील मंडळी, गुरुजन, पोक्त लोक, तपस्वी, देवता, पार बांधिलेले वड, पिंपळ वगैरे कल्याणकारक वृक्ष, व ब्राह्मण ह्यांना नमस्कार करणें हें अत्यंत मंगलप्रद आहे. तेव्हां हें तूं करितोसना ? हे निष्पापा, दुर्बलांना शोक व समर्थांना क्रोध उत्पन्न होईल असें वर्तन राजाच्या हातून घडूं नये; तेव्हां तुझ्या हातून तसें वर्तन घडत नाहींना ? त्याप्रमाणेंच, पुरोहितादि महात्म्यांनीं राजाच्या समीप राहून त्यास स्वस्तिवाचन केलें असतां राजाचें कल्याण होतें; तेव्हां तुझ्या समीप पुरोहितादिक तें करितातना ?

हे पुण्यवंता, तुझी ही आयुष्यवर्धक, यशस्कर, धर्मकामार्थसंपादक बुद्धि व वृत्ति सदासर्वकाळ अशीच असतेना ? युधिष्ठिरा, ही बुद्धि धारण करणाऱ्या राजाचें राज्य कधींही अवनतीस जाणार नाहीं. तो नरपति सर्व भूमंडळ जिंकून घेईल व अत्यंत सुखी होईल.

हे निष्पापा, सत्कुलांत जन्मलेल्या, स्वभावानें उत्तम, व निर्मल आचरणाच्या अशा एखाद्या साधुपुरुषावर चोरी वगैरे निंद्य कृत्याचा विनाकारण आरोप आला असतां, त्यास व्यर्थ शासन होणें हें अनुचित होय. अशा प्रकारच्या सदाचरणी मनुष्याची धनदौलत हरण करून घेऊन त्यास मरणाची शिक्षा देणारे लोभी अमात्य हे खरोखरी मूर्खच समजले पाहिजेत. तेव्हां हा अनाचार तुझ्या राज्यांत घडत नाहींना ? त्याप्रमाणेंच, हे नरश्रेष्ठा, एखादा दुष्ट पुरुष चोरी वगैरे निंद्य कृत्य करीत असतांना पाळत राखणाऱ्या लोकांनीं अगदीं मुद्देमालासुद्धां धरिला, तर अमात्यादिकांनीं द्रव्यादिकांच्या लोभानें त्यास सोडून देणें हेंही अयोग्यच आहे. तेव्हां तुझ्या राज्यांत असली गोष्ट घडूं नये म्हणून तूं दक्षता ठेविली आहेसना ? हे धर्मा, राष्ट्रांत कित्येक कार्यसाधु नीच लोक असतात, ते अमात्यादिक अधिकाऱ्यांना भलभलतेंच सांगून एखाद्याविषयीं विनाकारण भलताच ग्रह उत्पन्न करीत असतात. पुष्कळ श्रीमंत व गरीब लोक उद्योगधंदा करून धनादिक मिळवितात, आणि मग राष्ट्रांतील उपद्व्यापी लोकांस तें पाहवत नाहींसें होऊन ते अमात्यादिकांस 'तें धन वगैरे अनीतीनें किंवा चोरीनें वगैरे मिळविलेलें आहे,' असें सांगून त्यांस तें द्रव्य हरण करण्यास उद्युक्त करितात. राजा, राष्ट्रांत अशी अव्यवस्था माजेल, तर राष्ट्राचा कधींही उदय होणार नाहीं; म्हणून राजानें ह्या गोष्टीचा पूर्ण प्रतिकार केला पाहिजे. बा धर्मा, तुझ्या राज्यांत हा अन्याय होत नाहींना ? राजा युधिष्ठिरा, (१) नास्तिकपणा, (२) असत्य, (३) क्रोध, (४) प्रमाद, (गैरसावधपणा), (५) दीर्घसूत्रता (चेंगटपणा), (६) ज्ञानी लोकांची भेट न घेणें, (७) आळस, (८) इंद्रियासक्ति, (९) केवळ धनलोभ, (१०) दुष्टांशीं मसलत, (११) सुनिश्चित कर्मांविषयीं उदासीनता, (१२) रहस्यस्फोट, (१३) देवादिकांचे मंगलोत्सव न करणें, व (१४) दशदिशांकडील शत्रूंना दाबांत ठेवण्याविषयीं दक्षता न राखणें हे राजाच्या ठिकाणीं महान दोष होत. ह्या दोषांच्या योगानें

पृथ्वीवर सुस्थिर झालेले राजेही बहुधा विनाश पावल्याशिवाय राहात नाहींत. राजा, ह्या चौदा दोषांपासून तूं अलिप्त आहेसना ? असो. हे पृथा-नंदना, तुझे वेद, धन, पत्नी व श्रवण हीं सर्व सफल झालींना ?

युधिष्ठिर विचारतोः—हे देवर्षे, वेद, धन, पत्नी व श्रवण हीं सफल होतात, तीं कशीं बरें ?

नारद सांगतातः—हे युधिष्ठिरा, अग्निहोत्र हें वेदांचें फळ होय; दान करणें व उपभोग घेणें हें धनाचें फळ होय; रतिसुख व पुत्रप्राप्ति हें पत्नीचें फळ होय; आणि सौजन्य हें श्रवणाचें फळ होय.

वैशंपायन सांगतातः—राजा जनमेजया, ह्याप्रमाणें भगवान नारदांनीं धर्मराजास त्या मय-सभेंत राजनीतीचा उपदेश केल्यानंतर आणखी त्यास असें विचारिलें.

नारद म्हणालेः—राजा युधिष्ठिरा, व्यापार करून नफा मिळविण्याच्या उद्देशानें दूरदूरच्या देशांहून जे व्यापारी येतात, त्यांपासून वसूली-कामगार ठरल्याप्रमाणें करांचा वसूल करितातना? राजा, नगरामध्यें किंवा राष्ट्रामध्यें सन्माननीय झालेले तुझे कामगार, व्यापारी लोकांच्या थापांस भुलून किंवा अन्य रीतींनीं फसून मालाची खरेदी करीत नाहींतना ? राजा, ज्या ज्ञानी पुरुषांनीं देहाचें सार्थक्य कशांत आहे हें जाणून धर्म व अर्थ कसे प्राप्त होतात ह्याचें पूर्ण ज्ञान मिळविलें आहे, अशा ज्ञानवृद्ध लोकांचीं धर्मार्थप्रतिपादक वचनें तूं नित्य श्रवण करितोसना? राजा, कृषिकर्मापासून उत्पन्न होणारीं ओलीं व कोरडीं धान्यें, आणि धेनूंपासून प्राप्त होणारें दूध व तूप ह्यांपैकीं उत्तम उत्तम पदार्थ (धान्य व तूप) हीं तूं ब्राह्मणांस धर्म करीत असतोसना ? धर्मा, कारागीर लोकांस नित्य द्रव्य व उपकरणें पुरवावयाचीं, तीं चार चार महिन्यांना नीटपणें पुरतील अशीं वेळच्या वेळीं देतोसना? राजा, एखाद्यानें कांहीं विशेष कर्तबगारी दाखविली, तर तूं त्याचा आदरपूर्वक गौरव करून थोर लोकांत त्याची मानमान्यता करितोसना ? राजा, हत्ती, घोडे, रथ इत्यादिकांसंबंधानें जीं शास्त्रें आहेत, त्यांतील अत्यंत उपयोगी व ठळक ठळक असे जे नियम आहेत, ते सर्व तूं शिकत असतोसना ? हे भर-तर्षभा, नगरादिकांचें रक्षण करण्याकरितां धनुर्वेदांत जें युद्धशास्त्र व यंत्रशास्त्र (शस्त्रास्त्रज्ञान) निरूपण केलें आहे, त्यांतील त्रोटक नियमांचा अभ्यास तुझ्या गृहीं उत्तम प्रकारें चालू आहेना? राजा धर्मा, सर्व प्रकारचीं अस्त्रें, जारणमारण विद्या, व शत्रूंचा विध्वंस करणारे सर्व विषप्रयोग तुला विदित आहेतना ? राजा, अग्नीपासून, सर्पांपासून, रोगांपासून व राक्षसांपासून तूं आपल्या सर्व राष्ट्राचें संरक्षण करण्यास समर्थ आहेसना ? हे धर्मज्ञा, आंधळे, मुके, पांगळे, व्यंग, अनाथ व सर्वसंगपरित्याग केलेले संन्यासी अशा जनांचें तूं पित्याप्रमाणें पालन करितोसना ? आणि, राजा, निद्रा, आळस, भय, क्रोध, मार्दव व चेंगटपणा ह्या सहा अनर्थकारक गोष्टी तूं पाठीमागें टाकून दिल्या आहेसना ?

वैशंपायन सांगतातः—राजा जनमेजया, नंतर, भगवान विप्रवर्य नारदांचें भाषण श्रवण करून, कौरवश्रेष्ठ महात्म्या धर्मराजानें नारद मुनींच्या चरणांवर लोटांगण घातलें; आणि मोठ्या संतुष्ट चित्तानें तो त्या देवर्षीस म्हणाला, "हे ऋषिपुंगवा, आपल्या आज्ञेप्रमाणें मी सर्वथैव वागेन. आपण जो मला बोध केला, त्या योगें माझें ज्ञान अतिशय वृद्धिंगत झालें."

राजा जनमेजया, पुढें त्या धर्मराजानें नारद मुनींना म्हटल्याप्रमाणें वागणूक ठेविली, आणि समुद्रवलयांकित पृथ्वीचें राज्य मिळविलें. असो. धर्मराजाचें भाषण ऐकून नारद मुनि त्यास म्हणाले, "राजा धर्मा, मीं सांगितलेल्या ह्या नियमांप्रमाणें जो राजा चातुर्वर्ण्याचें रक्षण करितो, तो ह्या

लोकीं सर्व सुखोपभोग मिळवून शेवटीं इंद्रलोकास गमन करितो."

अध्याय सहावा.

—:०:—

देवसभांचें वर्णन ऐकण्याविषयीं धर्मराजाची इच्छा.

वैशंपायन सांगतात:—हे जनमेजय राजा, महर्षि नारदांचें भाषण श्रवण करून धर्मराज युधिष्ठिरानें त्यांचा फार गौरव केला, आणि त्यांची आज्ञा घेऊन पुनः त्यांस म्हटलें, "भगवन्, तुम्हीं जे राजधर्म निरूपण केले, ते अगदीं सुयुक्तिक व योग्य आहेत; आणि मी आपल्या बुद्धीप्रमाणें व शक्तीप्रमाणें ते पाळीत आहें. मुनिवर्या, राजांनीं ज्या ज्या गोष्टी कराव्या म्हणून तुम्हीं सांगितलें, त्या त्या गोष्टींचे हेतु मनांत आणून, पूर्वीच्या राजांनीं त्या अगदीं बरोबर रीतीनें केल्या, व त्यांच्या योगें प्राप्त होणारीं उत्कृष्ट फळें मिळविलीं, ह्यांत संदेह नाहीं. पण आम्हांला मात्र तसें करितां येईल कीं नाहीं ह्याचा वानवा आहे. महाराज, आम्ही केवळ त्या महात्म्यांच्या उत्तम मार्गानें जाण्याची इच्छा करीत आहों. कारण, त्या जितेंद्रिय नरपतींप्रमाणें आचरण करण्याचें सामर्थ्य आमच्या ठिकाणीं नाहीं."

वैशंपायन सांगतात:—हे जनमेजया, त्या महाधार्मिक युधिष्ठिरानें ह्याप्रमाणें भाषण करून भगवान नारदांनीं सांगितलेल्या नीतितत्त्वांचा धन्यवाद गाइला; आणि क्षणभर विचार केला, तों त्याचे मनांत आलें कीं, 'सर्व त्रैलोक्यांत संचार करणारे मुनिश्रेष्ठ नारद आज येथें प्राप्त झाले आहेत, हें मोठें उत्तम होय.' नंतर, ते महर्षि स्वस्थपणें अधिष्ठित आहेत असें पाहून, त्या महातेजस्वी धर्मराजानें सर्व भूमिपालांसमक्ष त्या सभेंत नारद मुनींना प्रश्न केला.

युधिष्ठिर म्हणाला:—हे महर्षे, ब्रह्मदेवानें मनुष्यसृष्टीच्यापूर्वीं निर्माण केलेले अनेक व नानाविध लोक अवलोकन करण्याकरितां तुम्ही मनोवेगानें सदासर्वकाळ ह्या ब्रह्मांडामध्यें फिरत असतां. महाराज, तुम्हीं सर्व ब्रह्मांड पूर्णपणें पाहिलें आहे; तेव्हां या सभेसारखी किंवा ह्या सभेपेक्षां वरचढ अशी एखादी सभा आजपर्यंत तुमच्या पाहण्यांत आली आहे काय? अथवा पुढें पाहण्यांत येण्याचा संभव आहे काय? महाराज, हें मला सांगावें.

वैशंपायन सांगतात:—हे पारिक्षिता, धर्मराजाचा तो प्रश्न श्रवण करून नारद मुनींनीं हसत हसत मधुर वाणीनें उत्तर दिलें. नारद म्हणाले:—बा धर्मा, ह्या तुझ्या सभेसारखी रत्नखचित सभा मनुष्यलोकांत मीं कोठें पाहिली नाहीं, व ऐकिलीही नाहीं. हे भारता, अशी दिव्य सभा मनुष्यलोकीं होणें केव्हांही शक्य नाहीं. राजा धर्मा, अशा प्रकारच्या लोकोत्तर सभा देवलोकीं आहेत. पितृराज यमाची सभा, बुद्धिमान वरुणाची सभा, देवश्रेष्ठ इंद्राची सभा, कैलासाधिपति कुबेराची सभा व ब्रह्मदेवाची ती विश्वरूपिणी सभा ह्या सर्व अगदीं अपूर्व आहेत. राजा, त्या ब्रह्मसभेचें काय वर्णन करावें! त्या सभेंत स्थित असलेल्या प्राण्यांस अविद्यादिक क्लेशांपासून मुळींच पीडा होत नाहीं; तेथें देवलोकीं, मनुष्यलोकीं व इतर लोकीं सुलभ असणाऱ्या कोणत्याही विषयांची प्राप्ति अनायासें होते; आणि मनांत जें रूप आणावें, तें रूप ती सभा तात्काळ धारण करिते. राजा, त्या ब्रह्मसभेंत देव, पितृगण, साध्य, मनोनिग्रही यजमान, व वेदाध्ययनांत निमग्न असणारे प्रख्यात ऋषि अधिष्ठित आहेत; असो. राजा, जर तुझ्या मनांत त्या देवसभांचें वर्णन ऐकावें अशी इच्छा असेल, तर मीं त्या सभांचें वर्णन तुला सांगण्यास सिद्ध आहें.

वैशंपायन सांगतात:—राजा पारिक्षिता, भगवान नारदांचें भाषण श्रवण करून धर्ममूर्ति युधिष्ठिरानें आपल्या श्रोत्यांसमवेत व तेथें बसलेल्या त्या

महान महान सर्व द्विजवर्यांसमवेत, हात जोडून नारदांस म्हटलें:—हे ऋषिवर्या, त्या सर्व सभांचें वर्णन करावें; आम्ही सर्व तें श्रवण करण्यास उत्सुक आहों. हे ब्रह्मन्, त्या सभा कोणत्या पदार्थांच्या केलेल्या आहेत; त्यांची लांबी, रुंदी किती किती आहे; तसेंच, त्यांमध्यें अधिपतींच्या सभोंवतीं कोण कोण पुरुष स्थित आहेत: म्हणजे ब्रह्मसभेंत ब्रह्मदेवाच्या भोंवताली कोण कोण बसले आहेत, इंद्रसभेंत देवराज इंद्राच्या भोंवताली कोण कोण बसले आहेत, यमसभेंत यमाच्या भोंवतालीं कोण कोण बसले आहेत, वरुणसभेंत वरुणाच्या भोंवताली कोण कोण बसले आहेत, आणि कुबेरसभेंत कुबेराच्या भोंवतालीं कोण कोण बसले आहेत, हें सर्व तुम्हांपासून आम्हीं सर्वांनीं सविस्तर ऐकावें, अशी आम्हांस फार फार इच्छा झाली आहे, तर ती तुम्हीं पूर्ण करावी.

वैशंपायन सांगतात:—राजा जनमेजया, ह्याप्रमाणें धर्मराजाचें भाषण श्रवण करून नारद ऋषींनीं त्यास म्हटलें:—हे धर्मराजा, मी आतां त्या दिव्य सभांचें यथाक्रम वर्णन करितों; तर तुम्हीं सर्वांनीं तें ऐकावें.

अध्याय सातवा.

—:०:—

इंद्रसभेचें वर्णन.

नारद म्हणाले:—हे युधिष्ठिरा, आधीं मी त्या इंद्रसभेचें वर्णन करितों. इंद्राची ती दिव्य सभा विश्वकर्म्यानें निर्माण केली आहे. तिचा वर्ण सूर्यप्रभेप्रमाणें उज्ज्वल व कांतिमान आहे. ती स्वत: इंद्रानें जिंकून घेतली आहे. तिची लांबी दीडशें योजनें व रुंदी शंभर योजनें आहे. ती आकाशमार्गानें संचार करणारी असून सभाधिपतीच्या इच्छेनुरूप वाटेल तिकडे जाते. तिची उंची पांच योजनें आहे. तिच्यामध्यें अधिष्ठित असणाऱ्या प्राण्यांस जरा, शोक किंवा श्रम हीं मुळींच प्राप्त होत नाहींत. ते प्राणी भयापासून अगदीं मुक्त असतात. त्यांचें त्या मंगलदायक सभेमुळें नेहमीं कल्याण होतें. तीमध्यें उत्तम उत्तम मंदिरें व रमणीय आसनें केलेलीं आहेत; आणि दिव्य वृक्षांच्या योगानें तिला अवर्णनीय शोभा प्राप्त झाली आहे.

हे पृथानंदना युधिष्ठिरा, त्या इंद्रसभेंत देवाधिदेव इंद्र शचीसहवर्तमान सिंहासनावर अधिष्ठित असून, तो आपल्या संपत्तीनें व ऐश्वर्यानें फार शोभत आहे. धर्मा, त्या देवेंद्राचें शरीर मोठें लोकोत्तर आहे. त्याच्या मस्तकावर मुकुट आहे. त्याचीं बाहुभूषणें आरक्त वर्णाचीं आहेत. त्याचीं वस्त्रें निर्मल आहेत. त्यानें चित्रविचित्र पुष्पमाला धारण केल्या आहेत; आणि त्याच्या ठिकाणीं विनय, यश व कांति हीं परिपूर्ण आहेत.

धर्मराजा, त्या दिव्य सभेंत शतक्रतु महात्म्या देवेंद्राच्या भोंवतालीं गृहस्थाश्रमी सर्व मरुत्, सिद्ध, देवर्षि, साध्य, देवगण आणि तेजस्वी व सुवर्णमाला धारण करणारे मेघसमूह आपापल्या अनुचरांसह मनोहर रूपें व उज्ज्वल अलंकार धारण करून अधिष्ठित आहेत. राजा, देवेंद्राच्या आसमंतात् जे महान महान देवर्षि बसलेले आहेत, ते अगदीं निर्विकार व निष्पाप असून, त्यांचें तेज प्रदीप्त हुताशनाप्रमाणें प्रज्वलित आहे. बा धर्मा, त्यांपैकीं कित्येकांचीं नांवें तुला सांगतों, तीं ऐक. राजा, त्या सभेंत अग्रस्थानीं महातेजस्वी व शोकदु:खरहित सोमयाजी मुनि अधिष्ठित असून, त्यांच्या समीप पराशर, पर्वत, सावर्णि-गालव, शंख, लिखित, गौरशिरा, दुर्वासा, क्रोधन, श्येन, दीर्घतमा, पवित्रपाणि, सावर्णि, याज्ञवल्क्य, भालुकि, उद्दालक, श्वेतकेतु, तांड्य, भांडायनि, हविष्मान, गरिष्ठ, हरिश्चंद्र राजा, हृद्य, उदरशांडिल्य, पाराशर्य, कृषीवल, वातस्कंध, विशाख, विधाता, काल, करालदंत, त्वष्टा, विश्वकर्मा, तुंबुरु आणि दुसरे वायु व हुतशेष भक्षण

करणारे योनिज न अयोनिज महात्मे हे, सर्व लोकांचा ईश जो स्वर्गाधिपति महात्मा वज्रधर इंद्र, त्याच्या सन्निध असतात. तसेंच, सहदेव, सुनीथ, महातपस्वी वाल्मीकि, सत्यवचनी शमीक, सत्यप्रतिज्ञ प्रचेता, मेधातिथि, वामदेव, पुलस्त्य, पुलह, क्रतु, मरुत्त, मरीचि, महातपस्वी स्थाणु, कक्षीवान्, गौतम, तार्क्ष्य, वैश्वानर, कालकवृक्षीय, आश्राव्य, हिरण्मय, संवर्त, देवहव्य, वीर्यवान विष्वक्सेन, कण्व, कात्यायन, गार्ग्य, कौशिक इत्यादि थोर थोर पुरुष त्या महेंद्राच्या समीप असून शिवाय दिव्य उदकें, ओषधी, श्रद्धा, मेधा, सरस्वती, धर्मार्थकामांच्या अभिमानी देवता, विद्युल्लता, जलवाही मेघ, गर्जना करणारे मेघ, पूर्व दिशा, यज्ञवाहक (अंगिरा, दक्षिणाग्नि, गार्हपत्य, आहवनीय, निर्मथ्य, वैद्युत, शूर, संवर्त, लौकिक, जाठर, विषग, क्रव्याद्, क्षेमवान्, वैष्णव, दस्युमान्, बलद, शांत, पुष्ट, विभावसु, ज्योतिष्मान्, भरत, भद्र, स्विष्टकृत्, वसुमान्, क्रतु, सोम व पितृमान्) असे सत्तावीस अग्नि, अग्नीषोम, इंद्राग्नि, मित्र, सविता, अर्यमा, भग, विश्वेदेव, साध्य, गुरु, शुक्र, विश्वावसु, सुमन, तरुण, यज्ञ, दक्षिणा, ग्रह, स्तोभ व यज्ञसंबंधी मंत्र हे सर्व तेथें आहेत. त्याप्रमाणेंच सुंदर अप्सरा व गंधर्व हीं नर्तन, गायन, वादन, विविध हास्य, मंगलकारक स्तुतिपाठ, पराक्रमाचीं कृत्यें इत्यादि वर्णन करून त्या बलासुराचा व वृत्रासुराचा वध करणाऱ्या प्रतापशाली देवाधिदेव इंद्राला रमवीत असतात. राजा धर्मा, प्रदीप्त अग्नीप्रमाणें देदीप्यमान असे सर्व ब्रह्मर्षि, राजर्षि व देवर्षि हे माला व अलंकार धारण करून नानाविध विमानांतून त्या इंद्रसभेंत इंद्राच्या दर्शनासाठीं ये जा करीत असतात; आणि बृहस्पति व शुक्र तर तेथें नित्यच असतात. राजा युधिष्ठिरा, इंद्रसभेंत अधिष्ठित असणारे व तेथें ये जा करणारे हे कित्येक पुरुष तुला सांगितले. पण ह्यांशिवाय दुसरे पुष्कळ तपोनिधि महात्मे तेथें आहेत; आणि प्रत्यक्ष ब्रह्मदेवाप्रमाणें सामर्थ्यवान असे भृगु व सप्तर्षि चंद्राप्रमाणें धवल अशा विमानांत आरूढ होऊन चंद्राप्रमाणें प्रसन्न कांति प्रसृत करीत त्या सभेंत येत असतात. हे धर्मराजा, देवेंद्राच्या सभेचें नांव पुष्करमालिनी असें आहे. ती मीं जशी पाहिली, तशी ही तुला निवेदन केली आहे. आतां मी तुला यमसभेचें वर्णन सांगतों, तें श्रवण कर.

अध्याय आठवा.

—:०:—

यमसभेचें वर्णन.

नारद म्हणालेः—राजा युधिष्ठिरा, मी आतां ज्या सभेचें वर्णन करणार आहें, ती वैवस्वत यमाची सभा विश्वकर्म्यानें केलेली आहे. त्या सभेची लांबी रुंदी शंभर शंभर योजनें असून तिचें तेज इंद्रसभेपेक्षां अधिक आहे. ती सर्व बाजूंनीं जणू काय सूर्याप्रमाणें झळाळत आहे. ती तात्काळ पाहिजे असेल तें रूप धारण करिते. ती अतिशय उष्ण नाहीं अथवा अतिशय शीतही नाहीं. ती मनाला अत्यंत सुख देणारी आहे. त्या सभेमध्यें जरा, शोक, तृषा, क्षुधा, दुःख, दैन्य, ग्लानि किंवा कोणतीही प्रतिकूल गोष्ट प्राप्त होत नाहीं. कोणतेही दिव्य अथवा मानुष सुखोपभोग, आणि सुरस, मधुर, रुचिकर व मनोहर असे भक्ष्य, भोज्य, लेह्य, चोष्य व पेय पदार्थ, तसेंच उत्तम उत्तम सुगंधि पदार्थ व पुष्पमाला ह्यांची त्या स्थळीं समृद्धि आहे. राजा धर्मा, त्या दिव्य सभेंत जे वृक्ष आहेत, ते सदासर्वकाळ इच्छेनुरूप फळें अर्पण करितात; आणि तेथील उदकें मधुर असून शीत किंवा उष्ण आहेत.

राजा युधिष्ठिरा, त्या सभेंत सूर्यपुत्र यमाच्या सभोंवतीं अनेक पुण्यवान व निर्मल असे राजर्षि व ब्रह्मर्षि मोठ्या आनंदानें अधिष्ठित असतात.

ययाति, नहुष, पूरु, मांधाता, सोमक, नृग, त्रसदस्यु, कृतवीर्य, श्रुतश्रवा, अरिष्टनेमि, सिद्ध, कृतवेग, कृति, निमि, प्रतर्दन, शिबि, मत्स्य, पृथुलाक्ष, बृहद्रथ, वार्त्त, मरुत्त, कुशिक, सांकाश्य, सांकृति, ध्रुव, चतुरश्व, सदस्य, भार्मि, कार्तवीर्य, भरत, सुरथ, वसुनीथ, निशठ, नल, दिवोदास, सुमना, अंबरीष, भगीरथ, व्यश्व, सदश्व, वध्र्यश्व, पृथुवेग, पृथुश्रवा, पृषदश्व, वसुमना, महापराक्रमी क्षुप, रुषद्रु, वृषसेन, पुरुकुत्स, ध्वजी, रथी, आर्ष्टिषेण, दिलीप, महात्मा उशीनर, औशीनरि, पुंडरीक, शर्याति, शरभ, शुचि, अंग, अरिष्ट, वेन, दुष्यंत, सृंजय, जय, भांगासुरि, सुनीथ, निषध, वहीनर, करंधम, बाल्हिक, सुद्युम्न, बलवान मधु, ऐल, बलिष्ठ मरुत्त, कपोतरोमा, तृणक, सहदेव, अर्जुन, व्यश्व, साश्व, कृशाश्व, शशबिंदु, दाशरथि राम, लक्ष्मण, प्रतर्दन, अलर्क, कक्षसेन, गय, गौराश्व, जमदग्निपुत्र परशुराम, नाभाग, सगर, भूरिद्युम्न, महाश्व, पृथाश्व, जनक, वैन्य, वारिसेन, पुरुजित्, जनमेजय, ब्रह्मदत्त, त्रिगर्त, उपरिचर, इंद्रद्युम्न, भीमजानु, गौरपृष्ठ, अनघ, लय, पद्म, मुचुकुंद, भूरिद्युम्न, प्रसेनजित्, अरिष्टनेमि, सुद्युम्न, पृथुलाश्व, अष्टक, शंभर मत्स्य, शंभर नीप व शंभर हय, एकशेंएक धृतराष्ट्र, ऐशीं जनमेजय, शंभर ब्रह्मदत्त, शंभर वीरि, शंभर ईरि, दोनशें भीष्म, शंभर भीम, शंभर प्रतिविंध्य, शंभर गज, शंभर अश्व पलाशकाशकुशादिक शंभर शंभर अभिमानी देवता, शांतनु राजा, तुझा पिता पांडु, उशंगव, शतरथ, देवराज, जयद्रथ, मंत्र्यासमवेत बुद्धिमान राजर्षि वृषदर्भ, आणि जे मोठमोठे अनेक अश्वमेध करून व विपुल दक्षिणा देऊन स्वर्गास गेले, ते सहस्रावधि शशबिंदु, हे महापुण्यवान, सुकीर्तिमान व बहुश्रुत नृपश्रेष्ठ त्या यमसभेंत यमाच्या समीप अधिष्ठित आहेत. त्याचप्रमाणें अगस्त्य, मतंग, काल, मृत्यु, यज्ञयाग करून परलोकाप्रत गेलेले व योगसाधनानें सिद्धि पावलेले पुरुष, अग्निष्वात्त, फेनप, उष्मप, सुधावान, बर्हिषद इत्यादि मूर्तिमान पितर, संवत्सरादिकांच्या अभिमानी देवता, भगवान अग्नि, दक्षिणायनांत मरण पावलेले व दुष्कृत्यें केलेले पुरुष, प्राण्यांना यमाकडे नेणारे दूत, आणि शिशप, पलाश, काश, कुश इत्यादि यज्ञसंबंधी द्रव्यांच्या अभिमानी देवता, हीं सर्व पितृराज यमाच्या सभेंत मूर्तिमंत बसलेलीं असून, त्यांशिवाय दुसरे पुष्कळ सभासद यमसभेंत अधिष्ठित असतात. त्यांची नांवांनीं किंवा गुणांनीं गणना करणें अशक्य आहे. धर्मराजा, त्या मनोहर सभेंत अव्यवस्था म्हणून कोणतीही नाहीं. ती सभा पाहिजे तिकडे नेतां येते. विश्वकर्म्यानें दीर्घकाळपर्यंत तपश्चर्या केली, तेव्हां त्यास ती निर्माण करितां आली; आणि ती सभा इतकी देदीप्यमान आहे कीं, ती आपल्या तेजानें अगदीं झळाळत असते !

हे भारतश्रेष्ठा, त्या सभेंत जाण्यास मोठी योग्यता असावी लागते. महान महान तपस्वी, नियमादिकांचें अनुष्ठान करणारे, मिथ्या शब्द न बोलणारे, सर्वत्र समबुद्धि धरणारे, सर्वसंगपरित्याग करणारे, व पुण्यकर्मांनीं चित्ताची शुद्धि जोडणारे जे मोठमोठे महात्मे, तेच त्या सभेंत प्रवेश करूं शकतात.

हे पांडुतनया, त्या सभेंतील सर्व सभासदांचे देह मोठे तेजःपुंज आहेत. ते सर्व निर्मल वस्त्रें धारण करितात. त्यांचीं बाहुभूषणें चित्रविचित्र असून त्यांच्या देहांवर सुंदर पुष्पें शोभतात. त्यांच्या कर्णांत दिव्य कुंडलें तळपत असून मस्तकावर व अन्यत्र राजचिन्हें विलसतात; आणि त्या महात्म्यांनीं जीं पुण्यकारक सत्कृत्यें केलेलीं असतात, त्यांच्या योगानें त्यांस अनुपम कांति प्राप्त झालेली असते.

राजा युधिष्ठिरा, महान महान गंधर्वांचे गण व अप्सरांचे समुदाय त्या सभेंत गायन, वादन, नर्तन, हास्य, लास्य (नृत्यविशेष) इत्यादिकांनीं

भगवान यमाची सांगोपांग सेवा करितात. तेथें सर्वत्र पवित्र, सुगंध व मनोहर ध्वनि व दिव्य पुष्पें ह्यांच्या योगें सभासदांस नित्य परम आल्हाद होतो, आणि कोट्यवधि धार्मिक पुरुष मनोहर देह धारण करून पवित्र चित्तानें त्या प्रजापति यमाची सेवा करण्यांत निमग्न असतात. राजा धर्मा, त्या पितृराज महात्म्या यमाची सभा अशा प्रकारची आहे. आतां, वरुणाची पुष्पमालिनी नामक जी सभा, तिचें मी वर्णन करितों.

अध्याय नववा.

—:०:—

वरुणसभेचें वर्णन.

नारद सांगतातः—राजा युधिष्ठिरा, वरुणाच्या दिव्य सभेचें तेज मोठें निरुपमेय आहे. तिची लांबी रुंदी यमसभेच्या इतकीच असून तिच्या सभोंवतीं सुंदर तट व तोरणें (कमानी) आहेत. विश्वकर्म्यानें ती सभा निर्माण करितांना अंतर्भागीं जलाचा आश्रय केला आहे; आणि त्यामुळें तेथें दिव्य व रत्नमय वृक्ष विपुल असून त्यांपासून पुष्पें व फळें ह्यांची समृद्धि होते. त्या सभेंतील निरनिराळे महाल लतापादपांनीं सिद्ध केलेले आहेत. वृक्षस्तंभांवर निळ्या, पिवळ्या, सांवळ्या, शुभ्र व आरक्त अशा नानाविध वर्णांचीं लतापल्लवरूप छतें दिलीं असून छतांतून अंतरालांत जिकडे तिकडे मंजरींचे गुच्छ लोंबत आहेत. त्याप्रमाणेंच त्या सभेंत नानाप्रकारचे सहस्रावधि पक्षी वास करितात. त्यांचे मनोहर स्वर व हृदयंगम देह अवलोकन केले म्हणजे, ते अगदीं अवर्णनीय आहेत, अशी खातरी होते. राजा धर्मा, त्या वरुणसभेंत प्रवेश केला असतां मनास अत्यंत आल्हाद होतो. ती फार शीत नाहीं प फार उष्णही नाहीं. तेथें सुंदर मंदिरें व उत्तम मंचक तयार केलेले आहेत. त्या लोकोत्तर सभेमध्यें सिंहासनावर वारुणीसहवर्तमान वरुण अधिष्ठित असतो. त्या उभयतांनीं दिव्य अलंकार व वस्त्रें धारण केलेलीं असून, त्यांजवर मोठमोठीं रत्नें विलसत असतात.

हे पांडुतनया, त्या जलाधिपति वरुणाच्या समीप दिव्य माळा धारण करून आणि सुगंधि द्रव्यांच्या उट्या, तिलक वगैरे लावून द्वादशादित्य बसलेले असतात. त्याप्रमाणेंच वासुकि, तक्षक, ऐरावत, नाग, कृष्ण, लोहित, वीर्यवान पद्मचित्र, कंबल, अश्वतर, धृतराष्ट्र, बलाहक, मणिमान्, कुंडक, कर्कोटक, धनंजय, पाणिमान्, कुंडधार, प्रल्हाद, मुषिकाद, जनमेजय, पताकी, मंडली, फणावान् ह्या तीन व इतर अनेक जातींचे सर्प त्या सभेंत वरुणाच्या समीप चोहों बाजूंस आनंदानें बसलेले असतात. विरोचनाचा पुत्र बलि, सर्व पृथ्वी जिंकून घेणारा नरकासुर, संऱ्हाद, विप्रचित्ति, कालखंज, सुहनु, दुर्मुख, शंख, सुमना, सुमति, घटोदर, महापार्श्व, क्रथन, पिठर, विश्वरूप, स्वरूप, विरूप, महाशिरा, दशग्रीव, वाली, मेघवासा, दशावर, टिट्टिभ, विटभूत, संऱ्हाद व इंद्रतापन हे दैत्य व दानव त्या सभेंत अधिष्ठित आहेत. त्या सर्वांच्या कानांत तेजस्वी कुंडलें चमकत असून गळ्यांत उत्तम माळा व मस्तकावर सुंदर किरीट शोभत असतात. त्यांनीं उत्तम वस्त्रें परिधान केलेलीं असून वरप्राप्तीमुळें त्या शूरांस मृत्यूचें भय उरलें नाहीं. राजा धर्मा, त्यांनीं उत्तम तपश्चर्या केल्यामुळें त्यांस तें दिव्य स्थान प्राप्त होऊन, महात्म्या पाशधर वरुणाच्या समीप सदोदीत आश्रय मिळाला आहे.

हे पृथानंदना, त्याप्रमाणेंच चार समुद्र, भागीरथी, कालिंदी, विदिशा, वेणा, वेगवाहिनी नर्मदा, विपाशा, शतद्रु, चंद्रभागा, सरस्वती, इरावती, वितस्ता, सिंधु, देवनदी, गोदावरी, कृष्णवेणा, सरिद्वरा, कावेरी, किंपुना, विशल्या, वैतरणी, तृतीया ज्येष्ठिला, महानद शोण, चर्मण्वती, महानदी, पर्णाशा, सरयू, वारवत्या, सरि-

श्लेष्ठ लांगली, करतोया, आत्रेया, महानद लौहित्य, लंघती, गोमती, संध्या व त्रिस्रोतसी ह्या व दुसऱ्या अनेक प्रसिद्ध पवित्र नद्या व त्याप्रमाणेंच दुसऱ्या अनेक सामान्य नद्या, शिवाय बहुविध तीर्थें, सरोवरें, कूप, झरे, डबकीं, तलाव, दिशा, पृथ्वी व पर्वत हीं सर्व देह धारण करून त्या सभेंत भगवान वरुणाच्या समीप अधिष्ठित आहेत. तसेंच, त्या सभेंत सर्व जलचर प्राणी वरुणाच्या सेवेंत निमग्न असून गंधर्वांचे व अप्सरांचे समुदाय गायनवादनांच्या योगें वरुणाचें रंजन करीत असतात. राजा युधिष्ठिरा, महान महान रत्नखचित पर्वत व प्रसिद्ध रस त्या सभेंत मधुर कथा सांगत बसलेले असतात. त्याप्रमाणेंच वरुणाचा मंत्री सुनाभ हाही तेथें आपल्या पुत्रपौत्रादिकांनीं व गो नामक पुष्कर नागानें परिवेष्टित होऊन भगवान वरुणाची सेवा करीत असतो. राजा, वरुणाच्या सभेंत अधिष्ठित असलेले पर्वतादिक सर्व प्रत्यक्ष मूर्ति धारण करून वरुणसभेंत निमग्न असतात. बा धर्मा, वरुणाची ही रम्य सभा मीं पूर्वीं जातां जातां पाहिली होती. आतां मी कुबेराच्या सभेचें वर्णन करितों, तें ऐक.

अध्याय दहावा.

—:०:—

कुबेराच्या सभेचें वर्णन.

नारद म्हणाले:—राजा युधिष्ठिरा, कुबेराची सभा शंभर योजनें लांब व सत्तर योजनें रुंद असून तिची कांति शुभ्रवर्ण आहे. ती सभा कैलास पर्वताच्या हिमाच्छादित शिखराप्रमाणें धवल असल्यामुळें चंद्रकिरणांनाही झांकून टाकिते. राजा धर्मा, कुबेरानें महान तपश्चर्या करून स्वतः ती सभा जिंकून घेतली. गुह्यक त्या सभेला उचलून घेऊन एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं नेऊं लागले, म्हणजे जणू काय ती आकाशाला चिकटून गेली आहे, असा भास होतो. त्या दिव्य सभेंत मोठमोठीं उंच उंच सुवर्णखचित राजमंदिरें आहेत. तीमध्यें महान महान तेजःपुंज रत्नांचें कोंदणकाम सर्वत्र असल्यामुळें ती अत्यंत चित्रविचित्र दिसते. तींत चोहोंकडे मनोरम सुगंध चालू असतात. तिचीं शिखरें श्वेतमेघांप्रमाणें उन्नत आहेत; आणि त्यांकडे पाहिलें असतां जणू काय ती वातावरणांत तरंगतच आहे, असें वाटतें. ह्या लोकोत्तर सभेवर सुवर्णमय रंगांनीं अशी कांहीं चित्रविचित्र वेलबुट्टी काढिली आहे कीं, जणू काय विद्युल्लताच त्या सभेंत इतस्ततः संचार करीत आहे, असा भास होतो !

राजा युधिष्ठिरा, त्या सभेचा अधिपति वैभवशाली कुबेर हा दिव्य वस्त्रें व विचित्र आभरणें धारण करून सहस्र स्त्रियांसमवेत पवित्र सिंहासनावर अधिष्ठित असतो. त्या सिंहासनाला लागून पाय सोडण्यासाठीं एक आसनावली केलेली आहे. ती सूर्याप्रमाणें तेजस्वी व अत्यंत मनोहर अशा आस्तरणांनीं फारच शोभते. तिच्यावर पाय सोडून सिंहासनावर अधिष्ठित असलेल्या त्या धनाधिपतीच्या कानांतील कुंडलांची प्रभा चोहोंकडे पसरत असते. मोठमोठ्या मंदर वृक्षांच्या बागा, कमलांचीं वनें, आलका नामक सरोवर व नंदनवन ह्यांतील सुगंध वाहून आणणारा थंडगार व आल्हादकारक वायु त्या सभेंत कुबेराची सेवा करीत असतो. देव, गंधर्व व अप्सरा तेथें येऊन दिव्य ताना घेऊन गात असतात. मिश्रकेशी, रंभा, सलील हास्य करणारी चित्रसेना, चारुनेत्रा घृताची, मेनका, पुंजिकस्थला, विश्वाची, सहजन्या, प्रम्लोचा, उर्वशी, इरा, वर्गा, सौरभेयी, समीची, बुद्‌बुदा, लता इत्यादि सहस्रावधि, गायनांत व नर्तनांत कुशल असलेल्या अप्सरा आणि गंधर्व त्या सभेंत कुबेराची सेवा करण्यांत निमग्न असतात. राजा धर्मा, तेथें गंधर्व व अप्सरा

ह्यांचें निरंतर दिव्य गायन, वादन, नर्तन वगैरे चालू असल्यामुळें ती सभा नेहमीं गजबजलेली व प्रेक्षणीय भासते. किन्नर व नर नांवाचे गंधर्व तेथें असून शिवाय माणिभद्र, धनद, श्वेतभद्र, गुह्यक, कशेरक, गंडकंडू, महाबल प्रद्योत, कुस्तुंबरु, पिशाच, गजकर्ण, विशालक, वराहकर्ण, ताम्रौष्ठ, फलकक्ष, फलोदक, हंसचूड, शिखावर्त, हेमनेत्र, बिभीषण, पुष्पानन, पिंगलक, शोणितोद, प्रवालक, वृक्षबाष्पनिकेत व चीरवास असे लक्षावधि यक्ष त्या सभेंत आहेत. राजा, भगवती लक्ष्मी सदासर्वकाळ तेथेंच असून कुबेराचा पुत्र नलकूबरही तेथेंच असतो. मी व माझ्यासारखे दुसरे प्रवासी तेथें वारंवार जातात. ब्रह्मर्षि व देवर्षि, तसेंच क्रव्याद् (असुर) व महाबलिष्ठ अनेक गंधर्व त्या सभेंत महात्म्या धनदाची शुश्रूषा करीत असतात.

राजा युधिष्ठिरा, त्या दिव्य सभेंत भगवान देवाधिदेव शंकर, पार्वतीसहवर्तमान, आपला मित्र जो कुबेर त्याच्या समीप सदैव अधिष्ठित असतो. त्या उग्र धनुष्य धारण करणाऱ्या, कामदेवास जाळणाऱ्या, त्रिशूल हातांत घेणाऱ्या व नंदीवर आरूढ होणाऱ्या विरूपाक्ष महादेवाच्या समीप ठेंगणे, उंच, कुबडे, आरक्त नेत्रांचे, भयंकर शब्द करणारे, मेदमांस खाणारे, नानाप्रकारचीं शस्त्रें धारण करणारे, वाऱ्यासारखे महावेगवान आणि अत्यंत भयंकर असे सहस्रावधि भूतगण सभोंवार बसलेले असतात. त्याचप्रमाणें दुसरे शतावधि गंधर्वाधिपति आपआपल्या परिवारासहवर्तमान मोठ्या आनंदानें त्या कुबेरसभेंत अधिष्ठित असतात. तसेंच विश्वावसु, हाहा, हूहू, तुंबुरु, पर्वत, शैलूष, गीतज्ञ चित्रसेन व चित्ररथ हे व ह्यांशिवाय दुसरे अनेक गंधर्व त्याच नेश्वराच्या उपासनेंत निमग्न असतात. त्याचप्रमाणें, विद्याधरांचा अधिपति चक्रधर्मा आपल्या अनुजांसमवेत, शेंकडों किन्नर, किन्नरांचा अधिपति द्रुम, आणि राक्षसांचे अधिपति महेंद्र व गंधमादन हे त्या धनाधिपतीच्या सेवेंत तत्पर असतात. भगदत्तादिक राजेही त्या सभेंत बसलेले असतात. ह्यांशिवाय यक्ष, गंधर्व व राक्षस ह्यांसहवर्तमान महाधर्मशील बिभीषण तेथें आपल्या भावाच्या सेवेंत रममाण असतो. हिमवान, पारियात्र, विंध्य, कैलास, मंदर, मलय, दर्दुर, महेंद्र, गंधमादन आणि दिव्य पर्वत इंद्रनील व सुनाभ हे सर्व पर्वत आणि ह्यांखेरीज मेरु आदिकरून बाकीचे सर्व पर्वत सुद्धां भगवान कुबेराची सेवा करीत आहेत. त्याचप्रमाणें भगवान नंदीश्वर, महाकाल, शंकुकाल वगैरे सर्व दिव्य सभासद, काष्ठ, कुटीमुख, दंती, महातपस्वी विजय आणि डुरकण्या फोडीत असलेला महाबलवान शुभ्र वृषभ हे तेथें आहेत. ह्यांशिवाय, अन्य राक्षस व पिशाचेंही, कुबेर आपल्या सभासदांसह भगवान महादेवाकडे जेव्हां जात असतो, तेव्हां त्याची उपासना करितात. त्या सभेंत भगवान धनपति कुबेर हा देवाधिदेव, त्रैलोक्यप्रतिपालक व बहुरूपधारी अशा उमापति शंकराला त्याची अनुज्ञा घेऊन शिरसा वंदन करितो, व त्याच्या समीप असतो; आणि कधीं कधीं कुबेरसखा भगवान शंकरही कुबेरासमीप असतो; आणि त्याचप्रमाणें, सर्व मुख्य निधींमध्यें श्रेष्ठ असे जे महान महान शंख व पद्म हे दोन निधि, ते सर्व निधींना बरोबर घेऊन धनाधिपति कुबेराची उपासना करितात. असो. राजा युधिष्ठिरा, अशा प्रकारची ती रम्य सभा अंतरिक्षांत संचार करीत असतांना मीं पाहिली. आतां मी तुला ब्रह्मसभेचें स्वरूप निवेदन करितों, तें ऐक.

अध्याय अकरावा.

—:०:—

ब्रह्मसभेचें वर्णन.

नारद म्हणाले:—बा धर्मा, आतां मी ब्रह्मदेवाच्या सभेचें वर्णन करितों, तें ऐक. राजा, ब्रह्मसभा

अमुक एका प्रकारची आहे, असें सांगतां येणें शक्य नाहीं. पूर्वी कृतयुगामध्यें, भगवान परमप्रतापी आदित्य मनुष्यलोक पाहण्याच्या इच्छेनें स्वर्गाहून भूतलावर येत असतां, त्यानें ही सभा सूक्ष्मपणें अवलोकन केली; आणि पुढें त्यानें मला त्या सभेविषयीं सांगितलें कीं, 'त्या दिव्य सभेचें लांबी, रुंदी वगैरे मान सांगतां येत नाहीं. ती आपल्या प्रभावानें सर्व प्राण्यांचे चित्तास आल्हादित करिते, आणि ती केवळ मनानें मात्र ध्यानांत आणण्यासारखी आहे.' राजा, अशा प्रकारचें त्या सभेचें गूढ स्वरूप जेव्हां मला सूर्यापासून विदित झालें, तेव्हां ती सभा अवलोकन करण्याची इच्छा माझ्या मनांत उद्भवली आणि मी सूर्यास म्हटलें, 'हे भगवंता, ती मंगलकारक पितामहसभा अवलोकन करावी, असें माझ्या मनांत आहे; तर कोणत्या उपायानें माझी ही इच्छा सफल होईल, तें निवेदन कर. हे इंद्रियाधिपा, ती लोकोत्तर व पापनाशक सभा दृष्टीस पडावी म्हणून कोणतीही तपश्चर्या, विधिविधान किंवा ज्योतिष्मत्यादि कल्पोक्त औषधें करण्यास मी सिद्ध आहें.' राजा धर्मा, तेव्हां त्या सहस्ररश्मि दिवाकरानें माझें भाषण श्रवण करून मला म्हटलें, 'हे नारदा, जर तुला ती दिव्य सभा पहावयाची असेल, तर तूं आपल्या मनोवृत्तींचा जय करून सहस्र संवत्सरपर्यंत ब्रह्मव्रताचें अनुष्ठान कर.'

राजा युधिष्ठिरा, भगवान आदित्याचें तें वचन श्रवण करून मी हिमालय पर्वतावर गेलों, व ब्रह्मोपासनेस प्रारंभ केला. पुढें सहस्र संवत्सरपर्यंत ती उपासना परिपूर्ण झाल्यानंतर भगवान प्रतापशाली ज्ञानरूप आदित्य मजप्रत आला, आणि मला घेऊन ब्रह्मसभेस गेला. मग मीं ती सभा पाहिली, तों तिच्या अनिर्वचनीय स्वरूपाचा मला प्रत्यय आला. मी क्षणभर त्या सभेकडे अवलोकन करीत आहें, तों तिचें तें रूप बदललें, व तिला दुसरेंच रूप प्राप्त झालें. पुढें त्या रूपावर दृष्टि ठेविली तों तिचें तें रूप गेलें, व आणखी तिला तिसरेंच रूप आलें. राजा धर्मा, ह्याप्रमाणें ती सभा क्षणांत वैकुंठाचें तर क्षणांत कैलासाचें, क्षणांत अमरावतीचें तर क्षणांत नागलोकाचें, अशीं नानाविध रूपें घेते; आणि त्यामुळें, तिचें अमुकच स्थिर स्वरूप आहे, असें केव्हांही सांगतां येत नाहीं. तसेंच, हे भारता, त्या सभेचें परिमाण किंवा आकार ह्यांचाही निश्चय करितां येत नाहीं. राजा, त्या सभेसारखें अद्वितीय स्वरूप मीं पूर्वी कधींही पाहिलें नव्हतें. ती सभा फार शीतही नाहीं व फार उष्णही नाहीं. तिच्यामध्यें सदोदीत सर्व प्रकारचीं सुखें मिळतात. तेथें क्षुधा, तृषा किंवा ग्लानि हीं केव्हां सुद्धां प्राप्त होत नाहींत. ती सभा अत्यंत देदीप्यमान अशा चित्रविचित्र रत्नांनीं केली असून तिला स्तंभांचा आधार नाहीं. ती सभा निरंतर राहणारी आहे. तिला कधींही क्षय नाहीं. स्वकांतीनें झळाळणारे महान महान तेजःपुंज नानाविध दिव्य पदार्थ तिच्यामध्यें असल्यामुळें सूर्य, चंद्र व अग्नि ह्यांस ती स्वयंप्रकाश सभा मागें टाकिते. राजा, त्या सभेची प्रभा स्वर्गमंडलावर इतकी प्रसृत झाली आहे कीं, तिच्यापुढें रविप्रभा अगदीं तुच्छ भासते!

राजा युधिष्ठिरा, त्या सभेंत सर्व लोकांचा पितामह भगवान ब्रह्मदेव स्वतः देवमायेच्या योगानें निरंतर सृष्टीची उत्पत्ति करीत असतो; व दुसरे प्रजापति त्या देवाधिदेवाच्या सेवेंत सदोदीत निमग्न असतात. दक्ष, प्रचेता, पुलह, मरीचि, महाशक्तिमान कश्यप, भृगु, अत्रि, वसिष्ठ, गौतम, अंगिरा, पुलस्त्य, क्रतु, प्रल्हाद व कर्दम हे प्रजापति, तसेंच अथर्वांगिरस मुनि, वालखिल्य मुनि, मरीचिप मुनि, मन, अंतरिक्ष, विद्या, वायु, तेज, जल, मही, शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध, प्रकृति, विकार, इतर कालादिक भूमीचीं कारणें, महातेजस्वी अगस्त्य, वीर्यवान मार्कंडेय, जमदग्नि, भर-

द्वाज, संवर्त, च्यवन, महाभाग दुर्वासा, धार्मिक ऋष्यशृंग, भगवान योगाचार्य तपोनिधि सनत्कुमार, असित, देवल, तत्त्वज्ञानी जैगीषव्य, जितशत्रु ऋषभ, महापराक्रमी मणि, देहधारी अष्टांग आयुर्वेद, सनक्षत्र चंद्र, आदित्य, वायु, क्रतु, संकल्प व प्राण हे सर्व मूर्तिमंत महात्मे व्रतादिकांचें अनुष्ठान करीत ब्रह्मदेवाच्या सेवेंत तत्पर झालेले होते. ह्यांशिवाय दुसरेही पुष्कळ महान महान पुरुष त्या देवाधिदेवाच्या समीप त्याच्या शुश्रूषेंत निमग्न होते. ह्याप्रमाणेंच धर्म, अर्थ, काम, हर्ष, द्वेष, तप व दम हे तेथें येतात. त्यांच्या बरोबर गंधर्व व अप्सरा ह्यांचे वीस वीस समुदाय असतात. त्यांशिवाय हंस, हाहा, हूहू, विश्वावसु, वररुचि, वृषण व तुंबुरु हे सप्तगंधर्व आणि सर्व लोकपाळ तेथें येतात. त्याप्रमाणेंच शुक्र, बृहस्पति, बुध, मंगळ, शनि, राहु इत्यादि सर्व ग्रह, मंत्र, रथंतर साम, हरिमान व वसुमान इंद्र, इंद्रासहित अग्नीषोम व इंद्राग्नि हे अदितिपुत्र, मरुद्गण, विश्वकर्मा, अष्टवसु, तसेच सर्व पितृगण, सर्व हविर्द्रव्यें, ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद, सर्व शास्त्रें, इतिहास, उपवेद (आयुर्वेद, धनुर्वेद, गांधर्ववेद, अर्थशास्त्र), वेदांगें, (शिक्षा, कल्प, व्याकरण, निरुक्त, छंदःशास्त्र, ज्योतिष), ग्रह, यज्ञ, सोम, सर्व देवता, सावित्री, संकटनिवारक सप्तविध वाणी (सप्तविध प्रणव), मेधा, धृति, श्रुति, प्रज्ञा, बुद्धि, यश, क्षमा, साममंत्र, स्तुतिशस्त्रें (स्तोत्रें), बहुविध गाथा, तर्कयुक्त मूर्तिमंत भाष्यें, अनेक प्रकारचे नाटककार, काव्यकार, कथा व आख्यानें सांगणारे, आणि दुसरे गुरूची पूजा करणारे पवित्र पुरुष त्या स्थळीं असतात. राजा धर्मा, क्षण, लव, मुहूर्त, दिवस, रात्रि, पक्ष, मास, सहा ऋतु, साठ संवत्सर, बारा पंचयुगें, दैव, पैत्र, ब्राह्म व मानुष असे चतुर्विध अहोरात्र, द्वादशराशिरूप दिव्य, नित्य, अक्षय व अव्यय काळचक्र आणि धर्मचक्र हीं सर्व त्या ब्रह्मसभेंत सदैव असतात. त्याप्रमाणेंच अदिति, दिति, दनु, सुरसा, विनता, इरा, कालिका, सुरभी देवी, सरमा, गौतमी, प्रभा, कद्रू, देवमाता, रुद्राणी, श्री, लक्ष्मी, भद्रा, षष्ठी, अपरा पृथिवी, गांगतादेवी, ऱ्ही, स्वाहा, कीर्ति, सुरा, शचीदेवी, पुष्टि, अरुंधती, संवृत्ति, आशा, नियता, सृष्टि व रतिदेवी ह्या व ह्याप्रमाणेंच दुसऱ्या पुष्कळ देवता प्रजापति ब्रह्मदेवाच्या सेवेंत निमग्न असतात. तसेच आदित्य, वसु, रुद्र, मरुद्गण, अश्विनीकुमार, विश्वदेव, साध्य, मनाप्रमाणें वेगवान पितर, महाभाग वैराज, अग्निष्वात्त, गार्हपत्य व नाकचर असे लोकविश्रुत तीन पितृगण, सोमप, एकशृंग, चतुर्वेद व कल हे चारी वर्णांस पूज्य असलेले चार पितृगण असे एकंदर सात पितृगण—ज्यांची तृप्ति केली असतां चंद्र पुनः वृद्धि पावतो—ते सर्व मोठ्या आनंदानें त्या अमितवीर्यशाली ब्रह्मदेवाची सेवा करितात. त्याप्रमाणेंच राक्षस, पिशाच, दानव, गुह्यक, नाग, पक्षी व पशु हे ह्या विश्वस्त्रष्ट्याची उपासना करीत असून स्थावरजंगम महान महान प्राणी, देवाधिपति इंद्र, वरुण, कुबेर, यम व उमेसहित महादेव हे सर्व त्या सभेंत सदोदीत येत असतात. राजा धर्मा, महासेन षडानन हा तर ब्रह्मदेवाच्या उपासनेंत सदासर्वकाळ रममाण असतो. नारायण देव, देवर्षि, वालखिल्य ऋषि आणि योनिज व अयोनिज असे इतर मुनि सुद्धां तेथें असतात. हे नराधिपा, स्थावरजंगम जी जी वस्तु ह्या ब्रह्मांडांत दृग्गोचर होते, ती ती वस्तु मीं त्या ब्रह्मसभेंत पाहिली असें तूं समज. राजा, स्वर्गांत राहणारे ऐशीं सहस्त्र ऊर्ध्वरेते मुनि व पन्नास सहस्त्र संसारी ऋषि आपल्या इच्छेप्रमाणें त्या सभेंत ब्रह्मदेवाचें दर्शन घेतात, आणि त्यास शिरसा वंदन करून स्वस्थानीं परत जातात. धर्मराजा, त्या सभेंत देव, दैत्य, नाग, विप्र, यक्ष, पक्षी, कालेय, गंधर्व, अप्सरा वगैरे जे भाग्यवान अतिथि जातात, त्यांचा,

ज्यांच्या त्यांच्या योग्यतेप्रमाणें, अमितबुद्धिमान, सर्वभूतवत्सल व लोकपितामह ब्रह्मदेव आदरसत्कार करितो; आणि त्यांशीं गोड शब्द बोलून व त्यांचा गौरव करून त्यांस द्रव्यादिक भोग्य पदार्थ देतो. राजा, ह्याप्रमाणें त्या सभेंत एकसारखे महान महान पुरुष येत असतात व तेथून परत जात असतात, ह्यामुळें ती सभा सदासर्वकाळ अगदीं गजबजलेली असून प्रेक्षकाच्या चित्तास अत्यंत आल्हाद उत्पन्न करिते. राजा युधिष्ठिरा, त्या ब्रह्मसभेचें काय वर्णन करावें? ह्या दिव्य सभेंत ब्रह्मर्षींचे गण सदोदीत अधिष्ठित असतात; तेथें सर्व प्रकारचें तेज मूर्तिमंत वास करीत आहे; ब्राह्मतेजानें म्हणजे शमादि संपत्तीच्या कांतीनें ती सभा अगदीं झळाळत आहे; आणि ह्यामुळें, जो भाग्यवान पुरुष ह्या सभेंत जातो त्याचीं सर्व दुःखें नष्ट होतात. राजा, ती ब्रह्मसभा मीं ह्याप्रमाणें पाहिली. जशी तुझी ही मयसभा मनुष्यलोकीं दुर्लभ आहे, तशी ती ब्रह्मदेवाची सभा त्रिभुवनांत दुर्लभ आहे. असो. हे भारतश्रेष्ठा युधिष्ठिरा, देवलोकीं ज्या सभा मीं पूर्वी अवलोकन केल्या, त्यांचें वर्णन हें असें आहे. बा धर्मा, ह्या मानवलोकीं तुझी ही सभा अत्यंत श्रेष्ठ आहे. भूतलावर ह्या सभेसारखी दिव्य सभा कोठेंही नाहीं!

अध्याय बारावा.

—:०:—

हरिश्चंद्राचें माहात्म्य.

युधिष्ठिर विचारतो:—गुरुराज नारद मुने, आपण यमसभेचें जें वर्णन केलें, त्यांत, तेथील सभासदांमध्यें बहुधा राजे लोकांचींच नांवें घेतलीं; वरुणसभेंत मुख्यत्वेंकरून नाग, दैत्येंद्र, सरिता व समुद्र हेच सांगितले; धनपति कुबेराच्या सभेंत यक्ष, गुह्यक, राक्षस, गंधर्व, अप्सरा व भगवान वृषभध्वज शंकर हेच प्राधान्येंकरून निवेदन केले; ब्रह्मदेवाच्या सभेंत सर्व महर्षि, देववृंद व मूर्तिमंत अखिल शास्त्रें बसतात, म्हणून वर्णिलें; आणि त्याप्रमाणेंच इंद्राच्या सभेंत देव, गंधर्व व अनेक महर्षि अधिष्ठित आहेत, असें आपल्या सांगण्यांत आलें. महामुने, त्या उदारधी देवेंद्राच्या सभेंत एकदा हरिश्चंद्र राजर्षि मात्र आपण सांगितला; तर त्या महायशस्वी नृपवरानें असें कोणतें कर्म अथवा तप केलें कीं, ज्यामुळें त्या महात्म्याला इंद्राची बरोबरी करितां आली? त्याप्रमाणेंच, हे विप्रोत्तमा, माझा पिता पांडु आपण पितृलोकीं कशा स्थितींत अवलोकन केला, ह्याची व आपली गांठ कशी पडली, आणि तो आपणांपाशीं काय म्हणाला, हें सर्व आपण मला सांगावें; महाराज, आपणांपासून हें सर्व श्रवण करावें, अशी मला फार फार इच्छा झाली आहे.

नारद म्हणाले:—राजेंद्रा युधिष्ठिरा, ज्या अर्थी हरिश्चंद्राविषयीं तूं मला विचारीत आहेस, त्या अर्थी त्या महाबुद्धिमान राजर्षीचें माहात्म्य मी तुला सांगतों.

युधिष्ठिरा, हरिश्चंद्र राजा महापराक्रमी होता. सर्व भूमंडलावर त्याची सत्ता अबाधित चाले. प्रत्येक नृप त्याची आज्ञा शिरसा वंदन करी. त्यानें विजयशाली व सुवर्णमंडित अशा एकाच रथांत आरूढ होऊन आपल्या शस्त्रप्रतापानें जंबुद्वीप, कुशद्वीप, शाकद्वीप, क्रौंचद्वीप, शाल्मलिद्वीप, गोमेदद्वीप व पुष्करद्वीप अशीं सातही द्वीपें जिंकून घेतलीं; आणि पर्वत, वनें व अरण्यें ह्यांसह्वर्तमान सर्व पृथ्वी हस्तगत करून राजसूय नामक महाक्रतु केला. त्या समयीं सर्व भूपालांनीं त्याची आज्ञा घेऊन त्यास नजरनजराणे आणून दिले; आणि यज्ञमंडपांत ब्राह्मणांस वाढण्याचेंही काम केलें! धर्मराजा, त्या यज्ञांत याचक जितकें धन मागत, त्याच्या पांचपट धन हरिश्चंद्र राजा मोठ्या प्रेमानें त्यांस देई. यज्ञसमारंभाकरितां देशोदेशांहून प्राप्त झालेले ब्राह्मण, यज्ञविधि समाप्त झाल्यावर आपापल्या

स्थानास जाऊं लागले असतां हरिश्चंद्र राजानें त्यांस नानाप्रकारची संपत्ति अर्पण करून संतुष्ट केलें. तेव्हां ते ब्राह्मण म्हणाले कीं, " अहाहा ! ह्या राजश्रेष्ठाची योग्यता काय सांगावी ! ह्यानें आम्हांस भक्ष्यभोज्यादिक नानाविध पदार्थ यथेष्ट अर्पण केले इतकेंच नव्हे, तर बहुविध रत्नांचे राशिही दिले; तेव्हां हा हरिश्चंद्र राजा सर्व राजांमध्यें अत्यंत पराक्रमी व विजयशाली झाला, ह्यांत संदेह नाहीं ! "

राजा धर्मा, त्या सहस्रावधि राजांपेक्षां हरिश्चंद्र राजा जो श्रेष्ठ, त्याचें कारण हेंच त्या महाप्रतापी हरिश्चंद्राचा राजसूय यज्ञ समाप्त झाल्यावर त्याला सार्वभौमराज्याचा अभिषेक झाला, तेव्हां तो अधिराज हरिश्चंद्र फारच शोभूं लागला. हे भरतर्षभा, जे राजे हरिश्चंद्राप्रमाणें राजसूय यज्ञ करून परमात्म्याची पूजा करितात, त्यांस इंद्रासमवेत आनंदानें राहतां येतें. राजा, जे वीर समरभूमींतून पळून न जातां धारातीर्थी पतन पावतात, त्यांसही तेंच उत्तम पद प्राप्त होतें. त्याप्रमाणेंच, जे पुरुष उग्र तपश्चर्या करून आपले देह ठेवितात, ते इंद्रसभेप्रत जाऊन नित्य दिव्य कांतीनें झळाळतात.

पांडूचा निरोप.

नारद पुढें सांगतात:—हे कौरवनंदना कुंतीपुत्रा, तुझा पिता पांडु राजा हरिश्चंद्राचें तें अवर्णनीय वैभव अवलोकन करून विस्मित झाला; व मी मनुष्यलोकास येण्याकरितां निघालों असें मनांत आणून मोठ्या नम्रपणानें मला म्हणाला, " नारद ऋषे, तुम्ही युधिष्ठिरास माझा हा निरोप कळवा कीं, हे युधिष्ठिरा, सर्व पृथ्वी जिंकण्यास तूं समर्थ आहेस; तुझे भ्राते तुला अनुकूल आहेत; तर तूं राजसूय नामक श्रेष्ठ क्रतु कर. बा भारता, तूं जर हें इष्ट कार्य करशील, तर हरिश्चंद्राप्रमाणें मलाही तात्काळ तें अतुल वैभव प्राप्त होईल; आणि मग मी अनंत वर्षेपर्यंत अव्याहतपणें इंद्राच्या सभेंत अधिष्ठित होईन." राजा युधिष्ठिरा, नंतर मीं पांडु राजाला सांगितलें कीं, "बरें आहे. जर मी भूर्लोकास गेलों, तर तुझा हा निरोप तुझ्या पुत्रास (धर्मराजास) सांगेन." बा पुरुषव्याघ्रा धर्मा, माझें तुला इतकेंच सांगणें आहे कीं, तूं आपल्या पित्याची ही इच्छा परिपूर्ण कर; म्हणजे तूं पूर्वजांसह इंद्रलोकीं प्रयाण करशील.

धर्मराजा, ह्या राजसूय नामक महाक्रतूमध्यें बहुत विघ्नें येतात. ह्यांत छिद्रें कशीं पडतील ह्याची यज्ञध्वंसक ब्रह्मराक्षस वाट पहात असतात. ह्या यज्ञाच्या निमित्तानें घोर युद्धें होऊन त्यांत क्षत्रियांचा व पृथ्वीचा नाश होतो; आणि कांहीं तरी कारण उद्भवून त्यामुळें भयंकर क्षय घडून येतो. राजेंद्रा, ह्या सर्वांचें नीट मनन कर, व जें प्रशस्त दिसेल तें करण्यास सिद्ध हो. राजा, चातुर्वर्ण्याचें रक्षण करण्यास नित्य सावध व तयार अस; नेहमीं आपल्या अभ्युदयार्थ उद्युक्त हो; आणि राज्यलक्ष्मीचा उपभोग घेऊन ब्राह्मणांस धनादिकांनीं संतुष्ट कर; असो. राजा, तूं जें मला विचारिलेंस, तें तुला मीं सविस्तर सांगितलें. आतां तूं मला निरोप दे. मी येथून दाशार्ह नगरीस (द्वारकेस) जाणार आहें.

वैशंपायन सांगतात:—राजा जनमेजया, ह्याप्रमाणें युधिष्ठिरप्रभृति पांडुपुत्रांस सांगून, आपल्या बरोबरच्या ऋषिसमुदायासहवर्तमान नारद मुनि निघून गेले. नंतर धर्मराजा तो राजसूय नामक श्रेष्ठ क्रतु करण्याविषयीं आपल्या भ्रात्यांसह विचार करूं लागला.

राजसूयारंभपर्व.

अध्याय तेरावा.

—:०:—

धर्मराजाची राज्यव्यवस्था.

वैशंपायन सांगतात:—राजा जनमेजया, भगवान नारद मुनींचें तें भाषण श्रवण करून युधिष्ठिरानें सुस्कारा टाकिला, आणि राजसूय यज्ञाचा विचार एकसारखा घोळूं लागून त्याचें मन अस्वस्थ झालें. थोर थोर राजर्षींचा तो महिमा ऐकून, राजसूयादिक पुण्यकारक क्रतूंनीं इंद्रलोकादिक महान फलें प्राप्त होतात हें मनांत आणून, व त्या हरिश्चंद्र राजास राजसूय यज्ञामुळें जें अपूर्व वैभव मिळालें, तिकडे लक्ष देऊन धर्मराजानें राजसूय यज्ञ करण्याचा विचार योजिला. राजा पारिक्षिता, नंतर धर्मराजानें मयसभेंत अधिष्ठित असलेल्या सर्व सभासदांची उत्तम प्रकारें पूजा केली; आणि त्यांजकडून मंगळकारक आशीर्वाद ग्रहण करून राजसूय यज्ञाकडे विशेष चित्त लाविलें; आणि पुन:पुन: विचार करून तो दिव्य क्रतु सिद्धीस न्यावयाचाच असा त्यानें संकल्प ठरविला.

राजा, त्या महापराक्रमी व लोकोत्तर तेजस्वी युधिष्ठिराच्या अंतःकरणांत सदोदीत स्वकर्तव्याचें निदिध्यसन चालू असे. लोकांचें कल्याण कशानें घडेल, हेंच तो नेहमीं चिंती. सर्व प्रजांना संतुष्ट ठेवून, भेदाभेद न पाहतां सर्वांचा सारखाच अभ्युदय करावा, असा त्याचा परिपाठ होता. देण्यासारखी जी जी वस्तु असेल, ती ती, कोपमदादिक दुष्ट मनोवृत्तींचा निग्रह करून प्रत्येकास देत जावी, अशी त्याची सर्वांस आज्ञा असे; आणि ह्या सर्व कृत्यांमुळें त्या वेळीं "शाबास धर्मराजा, शाबास !" ह्यांवांचून अन्य उद्गार केव्हांही निघत नसत ! पारिक्षिता, धर्मराजाची वृत्ति अशा प्रकारें सर्वथा प्रशंसनीय अशी असल्यामुळें सर्व प्रजा त्यावर पितृप्रेम करूं लागल्या; 'त्याचें प्रत्येक कृत्य केवळ आपल्या कल्याणाचेंच आहे,' असा त्या प्रजांचा त्याजवर दृढ विश्वास बसला; आणि संपूर्ण राज्यांत त्यास शत्रु म्हणून कोणी न राहिल्यामुळें, त्यास अजातशत्रु असें अन्वर्थक नांव प्राप्त झालें.

राजा, त्या पांच पांडुपुत्रांनीं राज्याची जी सुव्यवस्था ठेविली होती, तिचें वर्णन करावें तितकें थोडेंच. धर्मराजाचें प्रजावात्सल्य, भीमाची प्रजारक्षणदक्षता, सव्यसाची अर्जुनाचें शत्रुसंहाराविषयीं विलक्षण सामर्थ्य, दूरदर्शी सहदेवाचें धर्मशासन, व सर्वांविषयीं नकुलाचा स्वाभाविक विनय ह्या पांच विशिष्ट गुणांनीं राष्ट्रांतील कलहाचें बीज नष्ट झालें. प्रजांस भीति म्हणून कसलीच उरली नाहीं. त्या सर्वकाल आपलीं कर्तव्यें उत्साहानें करूं लागल्या. सर्वांनीं यज्ञयागक्रिया अव्याहत चालविल्या. पर्जन्याची विपुल वृष्टि होऊं लागली. धान्यादिकांची समृद्धि झाली. निर्वाहाचीं साधनें वाढलीं. गाईंचा उत्कर्ष झाला. भूमि अधिक पीक देऊं लागली. व्यापारास तेजी आली; आणि व्याजबट्ट्याचा रोजगार वाढला.

राजा जनमेजया, ही समृद्धि होण्याचें विशेष कारण राजशासन हेंच होय. राजधर्मांवर धर्मराजाचें सर्वकाळ पूर्ण लक्ष असल्यामुळें, प्रजांकडे कराची बाकी राहणें, प्रजांपासून जुलमानें पट्टी वसूल करणें, रोगांच्या सांती येणें, अग्निप्रलय होणें, चोरांपासून व वंचकांपासून उपद्रव घडणें इत्यादि एकही गोष्ट त्याच्या राज्यांत होत नसे; मांडलिक राजे परस्परांशीं मित्रत्वानें वागत; राजाच्या प्रीतींतल्या अधिकाऱ्यांनीं कोणावर कांहीं व्यर्थ तोहमती आणिल्याचें कधींही ऐकूं येत नसे; संधिविग्रहादिक सहा उपायांत प्रवीण असलेले मांडलिक राजे धर्मराजाचें प्रिय करण्याकरितां, त्यास खंडणी देण्याकरितां व

त्याची सेवा वगैरे करण्याकरितां, मोठमोठ्या कुलीन व्यापारीवर्गासमवेत किंवा स्वतंत्रपणें, त्याजकडे नित्य येत असत; व त्याच्या राज्यांत अन्नवस्त्रादिक सुखोपभोगांची अत्यंत समृद्धि असल्यामुळें विलासी व कामुकजनही चोहोंकडून मिळाले होते; आणि ह्यास्तव त्या नीतिमान पृथ्वीपतीच्या राज्यांत सर्वत्र एकसारखी भरभराट चालली होती. राजा जनमेजया, युधिष्ठिराची व्याप्ति सर्वत्र असे; त्याच्या ठिकाणीं सर्व सद्गुण वास करीत होते; तो अत्यंत क्षमाशील होता; त्याची सत्ता अगदीं अबाधित असे; आणि त्या भाग्यशाली व परम प्रतापवान भूपतीच्या राज्यांत ब्राह्मणादि श्रेष्ठ वर्णापासून तों गोपालादि कनिष्ठ वर्णापर्यंत सर्व प्रजा त्याजवर मातेप्रमाणें व पित्याप्रमाणें अत्यंत लोभ करीत असत. असो.

राजसूयविचार.

वैशंपायन सांगतात:—राजा जनमेजया, कसेंही करून राजसूय यज्ञ करावयाचाच, असा धर्मराजाचा निश्चय ठरल्यानंतर त्यानें भ्रातृमंडळ व मंत्रिसमुदाय ह्यांस बोलावून आणून त्यांस आपला मानस कळविला; आणि त्या महाक्रतूचें महत्त्व पुन: पुन: वर्णन करून तो करण्याविषयीं त्यांचा अभिप्राय विचारिला. तेव्हां मंत्र्यांनीं, यज्ञ करण्यास उत्कंठित झालेल्या त्या महाबुद्धिमान धर्मराजास मोठें उत्तेजनकारक उत्तर दिलें.

मंत्री म्हणाले:—हे राजश्रेष्ठा, राजावर अभिषेक झाला म्हणजे त्यास जलाधिपति वरुणाचा अधिकार प्राप्त होतो; ह्यास्तव त्यास पुढें अखिल भूमीच्या आधिपत्याची (सार्वभौमपदाची) इच्छा उत्पन्न व्हावी, हें साहजिकच आहे. म्हणून, हे धर्मराजा, तूं राजसूय यज्ञ करण्याचा जो विचार ठरविला आहेस, तो तुझ्या सुहृदांस (आम्हांस) सर्वथा मान्य आहे. तुझ्या अंगीं सार्वभौम राजाला अलंकृत करणारे सर्व गुण वसत आहेत; तेव्हां कालावधि न करितां तूं राजसूयाचा उपक्रम कर. युधिष्ठिरा, ज्याच्या अंगीं क्षात्रतेज झळकत आहे, त्यानें तो महायज्ञ केव्हांही करावा.

'राजा, त्या दिव्य क्रतूंत कडकडीत व्रताचरण करणारे महान महान ऋत्विज सामवेदविहित मंत्रांनीं सहा अग्निस्थंडिलें सिद्ध करितात; त्यांत दर्वीहोम (अग्निहोत्र) आदिकरून सर्व इष्टिसोम यागांचा समावेश होतो; आणि त्याच्या अंतीं यजमानावर सर्वजित्वाचा अभिषेक करितात!

हे धर्मराजा, तूं महापराक्रमी आहेस, व आम्ही सर्व तुझी आज्ञा पाळण्यास तत्पर आहों; ह्यास्तव, राजसूय यज्ञ सिद्धीस नेण्यास तुला कांहींच विलंब लागणार नाहीं. म्हणून, हे महाराजा, तूं अगदीं विचार न करितां ह्या कार्यास उद्युक्त हो.

वैशंपायन सांगतात:—राजा पारिक्षिता, धर्मराजाच्या त्या सर्व हितचिंतक मंत्र्यांनीं ह्याप्रमाणें सगळ्यांनीं मिळून व पृथक् पृथक सुद्धां धर्मराजास सांगितलें. नंतर युधिष्ठिरानें धर्मास अनुसरून असलेलें तें सुहृद्वाक्य श्रवण करून त्याची प्रगल्भता (स्पष्टता), इष्टता व श्रेष्ठता ह्यांचें मनन केलें, आणि मंत्रिवर्गाच्या अभिप्रायाप्रमाणें आपल्या हातून राजसूय यज्ञ घडणें अत्यंत अवश्य आहे, असें त्या अरिध्वंसकाच्या मनांत पुन:पुन: घोळूं लागलें. मग त्या बुद्धिमंतानें आपले भ्राते, महात्मे ऋत्विज व धौम्यद्वैपायनादि मंत्री ह्यांपाशीं त्या विषयाची पुन: चर्चा केली.

युधिष्ठिर म्हणाला:—ऋत्विजहो, राजसूय यज्ञ करणें हें मोठें दुर्घट कृत्य आहे. ह्यास्तव, हा करण्याची इच्छा महासमर्थ राजानेंच करावी; आणि असें असतांही ही इच्छा मला उत्पन्न झाली आहे, तेव्हां ही माझी इच्छा कशी परिपूर्ण होईल हें मला सांगा. श्रेष्ठहो, आपल्या वचनावर माझा पूर्ण विश्वास आहे.

वैशंपायन सांगतात:—राजा जनमेजया, धर्मराजाचें हें भाषण ऐकून त्या ऋत्विजांनीं धर्मराजास समयानुरूप उत्तर दिलें कीं, ' हे धर्मज्ञा, तो महान् राजसूय यज्ञ करण्यास तूं सर्व प्रकारें समर्थ आहेस. ' राजा जनमेजया, ऋत्विजांनीं व ऋषींनीं धर्मराजाला ह्याप्रमाणें सांगितलें असतां, धौम्यादिक मंत्र्यांनीं तो अभिप्राय श्रवण करून त्यास आपली संमति दिली. हे पारिक्षिता, धर्मराजाची बुद्धि मोठी विशाल होती. ह्यास्तव त्या जितेंद्रिय नराधिपानें पुनः नीटपणें त्या विषयाचें आपल्याशींच मनन केलें. त्यानें मनांत आणिलें कीं, ' आपण जें कृत्य करणार, त्यापासून लोकांचें हित झालें पाहिजे, ही पहिली गोष्ट होय. जो सुज्ञ पुरुष आपल्या अंगीं सामर्थ्य कितीं आहे, देश व काल हे अनुकूल आहेत कीं प्रतिकूल आहेत, द्रव्याचा संचय व खर्चाचा अंदाज ह्यांत मेळ आहे कीं नाहीं, इत्यादि गोष्टींचा यथास्थित विचार न करितां एखाद्या महाकार्यास प्रवृत्त होतो, त्याचा कधींही नाश झाल्याशिवाय राहणार नाहीं; केवळ आपल्या बुद्धीनें जरी हा राजसूय यज्ञ सुखकर आहे असें वाटत असलें, तरी तेवढ्यावरच तो सिद्धीस जाईल, असें म्हणणें उचित नव्हे; आणि जर आपणास हा कार्यभार उचलावयाचा असेल, तर त्याचा यथार्थ निश्चय करण्यासाठीं सर्वश्रेष्ठ भगवान जनार्दन श्रीकृष्णाचेंच अनुमोदन मिळविलें पाहिजे. '

श्रीकृष्णाचें आगमन.

राजा जनमेजया, धर्मराजानें असा विचार करून त्या भगवान अचिंत्यशक्ति, जन्ममरणहीन, लीलाविग्रही, महाबाहु श्रीकृष्णाचें मनांत ध्यान केलें. राजा, श्रीकृष्णाचीं बालपणींतलीं पूतनावधादिक दिव्य कृत्यें श्रवण करून युधिष्ठिराचा असा पूर्ण तर्क झाला होता कीं, 'जगांत अविदित असें ह्यापाशीं कांहींएक नाहीं; आपल्यास न होण्यासारखें असेंही ह्याला कांहींएक नाहीं; आणि दुःसह असें सुद्धां ह्याला कांहींएक नाहीं. ' राजा पारिक्षिता, धर्मराजानें हाच आपला तर्क सुदृढ करून भगवान श्रीकृष्णाच्या सल्ल्यावांचून प्रस्तुतचा विचार कायम ठरवावयाचा नाहीं, असा निर्धार केला; आणि त्या भूताधिप जगद्गुरूकडे त्यानें लागलाच इंद्रसेन नामक दूत पाठविला.

राजा, तो दूत वेगवान रथांत बसून फार लवकर यादवांकडे गेला, आणि त्यानें द्वारकावासी श्रीकृष्णाला द्वारकेंतच गांठून त्यास धर्मराजाचा निरोप कळविला. जनमेजया, धर्मराजाला जशी श्रीकृष्णदर्शनाची उत्कट इच्छा उत्पन्न झाली होती, तशीच श्रीकृष्णालाही धर्मराजाला भेटण्याची उत्कट इच्छा उत्पन्न झाली होती. ह्यास्तव, भगवान श्रीकृष्ण इंद्रसेनासहवर्तमान इंद्रप्रस्थास येण्यास लागलाच निघाला; व त्याच्या रथास वेगवान अश्व लाविले होते, ह्यामुळें तो नानाविध देश भराभर आक्रमण करून फार लवकर इंद्रप्रस्थास येऊन पोहोंचला !

राजा, इंद्रप्रस्थास आल्यावर भगवान श्रीकृष्णाची व धर्मराजाची भेट झाली; आणि राजमंदिरांत धर्मराजानें व भीमानें श्रीकृष्णाची पित्याप्रमाणें पूजा केली. नंतर श्रीकृष्णानें आपली आत्या जी कुंती, तिची मोठ्या उत्सुकतेनें भेट घेतली. पुढें, श्रीकृष्णाचा परम मित्र अर्जुन त्याजकडे मोठ्या प्रेमानें आला; आणि त्या उभयतांनीं एकमेकांचें रंजन केलें. नंतर नकुलसहदेव हे श्रीकृष्णाची सेवा करूं लागले. पुढें भगवान लोकनायक प्रभु श्रीकृष्ण हे शुभासनावर स्वस्थपणानें अधिष्ठित आहेत असा अवसर पाहून धर्मराजा त्यांसमीप प्राप्त झाला; आणि त्यानें आपला उद्देश त्यांस विदित केला.

युधिष्ठिर म्हणाला:—हे कृष्णा, माझ्या मनांत राजसूय यज्ञ करण्याची इच्छा उद्भवली आहे;

परंतु तो केवळ इच्छेनेंच सिद्धीस जाईल, असें म्हणतां येत नाहीं. राजसूय यज्ञ पार पडण्यास काय केलें पाहिजे, हें सर्व तुला माहीत आहे. ज्याच्या ठिकाणीं सर्व शक्ति आहे, ज्यास सर्वत्र बहुमान मिळतो, व जो सार्वभौम राजा असतो त्याच्याच हातून तो महायज्ञ सिद्धीस जातो. अशा प्रकारचा तो श्रेष्ठ यज्ञ करावा म्हणून माझे सुहृद् मला सांगत आहेत. ह्यास्तव, हे कृष्णा, तूं आपला अभिप्राय मला निश्चित करून निवेदन कर, म्हणजे तदनुसार मी कायमचा निश्चय करीन. देवा, तुलाच ही गोष्ट विचारण्याचें कारण असें कीं, कित्येक विनयशील पुरुष दुसऱ्याचे दोष केव्हांही सांगतच नाहींत; कित्येक पुरुष स्वार्थासाठीं मुद्दाम प्रियच बोलत असतात; आणि कित्येक तर प्रिय बोलणें हेंच आपलें कर्तव्य समजतात; ह्यामुळें, एखादें कार्य केवळ लोकमतासच अनुसरून केल्यानें, तें खरोखरी हितप्रद होईलच असें म्हणतां येत नाहीं. म्हणून, देवा, तूं असले हे त्रिविध हेतु एकीकडे ठेवून व कामक्रोधांनीं अविकृत राहून, लोकांमध्यें जें कृत्य अत्यंत उचित असेल, तें अगदीं बरोबर रीतीनें मला सांग.

अध्याय चौदावा.

श्रीकृष्णाचें भाषण.

श्रीकृष्ण म्हणाले:—महाराजा धर्मा, राजसूय यज्ञ करण्यास ज्या ज्या गुणांची आवश्यकता असते, ते सर्व गुण तुझ्या ठायीं आहेत; ह्यास्तव तूं राजसूय यज्ञ करावा हें उचित होय. युधिष्ठिरा, सध्याची परिस्थिति ही तूं साकल्येंकरून जाणतच आहेस; तथापि कित्येक गोष्टींचा मी उल्लेख करितों, तिकडे अवधान दे.

हे धर्मराजा, प्रस्तुत काळीं जे क्षत्रिय ह्या भूतलावर वास करीत आहेत, ते सर्व केवळ नामधारी आहेत. जमदग्निपुत्र परशुरामानें क्षत्रियांचा संहार केला, त्या समयीं जे क्षत्रिय पळून जाऊन लपून वगैरे राहिले, त्यांची ही प्रजा असल्यामुळें त्यांच्या अंगीं उग्र क्षात्रतेज विद्यमान नाहीं. हे वसुधाधिपा, त्या दुर्बल व हीनवीर्य क्षत्रियांनीं असें ठरविलें आहे कीं, जो राजा सर्व क्षत्रियांस जिंकील, त्यास सर्व राजांचा राजा म्हणजे सार्वभौम राजा असें म्हणावें, व तें तुला विदित आहेच. राजा धर्मा, सांप्रत ह्या पृथ्वीवरील सर्व राजे ऐल राजांना व ऐक्ष्वाक राजांना करभार अर्पण करून, स्वतांला त्या सोमसूर्यवंशीय भूपतींचे मांडलिक म्हणवितात. कित्येक क्षत्रिय असें स्पष्टपणें पारतंत्र्य कबूल करीत नाहींत; पण त्यांच्या ठिकाणीं शौर्यादिक क्षात्रधर्मांचा अभाव असल्यामुळें, पर्यायानें, इतर मांडलिक नृपांप्रमाणें तेही त्या ऐलैक्ष्वाकुवंशीय राजांच्या इच्छेप्रमाणें वर्तत असून त्यांच्या ताब्यांतच असतात.

धर्मराजा, त्या ऐल व ऐक्ष्वाक वंशांतील राजांचीं शंभर कुलें झालीं. ययाति हा त्या ऐल राजांच्या वंशापैकींच एक होय. भोजराजे हे त्या ययाति कुलांतच जन्मले. ते मोठे गुणवान असून आज चारही दिशांस सर्वत्र पसरले आहेत; व त्यांची संपत्ति आपणास प्राप्त व्हावी म्हणून प्रत्येक क्षत्रिय नित्य प्रयत्न करीत असतो.

राजा धर्मा, नुकतेच जरासंध राजानें भोजकुलांतील सर्व क्षत्रिय आपल्या बळानें पादाक्रांत करून त्यांची राज्यलक्ष्मी हरण केली, आणि त्या सर्व क्षत्रियांनीं जरासंधाचें आधिपत्य कबूल करून त्यास सार्वभौमपदीं स्थापिलें. राजा, जरासंधाचा पराक्रम अवलोकन करून आम्हीं त्याच्या भयानें मथुरा देश सोडिला, व द्वारकेस पळून गेलों. सध्या तो जरासंध राजा चोहोंकडून आम्हांशीं वैर उत्पन्न करीत आहे.

राजा, जो भूपति सर्वांत श्रेष्ठ व अत्यंत श-

क्तिमान असतो, त्याच्या स्वाधीन सर्व पृथ्वी होते; आणि त्यामुळें साहजिकपणेंच त्यास सार्वभौमसत्ता प्राप्त होऊन मोठमोठाले प्रतापशाली राजेही त्याची सेवा करूं लागतात. पहा—तो शिशुपाल किती पराक्रमी आहे बरें? परंतु प्रस्तुत तो सर्वस्वीं जरासंधाचा अंकित होऊन त्याचा सेनापति झाला आहे! त्याप्रमाणेंच, मायेच्या प्रभावानें युद्धांत शत्रूस जिंकणारा करूष देशाचा अधिपति महाबलिष्ठ वक्र ह्यानें शिष्यभावानें जरासंधाचा आश्रय केला आहे. तसेच ते प्रतापशाली महात्मे हंस व डिंभक हेही त्या महासामर्थ्यवान जरासंधाच्या पूर्ण स्वाधीन झाले होते. त्याप्रमाणेंच वक्रदंत, करूष, करभ व मस्तकाच्या ठिकाणीं अद्भुत मणि धारण करणारा मेघवाहन हे त्या जरासंधाच्याच आज्ञेंत वागत आहेत. राजा धर्मा, लोकपाल वरुणाप्रमाणें पश्चिम दिशेस मुरु व नरक ह्यांवर सत्ता चालविणारा यवनाधिप अपरिमित बलवान असा राजाही त्याचीच आज्ञा मानीत आहे. तसाच तुझ्या पित्याचा परम स्नेही व तुझ्यावरही अंतर्बाह्य लोभ करणारा वृद्ध भगदत्त सुद्धां वाणीनें व विशेषतः कर्मानें त्यास अंकित झाला आहे. युधिष्ठिरा, पृथ्वीच्या पश्चिम व दक्षिण भागीं अधिकार चालविणारा, तुझ्याविषयीं मनापासून आदरबुद्धि ठेवणारा तुझा मातुल पुरुजित् नामक कुंतिभोज राजा हा एकटा मात्र तुझ्या पक्षास आहे.

युधिष्ठिरा, चेदि देशांत पुरुषोत्तम नांवानें प्रसिद्ध असलेला तो पौंड्रक राजा देखील पूर्वींच जरासंधास जाऊन मिळाला आहे. तो इतका मूर्ख व अविचारी आहे कीं, तो ह्या लोकीं आपणास पुरुषोत्तम अशी संज्ञा धारण करून सतत माझीं चिन्हें धारण करितो. वंग, पुंड्र व किरात ह्या देशांत त्याची सत्ता फार आहे, व लोकांत त्यास वासुदेव असें म्हणतात. राजा, ह्यास मीं अद्याप मारिलें नाहीं, व ह्यामुळें त्यास शत्रुपक्षास मिळण्याला अवसर सांपडला आहे. राजा धर्मा, त्याप्रमाणेंच आमचा श्वशुर भोजाधिपति भीष्मक राजा सुद्धां जरासंधाचाच पक्ष धरून राहिला आहे. पहा—त्याचें ऐश्वर्य कांहीं कमी नाहीं. पृथ्वीच्या चौथ्या भागाचा तो राजा आहे. तो इतका बलवान आहे कीं, त्यानें इंद्राशीं सुद्धां मैत्री जोडिली आहे. विद्येच्या बळानें त्यानें पांड्य, क्रथ व कौशिक हे देश जिंकिले आहेत. त्याचा भ्राता आकृति हा परशुरामाप्रमाणें शूर आहे; आणि असें असतांही तो पराक्रमी राजा शत्रुपक्षाचा आश्रय करून राहिला आहे, तेव्हां काय म्हणावें! राजा, आम्हीं जर त्या भीष्मकाची आज्ञा पाळिली नसती, व त्याच्याशीं प्रतिकूल वर्तन केलें असतें, तर त्यानें आम्हां संबंधीजनांशीं वैर करण्यास उद्युक्त व्हावयाचें होतें; परंतु तो ह्याप्रमाणें युक्तायुक्तविचार न करितां आणि आपल्या कुलाकडे व शक्तीकडे लक्ष न देतां, केवळ जरासंधाच्या ऐश्वर्यास भुलून त्याचा दास बनला आहे!

हे धर्मराजा, उत्तर दिशेकडील अठरा भोजकुलें जरासंधाच्या भीतीनें पश्चिम दिशेकडे जाऊन राहिलीं आहेत. शूरसेन, भद्रकार, बोध, शाल्व; पटच्चर, सुस्थल, सुकुट्ट, कुलिंद, कुंति, सोदर्य व अनुचर ह्यांसह शाल्वायन, दक्षिणपंचाल, पूर्वपंचाल, कुंतिकोसल, मत्स्य व संन्यस्तपाद हे राजे उत्तर दिशा सोडून भयानें दक्षिण दिशेस गेले आहेत; आणि त्याप्रमाणेंच इतर सर्व पंचालराजे जरासंधाच्या भीतीनें घाबरून जाऊन आपआपलीं राज्यें टाकून चारही दिशांस जिकडे मार्ग मिळाला तिकडे पळून गेले आहेत!

युधिष्ठिरा, पूर्वी एके समयीं त्या दुष्ट कंसानें यादवांचा नाश केला, आणि जरासंधाच्या मुली व सहदेवाच्या कनिष्ठ बहिणी ज्या अस्ति व प्राप्ति, त्यांस मिळवून त्यानें त्यांशीं विवाह केला. राजा धर्मा, ह्याप्रमाणें त्या नीच कंसानें आपल्या बंधुवर्गाचें म्हणजे यादवांचें निर्दलन करून

आपलें वर्चस्व स्थापिलें, हा तर त्याचा घोर अपराध होय. असो. पुढें तो दुरात्मा भोजराजांस उपसर्ग देऊं लागला; तेव्हां त्यांतील वृद्ध राजांनीं आपल्या आप्तसुहृदांचें संरक्षण करण्याकरितां आमचा आश्रय केला, व आहुकाची ती सुंदर कन्या अक्रूराला दिली. धर्मा, बलरामाच्या साहाय्यानें मीं कंस व सुनाम ह्यांस ठार मारिलें, व यादवांचें व भोजांचें तें एक महान भय नाहींसें केलें !

युधिष्ठिरा, आम्हीं कंसाचा वध करून ती भीति दूर केल्यावर जेव्हां हा जरासंध उन्मत्त झाला, तेव्हां त्याच्या नाशासाठीं आम्ही विचार करूं लागलों; पण आमचा अठरा राजकुलांचा असा निश्चय ठरला कीं, आम्ही एकसारखे महान घोर अस्त्रांनीं तीनशें वर्षेंपर्यंत जरासंधाच्या सैन्याशीं झुंजलों, तरी आमच्यानें त्या सैन्याचा नाश होणें शक्य नाहीं; आणि ह्यास्तव पश्चिम दिशेस पळून जावें हेंच श्रेयस्कर होय. राजा, जरासंधाच्या सैन्यास जें हें अपूर्व सामर्थ्य प्राप्त झालें होतें, याचें कारण त्याजकडे हंस व डिंभक नांवाचे दोन महान सेनापति होते हें आहे. ते दोघेही देवांसारखे परमप्रतापी व बलिष्ठ असून शस्त्रानें मरण्यास पात्र नव्हते. राजा, ते हंसडिंभक सेनापति व जरासंध राजा हे तिघे शूर पुरुष सर्व त्रिभुवनास अजिंक्य होते, असें माझें व अन्य सर्व राजांचें मत आहे.

राजा, त्या हंसडिंभकांच्या मरणाची कथा मोठी विचित्र आहे. आम्हां अठरा राजकुलांचा शत्रूशीं संग्राम चालला असतां हंस नामक कोणीएक महापराक्रमी राजा बलरामाच्या हातून त्यांत मारला गेला. पुढें ' हंस मारला गेला ! ' हे इतकेच शब्द कोणाएकाच्या मुखावाटे निघालेले डिंभकाच्या कानीं गेले; आणि त्या योगें डिंभकास अतिशय उद्वेग प्राप्त होऊन, मी हंसावांचून ह्या लोकीं जीवित्व धारण करणार नाहीं, असें त्यानें म्हटलें; व तात्काळ यमुना नदींत उडी टाकून तो मरण पावला ! राजा, डिंभकाची ह्याप्रमाणें अवस्था झाल्यावर तें वर्तमान हंसास समजलें, व त्या महावीरानेंही तोच क्रम स्वीकारून यमुनाजलांत आपला देह ठेविला ! ह्याप्रमाणें आपल्या पक्षाचे महाबलाढ्य दोन सेनापति मृत्युवश झाल्याचें ऐकून जरासंधास फार दुःख झालें, व तो तावडतोब समरभूमि सोडून देऊन शून्यचित्तानें स्वनगरीस चालता झाला ! धर्मा, अशा विचित्र दैवयोगानें जरासंध राजा परत गेला, तेव्हां आमचें भय कमी झालें, व आम्ही सर्वजण मथुरेंत आनंदानें राहूं लागलों !

युधिष्ठिरा, ह्याप्रमाणें जरासंध राजापासून भीति दूर होऊन आम्ही स्वस्थ चित्तानें मथुरेंत कालक्रमण करीत असतां, भर्त्याच्या मरणानें संतप्त झालेली कंसभार्या आमचा सूड उगवावा म्हणून मगधदेशीं आपल्या पित्याकडे (जरासंधाकडे) गेली, आणि ' माझ्या पतीचा अंत करणाऱ्याला ठार मार ' असें त्यास म्हणाल्याचें आम्हीं ऐकिलें. तेव्हां पुनः आम्हांस आमच्या पूर्वीच्या निश्चयाचें स्मरण झालें, आणि आम्हीं घाबरून जाऊन आपली महान संपत्ति पृथक् पृथक् वांटून घेतली; व पुत्रकलत्रादिकांसमवेत सर्वजण पश्चिम दिशेस पळून गेलों, आणि त्या रैवतक पर्वतानें शोभणाऱ्या सुंदर द्वारकेचा आश्रय केला ! धर्मा, आम्ही तेथें राहिल्यानंतर त्या द्वारकेच्या सभोंवतीं देवांना देखील दुर्भेद्य असा एक बळकट किल्ला बांधिला; आणि त्या द्वारकेंत महारथ यादवच काय, पण स्त्रिया देखील युद्ध करतील, अशी स्थिति करून टाकिली ! आतां आम्ही तेथें निर्भय आहों !

राजा धर्मा, मगधाधिपाच्या भीतींतून मुक्त होऊन रैवतक पर्वत दृग्गोचर झाला, तेव्हां माधव नामक यादववीरांना मोठा आल्हाद झाला. सामर्थ्यवान असूनही आम्ही जरासंधाच्या नाशा-

स उद्युक्त झालों नाहीं, आणि त्याच्या भीतीनें त्रस्त होऊन धेनुयुक्त रैवतक पर्वताचा आश्रय केला, ह्याचें कारण हेंच कीं, जरासंध हा आपला आप्त असल्यामुळें त्याचा नाश आमच्या हातून होऊं नये, असें आम्हांस वाटत होतें.

बा धर्मराजा, द्वारका नामक आमचें निवासस्थान तीन योजनें लांब व एक योजन रुंद असून त्याचे तीन भाग आहेत. त्यांत प्रत्येक योजनावर शंभर शंभर द्वारें असून त्यांवर वीरपराक्रमद्योतक तोरणें आहेत. द्वारवती नगरींत युद्धधुरंधर असे निदान अठरा क्षत्रियसमुदाय केव्हांही युद्धास सिद्ध असतात. आमच्या कुळांत अठरा हजार बांधव आहेत. आहुकाला शंभर पुत्र असून त्यांतील प्रत्येक देवतुल्य पराक्रमी आहे. भ्रात्यांसह चारुदेष्ण, चक्रदेव, सात्यकि, बलराम, सांब, प्रद्युम्न व मी असे आम्ही सातजण रथ (रथी) आहों. कृतवर्मा, अनाधृष्टि, समीक, समितिंजय, कंक, शंकु व कुंति हे सात, तसेच अंधकभोजाचे पुत्र दोन, व तो वृद्ध अंधकभोज स्वतः एक असे एकंदर दहा महारथ आहेत. असो; राजा, वज्रतुल्य बलिष्ठ असे ते यादवांकडील महारथ वीर द्वारकेंत जरी राहात आहेत, तरी त्यांस रात्रंदिवस मथुरा देशाची आठवण होते!

हे कौरवश्रेष्ठा धर्मा, सार्वभौमपदास अवश्य असलेले सर्व गुण तुझ्या ठायीं सदोदीत विद्यमान असून शिवाय महाबलिष्ठ यादववीरांचेंही तुला आनुकूल्य आहे; ह्यास्तव, सर्व क्षत्रियांवर वर्चस्व स्थापून तूं सार्वभौमपदाची प्राप्ति करून घे. पण, धर्मा, जोंपर्यंत महापराक्रमी जरासंध जिवंत आहे, तोंपर्यंत तुझ्या हातून राजसूय यज्ञ सिद्धीस जाईल, असें मला वाटत नाहीं.

हे कौरवेश्वरा, त्या जरासंधानें सर्व राजे जिंकून गिरिव्रज नामक नगरीमध्यें कोंडून ठेविले आहेत. त्यांची ती दीन अवस्था पाहून, जणू काय महान महान गज मृगेंद्रानें हिमालय पर्वताच्या गव्हरामध्येंच कोंडून ठेविले आहेत असें भासतें! युधिष्ठिरा, अजून घोर अनर्थ तो ह्यापुढेंच आहे: तो हा कीं, त्या जरासंधाच्या मनांत उमापति महादेवाला ते सर्व राजे बलि देऊन तृप्त करावयाचें आहे! धर्मराजा, जरासंधाला हें सर्व अगाध सामर्थ्य महादेवाच्या तपश्चर्येनेंच प्राप्त झालें; व तो सर्व राजांना जिंकून त्यांचा वध करण्याची प्रतिज्ञा आतां लवकरच सिद्धीस नेईल. युधिष्ठिरा, सैन्यासहित चालून आलेल्या राजांना एकसारखे जिंकून त्यानें आपल्या नगरास आणिलें, व त्यांस जणू काय एका दावणीस बांधून त्यानें त्यांचा मोठा गोठाच तयार केला आहे! राजा, त्या समयीं आम्ही सुद्धां त्या दावणींत सांपडावयाचे; पण आम्हीं भीतीनें मथुरेंतून पळून जाऊन द्वारकेचा रस्ता धरिला, म्हणूनच त्या अरिष्टांतून आम्ही सुटलों! राजा धर्मा, जर तुझ्या मनांत हा राजसूय यज्ञ करावयाचा असेल, तर प्रथम त्या दुष्ट जरासंधाला ठार मारून त्याच्या कारागृहांत असलेल्या राजांची सुटका करण्याचा प्रयत्न कर. हे बुद्धिमंता पांडुतनया, जर हें घडलें नाहीं, तर हा राजसूय यज्ञ यथास्थितपणें पार पडणें कठिण आहे. राजा, मला हें असें वाटतें, मग तुझ्या विचारास कांहींही येवो. तेव्हां ह्या सर्व स्थितीचा विचार करून युक्तायुक्त गोष्टीचा तूं निश्चय कर, व तुला काय वाटतें, तें मला सांग.

अध्याय पंधरावा.

—:०:—

युधिष्ठिरश्रीकृष्णसंवाद.

युधिष्ठिर म्हणालाः—हे कृष्णा, तूं दूरवर दृष्टि देऊन जें कांहीं मला सांगितलेंस, तें सांगण्यास दुसरा कोणीही समर्थ नाहीं. ह्या पृथ्वीवर संशयाची निवृत्ति करणारा एक तूंच आहेस. हे यादवेश्वरा, घरोघर राजे लोक आपआपलें प्रिय करण्यांत तत्पर आहेत; परंतु त्यांस सार्व-

भौम पदवी प्राप्त झाली नाहीं. कारण, ती प्राप्त होणें मोठें दुष्कर आहे. असो.

श्रीकृष्णा, तूं जी मला परिस्थिति निवेदन केलीस, तिच्यावरून शत्रूचा दिव्य पराक्रम, विशाल ऐश्वर्य इत्यादिकांचें यथार्थ स्वरूप मला कळून आलें; परंतु तितक्यानेंच मी प्रशंसेला पात्र नाहीं. पराक्रमी वीराशीं गांठ पडली असतां जर माझ्या हातून कांहीं विशेष श्लाध्य कृत्य घडेल, तर मात्र मी प्रशंसनीय ठरेन.

देवा, ही अवाढव्य पृथ्वी किती तरी विस्तृत आहे. हिच्यामध्यें अनंत रत्नें भरलेलीं आहेत. तेव्हां आपलें श्रेय कशांत आहे हें ज्या पुरुषाला पाहावयाचें असेल, त्यानें केवळ आपल्या भोंवतालच्याच परिस्थितीचें मनन करून भागावयाचें नाहीं. त्यानें कांहींसें दूर जाऊन यथार्थ निर्णय करावा. श्रीकृष्णा, सर्व गोष्टींचा यथासांग विचार करितां मला असें वाटतें कीं, शम हाच कल्याणप्रद होय. शमापासूनच माझे मनोरथ सिद्धीस जातील. देवा, सार्वभौमपदप्राप्तीचा प्रयत्न मी करीत नाहीं; कारण तें पद दुष्प्राप्य आहे असें मी मानितों.

जनार्दना, ह्या सभेंत अधिष्ठित असलेल्या सत्कुलीन व विवेकसंपन्न अशा दुसऱ्या सभासदांचेंही मत माझ्या मताप्रमाणेंच असेल; कारण, लोकोत्तर पराक्रम करून जो कधीं तरी जरासंधादिक राजांस जिंकील, असा ह्यांच्यांत कोण आहे, हें त्यांस माहीत आहे. हे अनघा, जरासंधाच्या भीतीनें व त्याच्या दुष्ट स्वभावामुळें मी तर अगदीं शंकित झालों आहें. हे दुर्धर्षा, तूं देखील जर त्या जरासंधाला भीत आहेस, तर केवळ तुझ्या आश्रयावर अवलंबून राहणारे आम्ही कसे भिणार नाहीं? तथापि, हे माधवा, तूं, बलराम, भीमसेन किंवा अर्जुन ह्यांपैकीं कोणाच्या तरी हातून त्या जरासंधाचा वध होणें शक्य आहे कीं नाहीं, ह्याचा मी पुनःपुनः विचार करीत आहें. हे केशवा, माझी सर्व भिस्त तुझ्यावर आहे; तूं जसें सांगशील तसें मी करणार; तुझ्या सल्ल्यावांचून कोणतेंही कृत्य करण्यास मी सिद्ध नाहीं.

'वैशंपायन सांगतात:—राजा जनमेजया, ह्याप्रमाणें धर्मराजाचें भाषण श्रवण करून, भीमसेनानें मोठें समयोचित भाषण केलें.

भीमसेन म्हणाला:—हे धर्मराजा, कोणत्याही कार्यास प्रवृत्त न होतां स्वस्थ बसणारा राजा वारुळाप्रमाणें नाश पावतो; व बलवानाचा आश्रय करून राहणारा दुर्बल राजा प्रयत्न करावयाचा सोडून देईल, तर तोही तसाच अस्तंगत होतो. दुर्बल पुरुषही सावधपणानें वागून बलिष्ठ शत्रूचा बहुधा पराजय करील, आणि राजनीतींतील नियम उत्तम प्रकारें पाळून स्वहितकारक गोष्टी प्राप्त करून घेईल. राजा, श्रीकृष्णाजवळ राजनीति, माझ्या अंगीं बळ, व धनंजयाच्या ठिकाणीं विजयश्री अशीं तीन दिव्य साधनें आपणांपाशीं वास करीत आहेत; ह्यास्तव, तीन अग्नि जसे इष्टिरूप कार्य सिद्धीस नेतात, तसे आम्ही तिघे जरासंधहननरूप कार्य सिद्धीस नेऊं.

श्रीकृष्ण म्हणाला:—युधिष्ठिरा, परिणामाकडे दृष्टि न देतां जो पुरुष एखाद्या कार्यास एकदम प्रारंभ करितो, तो बालिश होय. असा पुरुष केवळ स्वार्थाकरितां उतावळा होऊन एखादें कार्य करूं लागला, तर शत्रु त्याची पर्वा करीत नाहींत. बा धर्मा, तुझ्या मनांत राजाधिराज ही पदवी केवळ एखाद्या विशिष्ट गुणामुळें मिळवावयाची नाहीं. तुला ती सर्व प्रकारांनीं मिळवावयाची आहे. आजपर्यंत पुष्कळ राजे एकेका गुणानें अधिराज होऊन गेले. मांधात्यानें जिंकण्यास योग्य असे सर्व राजे जिंकून ती श्रेष्ठ पदवी प्राप्त करून घेतली; भगीरथानें प्रजापालनामुळें ती अत्यंत प्रशंसनीय पदवी मिळविली; कार्तवीर्यानें तपःसामर्थ्यानें तें पद हस्तगत केलें; भरतानें आपल्या अमोघ नीतिबलावर आपली

सार्वभौमसत्ता स्थापिली; आणि मरुत्तानें धनादिकांची वृद्धि करून तें पद संपादिलें. राजा, ह्या पांच राजांनीं एकेका गुणानें आधिपत्य मिळविलें; पण तूं सर्व गुणांनीं आधिपत्य मिळवावें अशी इच्छा करीत आहेस.

राजा, साम्राज्याचें लक्षण मुख्यतः पांच प्रकारचें आहेः [१] निग्रह करण्यास योग्य असे जे शत्रु असतील, त्यांस हस्तगत करून घेणें, [२] प्रजेचें उत्तम पालन करणें, [३] तपश्चर्यादिक धार्मिक कृत्यें आचरणें, [४] राष्ट्रांतील नीतिमत्ता वाढविणें, व [५] अर्थवृद्धि घडवून आणणें. युधिष्ठिरा, ह्या पांचही लक्षणांनीं युक्त असें सार्वभौमपद तुला मिळवावयाचें आहे. जरासंधानें प्रस्तुत जें साम्राज्य मिळविलें आहे, तें कांहींसें पहिल्या प्रकारांत येतें; परंतु वास्तविक स्थिति तशीही नाहीं. त्यानें ज्या राजांचा निग्रह केला आहे, ते त्यास खरोखरी वश झाले नाहींत. सुमारें शंभर राजे मनानें त्यास अगदीं प्रतिकूळ आहेत; ह्यास्तव तो केवळ बळजोरीनें साम्राज्यपदाचा उपभोग घेत आहे असें म्हटलें पाहिजे. युधिष्ठिरा, महान महान रत्नाधीश राजे जरासंधाची शुश्रूषा करण्यास सिद्ध आहेत; परंतु तेव्हढ्यावर त्या मूर्ख व अदूरदर्शी राजाला संतोष होत नाहीं. पहा—जरासंधाचा अमात्य मूर्धाभिषिक्त राजांना बळानें ओढून आणितो, व त्यांच्या संपत्तीचा अपहार करितो. युधिष्ठिरा, हा असा क्रम एकसारखा चालू आहे. ह्याच्या विरुद्ध घडून आलेलें आम्हीं कधींही पाहिलें नाहीं. धर्मराजा, जरासंधानें सुमारें शंभर राजांना अशा अविचारीपणानें आपल्या ताब्यांत ठेविलें आहे. तेव्हां जरासंधासारख्या अशा दुष्ट राजाशीं सलगीचें वीकर्णें करण्यास तुजसारख्या दुर्बलतर राजानें कसें सिद्ध व्हावें बरें ? हे कौरवेश्वरा, पशुपति महादेवाला बळि देण्याकरितां पशूंप्रमाणें प्रोक्षण करून कोंडून ठेविलेल्या त्या राजांना जीवित्वाची तरी इच्छा असेल, असें मला वाटत नाहीं. असो. युधिष्ठिरा, अशा ह्या प्रसंगीं मागधराजाशीं युद्ध करावें, हेंच मला हितकर वाटतें; कारण, युद्धांत पतन पावल्यानें क्षत्रियाचा परलोकीं सत्कार होतो. ह्या उद्योगास प्रवृत्त होऊन जर आपण जरासंधाचा नाश केला. तर कदाचित् त्या शहायशीं राजांची आपल्या हातून सुटका होईल; व आणखी चौदा राजे मिळविल्यावर जो घोर अनर्थ व्हावयाचा आहे, तो टळेल. सारांश, हे धर्मराजा, जो पुरुष त्या राजांच्या वधास व्यत्यय आणील, व लोकोत्तर कीर्ति मिळवील, तोच जरासंधास जिंकून निश्चयानें सार्वभौम राजा होईल.

अध्याय सोळावा.

—:०:—

अर्जुनाचें भाषण.

युधिष्ठिर म्हणालाः—हे श्रीकृष्णा, सार्वभौमपदाची इच्छा करून केवळ स्वार्थाकरितां मी तुम्हांस जरासंधाकडे पाठविण्याचें साहस कसें करीन बरें ? अरे, भीम व अर्जुन हे माझे दोन नेत्र, व तूं श्रीकृष्ण हें माझें मन होय; तेव्हां मी मन व नेत्र ह्यांविरहित झाल्यास माझे जीविताची अवस्था कशी होईल बरें ? हे यदुवीरा, जरासंधाच्या त्या अगाध व दुर्धर सैन्याशीं गांठ पडल्यावर युद्धामध्यें साक्षात् यमालाही जय मिळणें कठिण आहे; मग तुमची कथा काय सांगावी ? हे केशवा, जो पुरुष हें विपरीत कृत्य करण्यास उद्युक्त होईल, त्याजवर महान अनर्थ ओढवेल; ह्यास्तव राजसूय यज्ञ करण्याचा माझा विचार अयोग्य व व्यर्थ होय, असें मी मानितों. श्रीकृष्णा, अशा ह्या स्थितींत निदान मला तर हेंच उचित दिसतें कीं, आतां सर्वसंगपरित्याग करून सगळेच प्रापंचिक व्यवसाय संपवावे; कारण हा दुर्घट राजसूय यज्ञ माझ्या चित्तास अत्यंत पीडा देत आहे.

वैशंपायन सांगतातः—राजा जनमेजया, ह्याप्रमाणें युधिष्ठिराचें भाषण श्रवण करून अर्जुनानें आपलें तें श्रेष्ठ गांडीव धनुष्य, अक्षय्य बाणभाते, रथ, ध्वज व सभा ह्यांकडे अवलोकन केलें; आणि त्यानें युधिष्ठिराशीं बोलण्यास प्रारंभ केला.

अर्जुन म्हणालाः—हे वरिपुंगवा, असें विनाकारण हताश होणें उचित नाहीं. धनुष्य, शस्त्र, बाण,उत्साह, सैन्य, कार्याकार्यविवेक,यश व प्रत्यक्ष भगवान श्रीकृष्ण हीं सर्व दुष्प्राप्य असतांही आपल्या इच्छेनुरूप आपणांस प्राप्त झालीं आहेत. सत्कुलामध्यें जन्म मिळणें ही गोष्ट अत्यंत प्रशंसनीय होय असें विद्वान पुरुष प्रतिपादितात; पण माझ्या मतानें उत्साहासारखी (उमेदीसारखी) एकही अन्य वस्तु प्रशंसनीय नाहीं; ह्यासाठीं उत्साह हाच मला अतिशय आवडतो. उत्साहहीन पुरुष कृतवीर्याच्या कुळांत जन्मला असला, तरी त्याच्या हातून काय होणार आहे! वीराला शोभणारा उत्साह जर अंगीं असेल, तर निर्वीर्य कुळांत जन्मलेल्या त्या सोत्साह पुरुषाचीच योग्यता अधिक होय. महाराज, ज्या पुरुषाचा कल सदासर्वकाळ शत्रूंला जिंकण्याकडे असतो, तोच खरा खरा क्षत्रिय समजावा. अशा वीराच्या ठिकाणीं इतर सर्व गुणांचा अभाव असला तरी तो शत्रूंचा विध्वंस उडविल्याशिवाय राहणार नाहीं. राजा, बाकीचे सगळे गुण विद्यमान आहेत, पण त्यांबरोबर एक उत्साह मात्र नाहीं, तर त्या गुणांचा कांहीं उपयोग नाहीं. इतर सर्व गुण पराक्रमी पुरुषाचें मात्र तेज वाढवितात. दुर्बळाला ते सर्व अगदीं व्यर्थ होत.

धर्मराजा,जयप्राप्तीचें मुख्य कारण—निर्धाराचा प्रयत्न व दैवाची अनुकूलता हें आहे. परंतु केव्हां केव्हां ह्या दोहोंचा संयोग असूनही बलवान पुरुष प्रमादांच्या योगानें जयप्राप्ति करूं शकत नहीं; आणि त्याच रंध्रांमुळें शत्रूपुढें त्या बळवंताची दाणादाण उडून जाते. राजा, दैन्य व मोह ह्या दोहोंच्याही योगानें बळवानाळा अपजय येतो; ह्याकरितां, विजयेच्छु वीरानें ह्या दोन्ही विनाशहेतूंचा अवश्य त्याग करावा. प्रस्तुत काळीं रायसूय यज्ञाकरितां जरासंधाचा वध व त्यानें कोंडलेल्या राजांचें संरक्षण हीं जर आम्हांस करितां आलीं, तर ह्याहून दुसरें तें कोणतें महत्कार्य आहे बरें?

राजेश्वरा, आपण कार्याला आरंभच केला नाहीं, तर आपल्यापाशीं जयसाधनें नाहींतच हें निश्चितच ठरेल; परंतु वास्तविकपणें आपणापाशीं तर जयसाधनें भरपूर आहेत; तेव्हां आपण शत्रुनाशाचा प्रयत्न करण्यास लागावें, हेंच योग्य होय. राजा, गांडीवासारखें धनुष्य व श्रीकृष्णासारखा मंत्री असल्यावर आपणांस कोणतेंही कार्य अवघड नाहीं, हें आपण पूर्णपणें लक्षांत आणिलें पाहिजे. असो. साम्राज्य मिळणें शक्य असल्यामुळें, आपण शत्रूंशीं युद्ध करावयास प्रवृत्त व्हावें, हेंच अवश्य होय. सर्वसंगपरित्याग करून काषाय वस्त्रें (भगव्या छाट्या) धारण करण्याची पाळी आल्यास तीं पुढेंही धारण करितां येतील!

अध्याय सतरावा.

श्रीकृष्णाचें भाषण.

श्रीकृष्ण म्हणालेः—राजा धर्मा, अर्जुनानें जे हे विचार प्रदर्शित केले, ते भरताच्या वंशांत व कुंतीच्या उदरीं जन्म पावलेल्या धनुर्धराला शोभण्यासारखेच आहेत. युधिष्ठिरा, मृत्यु हा रात्रीं येणार किंवा दिवसास येणार हेंही जर आपणांस समजत नाहीं, अथवा युद्ध न केल्यामुळें कोणी एखादा पुरुष अमर झाला असेंही जर आपणी ऐकत नाहीं, तर युद्धापासून पराङ्मुख होण्यांत लाभ तो कोणता? तेव्हां राजधर्मास अनुसरून

शत्रुनाशाचा उपक्रम करणें, हीच गोष्ट भाग्येच्छु पुरुषांनीं अवश्य करावी, व त्या योगें मनाचें समाधान मानून पश्चात्तापाचें बीज उरवूं नये.

हे भारतश्रेष्ठा, युद्धादिकांच्या प्रारंभीं योग्य सल्लामसलत व दैवाची अनुकूलता ह्यांचा सुयोग जमून आला, तर शत्रुनाशाचा उपक्रम सिद्धीस गेला म्हणूनच समजावें; कारण, अशा समयीं शत्रूशीं युद्धास उभें राहिलें म्हणजे निश्चयानें आपलें वर्चस्वच होतें, व दोघां पक्षांची बरोबरी कधींही होत नाहीं. त्याप्रमाणेंच, अयोग्य सल्लामसलत व दैवाची प्रतिकूलता ह्यांचा योग जमून आला, तर त्या योगें युद्धांत शत्रूपासून आपला विध्वंस उडतो; परंतु दोन्ही पक्षांस योग्य सल्लामसलत व दैवाचें आनुकूल्य मिळाल्यास कोणताच पक्ष विजयी न होतां वर्चस्वाबद्दल महान संशय राहतो.

राजा, ह्यावरून हें उघड आहे कीं, शत्रुनाशास उद्युक्त होण्यापूर्वीं आपली सल्लामसलत अगदीं उत्तम अशी असली पाहिजे. राजनीतींतील तत्त्वांचा यथायोग्य विचार करून नंतर जर आपण शत्रूच्या समीप गेलों, तर नदीच्या वेगानें जसे तीरावरील वृक्ष उन्मळून पडतात, तसेंच आपण शत्रूचें उत्पाटन करूं. शत्रूवर चालून जाण्यापूर्वीं, स्वपक्षांत जीं रंध्रें असतील, तीं गोपन करावीं, व परपक्षांत जीं रंध्रें असतील, त्या ठिकाणींच शत्रूवर हल्ला करावा; म्हणजे अपजय होण्याचें मुळींच कारण नाहीं. सैन्यादिकांची उत्तम रचना करून व्यवस्थित रीतीनें तोंड देण्यास प्रबळ शत्रु सिद्ध असेल, तर त्याजबरोबर युद्धप्रसंग करूं नये, असें जें राजकारणी पुरुषांनीं ठरविलें आहे, तें मलाही मान्य आहे.

धर्मराजा, राजनीतींतील तत्त्वांचा पूर्ण विचार करूनच आम्ही आपलें कर्तव्य करूं; आम्ही कोणत्याही अप्रशस्त मार्गाचें अवलंबन न करितां गुप्तपणें शत्रुगृहीं प्रविष्ट होऊं; आणि जरासंधाच्या देहाशीं लगट करून इष्ट कार्य सिद्धीस नेऊं. राजा, ह्या युक्तीवांचून जरासंधाशीं आमचा निभाव लागणार नाहीं; कारण, देहगत जीवात्मा ज्याप्रमाणें देहाचे सर्व भोग नित्य एकटा उपभोगितो, त्याप्रमाणें तो पुरुषव्याघ्र जगतांतील सर्व शक्तिरूप साधनें नित्य एकटा उपभोगीत आहे. ह्यास्तव, त्याच्या साधनांत व्यंग किंवा रंध्र वगैरे आम्हांस सांपडेल, व त्या योगें आम्ही त्याचा नाश करूं, हें मिथ्या होय. बरें, कदाचित् आम्ही त्यास गांठून फसवून मारिल्यानंतर त्याच्या सैन्यानें आम्हांवर चाल करून आमचा वध केला, तर आम्हीं बंधुवर्गीय राजांच्या त्राणाकरित आपले देह धारातीर्थीं ठेविले असें होऊन आम्हांस स्वर्ग तरी मिळेल !

युधिष्ठिर म्हणाला:—हे श्रीकृष्णा, ह्या जरासंधाची उत्पत्ति, सामर्थ्य व पराक्रम ह्यांचें तूं वर्णन कर. देवा, तुझ्या अग्नितुल्य शरिराला स्पर्श करून तो यःकश्चित् शलभरूप जरासंध वांचला तरी कसा, हें मला समजत नाहीं !

श्रीकृष्ण म्हणाला:—धर्मराजा, जरासंधाचें सामर्थ्य व पराक्रम किती आहे, आणि त्यानें आम्हांस अनेक वेळां पीडा दिली असतां आम्हीं त्याची उपेक्षा कां केली, तें सर्व ऐक.

जरासंधाची उत्पत्ति.

धर्मराजा, पूर्वी बृहद्रथ नामक एक महाबलिष्ठ राजा मगध देशांत होऊन गेला. त्याच्याजवळ तीन अक्षौहिणी सैन्य असे. 'मी कोणासही युद्धांत जिंकीन,' असा तो अभिमान बाळगी. तो मोठा रूपवान, वीर्यशाली व अतुलप्रतापी असून त्याचें वैभव लोकोत्तर होतें. ह्याच्या शरिरावर दीक्षेचीं चिन्हें नित्य असत; त्यामुळें, हा दुसरा इंद्रच आहे कीं काय, असा भास होई ! त्याची कांति सूर्याप्रमाणें होती; तो पृथ्वीप्रमाणें क्षमाशील होता; यम व मृत्यु ह्यांप्रमाणें त्याच्या ठिकाणीं क्रोध असे; आणि तो कुबेराप्रमाणें संप

त्तिमान होता. राजा, ज्याप्रमाणें सूर्याच्या किरणांनीं सर्व भूमंडळ व्यापून जातें, त्याप्रमाणें बृहद्रथाच्या कुळ, शील, दया, दाक्षिण्य वगैरे गुणांनीं सर्व भूमंडळ व्यापून गेलें होतें.

हे भरतर्षभा, त्या प्रतापशाली बृहद्रथ राजानें काशिराजाच्या दोन जुळ्या व रूपसंपन्न मुलींशीं विवाह केला, आणि त्यांस 'मी तुम्हांवर एकसारखें प्रेम ठेवीन' असें वचन दिलें. ज्याप्रमाणें हत्तीणींच्या समागमें हत्ती शोभतो, त्याप्रमाणें त्या सुंदर व प्रियकर अशा उभय स्त्रियांच्या समागमें तो पृथ्वीपति बृहद्रथ शोभत असे. राजा, त्या दोघी काशिराजकन्या व तो ब्रहद्रथ राजा म्हणजे जणू काय त्या गंगा-यमुना व तो मूर्तिमान महासागर ह्यांचाच तो समागम आहे, असें वाटे !

धर्मराजा, त्या दोन्ही राण्यांसहवर्तमान विषयोपभोग घेत असतां बृहद्रथ राजाचें तारुण्य गेलें; पण वंशाचा विस्तार करण्यास त्याला एकही पुत्र झाला नाहीं. त्यानें पुष्कळ मंगलकारक होमहवनें व पुत्रकामेष्टि केल्या; परंतु त्या व्यर्थ गेल्या. पुढें एके समयीं महात्म्या काक्षीवान् गौतमाचा महातपस्वी व उदारधी असा चंडकौशिक नांवाचा पुत्र यदृच्छेनें येऊन आम्रवृक्षाच्या मूळाशीं बसला आहे असें त्यानें ऐकिलें. तेव्हां बृहद्रथ राजा आपल्या उभय स्त्रियांसमवेत तेथें गेला; व त्यानें मुनींना योग्य असे सर्व पदार्थ अर्पण करून त्यास संतुष्ट केलें. नंतर तो सत्यनिष्ठ व सत्यभाषणी ऋषिश्रेष्ठ राजाला म्हणाला, "हे राजेंद्रा, मी संतुष्ट झालों आहें. तुला कोणता वर पाहिजे असेल, तो मागून घे." तेव्हां राजा भार्यांसह हात जोडून मुनीपुढें उभा राहिला, व पुत्रप्राप्तीविषयीं निराश झाल्यामुळें कंठ दाटून येऊन म्हणाला, "हे भगवंता, मी राज्याचा त्याग करून तपोवनांत निघालों आहें; ह्यास्तव मला मंदभाग्याला वर मागून काय करावयाचें आहे! आणि मला निपुत्रिकाला राज्याची तरी काय गरज आहे!"

राजा धर्मा, बृहद्रथाचे ते उद्गार श्रवण करून चंडकौशिक मुनीची मनोवृत्ति क्षुब्ध झाली, व तो त्याच आम्रवृक्षाच्या छायेंत कांहीं वेळ ध्यानस्थ बसला. इतक्यांत त्याच्या मांडीवर राघूनें चोंच न मारिलेलें असें एक रसभरित आम्रफल पडलें. तेव्हां त्या मुनिश्रेष्ठानें लागलेंच तें अप्रतिम आम्रफल उचलून घेऊन त्यावर हृदयानें अभिमंत्रण केलें व तें राजास दिलें. राजा धर्मा, बृहद्रथ राजाला पुढें त्या आम्रफलापासूनच पुत्र झाला. असो, चंडकौशिक ऋषीनें तें दिव्य फल दिल्यावर राजाला म्हटलें, "राजा तूं कृतार्थ झालास; तूं आतां परत जा." नंतर तें मुनिवचन श्रवण करून राजानें त्या मुनिश्रेष्ठाच्या पायांवर मस्तक ठेविलें, व तो स्वगृहीं परत गेला. हे भरतश्रेष्ठा, राजाची पहिलीच अशी प्रतीज्ञा होती कीं 'मी दोन्ही पत्न्यांशीं समभावानें वागेन.' ह्यास्तव त्यानें तें आम्रफल दोघी स्त्रियांना मिळून अर्पण केलें. नंतर त्यांनीं त्या फळाचीं दोन शकलें केलीं, व त्या पैकीं एकेक प्रत्येकीनें भक्षिलें !

राजा धर्मा, त्या महान चंडकौशिक ऋषीचें वचन मिथ्या कसें होईल? बृहद्रथाच्या उभय पत्नींनीं तीं शकलें भक्षण केल्यावर त्यांच्या योगें पुत्रप्राप्तिरूप भावी अर्थ सिद्ध होण्याकरितां त्या दोघींच्याही उदरामध्यें गर्भसंभव झाला. आपल्या स्त्रिया गर्भिणी आहेत, असें अवलोकन करून बृहद्रथ राजाला मोठा आनंद वाटला. हे महाप्राज्ञा, पुढें योग्य काळ गेल्यावर त्या उभय भार्या प्रसूत होऊन प्रत्येकीस पुत्रशरिराचें एकेक शकल जन्मलें! त्या शकलांस प्रत्येकीं एक नेत्र, एक बाहु, एक चरण, अर्धें उदर, अर्धें मुख व अर्धी कमर असे अवयव होते. युधिष्ठिरा, बृहद्रथ राजाच्या स्त्रिया तो विपरीत प्रकार पाहून अतिशय घाबरून थरथर कांपूं लागल्या. नंतर

त्या बहिणींनीं उद्विग्न होऊन आपसांत विचार ठरविला, आणि त्यांनीं मोठ्या दुःखानें तीं दोन्ही सजीव देहशकलें टाकून दिलीं! तेव्हां त्यांच्या दाया, तीं दोन्ही शकलें, पतन पावलेल्या गर्भाप्रमाणें नीट गुंडाळून घेऊन अंतःपुराच्या बाहेर आल्या, व अगदीं चवाठ्यावर तीं शकलें टाकून देऊन परत निघून गेल्या!

हे भरतश्रेष्ठा, पुढें तीं जिवंत शकलें, रक्तमांसावर उपजीवन चालविणाऱ्या जरा नामक राक्षसीच्या दृष्टीस पडतांच तिनें तीं घेतलीं, व सुलभ रीतीनें नेतां यावीं म्हणून, जणू काय दैवाची प्रेरणा झाल्यामुळें तीं एकत्र जोडिलीं! राजा, जरा राक्षसीनें तीं एके ठिकाणीं मिळवितांच एक देह धारण करणारा असा एक वीर बालक सिद्ध झाला! तें पाहून जरेस मोठें आश्चर्य वाटलें. नंतर तिनें तो बालक ओढून नेण्याचा प्रयत्न केला; पण त्या वज्रसारमय बलिष्ठ बालकास तिच्यानें ओढवेना!

युधिष्ठिरा, बृहद्रथ राजाच्या स्त्रियांनीं टाकून दिलेल्या त्या गर्भशकलांपासून तो वीर बालक निर्माण झाल्यावर त्यानें आपल्या आरक्तवर्ण हाताची मूठ वळून तोंडांत घातली, आणि तो सजल मेघाप्रमाणें मोठमोठ्यानें आक्रोश करूं लागला. धर्मराजा, तो शब्द कानीं पडतांच अंतःपुरांत एकच धांदल उडाली, आणि सर्व मंडळी बृहद्रथ राजासह बाहेर पडली. त्या समयीं त्या निराश व म्लान होऊन बसलेल्या दोन्ही राण्याही एकदम लगबगीनें उठल्या, व मुलास पाजण्यासाठीं उतावीळ होऊन त्या मंडळीबरोबर निघाल्या. ह्याप्रमाणें बृहद्रथ राजा, त्याच्या पत्न्या व अंतःपुरांतील सर्व जन त्या चवाठ्यावर येऊन त्या बालकासमीप उभे राहिले, तेव्हां त्यांस व त्या बलवान अर्भकास अवलोकन करून जरा राक्षसीनें मनांत आणिलें कीं, "अरेरे! ह्या थोर, धार्मिक व पुत्रेच्छु राजाच्या राज्यांत मी राहत आहें; तेव्हां त्यां ह्या राजपुत्रास मारावें हें अगदीं अनुचित होय." राजा धर्मा, असा विचार करून, मेघाच्या कलेनें जसें सूर्यबिंबास उचलून घ्यावें, तसें जरेनें त्या बालकास उचलून घेतलें, आणि मानवरूप धारण करून ती बृहद्रथ राजास म्हणाली, "हे बृहद्रथा, हा तुझा पुत्र आहे, हा मी तुला देत आहें; तर तूं ग्रहण कर. चंडकौशिक ब्राह्मणाच्या वरानें तुझ्या दोन भार्यांच्या उदरीं हा जन्म पावला, व दायांनीं टाकून दिलेला हा मीं रक्षिला आहे!"

श्रीकृष्ण सांगतोः—राजा युधिष्ठिरा, नंतर काशिराजाच्या त्या दोन्ही कन्यकांनीं लागलाच तो बालक उचलून घेतला, व त्याला पयःस्नानानें अगदीं भिजवून टाकिलें! बृहद्रथ राजालाही त्या वेळीं मोठा आनंद झाला, व सर्व वृत्तांत ध्यानीं आणून सुवर्णतुल्य सुंदर स्वरूप धारण करणाऱ्या मानववेषी राक्षसीस त्यानें विचारिलें, "हे सुवर्णलतिके, तूं कोण आहेस बरें? हा पुत्र तूं मला दिलास, ह्यावरून, स्वच्छंदानें भ्रमण करणारी तूं कोणी तरी देवता असावीस असें मला वाटतें."

अध्याय अठरावा.

—:o:—

जरा राक्षसीचें भाषण.

जरा राक्षसी म्हणालीः—बृहद्रथ राजा, तुझें कल्याण असो. मी स्वेच्छेनें पाहिजे तें रूप धारण करणारी जरा नामक राक्षसी आहें. राजेंद्रा, तुझ्या गृहीं माझें नित्य पूजन होत असतें, ह्यामुळें मी सुखानें राहिलें आहें. बृहद्रथा, मी मनुष्यांच्या घरोघर नित्य वास करितें. ब्रह्मदेवानें दिव्य देह धारण करणाऱ्या अशा मला उत्पन्न करून गृहदेवी असें माझें नांव ठेविलें, व फार प्राचीन काळापासून दानवांचा विनाश करण्याच्या कामावर माझी योजना केली आहे. जो

पुरुष भिंतीवर माझ्या तरुण देहाचें पुत्रांसमवेत चित्र काढील, त्याच्या गृहीं संततीची व ऐश्वर्याची वृद्धि होईल; आणि जो पुरुष ह्याप्रमाणें करणार नाहीं, तो सर्व प्रकारें नाश पावेल. राजा बृहद्रथा, तुझ्या गृहीं माझी नित्य पूजा होते, ह्यामुळें मी मोठ्या आनंदांत आहें. तुझ्या मंदिरांत भिंतीवर जागोजाग मुलांबाळांनीं परिवेष्टित अशीं माझीं चित्रें काढिलीं असून गंध, पुष्प, धूपदीप, भक्ष्यभोज्य इत्यादिकांनीं माझें नेहमीं पूजन होतें. तुझ्याकडून माझा असा सत्कार होत असल्यामुळें मी निरंतर तुझ्यावर प्रत्युपकार करण्याविषयीं चिंतन करीत असतें. राजा, तुझ्या पुत्राचीं दोन शकलें जेव्हां मीं पाहिलीं, तेव्हां तीं मीं एकत्र जुळविलीं, आणि पाहिलें तों त्यांपासून दैवयोगानें एक बालक बनला! राजा, मी केवळ निमित्तमात्र झालें; हा सर्व तुझ्या भाग्याचाच परिणाम होय. बृहद्रथा, माझ्या अंगीं इतकी घोर शक्ति आहे कीं, मी मेरु पर्वतास सुद्धां भक्षण करीन; मग तुझ्या या बालकास खाऊन टाकण्यास मी समर्थ आहें, ह्याविषयीं शंका कशास पाहिजे? परंतु तूं जी माझी आपल्या गृहीं पूजा करीत असतोस, तिच्यामुळें मीं संतुष्ट होऊन हा पुत्र तुला पुन: अर्पण करीत आहे.

जरासंधनामकरण.

श्रीकृष्ण सांगतात:–युधिष्ठिरा, ती जरा राक्षसी ह्याप्रमाणें भाषण करून तेथच्या तेथेंच अंतर्धान पावली. नंतर बृहद्रथ राजा तो पुत्र घेऊन आपल्या घरीं आला. पुढें त्या बालकाचें जातकर्म वगैरे करून बृहद्रथ राजानें जरा राक्षसीचा महोत्सव सर्व मगध देशभर घरोघर करण्याविषयीं आज्ञा केली. नंतर, ब्रह्मदेवाप्रमाणें परमपूज्य अशा त्या बृहद्रथ राजानें त्या पुत्राचें जरासंध असें नांव ठेवून, त्यास जरेनें सांधिल्याविषयींची पूर्वपीठिका लोकांत सुस्थिर करून टाकिली. पुढें मगधाधिपतीचा तो महातेजस्वी पुत्र, होमकुंडांतील अग्नीप्रमाणें उत्तरोत्तर वृद्धिंगत होत जाऊन वयोनुरूप आकार व बळ ह्यांनीं संपन्न झाला, आणि तो शुक्ल पक्षांतील चंद्राप्रमाणें मातापितरांच्या आनंदास वाढवीत चालला.

अध्याय एकोणिसावा.

—:०:—

जरासंधाची प्रशंसा.

श्रीकृष्ण म्हणाले:—धर्मराजा, नंतर कांहीं काळानें पुन: ते महातपस्वी भगवान चंडकौशिक ऋषि मगध देशांत आले. ते आल्याचें ऐकून बृहद्रथ राजास अत्यंत आल्हाद वाटला; आणि अमात्य, सेवक, आप्त, सुहृद्, भार्या व पुत्र ह्यां सहवर्तमान तो त्यास सामोरा गेला. नंतर अर्घ्य, पाद्य, आचमनीय इत्यादिकांनीं त्या महर्षींचें पूजन करून बृहद्रथ राजानें आपलें राज्य व पुत्र हीं त्यांच्या चरणीं अर्पण केलीं. भगवान चंडकौशिक मुनींनीं ती पूजा स्वीकारून मोठ्या प्रमुदित अंत:करणानें बृहद्रथ राजास म्हटलें, "राजा, मीं दिव्य दृष्टीनें तुझ्या पुत्राच्या संबंधानें जें कांहीं जाणिलें आहे, तें ऐक. हा तुझा पुत्र मोठा रूपवान, धैर्यशाली व बलिष्ठ असा निपजेल; ह्यास सर्व प्रकारचें ऐश्वर्य प्राप्त होईल; ह्याच्या ठिकाणीं विलक्षण पराक्रम दृग्गोचर होईल; हा सर्व कांहीं प्राप्त करून घेईल; व ह्याचा एकसारखा उत्कर्षच होईल; ह्यांत संदेह नाहीं. राजा, पक्षिराज गरुड उड्डाण करीत असतां त्याची बरोबरी करण्यास अन्य पक्षी जसे समर्थ होत नाहींत, तसे, ह्या तुझ्या विजयी पुत्राची बरोबरी करण्यास दुसरे राजे समर्थ होणार नाहींत. जे कोणी ह्याच्या वाटेस जातील, त्यांचा पूर्ण नाश होऊन जाईल. ज्याप्रमाणें नदीच्या वेगानें पर्वतास यत्किंचित् इजा होत नाहीं, त्याप्रमाणें देवांनीं सोडलेल्या अस्त्रांनीं सुद्धां ह्या लोकोत्तर वीराच्या देहास यत्किंचित् इजा होणार नाहीं. बृहद्रथा, सर्व

मूर्धाभिषिक्त राजांच्या मस्तकावर हा अग्नीप्रमाणें जळत राहील. सूर्य जसा सकल नक्षत्रांची प्रभा हरण करितो, तसा हा तुझा पुत्र सर्व राजांची प्रभा हरण करील. अग्नीच्या समीप प्राप्त झाले असतां शलभ जसे विनाश पावतात, तसे हा तुझ्या पुत्राच्या समीप प्राप्त झाले असतां मोठमोठे राजे अगणित चतुरंग सैन्यासहित विनाश पावतील. वर्षाऋतूंत अपरंपार भरलेल्या नद्यांचें जल ज्याप्रमाणें समुद्र ग्रहण करितो, त्याप्रमाणें सर्व राजांचीं अपरंपार भरलेलीं धनभांडागारें हा तुझा पुत्र ग्रहण करील. सर्व प्रकारच्या धान्यांना धारण करणारी अवाढव्य पृथ्वी जशी बऱ्या वाईट सर्व वस्तूंना आश्रय देते, तसा, सर्व प्रकारच्या शक्ति धारण करणारा हा महाबलाढ्य पुत्र, उच्चनीच सर्व आश्रमांना उत्तम आश्रय देईल: म्हणजे सर्व आश्रमांचें योगक्षेम उत्तम रीतीनें चालवील. देहांत वास करणाऱ्या वायूच्या स्वाधीन सर्व जीव असतात, तद्वत्, तुझ्या पुत्राच्या स्वाधीन सर्व राजे असतील. हा तुझा पुत्र सर्व लोकांत अत्यंत बलिष्ठ निपजेल; आणि त्रिपुरासुराचा वध करणाऱ्या भगवान महादेव रुद्राचें ह्यास प्रत्यक्ष दर्शन घडेल!"

श्रीकृष्ण सांगतो:—धर्मराजा, ह्याप्रमाणें भाषण करीत असतां, त्या चंडकौशिक ऋषींचें चित्त दुसऱ्या कार्यांत व्यग्र झाल्याचें दिसलें, आणि त्यांनीं बृहद्रथ राजास एकदम निरोप दिला. युधिष्ठिरा, नंतर तो बृहद्रथ राजा स्त्रियापुत्र, आप्तसुहृद् इत्यादिकांसह नगरांत परत आला; आणि त्यानें जरासंधास राज्याभिषेक करून आपल्या जन्माची कृतार्थता मानिली व दोन्ही भार्यांसहवर्तमान तपोवनाचा मार्ग धरिला! धर्मराजा, ह्याप्रमाणें मातापितरें वनांत जाऊन राहिल्यानंतर तीं जिवंत असतांनाच जरासंध राजानें मोठा पराक्रम करून राजेलोक स्वाधीन करून घेतले!

वैशंपायन सांगतात:—राजा जनमेजया, पुढें त्या बृहद्रथ राजानें बहुत वर्षेपर्यंत वनांत राहून तपश्चर्या केली, व अखेरीस तो भार्यांसह स्वर्गलोकास गेला. इकडे भगवान चंडकौशिक मुनींनीं भविष्य कथन केल्याप्रमाणें जरासंधास सर्व वैभव प्राप्त झालें, व त्यानें राज्यकारभार चालविला. पुढें कांहीं काळानंतर श्रीकृष्णानें कंस राजाचा वध केल्यावर त्याचें व जरासंधाचें वैर उत्पन्न झालें. हे पारिक्षिता, पुढें त्या महाबलवान जरासंधानें गिरिव्रज नगरांत आपली गदा नव्याण्णव वेळां गरगर फिरविली, आणि अद्भुत कृत्यें करणारा भगवान श्रीकृष्ण मथुरेंत रहात होता, त्याकडे नव्याण्णव योजनें ती गदा झुगारून दिली! तेव्हां ती श्रेष्ठ गदा तात्काळ मथुरेच्या समीप येऊन धाडकन पडली! त्या समयीं मथुरावासी जनांनीं ती गदा जरासंधाची आहे असें नीट ओळखिलें, व जरासंधाची गदा मथुरेच्या सन्निध येऊन पडल्याचें तें वर्तमान जिकडे तिकडे प्रसिद्ध केलें. असो. राजा जनमेजया, अशा त्या अपूर्व वीर्यशाली जरासंधाचे हंस व डिंभक नांवाचे दोन महाबलिष्ठ सेनापति होते हें मीं तुला पूर्वी सांगितलेंच आहे. ते महाबुद्धिमान, राजनितींत अत्यंत निपुण, सल्लामसलतींत उत्तम वाकबगार व शस्त्रादिकांनीं अवध्य असे होते! राजा, फार काय सांगावें? स्वत: जरासंध, व त्याचे हे दोन सेनापति असे हे तिघेजण सर्व त्रैलोक्यास पुरेसे होते, असा माझा समज आहे, असो. राजा जनमेजया, कुकुर, अंधक व वृष्णि हे जरी बलिष्ठ होते, तरी जरासंधाचें सामर्थ्य असें अगाध असल्यामुळें, त्यापुढें आपला टिकाव लागणार नाहीं, असें त्यांनीं मनांत आणिलें. व राजनीतीच्या नियमास अनुसरून त्या अधिक बलवान जरासंधाची त्यांनीं उपेक्षा केली!

जरासंधवधपर्व.

अध्याय विसावा.

—:०:—

भीमार्जुनांचें श्रीकृष्णांसह मगधदेशीं प्रयाण.

श्रीकृष्ण म्हणाले:—धर्मराजा, जरासंधाचा वध करण्यास प्रस्तुतचा काळ योग्य आहे. सांप्रत हंस व डिंभक हे गत झालेले असून कंसाचाही परिवारासुद्धां वध झालेला आहे; तेव्हां ह्या समयीं त्यास मारणें बरेंच सुलभ जाईल. राजा, सर्व देव व दैत्य मिळून जरी जरासंधाशीं युद्ध करण्यास उभे राहिले, तरी त्यांत त्यास जिंकणें हें सर्वस्वीं अशक्य होय. जरासंधास जिंकावयाचें तर केवळ शक्तियुद्धांतच जिंकिलें पाहिजे, असा माझा अभिप्राय आहे. धर्मा, माझ्या ठिकाणीं राजनीति उत्तम प्रकारें वास करीत आहे; भीमसेनाच्या अंगीं दुर्धर बळ आहे; व अर्जुन हा आम्हां दोघांचेंही संरक्षण करण्यास समर्थ आहे. तेव्हां आम्ही तिघे, इष्टि सिद्ध करणाऱ्या तीन अग्नींप्रमाणें जरासंधवधरूप इष्ट कार्य सिद्ध करूं. हे नराधिपा, आम्हीं तिघांनीं जरासंधास एकांतांत गांठलें असतां, तो आम्हांपैकीं कोणाशीं तरी युद्धास उद्युक्त होईल, ह्याचा वानवा नको; फार कशाला? बाहुबलानें चढून गेलेल्या त्या जरासंधाला माझ्याशीं किंवा अर्जुनाशीं युद्ध करण्यांत अपमान वाटेल; भीमसेनाशीं युद्ध करून त्यावर पराक्रम गाजवावा, असा त्यास अभिमान उत्पन्न होईल; आणि अखेरीस तो निश्चयानें भीमसेनाशींच युद्ध करूं लागेल. राजा, भीमसेन हा त्या जरासंधाशीं युद्ध करण्यास समर्थ आहे. ज्याप्रमाणें प्रचंड जगताचा काळ हा नाश करितो, त्याप्रमाणें हा महाबलवान व महाबाहु भीमसेन खचीत जरासंधाचा नाश करील. ह्याकरितां, हे युधिष्ठिरा, जर माझें हृदय तूं जाणत असशील, व माझ्यावर तुझा विश्वास असेल, तर हे भीमार्जुन एखाद्या ठेवीप्रमाणें त्वरित माझ्या स्वाधीन कर."

वैशंपायन सांगतात:—राजा जनमेजया, श्रीकृष्णाचें भाषण श्रवण करून युधिष्ठिरानें भीमार्जुनांकडे अवलोकन केलें, व उत्साहानें त्यांच्या मुद्रा प्रफुल्लित झाल्या आहेत, असें पाहून श्रीकृष्णास उत्तर दिलें.

युधिष्ठिर म्हणाला:—हे शत्रुनाशका अच्युता, नको, नको, असे शब्द बोलूं नको! देवा, पांडवांचा नाथ तूं आहेस; आम्ही तुझे सेवक आहों; हे गोविंदा, तूं जें म्हटलेंस, तें सर्व सयुक्तिक व योग्य आहे. देवा, ज्यांकडे विजयश्रीनें पाठ केली, त्यांचा पुढाकार तूं कधींही करणार नाहींस. हे केशवा, आतां जरासंध मेला, सर्व राजे मुक्त झाले, व माझा राजसूय यज्ञ शेवटास गेला, असेंच ह्या दासाला वाटत आहे! हे केशवा, आतां विलंब करूं नको. ज्या रीतीनें हें कार्य पार पडेल, त्या रीतीनें सावधगिरी ठेवून जें विहित तें आचरण कर. हे जगन्नाथा, रोगी पुरुष हा धर्म, अर्थ व काम ह्यांविरहित होऊन दुःखानें जसा दीन होतो, तसा मी तुम्हां तिघांविरहित झालों म्हणजे दुःखानें अगदीं दीन होऊन जाईन! देवा, कृष्ण असला म्हणजे तेथें अर्जुन असावयाचाच; व अर्जुन असला कीं, तेथें कृष्ण असावयाचाच! तेव्हां हा काय अपूर्व योग आहे बरें! श्रीधरा, तुम्हां दोघांला ह्या जगतांत अजिंक्य असें कांहींही नाहीं! तसाच हा महाबलिष्ठ, युद्धधुरंधर व विजयशाली भीमही तुमच्या साहाय्यानें कोणतें कार्य करणार नाहीं बरें? हे यदुनंदना, बलाचा ओघ उत्तम प्रकारें वाहून नेला असतां, तो महान कार्य करितो. पहा—स्वतः सैन्य अंधळें व अज्ञान असतें; पण चतुर सेनाग्रणींनीं युद्धभूमीवर त्यास योग्य मार्गानें शत्रूवर चाल करावयास लाविलें, म्हणजे तेंच शत्रूचा

निःपात उडवितें. श्रीकृष्णा, जलप्रवाह एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं न्यावयाचा असल्यास तो उतार जमिनीवरून नेतास; तसेंच, शेतास वगैरे पाणी द्यावयाचें असल्यास तें बांधांच्या रंध्रांतूनच (भगदाडांतून) नेतात; तेव्हां, हे माधवा, ह्या सर्व गोष्टी उत्तम प्रकारें जाणणाऱ्या महाप्रख्यात व राजनीतिनिपुण अशा तुजसारख्या अद्वितीय पुरुषाच्या आश्रयानें आम्ही स्वकार्य करण्यास झटत आहों, हें उत्तम होय. देवा, विशाळ बुद्धि, उत्कृष्ट राजनीति, अगाध बळ व कार्यसिद्धीचीं अमोघ साधनें हीं वास्तविकपणें एकट्या तुजपाशींच आहेत. तेव्हां विजयेच्छु पुरुषानें कार्यसिद्धिस्तव तुलाच पुढाकार द्यावा, हें योग्य आहे. म्हणून, हे यादवेश्वरा, अर्जुनानें तुझ्या अनुरोधानें वागावें; व भीमानें अर्जुन सांगेल तसें करावें. म्हणजे तुझें दूरवर धोरण, अर्जुनाची जयशालिता, व भीमसेनाचें अगाध बळ ह्या सर्वांचा एका काळीं संयोग होऊन आपले मनोरथ सिद्धीस जातील !

वैशंपायन सांगतातः—राजा जनमेजया, ह्याप्रमाणें युधिष्ठिराचें भाषण श्रवण करून ते तिघे महाबलिष्ठ भ्राते म्हणजे श्रीकृष्ण व भीमार्जुन हे मगध देशास जाण्यासाठीं निघाले. निघतांना त्यांनीं मृगचर्म, दंड, कमंडलु, भगवीं वस्त्रें इत्यादि धारण करून ब्रह्मनिष्ठ स्नातक ब्राह्मणांचा वेष घेतला; आणि आप्तस्वकीयांचें अभिनंदनपर उत्साहजनक भाषण श्रवण करीत करीत ते बाहेर पडले. राजा, त्या तिघांही वीरांच्या अंगीं क्षात्रतेज आधींच वसत होतें. शिवाय, मूर्धाभिषिक्त राजांना जरासंध जे क्लेश देत होता, त्यांच्या योगानें ते तिघेही अगदीं जळत होते. ह्यास्तव त्यांचीं शरीरें सूर्य, चंद्र व अग्नि ह्यांप्रमाणें अत्यंत देदीप्यमान भासत होतीं. जनमेजया, तो अगाध सामर्थ्यवान भीम पुढें, आणि सदासर्वकाळ विजयी असणारे कृष्णार्जुन हे त्याच्या मागें, अशा क्रमानें ते तिघेही प्रबळ योद्धे एकाच कार्यास उद्युक्त होऊन प्रयाण करीत असलेले धर्मराजानें जेव्हां अवलोकन केलें, तेव्हांच त्यानें ठरविलें कीं, ' जरासंध मेला ! ' कारण, हे परिक्षिता, धर्मराजाला असें पूर्ण कळलें होतें कीं, जगतांतील सर्व कार्यांचे खरे खरे प्रवर्तक ते महासत्ताधीश कृष्णार्जुनच (नरनारायणच) असून धर्म, अर्थ व काम ह्यांविषयीं लोकांचे उद्योग तेच महात्मे सिद्धीस नेतात.

जनमेजया, श्रीकृष्ण, भीम व अर्जुन हे कुरुदेशाहून निघाले, ते कुरुजांगल देशांतून रमणीय अशा पद्म सरोवराप्रत गेले. नंतर त्यांनीं काळकूट पर्वत ओलांडिला; व पुढें मार्गांत, प्रत्येकीं एकेका पर्वतावरून खालीं वहात येत असलेल्या गंडकी, महाशोण व सदानीरा ह्या नद्या त्यांस लागल्या. त्या नद्या उतरून गेल्यावर पुढें त्यांस रम्य अशी सरयू नदी आढळली. तिचा अवलोकन करून ते पूर्व कोसल देशांत शिरले. नंतर तो देश आक्रमण करून ते मिथिला व माळा ह्या देशांत गेले. पुढें त्यांनीं चर्मण्वती, गंगा व शोणनद उतरून पूर्व दिशा धरिली; आणि ते वल्कलें व दर्भ धारण करून नेमकेच मागध देशास पोहोंचले! त्या देशांत प्रवेश केल्यावर त्यांस पुढें गोरथ नांवाचा पर्वत लागला. त्यावर सदासर्वकाळ गाई चरत असून उदकाचे झरे व उत्तम वृक्ष विपुल होते. नंतर त्या तिघां नरवरांनीं त्या गोरथ पर्वतावर चढून मागधपुर (गिरिव्रज नगर) अवलोकन केलें.

अध्याय एकविसावा.

—:०:—

गिरिव्रजागमन.

श्रीकृष्ण म्हणालेः—हे पार्था, हें पहा मागधपुर दिसत आहे. ह्यासच गिरिव्रज असें म्हणतात. ह्या महान राजधानींत पशूंची समृद्धि आहे;

उदकाचा पुरवठा कधींही कमी पडत नाहीं; एथें रोगराई केव्हांही नसते; ह्यांत मोठमोठे राजवाडे व श्रीमंतांचे बंगले आहेत; आणि ह्या स्थळीं कोणत्याही गोष्टीची वाण म्हणून नाहीं. हे पहा वैहार, वराह, वृषभ, ऋषिगिरि व चैत्यक नांवांचे मोठमोठाले पांच सुंदर पर्वत ह्या गिरिव्रज नगराचें चोहों बाजूंनीं संरक्षण करीत आहेत. हे पांचही पर्वत दुर्भेद्य असून त्यांवर मोठमोठीं शिखरें व शीतळ वृक्षच्छाया आहे. ह्यांवर लोध्रवृक्षांचीं मनोहर वनें लागून गेलीं असून त्यांच्या सुपुष्पित शाखाग्रांनीं व हृदयंगम सुगंधानें कामिजनांची चित्तवृत्ति क्षुब्ध होते. पार्था, हे पर्वत तुला स्पष्ट दिसत नाहींत, ह्याचें कारण त्यांचा पृष्ठभाग विलासी जनांस प्रियकर असलेल्या ह्या वनश्रीनें अगदीं झांकून टाकिला आहे, हेंच होय.

अर्जुना, येथेंच उग्र तपश्चर्या करणाऱ्या महात्म्या गौतम मुनीनें औशीनरी नामक शूद्रीच्या ठिकाणीं काक्षीवान् वगैरे सुत निर्माण केले. हे काक्षीवदादि पुत्र जरी वस्तुतः शूद्रीपासून जन्मलेले आहेत, तरी त्यांस गौतम मुनींच्या प्रभावानें मानव वंशाचा आश्रय मिळाला आहे, हा त्या महात्म्या गौतमांचाच त्या राजांवर अनुग्रह होय. पार्था, अंगवंगादि देशांचे बलाढ्य राजे ह्या गौतमाश्रमांत येऊन पूर्वी क्रीडा करीत असत. गौतम ऋषीच्या आश्रमासमीप वाढलेल्या पिंपळाच्या व लोध्राच्या ह्या सुंदर वनराजी अवलोकन कर. हे धनुर्धरा, शत्रूंना दुःख देणारे अर्बुद व शक्रवापी नांवांचे पन्नग येथेंच राहतात, आणि स्वस्तिक व मणिनाग ह्यांचीं मनोहर आलयेंही ह्या स्थळींच आहेत. पार्था, ह्या मागध देशांत अवर्षण म्हणून केव्हांही पडत नाहीं. कांहीं झालें तरी येथें पर्जन्य पडावयाचाच, अशी मनूची व्यवस्था आहे. ह्या प्रदेशावर कौशिक व मणिमान ह्यांनींही कृपा केलेली आहे. .बा अर्जुना, अशा प्रकारें चोहोंकडून सुरक्षित, अत्यंत मनोरम आणि मानुष व अमानुष अशा सर्व साधनांनीं ओतप्रोत भरलेली अशी ही गिरिव्रज पुरी प्राप्त झाल्यामुळें जरासंध राजा 'मी अत्यंत श्रेष्ठ व वैभववान' असा गर्व वाहत आहे. असो. आतां आपण त्यास गांठलें म्हणजे त्याचा तो गर्व उतरून टाकूं !

वैशंपायन सांगतातः—राजा जनमेजया, श्रीकृष्णाचें ह्याप्रमाणें भाषण झाल्यावर ते तिघेही महातेजस्वी भ्राते गिरिव्रज नगरींत प्रवेश करण्यासाठीं पुढें चालूं लागले; आणि लवकरच त्या नगरीसमीप प्राप्त झाले. राजा, त्या नगरांतील लोक शरिरानें सुदृढ असून सर्व प्रकारच्या समृद्धीमुळें मोठे आनंदित होते. तेथें चारी वर्णांच्या लोकांची दाट वसति असून त्यांचे सर्व आश्रमधर्म अव्याहतपणें चालले होते. त्या नगरींत मोठमोठाले उत्सव सदा होत असत; व त्या नगरीच्या आसमंताद्भागीं महान महान पर्वतांचा वेढा असल्यामुळें तिजवर चाल करून जाणें सर्वथा अशक्य झालें होतें. असो.

ते तिघे महावीर गिरिव्रज पुरीच्या समीप आल्यावर पुरद्वाराकडे वळले नाहींत: पर्वतासारख्या उंच बुरुजाजवळील नगरद्वार त्यांनीं ,टाळिलें; आणि बृहद्रथाच्या वंशांतील राजांना व मागध देशांतील लोकांना अत्यंत पूज्य व प्रिय अशा चैत्यक पर्वताप्रत ते मोठ्या त्वरेनें गेले.

राजा जनमेजया, ह्या चैत्यक पर्वतावर वृषभाच्या आकाराचा एक मांसाहारी दैत्य पूर्वी बृहद्रथानें मारून त्याच्या कातड्याच्या तीन नौबदी केल्या होत्या. त्या एकदा वाजविल्या असतां त्यांचा महिनाभर एकसारखा शब्द चालू राही ! बृहद्रथ राजानें त्या तीन नौबदी त्या दैत्याच्याच वादीनें आवळून आपल्या राजधानींत दिव्य पुष्पें व सुगंधि द्रव्यें वर घालून नगराच्या द्वारावर ठेविल्या होत्या; आणि त्या तेथें नित्य वाजत असत !

राजा जनमेजया, चैत्यक पर्वतावरून ते तिघे महापराक्रमी भ्राते आंतल्या अंगास खालीं उतरले, व नगराच्या द्वारावर चढून त्यांनीं तेथें असलेल्या तिन्ही नौबदी फोडून टाकिल्या! नंतर ते नगराच्या सन्निध असलेल्या दुसऱ्या कोटाकडे (चैत्यक प्राकाराकडे) वळले. त्या समयीं द्वाररक्षक हे नानाविध शस्त्रें घेऊन त्यांच्या मागें लागले. परंतु त्यांस त्यांनीं दाद दिली नाहीं; व त्यांनीं त्या सुरम्य कोटावर चढून, जणू काय जरासंधाला मारण्याच्या इच्छेनें त्याच्या मस्तकावर लत्ताप्रहार केला! जनमेजया, नंतर त्या वीरपुंगवांनीं चैत्यकप्राकाराचें (कोटाचें) एक शिखर आपल्या बाहूंच्या प्रहारानीं कोसळून टाकिलें. तें शिखर मोठें बळकट, प्रचंड, उंच व पुरातन असून गंधमाल्यादिकांनीं त्याची सतत पूजा करण्यांत येत असे. असो. नंतर त्यांनीं मोठ्या उत्साहानें गिरिव्रज नगरींत प्रवेश केला.

ह्याप्रमाणें ते तिघे पुरुषव्याघ्र नगरांत शिरले, तों तिकडे वेदपारंगत ब्राह्मणांस दुश्चिन्हें आढळून आलीं व तीं त्यांनीं जरासंधास विदित केलीं. पुढें पुरोहितांनीं अरिष्टाच्या शमनाकरितां गजारूढ झालेल्या जरासंधाच्या सभोंवतीं पर्यग्निकरण[1] केलें आणि स्वतां जरासंधानें दीक्षा घेऊन व व्रतस्थ राहून उपवास आरंभिला.

इकडे स्नातक वेष धारण केलेले भीम, श्रीकृष्ण, व अर्जुन हे शस्त्रास्त्रें वगैरे कांहींएक बरोबर न घेतां केवळ बाहुबळानें जरासंधाशीं युद्ध करावें अशा इच्छेनें नगरांत शिरले, तों त्यांस प्रथम बाजाराच्या पेठा लागल्या. त्यांत नानाप्रकारचे खाद्य पदार्थ, उत्तम सुगंधि पुष्पें व इतर सर्व प्रकारच्या वस्तूंची समृद्धि आढळली. त्या पेठांत रस्त्यांवर माळांचे जे ढीगच्या ढीग पडले होते, त्यांची शोभा पाहात पाहात ते राजमार्गांतून जात असतां, त्यांनीं एका माळ्यापासून बळजोरीनें फुलें घेतलीं; आणि साधीं वस्त्रें, पुष्पांच्या माळा व तेजस्वी कुंडलें धारण करून ते तिघेजण महाबुद्धिमान जरासंधाच्या राजवाड्यांत शिरले; आणि ज्याप्रमाणें हिमालय पर्वतावरील सिंह गोठ्यांत गाईंना धुंडाळितात, त्याप्रमाणें ते जरासंधास धुंडाळूं लागले!

राजा जनमेजया, त्या श्रीकृष्णप्रमुख अद्वितीय योद्ध्यांचें वक्षस्थल विशाल असून बाहु शालवृक्षाप्रमाणें पुष्ट व दीर्घ होते; आणि त्यांवर चंदन व अगुरु ह्यांचें चर्चन केलें होतें. गिरिव्रज पुरींतील लोकांनीं, त्या तिघा वीरकुंजरांकडे जेव्हां अवलोकन केलें, तेव्हां त्यांस ते शालवृक्षच भूमींतून वर आले आहेत, असें भासून मोठा चमत्कार वाटला. पुढें ते तिघे पुरुषशार्दूल राजमंदिरांतील लोकांनीं गजबजलेले तीन चौक आक्रमण करून निर्धास्तपणें व मोठ्या वीरश्रीनें जरासंधाच्या सन्निध जाऊन उभे राहिले.

श्रीकृष्णजरासंधसंवाद.

जनमेजया, जरासंधानें त्या त्रिवर्गास पाहतांच त्यांस उत्थापन दिलें, आणि तो अर्घ्य, पाद्य, मधुपर्क व गोप्रदान ह्यांच्या योगें त्या वंदनीय पुरुषांचा बहुमान करून, 'विप्रहो तुमचें स्वागत करितों.' असें त्यांस म्हणाला. राजा, त्या समयीं भीम व अर्जुन यांनीं मौन धरिलें होतें. ह्यास्तव, त्या तिघांपैकीं महाबुद्धिमान श्रीकृष्णानें मात्र त्यास उत्तर दिलें. श्रीकृष्ण म्हणाला, 'राजेंद्रा, हे दोघे अनुष्ठान करीत असल्यामुळें त्यांस मध्यरात्रीच्या पूर्वीं भाषण करितां येत नाहीं. मध्यरात्र उलटून गेल्यावर ते तुजबरोबर भाषण करतील.' असो. नंतर जरासंध राजानें त्यांस यज्ञशाळेंत रहावयास सांगितलें, व तो आपल्या महालांत निघून गेला.

राजा जनमेजया, मध्यरात्र होतांच जरासंध राजा, जेथें ते स्नातक ब्राह्मण उतरले होते, तेथें प्राप्त झाला. कारण, स्नातक ब्राह्मण प्राप्त झा-

१ प्रज्वलित अग्नि भोंवतालीं फिरविणें हें कृत्य.

त्याचें ऐकून तो विजयशील जरासंध राजा अर्धरात्रीं सुद्धां त्यास सामोरा जात असे, ही गोष्ट सर्वविश्रुतच होती. असो; त्या समयीं जरासंधानें पुनः त्या त्रिवर्गांकडे अवलोकन केलें, व त्यांचा तो अपूर्व वेष पाहून त्यास फार विस्मय वाटला. नंतर जरासंध राजा सान्निध उभा राहिला असतां ते तिघे नरश्रेष्ठ, 'राजा तुझें कल्याण होवो' असें म्हणून उभे राहिले; आणि राजाकडे व परस्परांकडे पाहूं लागले!

जनमेजया, नंतर जरासंधानें त्या तिघां स्नातकवेषधारी यादवपांडवांस 'बसावें' म्हणून सांगितलें; व मग ते, महाध्वरांतील प्रदीप्त अग्नीप्रमाणें दिव्य तेजानें झळाळणारे तीन पुरुष खालीं बसले. नंतर त्या वेषधारी ढोंगी ब्राह्मणांचा त्या सत्यवचनी जरासंधानें धिक्कार केला!

जरासंध म्हणाला:—ब्राह्मणहो, ह्या लोकांमध्यें स्नातकव्रत आचरणारे पुरुष समावर्तनादि कारणांवांचून गंधपुष्पें वगैरे बाह्यालंकार धारण करीत नाहींत, हें मला पूर्ण विदित आहे. ह्यास्तव तुम्ही खरोखरी ब्राह्मण नाहीं; तुम्ही कोणी तरी क्षत्रिय असून, पुष्पें वगैरे बाह्यतः धारण करून स्नातक ब्राह्मणांचें ढोंग केलें आहे. ह्या पहा तुमच्या दंडांवर ज्येच्या[1] खुणा उमटलेल्या आहेत; निःसंशय तुम्ही क्षत्रियच असून ब्राह्मणांचें सोंग आणिलें आहे. तेव्हां, हे विप्रांनो, सत्य काय आहे तें सांगा. ह्या जगामध्यें क्षत्रियांना सत्यापासूनच शोभा प्राप्त होते. अहो, तुम्हीं चैतकप्राकाराचें शृंग फोडून भलत्याच मार्गानें निर्भयपणें राजरोस येथें प्रवेश केला, तेव्हां हें असें कपट करण्याचें प्रयोजन कोणतें? अहो, ब्राह्मणांचा पराक्रम काय तो विशेषतः वाणीमध्यें; आणि असें असतांना, ब्राह्मणशीलाच्या विरुद्ध वर्तन करून, तुम्हीं आज कृतींत पराक्रम दाखविला, तेव्हां ह्याचा मेळ कसा घालावा? अहो, तुम्ही माझ्या गृहीं प्राप्त झालां आहां, व मी तुम्हांस यथाविधि पूजा अर्पण करीत आहें, तरी माझ्या पूजेचा स्वीकार करून मजवर अनुग्रह तुम्ही करीत नाहीं, तेव्हां तुमचा येथें येण्याचा उद्देश काय आहे बरें?

वैशंपायन सांगतात:—राजा जनमेजया, जरासंधाचें भाषण श्रवण करून, उदारधी व वक्तृत्वकुशल श्रीकृष्णानें मधुर व गंभीर असें भाषण करण्यास प्रारंभ केला.

श्रीकृष्ण म्हणाला:—राजा जरासंधा, आम्ही खरोखरीच स्नातक ब्राह्मण (स्नातकव्रतानें ब्रह्मचिंतन करणारे पुरुष) आहों. ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य ह्या तिघांसही स्नातकव्रताचें परिपालन करण्यास अधिकार आहे. राजा, स्नातक पुरुषांचे धर्म दोन प्रकारचे आहेत: (१) सामान्य व (२) विशेष. क्षत्रिय स्नातकानें विशेष धर्माचें आचरण केल्यास त्यास लक्ष्मी प्राप्त होते. पुष्पें धारण केल्यानें विजयलक्ष्मी माळ घालिते ही गोष्ट अगदीं निर्विवाद आहे. ह्या कारणानें आमच्या शरीरांवर ह्या पुष्पमाला शोभत आहेत. क्षत्रियाच्या ठिकाणीं जसें बाहुबल असतें, तसें वाग्बल नसतें. हे बार्हद्रथा, क्षत्रियापासून मोठ्या प्रगल्भ भाषणाची इच्छा करण्यापेक्षां उग्र क्षत्रियतेजाची इच्छा करावी. विधात्यानें क्षत्रियाच्या ठिकाणीं बाहूंमध्येंच विशेषेंकरून बल ठेविलें आहे; तें बल पाहावें अशी तुझी इच्छा असल्यास, ती तुझी इच्छा आज निश्चयानें परिपूर्ण होईल. राजा, धूर्त पुरुष शत्रुगृहीं आडमार्गानें व मित्रगृहीं योग्य मार्गानें प्रवेश करितात. ह्यास्तव, आम्हीं ज्या मार्गानें येथें प्रवेश केला, तो राजनीतीच्या अनुसारानें योग्य मार्गच आहे. हे जरासंधा, आम्ही येथें शत्रुगृहीं कांहीं कार्याच्या हेतूनें आलों आहों; ह्यास्तव, तुझ्यापासून आदरातिथ्याचा स्वीकार करावयाचा नाहीं, हा आमचा पूर्ण निश्चय आहे.

१ धनुष्याच्या दोरीच्या.

अध्याय बाविसावा.

—:०:—

श्रीकृष्णाचें जरासंधाशीं भाषण.

जरासंध म्हणालाः—विप्रहो, मीं कधीं तुम्हांशीं वैर केल्याचें मला स्मरत नाहीं; अथवा विचार करून पाहतां, तुम्हांला कधीं पीडा दिल्याचीही मला आठवण होत नाहीं. तेव्हां माझ्या हातून तुम्हांला कोणताही अपकार घडला नसतांना, तुम्ही मला विनाकारण शत्रु मानितां हें आहे तरी काय? विप्रहो, एखाद्यावर अशा प्रकारें निष्कारण दोषारोप करणें हा सज्जनांचा मार्ग नव्हे. जो क्षत्रिय निरपराधी जनावर दोष लादितो, त्याच्या हातून धर्ममर्यादेचें अतिक्रमण घडून त्यास खचीत पुढें अनुताप होतो; ह्यास्तव, ब्राह्मणांनो, धर्मवेत्ता महारथ लोकांत अयोग्य आचरण करूं लागल्यास त्याच्या पुण्याचा क्षय होऊन त्यास शेवटीं नरकांत पडावें लागतें! अहो, त्रैलोक्यांत साधुजनांना क्षत्रियधर्मच श्रेयस्कर वाटतो; धर्मवेत्ते पुरुष अन्य धर्माची प्रशंसा करीत नाहींत. तेव्हां, विप्रहो, मी क्षात्रधर्माप्रमाणें वागत असतां, व प्रजाजनांचें कोणत्याही प्रकारें अकल्याण करीत नसतां तुम्ही मला दोष देतां, हा केवळ तुमचा प्रमाद होय.

श्रीकृष्ण म्हणाले:—हे महाबाहो जरासंधा, तूं आम्हां स्वतांला पीडा दिली आहेस, व त्यामुळें आम्ही तुझ्याशीं युद्ध करण्यास उद्युक्त झालों आहों, असा अर्थ नाहीं. जो एकटा पुरुष सर्व कुलाचें (जगाचें) हित साधीत आहे, त्याच्या (जगन्नियंत्या परमेश्वराच्या) आज्ञेनें आम्ही तुझ्यावर उठलों आहों. जरासंधा, ह्या भूतलावरील राजे तूं बलि देण्याकरितां आणिले आहेस; आणि असलें क्रूर कर्म करूनही तूं आपणास निरपराधी मानितोस, तेव्हां काय म्हणावें? अरे, एका मूर्धाभिषिक्त राजानें दुसऱ्या मूर्धाभिषिक्त राजांचा वध करण्यास उद्युक्त व्हावें, हें किती निंद्य! आणि असें असतां, तूं त्यांस जिंकून आणून रुद्राला बलि देण्याचें योजिलें आहेस, तेव्हां हा तुझा अपराध लहानसहान आहे काय? हे बार्हद्रथा, हें जें घोर पातक तूं करीत आहेस, त्याचीं फळें आम्हांलाही भोगावीं लागतील. बाबा, धर्मरक्षण करण्यास आम्ही समर्थ आहों. धर्माचरण हेंच आम्ही कर्तव्य समजतों. देवतेच्या संतोषाकरितां मनुष्यांचा वध करणें हें अद्याप कोठें पाहिलें नाहीं. तेव्हां शंकराच्या प्रीत्यर्थ नरयज्ञ करण्यास तूं सिद्ध होत आहेस, हें अगदीं अनुचित होय. जरासंधा, तूं क्षत्रिय, व तूं कोंडून ठेविलेले ते राजे तरी क्षत्रियच; तेव्हां क्षत्रियानें क्षत्रियांना यज्ञपशूंची संज्ञा द्यावी, असला हा मूर्खपणा करणारा तुझ्याव्यतिरिक्त दुसरा कोणी असेल, असें आम्हांस वाटत नाहीं.

राजा, जो पुरुष ज्या ज्या स्थितींत जें जें कर्म करितो, तो पुरुष त्या त्या स्थितींत त्या त्या कर्माचें फळ अनुभवितो, असा नियम आहे. ह्यास्तव, तूं ज्ञातीचा क्षय करण्यास उद्युक्त झाला आहेस असें पाहून, त्या दीन राजांचा मृत्यु चुकवावा, व त्या योगें ज्ञातीची वृद्धि करावी, ह्या उद्देशानें तुझ्या वधासाठीं आम्ही येथें प्राप्त झालों आहों. राजा, ह्या लोकीं आपल्याशीं झुंजणारा एकही क्षत्रिय वीर नाहीं असा जो तूं गर्व वहात आहेस, तो केवळ तुझा बुद्धिभ्रंश होय. जरासंधा, स्वजातीयांचें संरक्षण करणें हें कर्तव्य आहे असें मानणारा मनोनिग्रही क्षत्रिय अशा समयीं युद्धास सिद्ध होऊन रणांगणांत आपला देह ठेवील, आणि स्वर्गास जाऊन अतुल व अक्षय्य अशीं सुखेंच भोगील, हें पक्कें लक्षांत ठेव. हे पुरुषश्रेष्ठा, स्वर्गप्राप्तीच्या उद्देशानेंच रणयज्ञार्थ दीक्षा घेतलेले क्षत्रिय लोकांस जिंकीत असतात. राजा, स्वर्गप्राप्तीच्या उद्देशानेंच लोक ब्रह्मचिंतनांत निमग्न होतात, स्वर्गप्राप्तीच्या उद्देशानेंच लोक

दयादाक्षिण्यादि गुण प्रकट करून मोठी कीर्ति मिळवितात, स्वर्गप्राप्तीच्या उद्देशानेंच लोक तपश्चर्येचें अनुष्ठान करितात, आणि स्वर्गप्राप्तीच्या उद्देशानेंच लोक धारातीर्थी देह ठेवण्यास सिद्ध होतात. जरासंधा, समरभूमीवर मृत्यु आला असतां, त्या योगें, सुखोपभोगांनीं सदोदीत समृद्ध असलेला इंद्राचा वैजयंत प्रासादही प्राप्त होतो. राजा, सर्व असुरांचा पराजय करून जगतावर साम्राज्य करण्याचा जो अद्वितीय अधिकार इंद्राला प्राप्त झाला आहे, त्याचें कारण तरी त्यास रणांगणीं मरण आलें हेंच होय. राजा, तुझ्याशिवाय अन्य वीरांशीं लढून आम्हांस स्वर्गप्राप्ति कशी होईल ? परंतु, हे जरासंधा, मागध देशचें बलिष्ठ व अफाट सैन्य मजपाशीं आहे, असें मनांत आणून तूं चढून जाऊं नको. इतर राजांचा अपमान करणें हें अगदीं अयोग्य होय. बाबा, प्रत्येक व्यक्तीमध्यें पराक्रम असतोच, असा नियम नाहीं. जेथपर्यंत तुझ्या बरोबरीचें किंवा तुझ्याहून अधिक वीर्य तुला आढळलें नाहीं, तेथपर्यंत हा तुझा गर्व चालेल. राजा, हा तुझा उन्मत्तपणा इतरांच्या अंगीं कमी वीर्य असल्यामुळें त्यांनीं सहन केला, पण आम्ही हा सहन करण्यास समर्थ नाहीं. ह्यास्तव, आम्ही तुला जें सांगतों, तिकडे चांगलें लक्ष दे.

जरासंध राजा, आपल्या बरोबरीचे कोणीही नाहींत, हा अभिमान व उन्मत्तपणा टाकून दे. जर तूं हा अविचार सोडून दिला नाहींस, तर तुझें सैन्य, तुझे अमात्य, तुझे पुत्र यांसह स्वतः तूंही यमसदनीं जाशील, हें लक्षांत आण. दंभोद्भव, कार्तवीर्य, उत्तर व बृहद्रथ हे पराक्रमी राजे बलिष्ठांचा अवमान करूनच सैन्यासहित नाश पावले. जरासंधा, तुझ्याशीं युद्ध करण्याची इच्छा करणारे आम्ही खरोखरी ब्राह्मण नाहीं. हे दोघे वीर पांडूचे पुत्र आहेत; आणि मी ह्या दोघांचा मामेभाऊ शूरकुलोत्पन्न कृष्ण आहें !

जरासंध राजा, आम्ही तुला युद्धास बोलावीत आहों, तर तूं सुस्थिरपणानें आमच्याशीं युद्ध कर. कोंडून ठेविलेल्या सर्व राजांना तूं सोडून दे, अथवा यमसदनीं जाण्यास सिद्ध हो !

जरासंधाची युद्धाची तयारी.

जरासंध म्हणालाः—कृष्णा, मीं कोणत्याही राजास जिंकल्यावांचून येथें आणिलें नाहीं. मीं आणिलेले राजे इतरांस जरी अजिंक्य असले, तरी मीं ते सर्व जिंकिलेलेच आहेत. राजांना जिंकून आणिल्यानंतर त्यांची वाटेल त्याप्रमाणें व्यवस्था करणें हा क्षत्रियाचा धर्मच होय. कृष्णा, देवतेच्या संतोषाकरितां जे राजे मीं आणून ठेविले आहेत, त्यांची सुटका आज केवळ तुमच्या भीतीनें मीं करावी, व क्षात्रव्रत मोडावें, ही गोष्ट मला उचित दिसत नाहीं. ह्यास्तव, व्यूह रचून युद्धाकरितां सिद्ध असलेल्या तुमच्या सैन्याशीं लढण्यास माझें सैन्य सिद्ध आहे; किंवा तुमच्यापैकीं एकेकाशीं युद्ध करण्यास मी एकटा तयार आहें; अथवा तुम्ही एकदम दोघे किंवा तिघे जरी माझ्याशीं झुंजूं लागलां, तरी माझी हरकत नाहीं !

वैशंपायन सांगतातः—राजा जनमेजया, ह्याप्रमाणें भाषण करून जरासंध हा त्या तिघां बलिष्ठ वीरांशीं युद्ध करण्यास उद्युक्त झाला, व त्यानें आपला पुत्र सहदेव ह्यास राज्याभिषेक करण्याची आज्ञा दिली. राजा, ह्या प्रसंगीं जरासंधास कौशिक व चित्रसेन म्हणजे जगद्विख्यात हंस व डिंभक ह्या सेनापतींचें स्मरण झालें. असो; पुढें आत्मनिष्ठ, सत्यप्रतिज्ञ, सर्वव्यापक व पुरुषश्रेष्ठ भगवान श्रीकृष्णानें, त्या महाबलिष्ठ जरासंधाचा मृत्यु ब्रह्मदेवानें कोणाच्या हस्तें निश्चित करून ठेविला आहे ह्याचें स्मरण केलें, व मधुवंशोत्पन्न पुरुषाच्या हातून युद्धांत ह्याचा वध होणार नाहीं हें जाणून, आपण स्वतः त्याशीं युद्ध करण्याचा विचार सोडून दिला !

अध्याय तेविसावा.

—:०:—

भीमजरासंधयुद्ध.

वैशंपायन सांगतात:—राजा जनमेजया, जरासंधाचा युद्ध करण्याविषयींचा निश्चय झाल्यावर वाग्विशारद श्रीकृष्णानें त्यास म्हटलें:—हे जरासंध राजा, आम्हां तिघांपैकीं कोणाबरोबर युद्ध करावें असें तुझ्या विचारास येतें तें सांग, म्हणजे त्याप्रमाणें तो युद्धार्थ सिद्ध होईल !

जनमेजया, श्रीकृष्णाचें भाषण श्रवण करून त्या महादेदीप्यमान मगधाधीशानें भीमसेनाशीं युद्ध करण्याचें मान्य केलें. नंतर गोरोचना, डाळिंब वगैरे वनस्पति, पुष्पें, इतर मंगलकारक पदार्थ, मुख्य मुख्य औषधें आणि दुःख व मूर्छा हरण करणारीं द्रव्यें घेऊन पुरोहित हा युद्धास प्रवृत्त झालेल्या जरासंधाच्या समीप प्राप्त झाला. मग त्यानें स्वस्तिपुण्याहवाचन करून जरासंधास सज्ज होण्याविषयीं आज्ञा दिल्यावर, क्षात्रधर्मास अनुसरून जरासंध युद्धास सिद्ध झाला. त्यानें मुकुट काढून ठेवून केश घट्ट बांधिले, आणि अशा प्रकारें युद्धासाठीं पुढें सरून उभा राहिला कीं, जणूं काय महासागरच मर्यादेचें अतिक्रमण करून पुढें सरसावला असें वाटलें !

राजा जनमेजया, नंतर त्या भीमपराक्रमी महाचतुर जरासंधानें भीमास म्हटलें, "भीमा, तुझ्याबरोबर मी युद्ध करीत आहें. बलवानाशीं युद्ध करून त्यांत अपजय प्राप्त झाला तरी त्याची योग्यता विशेष असते ! " पारिक्षिता, भीमाला जरासंध ह्याप्रमाणें म्हणाला; व बल नामक दैत्य जसा इंद्रावर धावून गेला होता, तसा तो जरासंध भीमावर धावून गेला. इकडे जरासंध सज्ज होऊन भीमावर धावून येणार, तों श्रीकृष्णानें भीमाला स्वस्तिवाचन वगैरे करून युद्धाची आज्ञा दिली होतीच. जरासंध आपल्यावर चाल करून आला असें पाहून भीम श्रीकृष्णाच्या कानाशीं लागला, व त्याची सल्ला घेऊन युद्ध करण्यासाठीं जरासंधाशीं भिडला !

नंतर ते दोघे पुरुषव्याघ्र मोठ्या उल्हासानें जयश्रीची इच्छा धरून बाहुयुद्धास प्रवृत्त झाले. प्रथम त्यांनीं एकमेकांचे हात धरून पादवंदन केलें; आणि दंड असे ठोकिले कीं, त्यांबरोबर बाहुभूषणांचे बंद कंपायमान झाले पुढें त्या एकमेकांनीं एकमेकांचे खांदे धरिले, आणि त्यांवर एकसारखे मुष्टींचे प्रहार चालविले. नंतर ते परस्परांला धडक्या देऊं लागले, व एकमेकांना एकमेक घासूं लागले. मग त्यांनीं हातांचे, पायांचे, बगलेंतले वगैरे अनेक पेंच केले, आणि गालांवर कपाळें हाणिलीं, तेव्हां विजेसारख्या ठिणग्या पडल्या ! नंतर त्यांनीं बाहूंनीं एकमेकांस विळखे घातले, व पायांनीं एकमेकांच्या स्नायूंवर प्रहार केले. पुढें त्यांनीं परस्परांच्या छातीवर हातांनीं घाव घातले, व दोन्ही हातांची एकत्र मूठ वळून परस्परांचीं मस्तकें हाणिलीं. नंतर ते एकमेकांचे हात मुरगळून हत्तींसारखे गर्जना करूं लागले, व एकमेकांकडे रोखून पाहून एकमेकांवर मुष्टि हाणूं लागले. पुढें, चवताळलेल्या सिंहांप्रमाणें त्यांनीं परस्परांस ओढिलें, व मग त्यांची झोंबाझोंबी सुरू झाली. नंतर त्यांनीं आपलीं अंगें एकमेकांवर घासण्यास आरंभ केला, व बाहूंनीं एकमेकांस घट्ट धरून उरावर मुठींचे प्रहार हाणिले. पुढें त्यांनीं कमरेवर व बरगड्यांत मोठ्या जोरानें कोंपरें मारण्यास सुरुवात केली, आणि तेव्हां ते दोघेही पटाईत मल्ल अंग चोरून एकमेकांचे प्रहार चुकवूं लागले. अशा प्रकारें चुकवाचुकवीस प्रारंभ झाल्यावर त्यांनीं तो क्रम सोडून दिला, व मग ते पोटाला विळखा घालून परस्परांना उरापर्यंत व गळ्यापर्यंत उचलून खालीं टाकूं लागले. नंतर त्यांनीं बाहुयुद्धांतील मर्यादा सोडून

दिल्या, व एकमेकांच्या पाठी भूमीला लावून कोंपरांनीं एकमेकांच्या उदरादिकांवर व मुठींनीं एकमेकांच्या मस्तकांवर प्रहार आरंभिले; आणि पुढें ते परस्परांचे हात, पाय, मान वगैरे तृणासारखे पिळूं लागले; व हुलकावणीनें भलभलत्याच ठिकाणीं मुष्टिप्रयोग करूं लागले !

राजा जनमेजया, ह्याप्रमाणें जरासंध व भीम ह्यांचें तें मल्लयुद्ध आणखी अनेक प्रकारांनीं झालें. त्यांचें तें अपूर्व युद्ध पाहण्याकरितां गिरिव्रज नगरांतील सहस्रावधि ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, स्त्रिया, वृद्धजन वगैरे मंडळींची त्या दोघांच्या भोंवतीं इतकी गर्दी जमली होती कीं, मुंगीचा सुद्धां रिघाव होणें कठिण होतें ! जनमेजया, ते दोघे प्रबळ वीर जेव्हां एकमेकांस धडक्या देत, मानेला हिसका देऊन एकमेकांना खालीं पाडीत व एकमेकांना उताणे पाडण्यासाठीं पाय ओढीत, तेव्हां जणू काय पर्वतावर वज्रच आदळत आहे, असा भास होई. कारण, त्या उभयतांस युद्धाविषयीं अत्यंत उल्हास असून त्यांच्या अंगीं बळही तसेंच होतें; आणि आपला प्रतिस्पर्धी कोठें व कसा फसेल ह्याविषयीं ते दोघेही जयेच्छु वीर कसे अगदीं लक्षकदृष्टीनें टपलेले होते ! राजा जनमेजया, तें युद्ध पाहून, प्रत्यक्ष इंद्र व वृत्रासुर ह्यांचेंच युद्ध चाललें आहे असें लोकांस वाटलें; व ते भीमजरासंध जेव्हां एकमेकांना लोटूं लागले, तेव्हां प्रेक्षकसमूह मागें मागें सरत चालला. राजा, नंतर त्या मल्लांनीं एकमेकांस मागून ढकलिलें, पुढें ओढिलें, तोंडघशीं पाडिलें, भूमीवरून फरफर ओढिलें, व मध्यें गुडघे घालूनही आदळिलें ! नंतर त्यांनीं परस्परांची निर्भर्त्सना केली, व पाषाणांच्या एकसारख्या प्रहारांप्रमाणें एकमेकांवर मुष्ट्यादिकांचे एकसारखे घाव घातले ! राजा, त्या प्रबल वीरांचे बाहु म्हणजे केवळ लोहाच्या अर्गळाच होत्या, व त्यांच्या योगें ते एकमेकांना आवळून धरीत होते. असो.

ह्या महात्म्यांचें तें भयंकर युद्ध कार्तिकशुद्ध प्रतिपदेस सुरू झालें; व मध्यंतरीं आहार वगैरे झाल्यावांचून एकसारखें रात्रंदिवस अविश्रांतपणानें त्रयोदशीपर्यंत चाललें होतें. चतुर्दशीस रात्रौ जरासंध थकला, व माघार घेण्याच्या बेतांत आला; पण इतक्यांत जरासंधाची ती अवस्था पाहून श्रीकृष्णानें जणू काय आपला अभिप्राय पर्यायानें व्यक्त करण्याकरितां भीमाला म्हटलें, "बा भीमा, समरभूमीवर शत्रूला ग्लानि येऊन तो पेंचाटींत सांपडल्यास त्यास पीडा करणें प्रशस्त नाहीं. अशा शत्रूवर जर पूर्ण पराक्रम गाजविला, तर तो तात्काळ मरतो; ह्याकरितां, क्लांत झालेल्या जरासंधाला तूं पीडा करूं नको. तो जसें युद्ध करील, तसेंच तूं युद्ध कर."

राजा जनमेजया, श्रीकृष्णाचें भाषण श्रवण करून भीमाची दृष्टि जरासंधाच्या क्लांत अवस्थेवर गेली; व त्या बलाढ्य जरासंधाचा वध करावयास ही योग्य संधि आहे, असें मनांत आणून तो त्यास मारण्यास सिद्ध झाला !

अध्याय चोविसावा.

—:०:—

जरासंधाचा वध.

वैशंपायन सांगतात:—राजा जनमेजया, श्रीकृष्णाचा उद्देश मनांत आणून जरासंधास मारण्याला भीमसेन सिद्ध झाला खरा; परंतु आपल्या हातून हें कार्य घडेल किंवा नाहीं, ह्याबद्दल यथास्थित विचार करून तो श्रीकृष्णास म्हणाला, "हे यादवेश्वरा, जरी मी ह्या पातक्याचा वध करण्यास सिद्ध झालों आहें, तरी माझ्या हातून हें कार्य घडेल, असें मला वाटत नाहीं; कारण, ह्याचें बळ माझ्यापेक्षां अधिक आहे."

जनमेजया, भीमाचे ते उद्गार ऐकून श्रीकृष्णानें त्वरा करून पुनः त्यास म्हटलें, "भीमा, अगदीं कालावधि करूं नको; तुझ्या अंगीं जें

काहीं दैविक सामर्थ्य असेल, किंवा वायूपासून तुला जें कांहीं वीर्य प्राप्त झालें असेल, तें सर्व आज जरासंधाशीं युद्ध करितांना प्रकट कर."

राजा पारिक्षिता, भगवान श्रीकृष्णाची आज्ञा होतांच भीमानें जरासंधाला एकदम उचलून शंभर वेळां गरगर फिरविलें, आणि भूमीवर त्याची पाठ गुडघ्यांनीं वांकवून तिचा चुराडा करून टाकिला! नंतर त्यानें मोठी गर्जना करून जरासंधाची एक तंगडी वर ओढिली, व त्याचें शरीर फाडून त्याच्या दोन चिरफळ्या केल्या! राजा जनमेजया, ह्याप्रमाणें जरासंधाच्या देहाची ओढताण व भीमाची गर्जना चालू असतां भयंकर ध्वनि उत्पन्न झाला, आणि त्यामुळें सर्व प्राणी घाबरून गेले. राजा, त्या समयीं मागध देशांतील सर्व लोक भयाकुल झाले व स्त्रियांचे गर्भ भराभर पतन पावले! भीमसेनाचा तो शब्द ऐकून, एक हिमालय पर्वताचा स्फोट झाला असावा, किंवा पृथ्वी तरी विदीर्ण झाली असावी, असें त्या मागधीय लोकांस वाटलें! असो; राजा जनमेजया, ह्याप्रमाणें जरासंधाचा भीमानें वध केला, व नंतर ते त्रिवर्ग बंधु—श्रीकृष्ण, भीम व अर्जुन—हे त्या मृत झालेल्या जरासंधास रात्रीच्या प्रहरीं राजवाड्याच्या द्वारापाशीं निद्रित असल्याप्रमाणें ठेवून तेथून निघून गेले!

राजांची मुक्तता.

राजा पारिक्षिता, ह्याप्रमाणें श्रीकृष्णानें भीमाकरवीं जरासंधाचा वध केल्यानंतर त्यानें त्या मगधाधिपतीचा ध्वजपताकेनें शोभणारा रथ जोडिला; व त्यांत भीमार्जुनांस बसवून, जरासंधानें जे राजे कोंडून ठेविले होते, त्यांची मुक्तता केली! राजा जनमेजया, त्या दीन राजांची प्राणसंकटांतून सुटका होतांच ते श्रीकृष्णापाशीं आले, व त्यांनीं मोठमोठीं अनेक रत्नें त्यास अर्पिलीं. मग भगवान श्रीकृष्णानें त्या सर्व राजांस दिव्य रथांत बसविलें, व ते सर्व जन गिरिव्रज नगरांतून बाहेर पडले. हे कुरुकुलावतंसा त्या प्रसंगीं त्या

रथाची शोभा

फार अवर्णनीय दिसली: त्यावर भगवान श्रीकृष्ण सारथ्य करीत होते; आणि भीमसेन व अर्जुन हे आंत वीरासनीं अधिष्ठित होते! ह्यामुळें, सर्व धनुर्धरांस अजिंक्य असा तो रथ अतिशयच शोभत होता! राजा जनमेजया, भगवान श्रीकृष्ण हे प्रस्तुत प्रसंगीं ज्या रथांत अधिष्ठित झाले होते, तो रथ मोठा लोकोत्तर होता. बृहस्पतीची भार्या जी तारा, तिच्यामुळें प्रवृत्त झालेल्या युद्धांत इंद्र व विष्णु हे ह्याच रथांत आरूढ होऊन समरांगणांत संचार करीत असत. ह्या रथाची कांति तापलेल्या सुवर्णाप्रमाणें झळाळत असून त्यास लहान लहान घंटांच्या माळा बांधिल्या होत्या. तो रथ चालत असतां मेघांप्रमाणें गंभीर शब्द होत असे; व त्यांतून स्वारी करणाऱ्यास केव्हांही अपयश येत नसे. राजा जनमेजया, ह्या रथांतून इंद्रानें नव्याण्णव दानवांचा वध केला. असो. अशा प्रकारच्या ह्या दिव्य रथावर ते वीरपुंगव आरूढ झाले, तेव्हां त्यांस मोठा आनंद झाला. पुढें लवकरच त्या श्रेष्ठ रथांत भगवान श्रीकृष्ण, भीम व अर्जुन अधिष्ठित आहेत असें पाहून मागधीय लोकांस मोठा विस्मय वाटला. राजा, त्या वायुवेगानें चालणाऱ्या रथास दिव्य अश्व लाविले असून त्यावर भगवान श्रीकृष्ण विराजमान होते; ह्यामुळें मोठी अद्वितीय शोभा दिसत होती. जनमेजया, त्या अपूर्व रथावर जो ध्वज फडकत होता, तो रथाच्या वर अधांतरीं होता. तो केवळ दैविक शक्तीनेंच लटकलेला होता. रथ एक योजनावर आहे तोंच तो इंद्रधनुष्याप्रमाणें महादेदीप्यमान ध्वज दृग्गोचर होत असे. असो. जनमेजया, अशा त्या दिव्य रथांत भीमार्जुनांसह श्रीकृष्ण अधिष्ठित असतां, श्रीकृष्णानें गरुडाचें स्मरण

केलें, तेव्हां तो तात्काळ त्या ठिकाणीं प्राप्त होऊन त्या रथावर आरूढ होतांच, एखाद्या उंच वृक्षाप्रमाणें तो रथ भासूं लागला! सर्पभक्षक गरुड त्या रथावर बसतांच, त्याच्या बरोबर भूतगण आपलीं मुखें विवृत्त करून गर्जना करीत ध्वजावर येऊन बसलीं; आणि मग मध्यान्हींच्या सूर्याप्रमाणें त्याचें तेज दुःसह होऊन त्याकडे कोणालाही पाहवेनासें झालें! राजा जनमेजया, तो रथ वृक्षादिकांना आडकत नसे, किंवा शस्त्रादिकांनीं त्यास इजा होत नसे; आणि तो स्वर्गलोकांतला रथ असतांनाही मनुष्यांना मृत्युलोकीं दिसत असे! जनमेजया, अशा त्या दिव्य रथांत बसून श्रीकृष्ण, भीम व अर्जुन हे गिरिव्रज नगरांतून बाहेर पडले, तेव्हां त्या रथाचा ध्वनि मेघाप्रमाणें गंभीर होऊं लागला. असो. राजा, हा दिव्य रथ इंद्रापासून वसुराजाला मिळाला होता; वसुराजापासून बृहद्रथानें मिळविला होता; व बृहद्रथापासून ओघानेंच तो जरासंधाकडे आला होता.

राजा जनमेजया, भगवान श्रीकृष्ण त्या दिव्य रथांतून गिरिव्रज नगराच्या बाहेर गेल्यावर त्यांनीं सपाट प्रदेशावर तो रथ उभा केला. तेथें गिरिव्रज नगरांतील ब्राह्मणप्रमुख सर्व लोक त्यांच्या सत्कारासाठीं जमले, व त्यांनीं यथाविधि पूजन करून त्या त्रिवर्ग बंधूंचा बहुमान केला. नंतर बंधांतून विमुक्त झालेल्या राजांनीं अर्घ्यपाद्यादिकांनीं श्रीकृष्णाची पूजा केली, व त्यास स्तुतिपूर्वक म्हटलें, "हे देवकीनंदना, तुझें अद्वितीय शौर्य व त्यांत आणखी भीमार्जुनांचें साहाय्य, तेव्हां तुमच्याकडून धर्माचें प्रतिपालन झालें, ह्यांत नवल तें काय आहे? जरासंधरूप घोर हदांतील दुःखरूप चिखलांत बुडून जात असतां आम्हां दीन राजांना तू तारिलेंस, हें तुझ्या ठायीं सयुक्तिकच आहे. हे यादवेश्वरा श्रीहरे, गिरिव्रज नगरांतील महाभयंकर किल्ल्यांत कोंडून ठेविलेल्या आम्हांला सुदैवानें सोडविल्यामुळें तूं अत्यंत उज्ज्वल कीर्ति मिळविलीस. देवा, आम्हीं काय करावें तें आम्हांस सांग; आम्ही तुझे अगदीं दास आहों. तू जी आज्ञा करशील, ती कितीही दुष्कर असली तरी आम्ही तात्काळ पूर्ण करूं."

वैशंपायन सांगतातः—राजा जनमेजया, बंधांतून मुक्त झालेल्या राजांची प्रार्थना श्रवण करून भगवान हृषीकेश श्रीकृष्ण त्यांस गौरवून म्हणालाः—नृपहो, युधिष्ठिर राजा राजसूय यज्ञ करण्याची इच्छा करीत आहे, ह्यास्तव साम्राज्यपद प्राप्त व्हावें म्हणून यत्न करणाऱ्या त्या धर्मशील युधिष्ठिराला तुम्हीं सर्वांनीं मनापासून साहाय्य करावें. जनमेजया, श्रीकृष्णाची आज्ञा श्रवण करून त्या सर्व भूपालांनीं मोठ्या प्रेमानें त्या आज्ञेचा अंगीकार केला, व त्यास 'बरें आहे' असें उत्तर देऊन ते त्यांजबरोबर धर्मराजास भेटण्याकरितां निघाले. त्या राजांनीं श्रीकृष्णास पुष्कळ रत्नें समर्पिलीं, पण तीं घ्यावीं असें श्रीकृष्णास वाटेना; परंतु अखेरीस त्या राजांविषयीं श्रीकृष्णाचें मन फारच द्रवलें, व त्यांच्या संतोषाकरितां म्हणून त्यानें त्यांचा स्वीकार केला!

राजा जनमेजया, इतक्यांत जरासंध राजाचा पुत्र महात्मा सहदेव हा, अमात्य व स्वजन ह्यांसह पुरोहितास बरोबर घेऊन त्या स्थलीं प्राप्त झाला; व बहुत रत्नें श्रीकृष्णाच्या पुढें ठेवून मोठ्या विनयानें हात जोडून उभा राहिला. तेव्हां त्या लोकनायकानें, भयभीत झालेल्या त्या जरासंधपुत्रास अभय दिलें; व त्यानें अर्पण केलेल्या उंची रत्नांचा अंगीकार करून त्यास तेथच्या तेथेंच राज्याभिषेक केला. राजा जनमेजया, ह्याप्रमाणें श्रीकृष्णाची व सहदेवाची मैत्री घडून पुढें भीमार्जुनांची व सहदेवाची मैत्री जमली; आणि सहदेवाचा सर्वांनीं सत्कार केल्यावर तो पुनः गिरिव्रज राजधानींत परत गेला.

राजा जनमेजया, ह्याप्रमाणें श्रीकृष्ण व भीमा-

र्जुन हे विजयी झाले, आणि विपुल रत्नें बरोबर घेऊन त्या जरासंधपुरांतून पुनः इंद्रप्रस्थास जाण्यासाठीं निघाले, व लवकरच धर्मराजास येऊन भेटले. राजा, इंद्रप्रस्थास आल्यावर श्रीकृष्ण मोठ्या हर्षानें युधिष्ठिरास म्हणालाः—हे धर्मराजा, सुदैवानें भीमाच्या हातून बलिष्ठ जरासंधाचा वध होऊन त्याच्या बंदिशाळेंतील राजे मुक्त झाले. राजा, हे पहा भीमार्जुन कांहींएक अपकार न होतां सुखरूपपणें येथें परत आले आहेत!

राजा जनमेजया; नंतर युधिष्ठिरानें अर्घ्यपाद्यादिकांनीं श्रीकृष्णाची पूजा केली, आणि मोठ्या उल्हासानें भीमार्जुनांस आलिंगन दिलें. असो. ह्याप्रमाणें जरासंधाचा वध होऊन भीमार्जुनांस लोकोत्तर जय मिळाल्यावर अजातशत्रु धर्मराजा आपल्या भ्रात्यांसहवर्तमान मोठा आनंदित झाला. नंतर, गिरिव्रज नगरींतून श्रीकृष्णाबरोबर जे राजे इंद्रप्रस्थास आले होते, त्यांच्या भेटी ज्यांच्या त्यांच्या वयाप्रमाणें, भ्रात्यांसहवर्तमान युधिष्ठिरानें घेतल्या; आणि त्यांचा सत्कार करून त्यांस निरोप दिला. नंतर ते सर्व राजे मोठ्या आनंदानें उच्चनीच वाहनांवरून सत्वर आपआपल्या नगरांत गेले.

श्रीकृष्णाचें द्वारकेस गमन.

राजा, जनमेजया, ह्या प्रकारें महाबुद्धिमान पुरुषश्रेष्ठ जनार्दनानें बुद्धिपुरःसर पांडवांच्या हस्तें जरासंधाचा वध करविला; आणि नंतर धर्मराज, कुंती, द्रौपदी, सुभद्रा, भीमसेन, अर्जुन, नकुल, सहदेव व धौम्य मुनि ह्यांचा निरोप घेतला. मग तो जगदात्मा, पूर्वी धर्मराजानें पाठविलेल्या ज्या मनोजव दिव्य रथांतून द्वारकेहून इंद्रप्रस्थास आला होता, त्याच रथांत आरूढ झाला; व आपल्या मनोहर कीर्तीनें दाही दिशा दुमदुमित करीत पुनः आपल्या नगरीस (द्वारकेस) परत जाण्यास निघाला. त्या समयीं मंगलमूर्ति श्रीकृष्णास धर्मप्रमुख पांडवांनीं प्रदक्षिणा केली, आणि मग ती भगवंताची स्वारी मार्गी क्रमूं लागली.

पारिक्षिता, श्रीकृष्ण परमात्मा द्वारकेस गेल्यावर इकडे पांडवांनीं महान महान जय मिळविले; आणि राजे लोकांस अभय देऊन आपलें अनुपम यश चोहोंकडे प्रसृत केलें. त्यामुळें द्रौपदीस अत्यंत आनंद झाला. राजा, त्या प्रसंगीं धर्म, काम व अर्थ हे त्रिविध पुरुषार्थ वृद्धिंगत करण्याकरितां जें जें कर्तव्य उचित होतें, तें तें सर्व युधिष्ठिरानें यथाविधि केलें, व प्रजांना संतोष देऊन उत्कृष्ट लौकिक संपादिला.

दिग्विजयपर्व.

अध्याय पंचविसावा.

—:०:—

दिग्विजयाचें संक्षिप्त कथन.

वैशंपायन सांगतातः—राजा जनमेजया, तें श्रेष्ठ गांडीव धनुष्य, मोठेमोठे अक्षय्य भाते, दिव्य रथ व ध्वज, आणि ती अपूर्व सभा प्राप्त झालेली अवलोकन करून अर्जुन धर्मराजास म्हणाला, "हे युधिष्ठिरा, धनुष्य, अस्त्र, दिव्य पराक्रम, श्रीकृष्णासारखा साहाय्यकर्ता, दुर्ग, बल व कीर्ति ह्या सर्व अपेक्षित दुर्लभ वस्तु आपणास प्राप्त झाल्या आहेत; तेव्हां आतां राजसूय यज्ञाच्या परिसमाप्तीसाठीं धनभांडागार वृद्धिंगत करावें असें मला वाटतें. ह्याकरितां मी सर्व भूपतींपासून करभार घेऊन येतों. प्रथम मी उत्तर दिशेस धनाधिपति कुबेर ह्याच्या राज्यांत सुमुहूर्तीं प्रयाण करण्याची इच्छा करीत आहें."

वैशंपायन सांगतातः—राजा जनमेजया, अर्जुनाचें तें भाषण श्रवण करून धर्मराज युधिष्ठिरानें प्रेमळपणानें व गांभीर्यानें म्हटलें, "बा अर्जुना, सत्पात्र ब्राह्मणांकरवीं स्वस्तिवाचनादि मंगलप्रद विधि करवून दुष्टांस शासन करण्यासाठीं व सुष्टांस आनंद देण्यासाठीं तूं प्रयाण कर. बा भारतश्रेष्ठा, तुला निश्चयानें विजय मिळेल व तुझे मनोरथ सिध्दीस जातील." राजा जनमेजया, धर्मराजाची ह्याप्रमाणें आज्ञा झाल्यावर, अद्भुत कर्में करणाऱ्या त्या अग्निदत्त दिव्य रथांत पार्थ अधिष्ठित झाला; व मोठें सैन्य बरोबर घेऊन सुमुहूर्तीं दिग्विजयास बाहेर पडला. नंतर तो महापराक्रमी भीमसेन व ते पुरुषश्रेष्ठ नकुलसहदेव ह्यांनींही धर्मराजाच्या आज्ञेनें तोच क्रम स्वीकारिला.

जनमेजया, कुबेरानें पालन केलेली ती उत्तर दिशा अर्जुनानें जिंकून घेतली; भीमानें पूर्व दिशेस विजय मिळविला; सहदेवानें दक्षिण दिशा वश केली; व अस्त्रें जाणणाऱ्या नकुलानें पश्चिम दिशेस पांडवांचें आधिपत्य स्थापिलें. राजा पारिक्षिता, ह्याप्रमाणें चारही भ्रात्यांनीं सर्व पृथ्वी जिंकून विपुल लक्ष्मी इंद्रप्रस्थास आणिली, तेव्हां धर्मराज युधिष्ठिर सुहृद्गणांसमवेत अतुल वैभवानें शोभूं लागला.

अध्याय सव्विसावा.

—:०:—

अर्जुनाचा दिग्विजय.

जनमेजय राजा विचारतोः—अहो ब्रह्मवर्य, तुम्हीं दिग्विजयाचें संक्षिप्त वर्णन केलें, तेवढ्यानें माझें समाधान होत नाहीं; ह्यास्तव तो सर्व इतिहास तुम्ही विस्तृतपणें निरूपण करा; कारण पूर्वजांचीं तीं दिव्य चरित्रें मला अधिकाधिकच ऐकावींशीं वाटतात.

वैशंपायन सांगतातः—राजा, बरें आहे. भीमादिक पांडुपुत्रांनीं ही सर्व पृथ्वी एका कालींच जिंकिली; परंतु प्रथम मी तुला, अर्जुनानें कसा दिग्विजय केला तो सर्व इतिहास सांगतों.

राजा, त्या महाधनुर्धर अर्जुनानें प्रथमारंभीं कुलिंद देशांतील भूपाल आपल्या हस्तगत करून घेतले. त्यांस जिंकण्यास त्यास फारसा पराक्रम गाजवावा लागला नाहीं. नंतर त्यानें आनर्त व कालकूट ह्या देशांवर आपलें वर्चस्व स्थापून सुमंडल राजाचा सैन्यासुद्धां पराजय केला. पुढें अर्जुन सुमंडलासह शाकलद्वीप व प्रतिविंध्य राजा ह्यांवर चालून गेला. त्या समयीं शाकलद्वीपांतील व सप्तद्वीपांतील सर्व राजांशीं अर्जुनाच्या सैन्याचें घोर युद्ध झालें. जनमेजया, त्या महापराक्रमी राजांना सुद्धां अर्जुनानें जिंकलें, आणि त्या सर्व राजांसहित प्राग्ज्योतिष देशावर त्यानें स्वारी केली. राजा, त्या प्राग्ज्योतिष देशाचा अधि-

पति भगदत्त नांवाचा होता, त्याजबरोबर अर्जुनाचें अत्यंत भयंकर युद्ध झालें. राजा, त्या देशांत किरात, चीन व दुसरे पुष्कळ सागरतीरवासी योद्धे होते, त्यांसहवर्तमान भगदत्त राजानें अर्जुनाशीं आठ दिवस संग्राम केला; आणि नंतर, अर्जुनाचें बळ पूर्ववत् ठाम आहे असें अवलोकन करून प्रसन्न मुद्रेनें भगदत्त म्हणाला, " हे रणधुरंधरा कौरवनंदना, तुझ्या अंगीं जें हें अद्वितीय क्षात्रतेज वसत आहे, तें तुझ्या इंद्रांशास अनुरूपच होय. पार्था, मी महेंद्राचा सखा असून युद्धामध्यें अगदीं तत्तुल्य आहें; परंतु तुझ्यापुढें युद्ध करण्यास माझ्या ठिकाणीं सामर्थ्य नाहीं. ह्यास्तव, हे पांडुनंदना, तुझा कोणता मनोरथ असेल तो मला सांग, म्हणजे तो मी परिपूर्ण करितों. "

अर्जुन म्हणाला:—हे भगदत्ता, कुरुश्रेष्ठ धर्मपुत्र युधिष्ठिर हा मोठा सत्यवक्ता, धर्मशील, यज्ञयाग करणारा, व याचकांस विपुल दक्षिणा देणारा असा असून, सार्वभौमपदप्राप्तीच्या इच्छेनें राजसूय क्रतु करण्याची इच्छा करीत आहे, तर त्यास त्वां करभार द्यावा. राजा भगदत्ता, तू माझ्या पित्याचा मित्र असून माझ्यावर तुझें प्रेम फार आहे; म्हणून तुझ्यावर हुकमत चालवावी, असें मला वाटत नाहीं. ह्यास्तव तूं प्रेमानेंच खंडणी द्यावी हें उचित आहे.

भगदत्त म्हणाला:—हे कुंतीपुत्रा, जसें तुझ्यावर माझें प्रेम आहे, तसेंच युधिष्ठिरावरही माझें प्रेम आहे, ह्यास्तव तुला करभार तर मी अर्पण करितोंच, पण आणखी तुझा कोणता मनोरथ आहे, तो विदित कर.

अध्याय सत्तावीसावा.

—:०:—

अर्जुनकृत नानादेशजय.

वैशंपायन सांगतात:—राजा जनमेजया, भगदत्ताचें भाषण ऐकून अर्जुनानें त्यास उत्तर दिलें, " हे भगदत्ता, तू करभार देण्याचें कबूल केलेंस, एवढयानेंच आमचें सर्व कार्य सिद्धीस जाईल; ह्यास्तव तूं आणखी कांहीं करावयास नको. " राजा पारिक्षिता, ह्याप्रकारें भगदत्तास वश करून घेऊन कुंतीपुत्र विक्रमशाली धनंजय प्राग्ज्योतिष देशांतून उत्तर दिशेस कुबेराच्या मुलखांत शिरला. तेथें त्यानें अंतर्गिरि, बहिर्गिरि, उपगिरि व सर्व पर्वत जिंकून घेतले, आणि त्या प्रदेशांत वास करणाऱ्या सकल भूपतींस स्वाधीन करून घेऊन त्या सर्वांपासून खंडणी ग्रहण केली, व त्यांचीं राज्यें त्यांजकडेच ठेवून त्या सर्वांसह तो उलूक देशांत बृहन्त राजावर चालून गेला. राजा जनमेजया, तो बृहन्त राजा उत्तम मृदंगाच्या रथचक्रांच्या व महान हत्तींच्या दिव्य घोषानें सर्व भूमंडळ कंपायमान करीत असे. आपणावर अर्जुन चालून आला, असें जाणून तो तात्काळ चतुरंग सैन्यानिशीं नगरांतून बाहेर पडला, व त्यानें अर्जुनाबरोबर घोर युद्ध आरंभिलें. राजा, त्या समयीं अर्जुन व बृहन्त ह्यांचा भयंकर संग्राम झाला, आणि अखेरीस धनंजयाच्या पराक्रमापुढें त्याचें कांहीं चालेनासें होऊन, इतरांना अजिंक्य असा तो पर्वताधिपति बृहन्त राजा सर्व प्रकारच्या रत्नकोशासहित अर्जुनास शरण आला. नंतर अर्जुन बृहन्ताचें तें राज्य त्याकडेच ठेवून त्यासहवर्तमान सेनाबिंदूवर चाल करून गेला; व त्यास राज्यपदावरून काढून टाकून प्रजाजनांनीं गजबजून गेलेले मोदापुर, वामदेव, सुदामा व उत्तरउलूक ह्या देशांचे राजे त्यानें एकत्र मिळविले, आणि त्यांजकडून धर्मराजाचें आधिपत्य कबूल करून घेतलें. पुढें अर्जुन तेथेंच राहिला, व त्यानें तेथूनच धर्मराजाच्या आज्ञेप्रमाणें आपल्या सैनिकांकरवीं पंचगण देश आपल्या ताब्यांत आणिला. राजा जनमेजया,

नंतर तो विजयशाली अर्जुन पंचगण देशांतील भूपालांसमवेत सेनाबिंदु राजाच्या देवप्रस्थ नामक राजधानीस गेला, व त्यानें तेथें चतुरंग दळासहित वास्तव्य केलें. पुढें बरोबरच्या सर्व राजांसमवेत तो महापराक्रमी धनुर्धर पार्थ, पौरव कुलांतील विश्वगश्व राजावर चालून गेला, आणि पर्वतांत राहणाऱ्या सर्व महारथांचा युद्धांत पराभव करून त्यानें राजधानी हस्तगत केली; व विश्वगश्व राजास जिंकून पर्वतांत राहणाऱ्या सात प्रकारच्या रानवट चोरट्यांचा विध्वंस उडविला.

राजा जनमेजया, ह्याप्रमाणें विश्वगश्व राजाला व पर्वतांतील चोरट्यांना जिंकल्यानंतर, तो क्षत्रियाग्रणी पार्थ काश्मीराकडे वळला. तेथें जे वीर त्याच्याशीं युद्ध करण्यास आले, त्यांचा त्यानें पराभव केला; व त्या प्रांतांतील दहा मांडलिक नृपांसह लोहित राजास आपल्या ताब्यांत आणिलें. नंतर त्रिगर्त, दार्व व कोकनद ह्या देशांतील अनेक क्षत्रियांनीं पार्थास विपुल करभार दिला. पुढें त्या कौरवनंदनानें अत्यंत रमणीय अशी अभिसारी नामक नगरी जिंकून घेतली, व उरगवासी रोचमानाचा युद्धांत पराजय केला. मग, चित्रायुधानें रक्षण केलेलें सिंहपूर नामक सुंदर नगर धनंजयानें समरभूमीवर पराक्रम गाजवून उडवून टाकिलें. नंतर त्यानें सुह्म व चोल ह्या देशांवर सर्व सैन्यासह चाल केली, व त्या देशांचा नाश करून तो बाल्हीक देशांत शिरला. राजा, ह्या बाल्हीक देशांत भयंकर रण माजलें, व त्यांत मोठा संहार होऊन अखेरीस त्या देशांतील सर्व अजिंक्य राजे अर्जुनाच्या हस्तगत झाले. पुढें निवडक वीर बरोबर घेऊन इंद्रपुत्र अर्जुन कांबोज व दरद ह्या देशांवर चालून गेला, आणि त्यांतील राजांचा पराभव करून त्यानें त्यांस स्वाधीन करून घेतलें. नंतर अर्जुनानें ईशान्य दिशेस वनामध्यें वास करणाऱ्या चोरट्या लोकांचा पराभव करून त्या प्रांतांतील लोकांस सुखी केलें. मग अर्जुनानें लोह, परमकांबोज व उत्तरऋषिक ह्या देशांवर हल्ला केला, आणि तेथें एकवटलेल्या सर्व राजांना जिंकून घेतलें. राजा जनमेजया, त्या देशांत ऋषिकांचा व अर्जुनाचा फारच भयंकर संग्राम झाला; आणि तो पाहून, केवळ देवांचा व दैत्यांचाच संग्राम चालला आहे, असें भासलें. राजा, त्या युद्धांत अर्जुनानें ऋषिकांचा पराभव करून त्यांपासून शुकोदरवर्णाचे आठ अश्व करभार म्हणून ग्रहण केले. पुढें तो महाप्रतापनिधि अर्जुन उत्तरऋषिकांवर चालून गेला, व त्यानें त्यांजबरोबर युद्ध करून त्यांजपासून मयूरवर्णाचे व शीघ्रगामी असे अनेक अश्व खंडणीदाखल ग्रहण केले. असो. ह्याप्रमाणेंच त्यानें हिमवान् व निष्कुट पर्वतावर स्वारी करून त्यावरील लोकांचा पराभव केला, आणि तो श्वेतपर्वतावर जाऊन तेथेंच राहिला.

अध्याय अठ्ठाविसावा.

—:०:—

अर्जुनकृत उत्तरदिग्विजय.

वैशंपायन सांगतात:—राजा जनमेजया, त्या पांडवश्रेष्ठ महाबलिष्ठ अर्जुनानें श्वेत पर्वताचें उल्लंघन करून किंपुरुषावास नामक देशावर स्वारी केली; आणि त्या देशाचा संरक्षक द्रुमपुत्र म्हणून एक राजा होता, त्याशीं अर्जुनाचें घोर युद्ध होऊन त्यांत पुष्कळ क्षत्रिय पतन पावले. परंतु अखेरीस अर्जुनानें द्रुमपुत्रास जिंकून त्याजपासून करभार घेतला. राजा जनमेजया, किंपुरुषावास देश जिंकल्यानंतर अर्जुनानें सैन्यानिशीं हाटक देशावर चाल केली. तो देश गुह्यकांच्या स्वाधीन असून ते त्या देशाच्या संरक्षणाकरितां फार झटत होते. राजा, कोणाशीं कसें वर्तन ठेवावें हें पार्थास उत्तम माहीत असे. ह्यास्तव त्या परम दक्ष